॥ श्री ॥

महाकविहोमरकृत

इलियडचें

कवितावद्ध मराठी भाषांतर.

भाग १ ला.

गणेश रामकृष्ण हवलदार, बी. ए. एल्. एल्. बी.
सुपरिन्टेन्डन्ट, हायकोर्ट, अपील शाखा, मुंबई,
यांनीं केलें.

सन १९१३–शके १८३५.

आवृत्ति १ ली.

समग्र ग्रंथ भाग १ व २ मिळून
किंमत २॥ रुपये.

Registered under Act XXV of 1867.

Printed by C. S. Deole, at the Bombay Vaibhav Press, Servants of India Society's Building, Sandhurst Road, Girgaum, Bombay.

and

Published by Ganesh Ramkrishna Havaldar, Angre's Wadi, Girgaum, Bombay.

अर्पणपत्रिका.

कवण श्रेष्ठ असे बा देवांमाजी व गुरुजनांमाजी? ।
यक्ष पुसे धर्म कथी सानुक्रम जो पिता व माता जी ॥ १ ॥

विद्या दिलि ज्या गुरुनीं लोभानें अथ कदापि कोपानें ।
अमरत्व या सुधेनें ये स्वर्गींच्या न त्या सुधापानें ॥ २ ॥

आप्तेष्ट मित्र बांधव ज्यांविण जगती दिसेल दीर्घ वन ।
ज्या रसिक वाचकांविण काव्य गमे मधुकरांविणें सुमन ॥ ३ ॥

मूका वाचाल करी पंगुस गिरि लंघवी कृपा ज्याची ।
त्यां त्यांस अर्पितों ही कृति मम सेवा विनम्र दासाची ॥ ४ ॥

भाषांतरकर्ता.

॥ श्री ॥

वांच्छानंदीं बुध वदति कीं सृष्टि होते जगाची ॥
कर्मानंदीं स्थिति अनुभवा येत लोकांस साची ॥
ब्रह्मानंदीं लय घडतसे ज्ञान होतां पराचें ॥
आनंदें या त्रिगुणित घडो कार्य भाषांतराचें ॥ १ ॥

आलिम्पसीं करुन गायन भागलीस ।
वाग्देवि ! मंदिरिं सुनिद्रित जाहलीस ॥
नाहीं श्रमापहृति काय अजून झाली ।
नेत्रांवरी ह्मणुन जागृति ती न आली ॥ २ ॥

पूर्वेकडेस फुलली कळि त्या रवीची ।
कीं स्फूर्ति हृष्ट कविच्या हृदिं थोरवीची ॥
हें गोड काव्यसम गान विहंगमांचें ।
निद्रा तुझी न दवडी ! फल हें कशाचें ? ॥ ३ ॥

नेत्रांस गच्च अधिकाधिक आंवळोनी ।
घेतेस हात आणि पायहि आंखडोनी ॥
ओढून पांघरुण तूं वळसी कुशीला ।
शोभे तुलाच कृति वंचक एकलीला ॥ ४ ॥

वाद्यांतें शिवली न अंगुलि गमे फारां दिसांनीं तव ।
नाहीं अंकुर ते ह्मणून फुटले निर्जीव काष्ठां नव ।
क्रौर्यातें त्यजिलें न हिंस्र पशुनीं होवोनि नादावश ।
सारे नाचति कां न लोक ! भरल्या मोदें दिशा जों दश ॥ ५ ॥

घेसी झोंप किती ! कलांस कुठलें येईल गे जीवन ? ।
शब्दां भूषण कोठलें? अमृत तें वर्षेल कैसा घन ? ॥
कैसा वाहिल ओघ जो नवरसें संपूर्ण, पृथ्वीवरी ! ।
कैसें सौख्य उचंबळेल, जल कीं त्या मानसाच्या सरीं ! ॥ ६ ॥

सांगें तूं बघशील गे मजकडे केव्हां कृपादृष्टिनें ॥
केव्हां मस्तकिं हस्त ठेवशिल गे सप्रेमशा बुद्धिनें ॥
केव्हां होइल गे प्रसाद अवघे जेणें मिळे तत्त्वतां ।
कार्यां सिद्धि, मनोरथां सफलता, इच्छेस संपूर्णता ॥ ७ ॥

थांबा; ही निज हस्तपाद पसरी आळे पिळे द्यावया ।
वाटे घालवितात आळस मुखांतोनी हिच्या जांभया ॥
नेत्रां ही उघडी बरेच सुजले जे दीर्घ निद्रेस्तव ।
लावी दृष्टि जलार्द्र अल्प तिरपी जी होय निष्कैतव ॥ ८ ॥

मातें पाहुनी ही उभी दचकुनी शय्या त्यजोनी दुरी ।
लावी हात मुखास एक दुसरा ठेवोनि तैसा उरीं ।
बोले " कोण? कुठून येसि? दिसतें हें धाष्टर्य मोठें तव ! " ।
"खाणारा सुफलें धरेवरिल मीं आलों इथें मानव ॥ ९ ॥

आहें होमरभक्त मी न परका, मी दास आहें तव ।
झालों लीन पदीं विनंति करण्या केल्या विना लाघव ॥
तो माझा प्रिय देश, आद्य कविचा जो देश वाल्मीकिचा ।
तूतें होमरबन्धुचा ह्मणुनियां होईल जो प्रीतिचा ॥ १० ॥

तेथें येउन कंठ साफ करण्या थोडें करीं गायन ।
सांगें होइल लुप्त ही तव अनाभ्यासें कला काय न ?

सौन्दर्या सजवील जो निजगुणें पोषाख हा साजरा ।
घेई तूं; नलगे प्रसाधनकला तूतें बिचारी जरा ॥ ११ ॥

घे चोळी लुगडें घरून आणिलीं; टाकीं, नको हा झगा ॥
वीणा घे स्वरसिन्धु तज्ज्ञ ह्मणती ज्या गायनाचा सगा ॥
अग्रीं वाहन हा मयूर नटला जो होय आर्या प्रिय
हो तूं पूर्ण सरस्वती; मम कृती गातां तुझा हो जय ! ” ॥ १२ ॥

प्रस्तावना.

सकल जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांत प्रमुखत्वानें असलेल्या इंग्रजी राष्ट्राचा अम्मल आमच्या देशावर चालू झाल्यावर इंग्रजांनीं केलेल्या सुधारणेपासून जे अनेक फायदे झाले आहेत त्यांतील एक मोठा फायदा असा झाला आहे कीं पृथ्वीच्या चारी टोंकांचे लांबलांबचे प्रदेश दळणवळणाचीं साधनें वाढल्यामुळें, एकाच देशाच्या विभागाप्रमाणें संन्निकृष्ट झाले आहेत. ह्मणून नानादेशांतील धनसंपन्न व्यापारी आपआपल्या देशांतील चांगल्या चांगल्या पदार्थांचा पुरवठा आमच्या देशांतील लोकांस करतात व आमच्या देशांतील चांगल्या पदार्थांचा पुरवठा इतर देशांतील लोकांस करतात. हें ह्मणणें जसें शारीरिक सुखाची वृद्धि करणाऱ्या पदार्थांच्या पुरवठ्यास लागू पडतें तसेंच विद्याविषयक मानसिक सुखाची वृद्धि करणाऱ्या ज्ञानप्रसारक ग्रंथांच्या पुरवठ्यास ह्मणजे विनिमयासही लागू पडतें. या ग्रंथांच्या पुरवठ्यानें घरीं बसून श्रेष्ठ लोकांचा सहवास हवा त्यास मिळतो. **श्रीव्यास, वाल्मीकि, होमर** हे कविताशाखेवर आरूढ होणारे कोकिल सर्वश्रुतिमनोहर काव्यालाप पंचम स्वरांत आह्मांस ऐकवतात. **केल्व्हिन**सारखीं विद्वद्रत्नें भौतिकशास्त्रज्ञानाचा प्रकाश पाडून अज्ञानतम दूर करतात. **न्यूटन** आपल्या गुरुत्वाकर्षणपद्धतीचें विवेचन करतो. **गिबन** इतिहासाचें रहस्य कथन करतो. **मनु** व **जस्टिनिअन** समाजसंस्थेचें रक्षण करणाऱ्या कायद्यांचें स्वरूप समजावून सांगतात. **डेमास्थनीस, सिसरो, बर्क** व **पिट** हे आपल्या अलौकिक वक्तृत्वानें चित्तवृत्ती हरण करून नेतात. **गॅलिलिओ** आपल्या नलिकेच्या साहाय्यानें ग्रहमालिका आकाशांत अगदीं जवळ आणून दाखवतो. **प्लेटो** हा आपल्या **अरिस्टॉटल** आदिकरून शिष्यांसहवर्तमान तर्कमय तत्त्वविवेचन करतो. **डार्विन** आपला जीवनकलहावरील निबंध वाचतो.

महाकवि शेक्सपिअर मनुष्यस्वभावाचें इंगित स्पष्ट करून सांगतो व कालिदास उत्तम कल्पनांनीं मनोरंजन करून बोधामृत पाजतो. मिल्टन वेळेस झोंपडीचें नंदनवनच बनवतो. असे एक कीं दोन ह्मणावे ! शेवटीं श्रीशंकराचार्य आपली परा विद्या कथन करून ब्रह्मानंदांत मग्न करून सोडतात.

हा विद्याविनियम वडवून आणण्यास मुद्रणकलेचा उपयोग फार झाला आहे. आमच्या इकडील प्राचीन विद्यांचें अधिष्ठान जशी संस्कृत भाषा आहे तशी पाश्चिमात्य प्राचीन व अर्वाचीन विद्यांचें अधिष्ठान इंग्रजी भाषा आहे. अनेक ठिकाणीं विद्यापीठें स्थापन करून या दोन्हीं भाषांचा प्रसार करून इंग्रज सरकारनें आह्मांस ऋणी करून ठेवलें आहे. या दोन्ही भाषा वरील वाग्विनिमयाचे कामांत उत्तम कामगिरी बजावीत आहेत.

असो. अशा रीतीनें घरीं बसून आपलें मनोरंजन करीत असतां " बाणोच्छिष्टं जगत्सर्वम् " अशी जी एक बाणाविषयीं प्रशंसापर उक्ति आहे तशी होमरविषयीं एक माझ्या वाचण्यांत आली. तिचा सारांश असा आहे कीं एक वेळ होमर *वाचा ह्मणजे दुसरें कोठलेंही पुस्तक वाचण्याची अपेक्षा उरणार नाहीं. +व्यासांविषयींही अशीच एक उक्ति आहे. नंतर मोठ्या कुतूहलानें होमरचें इलियड वाचलें, तेव्हां वरील उक्ति सार्थ आहे असा अनुभव आला व त्याचें भाषांतर मराठी वाचकांकरतां करावें अशी

---

*Read Homer once and you can read no more,
For all books else appear so mean, so poor,
Verse will seem prose, but still persist to read
And Homer will be all the books you need.

*ह्मणऊनी महाभारतीं नाहीं । तें नोहे लोकीं तिहीं । येणें कारणें ह्मणिपे पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्रय ॥ १ ॥
ज्ञानेश्वर.

इच्छा झाली. ती परमेश्वराच्या कृपेनें पुरी झाली. ह्मणून नम्रपणें त्याचे धन्यवाद गाऊन मराठी वाचकांस हें भाषांतर सादर करीत आहें.

या भाषांतराविषयीं दोन शब्द येथें लिहिणें वावगें होणार नाहीं. खरें ह्मटलें ह्मणजे भाषांतरकर्त्यानें खालील गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. भाषांतर असें उतरलें पाहिजे कीं वाचणाऱ्यास त्याचा अर्थ स्पष्टपणें कळून आनंद वाटला पाहिजे. निदान अर्थ समजावयाला तरी जड जातां कामा नये. शब्दाचा जो रूढार्थ असेल तो टाकून दुसऱ्याच लाक्षणिक अर्थानें तो वापरून ' याचा येथें विशिष्ट अर्थ असा आहे ' अशी टीप देण्याचा प्रसंग अगदीं टाळला पाहिजे. दुसरी अशी कीं ज्या भाषेंतून भाषांतर केलेलें असेल त्या भाषेचें ज्ञान करून जर कोणास घ्यावयाचें असेल तर तसें करून घेण्यांत वाचकांस भाषांतरापासून साहाय्य झालें पाहिजे; ह्मणजे मूळांतील अर्थ पूर्णपणें भाषांतरांत आला पाहिजे. तो तितक्याच शब्दांत नसला तरी चालेल पण तो अर्थ मात्र सरळ व साध्या भाषेंत आला पाहिजे. कांहीं पदरचें घालून उपयोग नाहीं किंवा कमीही करतां कामा नये. जसा संक्षेप इष्ट नाहीं तशी वृद्धिही ग्राह्य नाहीं. ह्मणून भाषांतराचें काम वाटतें तितकें सोपें नाहीं. व्याकरणशुद्ध भाषांतर होण्यापलिकडे सर्वत्र सारखें मूळचें सौन्दर्य येईल असें हटकून सांगतां येणार नाहीं; कारण कवितेचें भाषांतर निर्दोष करणें हें जवळ जवळ अशक्य आहे. एकींतला जीवनरस दुसरींत भरतां यावयाचा नाहीं. शब्द ह्मणजे केवळ खुर्दा नाहीं. असते, तर ते देऊन दुसऱ्या जातीचीं नाणीं घेतां आलीं असतीं. एक वेळ शास्त्रीय शब्दांचें भाषांतर तंतोतंत करतां येईल. घनमूळ हें **ग्री**कांना सारखेंच व **र**शिअनांसही सारखेंच. परंतु कविता ह्मणजे राष्ट्र-क्षेत्रांत लावलेल्या भाषालतेची एक मंजरीच होय. तींतून लोकांचे आचार विचार फलद्रूप होत असतात. ह्मणून **हो**मरच्या काव्यांतील **ग्री**कांच्या

रक्तास चालन देणारा मूळ शब्द कोणीकडे व भाषांतरांत दाखल झालेला अन्य भाषेंतील शब्द कोणीकडे ! तथापि इंग्रजी भाषेच्या अंगीं वाटेल त्या अर्थाचा बोध करण्याची शक्ति आहे; व उत्तम उत्तम विद्वानांनीं पुष्कळ परिश्रम घेऊन इलियडचें भाषांतर केलेलें आहे. तें शक्य तितकें उत्तम वठलेलें असल्याचा संभव आहे. ज्या मराठी भाषेंत भारत रामायणादि जगन्मान्य जगड्व्याळ ग्रंथाचें भाषांतर होऊं शकतें, व ज्ञानेश्वरी सारखें तत्त्वज्ञानमय काव्य होऊं शकतें, त्या मराठी भाषेंत योग्य परिश्रम केल्यास होमरच्या इंग्रजी भाषांतरावरून मराठींत भाषांतर चांगलें होण्यास विशेष अडचण पडणार नाहीं. आणखी एक अडचण जरी ती विशेष नाहीं, तरी नमूद करून ठेवण्यासारखी आहे, ह्मणून नमूद करून ठेवतों. ती ही. होमरच्या इलियडमध्यें प्रक्षिप्त भाग बराच आहे. तो हीन कवीनीं केला असल्यामुळें होमरकृत भागाइतका सरस नाहीं. त्याचें भाषांतर अगदीं बरोबर केलें ह्मटलें ह्मणजे तें तितकेंच नीरस उतरेल हें सांगावयास नको. माझ्यावरची जबाबदारी टाळण्याकरतां हें लिहिलें आहे, असें नव्हे. जी गोष्ट आहे ती नमूद करून ठेविली आहे एवढेंच.

तेव्हां वरील मधून मधून प्रक्षिप्त असलेल्या भागाचें भाषांतर जमेस न धरलें तर बाकी राहिलेल्या होमरच्या ग्रंथाचें भाषांतर चांगलें झालें पाहिजे. तें माझ्या हातून कसें वठलें आहे हें सांगण्याचें काम वाचकांचें आहे.

होमरच्या काव्याचें सौन्दर्य तंतोतंत भाषांतरांत उतरलें नाहीं तरी ओळख पटण्या इतकें साम्य त्यांत उतरलें असेल तर मी कृतार्थ होईन. विघ्नहर्त्या विनायकाच्या मंगलमूर्तीचें चित्र करावयास बसलेल्या चित्रकारानें विघ्नकर्त्या अमंगल मर्कटाची मूर्ति निर्माण केली* तशी अवस्था झाली नसली ह्मणजे पुष्कळ झालें !

या भाषांतरांत जे दोष दिसतील ते जर सद्बुद्धिनें कोणी दाखवून देतील

* विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् ।

तर या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं, सुदैवानें तसा प्रसंग आल्यास, शक्य तर ते काढण्याचा प्रयत्न करीन अथवा दुसरें एकादें असलें भाषांतर करण्याचा सुयोग आला तर ते न होऊं देण्याची काळजी घेईन.

होमरच्या इलियडचीं भाषांतरें इंग्रजींत अनेक झालीं आहेत व अजूनही होतील. पहिल्यानें केलेलें दुसऱ्यास पसंत नाहीं, दुसऱ्याचें तिसऱ्यास नाहीं, याप्रमाणें अहमहमिकेनें प्रोत्साहित होऊन अनेकांनीं परिश्रम केले आहेत. त्यांतील प्रमुख **चॅप्मन**, **पोप**, **ड्रायडन** (कांहीं भाग), **कौपर** व **सोथबी** हे होत. ह्यांचीं भाषांतरें पद्यात्मक आहेत. गद्यात्मक निराळीं आहेतच. त्याप्रमाणें ज्यास शक्य असेल त्यानें दुसरें निर्दोष भाषांतर करावें व मराठी भाषेची चांगली सेवा करावी. व मला अशी आशा आहे कीं कांहीं चांगली मंडळी पुढें सरून या कामास लागतील, व **व्हर्जिल**, **मिल्टन**, **स्कॉट**, इ०कवींच्या कृतीचीं भाषांतरें करून मराठी भाषेच्या इतिहासांतील नवीन युगास आरंभ करून देतील.

असो वर निर्दिष्ट केलेल्या सामान्य अडचणींशिवाय माझ्या मार्गांत विशेष अशा अडचणी आल्या त्या या कीं श्लोकांत भाषांतरास प्रारंभ केल्यावर कांहीं कांहीं स्थलांचीं व पुरुषांचीं नांवें चरणांत नीट बसत नाहींशी होत. एका वीराचें नांव एका चरणांत बसलें तर त्याचाच सहचर ह्मणून मागून येणाऱ्याचें नांव त्या वृत्तांत दुसऱ्या चरणांत बसेना. ही अडचण दुसऱ्या सर्गांत फारच भासूं लागली. उभय पक्षांतील कोणचे वीर, कोठून, किति नौका व सैन्य घेऊन आले या यादीला जेव्हां प्रारंभ झाला तेव्हां ओवी-वृत्ताचाच आश्रय घ्यावा लागला. नंतर ही वारंवार येणारी अडचण टाळण्याकरतां आर्यावृत्ताला हाताशीं धरावें लागलें, व तें मात्रावृत्त असल्यामुळें फार सोय झाली. शिवाय सर्व रसांचा परिपोष करण्याचें सामर्थ्य आर्येंत आहे. तिचा महिमा असा वर्णिलेला आहे.

आर्या आर्यांसि रुचे ईच्या ठायीं जशी असे गोडी ।
आहे इतरां छंदीं गोडी, परि या परीस ती थोडी ॥ १ ॥

परंतु माझ्या आर्यांमध्यें **पं**तांचें वळण नाहीं, ह्मणून वाचकांस अगदीं चुकल्या चुकल्यासारखें होईल. माझ्या आर्यांत **पं**तांची भारदस्त, पदलालित्ययुक्त, प्रासादिक, ओजोगुणाविशिष्ट, रसमय, शुद्ध व प्रतिभादर्शक वाणी आढळणार नाहीं. अशा वाणीलाही नांव ठेवणारे लोक होते. त्यांचा उल्लेख खुद्द **पं**तांनीं क्वचित्प्रसंगीं आपल्या काव्यांत केला आहे.

शिरला सदार सानुज सशकुनि सांगेश तो सकटक वनीं ।
दुखवावया शिरे खळ जैसा निज दुर्गुणांसकट कवनीं ॥ १ ॥
आर्येला मानियलें बहु पाहुनि सज्जनीं चमत्कृतिला ।
खळचि न मानिति तैसे बहुदूषणसज्ज नीच मत्कृतिला ॥ २ ॥

ही दशा **पं**तांसारख्या कसलेल्या कवींद्राची मग त्यांच्यापुढें माझी अनभ्यस्ताची भाषांतरकाराची कथा काय !

ग्रीक व **ट्रो**जन वीरांचीं नांवें मराठी वाचकांस तीं कानावरून जाण्याचा अभ्यास नसल्यामुळें कर्णकटु लागतील. त्याला इलाज नाहीं. त्यांचे उच्चार सोईकरतां थोडे बदलले आहेत. परंतु **चं**द्रगुप्त या नावांचें रूपांतर **यु**रोपीयन लेखकांनीं जसें "**सॅ**न्ड्रोकोटस" असें केलें आहे व त्यास जितकें भिन्न स्वरूप आणिलें आहे, तितकें मीं आणलें नाहीं. भाषांतर करतांना बहुधा मूळ सोडलेलें नाहीं. कांहीं ठिकाणीं **पो**पनें केलेल्या भाषांतरांत कांहीं निराळीच गोडी दिसून आल्यामुळें त्याच्या इंग्रजी भाषांतराचें भाषांतर टिपेंत दिलें आहे. ही गोडी **पो**पनें आपल्या आंगची कल्पना लढवून आणली आहे व त्यालाच कवि ह्मणतां येईल. ह्मणून त्याच्या बहुमानार्थ त्याच्या दोन चरणांचें भाषांतर एका ठिकाणीं मुद्दाम माझ्या भाषांतरांत घेतलें आहे. पृष्ठ २५ श्लो० ११४ यावरची टीप पहा.

मी नवीन कल्पना लढविली नाहीं कारण तिचा माझे ठिकाणीं अभाव आहे. शिवाय हल्लींचा शास्त्रीय ज्ञानाचा तार्किक काळ म्हटला म्हणजे सर्व काव्यांचा म्हणजे कल्पनामय रचनेचा **काळ**च आला आहे. तो कवितेला मुळींच अनुकूल नाहीं. ' कविता व तार्किकत्व यांचें एका ठिकाणीं वास्तव्य म्हणजे चांदणें व ऊन यांच्या एके ठायीं वास्तव्याइतकें विस्मयकारक होय.' असा अभिप्राय **प्र**सन्नराघव नाटकाच्या कर्त्यानें नटाचे तोंडीं घातला आहे. तर्कशास्त्र सर्व शास्त्रीय शोधांच्या मूळाशीं आहे म्हणून शास्त्रीय शोधांचा काळ हा कवीच्या कल्पनामय सृष्टीस प्रतिकूल आहे. *

या दोन कारणांकरतां मीं मूळ सोडून कल्पना लढविण्याचा प्रयत्नही केला नाहीं तेव्हां हें उघड आहे कीं मीं कुणी कवि नसून एक भारवाहक भाषांतरकार आहें. असा भाषांतरकार जर कवींत गणला जाईल तर रानांतले वृष्टि उष्ण सहन करणारे, शिरीं पारंब्या धारण करणारे, विस्तृत वटवृक्षही वर्षोष्णसह जटा धारण करणारे श्रेष्ठ योगिराज बनतील. +

काव्यामध्यें जागोजाग स्थलांची व वीरांचीं नावें आलीं आहेत, त्यांच्या विषयीं देण्यासारखी माहिती अनेक वेळा **हो**मरनें आपणच दिली आहे. कित्येक वेळां अमुक एक वीर **ग्री**क पक्षाचा आहे का **ट्रो**जन पक्षाचा आहे एवढी माहिती मिळाली असतां पुरेशी होते. तरीही **हो**मरनें जिथल्या तिथेंच कधीं कधीं दिलेली आहेच. शिवाय जी कांहीं माहिती इलियड समजावयास लागेल ती आरंभीं ऐतिहासिक नांवांचा कोश जोडला आहे त्यांत मिळेल. शहरांच्या नांवांमध्यें विशेष कांहीं नसल्यामुळें फक्त महत्वाचीं तेवढीं घेऊन कोशांत त्याविषयीं माहिती दिली आहे. शेवटीं श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या शब्दांत वाचकांस विनंति करून ही आरंभीची प्रस्तावना संपवितों.

तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें । करुनि घ्यावें हें तुमतें । विनवितसें.

भाषांतरकर्ता.

---

* नटः—नन्वयं कविः प्रमाणप्रवीणोऽपि श्रूयते । तदिह चंद्रिकाचण्डातपयोरिव कवितातार्किकत्वयोरेकाधिकरणतामालोक्य विस्मितोऽस्मि.

+ वर्षोष्णसह जटिलवर, तरि काय वहु तसे वनीं न वट । मोरोपंत.

इलियड.

ट्रायनगरीमध्यें **प्रा**यम या नांवाचा राजा राज्य करीत असे. त्याला त्याच्या हेक्युबानामक सच्छील भार्येपासून एकोणीस अपत्यें झालीं होतीं. यापैकीं दुसरा पुत्र जो **पा**रिस त्याच्या संबंधानें त्याच्या मातेला एकदां असें स्वप्न पडलें कीं हा **ट्रा**यनगरी अग्निमुखीं अर्पण करील. तेवढ्यावरून त्याला दूर देशीं सोडून देण्यांत आल्यामुळें त्यास अज्ञातवासांत शेतकऱ्याच्या रूपानें दिवस काढावे लागले. सौंदर्याबद्दल देऊं केलेलें बक्षिस मिळविण्याकरतां स्वर्गांतील तीन देवींमध्यें जो वाद सुरू झाला, तो यानें या दशेंत असतांच आपला अभिप्राय देऊन मिटविला. नंतर त्याला आपलें मूळ व कूळ समजून आलें व **प्रा**यमानेंही हा आपला मुलगा आहे असें मान्य केलें. नंतर तो **ग्री**सदेशांत जलमार्गानें प्रवासास गेला असतां **स्पार्टा** संस्थानचा राजा **मे**निलास यानें त्याचा आतिथि ह्मणून चांगला सत्कार केला. त्यावेळेस त्याच्या राणीचें ह्मणजे **हे**लनचें रूप पाहून तो मोहित झाला. व तीही त्याचे बरोबर **ट्रा**यपुरास त्याचा हात धरून निघून गेली. **प्रा**यमानें स्नुषा ह्मणून तिचा आदर केला.

इकडे **पा**रिस आपल्याला उत्तम स्त्रीरत्नाची प्राप्ति झाली ह्मणून आनंदांत स्वस्थपणें मग्न होता. परंतु तिकडे, झालेल्या हानीबद्दल **मे**निलासाला सारखी हुरहुर लागून राहिली होती. त्यानें स्वस्थ न बसतां **ग्री**सदेशांतील नामांकित समरशील राजांची मनधरणी करून हिरावून नेलेली स्त्री पुन्हा शस्त्रबलानें मिळविण्याची तयारी केली. मिळविलेल्या सैन्याचें आधिपत्य **अ**गमेम्नन या नांवाच्या त्याच्या बन्धूस देण्यांत आलें होतें. या पक्षांत मोठ मोठे योद्धे ह्मटले ह्मणजे अकिलीस, **आ**जक्षबन्धू, **यु**लिसीस, **दा**योमीद व **ने**स्तर असे होते. यां शिवाय कमी प्रतीचे अनेक होते. १२०० नौकांसहवर्तमान यांनीं येऊन **ट्रा**यपुरीस वेढा दिला परंतु **प्रा**यमाचा पुत्र **हे**क्तर, **स**र्पिदन, ईनिआस,

पन्दारस व इतर **ट्रो**जन वीर यांनीं त्यांस फार शौर्यानें प्रतिबंध केला व तो वेढा चालू असतां नऊ वर्षें तशींच निघून गेलीं. परंतु दहाव्या वर्षीं **ग्री**कांत अंतःकलहाला आरंभ झाला. त्यांच्या सैन्यांत सांथीचा उद्भव झाला. तिचें खरें कारण काय असावें याचा वीरसभेंत खल चालू झाला. त्या समयीं **कल्का**स ह्मणून एक **ग्री**कांबरोबर भविष्यवादी आला होता त्यानें उठून सांगितलें कीं, **लि**र्नेसस शहरीं जी लूट मिळाली तिची वांटणी करतांना **फी**बस **अ**पालोचा पुजारी जो **क्रै**सीस त्याची कन्या **अ**गमेम्ननानें आपला भाग ह्मणून घेतली. तिला बन्धमुक्त करण्याकरतां जेव्हां तिचा जनक खण्डण्या घेऊन **अ**गमेम्ननाकडे आला व विनवण्या करूं लागला तेव्हां **अ**गमेम्ननानें त्याचा धिक्कार करून त्यास घालवून दिलें. तेवढ्या वरून त्या वृद्ध पुजाऱ्यानें **ग्री**कांचा समाचार घेण्याविषयीं **अ**पालोची प्रार्थना केली; **अ**पालोचा राग **ग्री**कांवर झाला; व तोच सांथीचें खरें कारण होय. **कल्का**सानें असेंही सांगून ठेविलें कीं पुरोहितकन्या परत देईतों सांथीच्या योगानें अनर्थ होतच राहील. **अ**गमेम्ननानें जनहितार्थ पुरोहितकन्येस सोडून देण्याचें कबूल केलें, व तीस पित्याच्या घरीं पोचविलेंही. परंतु इतर सरदारांनीं मोबदला ह्मणून कांहीं तरी विभाग आपल्या वांट्यांतील त्यास अधिपति ह्मणून द्यावा असा हट्ट धरिला. ह्मणजे तो **अ**किलीसाच्या वांट्यास आलेली जी **ब्रै**सीसकन्या तीच मागूं लागला. शेवटीं प्रकरण विकोपास जाऊन बलानें तिला दूतांकरवीं घेऊन आला. तेणेंकरून **अ**किलीस फार संतापून जाऊन लढाईतील आपलें अंग काढून घेऊन नौदेशीं रुसून बसला. त्यामुळें **ट्रो**जनांचा पक्ष फार बळावत गेला व **हे**क्तरादि वीरांस सारखा जय येत चालला. त्याच्या भरांत त्यांनीं **ग्री**कांचा बराच संहार केला. ह्मणून **अ**किलीसाकडे उपायनें बरोबर देऊन समजी करण्याकरतां कांहीं शिष्ट जन पाठविण्यांत आले. **ब्रै**सीसकन्या परत त्याची त्याला देण्याचेंही **अ**गमेम्ननाची तयारी होतीच. परंतु **हे**क्तरानें

नौदेशाला जोंपर्यंत आग लावली नाहीं तोंपर्यंत रणांत येण्याचें अकिलीसानें साफ नाकारिलें; तसा प्रसंग मागून आला, तेव्हां मात्र त्यानें आपला मित्र जो पत्रोक्लश त्यास आपलें सैन्य देऊन ग्रीकांस मदत ह्मणून पाठविलें. अकिलीसाचें कवच अंगांत घालून लढत असतां पत्रोक्लश हेक्तराच्या हातून मृत्यु पावला. अकिलीस मित्रविरहानें व्याकुल होऊन शोक करीत बसला असतां त्याच्या मातेनें त्यास व्हल्कनकृत कवच व ढाल नवीं आणून दिलीं. तीं घेऊन हेक्तर रणांत गेला. नव्या कवचाची गरज लागली कारण त्यानें जें आपलें कवच पत्रोक्लशास दिलें होतें तें त्रोजनांनीं हरून नेलें होतें. कवचाशिवाय लढणें अशक्य होतें. अकिलीसानें रणांत हेक्तराचा वध केला; पुढें मागाहून त्राय ग्रीकांचे हातीं लागलें. हीच गोष्ट होमरनें आपल्या काव्यांत कथन केली आहे. दहाव्या वर्षी जें अगमेम्नन व अकिलीस यांचें भांडण झालें, तेथें प्रारंभ करून हेक्तरवध व त्याची केलेली त्रोजनांनीं क्रिया यांचें वृत्त सागूंन होमरनें इलियड संपविलें आहे.

एवढें वृत्त कळवून पुढील प्रश्नांचा विचार करूं.

१ त्रोजन युद्धाचा काळ कोणता ?

२ इलियडच्या रचनेचा काळ कोणता ?

३ इलियडचा कर्ता कोण ?

४ तो होमर असला तर त्याचीं काव्यें इतिहास आहेत काय ?

५ होमरची कवि या नात्यानें योग्यता केवढी आहे ?

६ रामायणांतील कथेचा इलियडच्या कथेशीं संबध काय ?

या प्रश्नांचा फार पुरातन कालाशीं संबंध असल्यामुळें यांचें निश्चित उत्तर देणें अवघड झालें आहे. पुरावा फार अस्पष्ट स्वरूपाचा आहे. तीरापासून अत्यन्त दूर अशा महासागराचे तलावर उच्छिन्न झालेल्या नौकेच्या वाहत आलेल्या फळ्यांच्या तुकड्यांवरून मूळ भव्य नौकेच्या

महारंभरचनेचें स्वरूप निश्चित करण्या इतकेंच जवळ जवळ वरच्या पांचव्या प्रश्ना खेरीज सर्व प्रश्नांचें निश्चयात्मक उत्तर देणें कठीण आहे.

इतक्या पुरातन कालाच्या सीमेवर पाय ठेवतांक्षणींच दृष्टीला मांद्य येऊन पुढचा प्रदेश संधिप्रकाशानें व्याप्त आहे असें वाटूं लागतें. जवळच्या सर्व वस्तूंचें स्वरूप अस्पष्ट होतें. दूरच्या वस्तू तर अंधकारांत मिसळून सर्वांचा एक तमोमय गोळाच होऊन गेला आहे असें दिसतें, व शोधक हा आंधळया कोशिंबिरींचा खेळ खेळत आहे असें वाटतें. तथापि तितक्यांतही फार दक्षपणा राखून, टाकलेलें पाउल पक्कें बसल्यावर, शब्दवेध्याप्रमाणें लक्षपूर्वक शब्दांचा वेध घेउन पुढील मार्ग क्रमूं लागल्यास उद्दिष्ट स्थलाचें इष्ट ज्ञान कांहींसें होणें शक्य आहे. परंतु आधींच अस्पष्ट अशा वस्तूंचा नीट बोध करून न घेतां वाटेल तीं अनुमानें जर शोधक काढूं लागला व हव्या त्या वस्तूस जी पाहिजे होती, व जिच्या शोधांत आपण होतों, तीच आपणास मिळाली असें बेसावधपणें धरून चालूं लागला तर *ज्या अंधाऱ्या रात्रींत तमाचा जणूं काय अंगावर लेपच बसत होता व आकाशही जणूं काय काजळाचा वर्षावच करीत होतें व असज्जनाच्या सेवेची विफलता दृष्टीस आली होती त्या अंधाऱ्या रात्रींत **व**संतसेनेला शोधावयाला निघालेले राजशालक शकार महाराज ज्याप्रमाणें एकदां **विट** व एकदां **चेट** हातीं लागतांच **व**संतसेना ह्मणून धरून ठेऊं लागले व ते **विट** व **चेट** आहेत असें समजतांच इकडे **विट** व तिकडे **चेट** अशा घोटाळ्यांत जाऊन पडले व **व**संतसेना हातची निसटून गेली त्याप्रमाणें खऱ्याचा शोध जवळ जवळ हातास लागत आला असूनही तो हातांतून निसटून जाईल व खरा खरा वाटत असलेला शोध खोटा ठरून शोधक घोटाळ्यांत

* या अंधाऱ्या रात्रीचें वर्णन शूद्रकानें असें केलें आहे.
लिम्पतीव तमोऽङ्गानि वर्षतीवांजनं नभः । असत्पुरुषसेवेव दृष्टिर्विफलतां गता. ॥

पडेल. ह्मणून वर निर्दिष्ट केलेल्या प्रश्नांची उत्तरें सावधपणें शोध करून दिलीं पाहिजेत.

असो. सर्ग २० पृष्ठ ६२० आर्या १०२–११६ पहा. यांत **प्रा**यमाची वंशावळ दिली आहे. या राजकुलाचा मूळपुरुष **दा**र्देनस हा होय. याची उत्पत्ति **जो**व्हापासून झालेली होती. **प्रा**यम हा **दा**र्देनसापासून सहाव्या पिढीचा व त्याचे मुलगे **हे**क्तर, **पा**रिस इ० व **ई**निआस हे सातव्या पिढीचे होत. हे सर्व **त्रो**जनयुद्धांत रण करीत होते. त्या वेळीं त्यांचीं वयेंही समरकार्यक्षम असलीं पाहिजेत. प्रत्येक पिढी ३० वर्षांची धरली तर **दा**र्देनसानंतर सहा पिढ्या त्याला वगळून **त्रो**जन युद्धापर्यंत झाल्या होत्या. ह्मणजे **दा**र्देनसनिधनानंतर सहा पिढ्यांनीं ह्मणजे १८० वर्षांनीं **त्रो**जनयुद्ध झालें असें धरलें पाहिजे. ईजिप्तांतील शिलालेखांवरून असें दिसतें कीं **दा**र्देनस यानें **दा**र्देनिआ शहर वसवून **खि**स्तीशकापूर्वीं १४६६ पासून १४०६ पर्यंत राज्य केलें. या शेवटल्या वर्षांतून १८० वर्षे वजा केलीं ह्मणजे **त्रो**जनयुद्धाचा काळ निघतो तो **खि**० पू० १२२६ वर्षांचा होय. ह्मणून ढोबळ मानानें खि० पू० १२०० वर्षांनीं **त्रो**जनयुद्ध झालें. हें उघड आहे.

सर्ग ९ पृष्ठ २६८ आ. १७३–१७६ पहा. ईजिप्तमध्यें **थी**ब शहर होतें. त्यावर आपली सत्ता १९–२० नृपकुलांनीं ठेविली होती. १९ व्या नृपकुलाच्या वेळेस संपत्तीचा कळस होऊन गेला. व विसाव्या कुलापासून ऱ्हास होऊं लागला. १९ वें नृपकुल खिस्तापूर्वीं १३२२ वर्षांनीं होऊन गेलें. तेव्हांपासून "संपत्ति किति पाहिजे" तर "**थी**बांत भरली आहे इतकी" असें एक संपत्ति मोजण्याचें **थी**ब हें मोठें मापच होऊन गेलें होतें. अकिलीसाकडे **त्रो**जन लोक शिष्टाई करण्यास आले व देणग्या देऊन त्यानें युद्धांत सामील व्हावें व **ग्री**कांवरचें अरिष्ट टाळावें ह्मणून त्याची समजी करूं लागले. परतुं देणग्यांनीं माझा राग शमणार नाहीं असें **सा**र अलंकार योजून अकिलीसानें

सांगितलें. तो ह्मणला " अगमेम्ननानें देऊं केलेल्या देणग्यांचे दसपट किंवा वीसपटही द्रव्य मला नको. मिळेल तेवढें कोठून शोधून आणून सर्वस्वाची भर त्यानें आंत घातली तरी नको. आर्कोमेनासांतील नको. थीबांतीलही नको. अर्थात हें शहर या वेळेस 'संपत्तींत पहिलें' अशी त्याची कीर्ति सर्वतोमुखीं झालेली पाहिजे. थीबावर राज्य करणाऱ्या राजकुलाचा जरी ऱ्हास होऊं लागला होता तरी त्याच्या गतवैभवाची स्मृतिही लागलीच नष्ट झाली नसेल हें उघड आहे. तशी स्मृति १००।१२५ वर्षे पर्यंत टिकेल असें धरलें ह्मणजे ट्रोजनयुद्ध खिस्तापूर्वीं १२०० वर्षांनीं होऊन गेलें असें धरण्यास हरकत नाहीं. हें पहिल्या प्रश्नाचें उत्तर झालें.

ट्रोजनयुद्धानंतर किति वर्षांनीं इलियड लिहिलें गेलें असावें हा प्रश्न लागलाच उद्भवतो. विद्वानांचीं मतें या बाबतींत जरा सढळच आहेत. अलेक्झान्ड्रा येथील प्रसिद्ध जुन्या पुस्तकालयाच्या एका अध्यक्षाच्या मतें ट्रोजन युद्धानंतर इलियड एका शतकाचे आंतच लिहिलें गेलें असावें. इतर विद्वान हें अंतर वाढवितां वाढवितां ४०० वर्षांवर आणून ठेवितात परंतु एवढें खास कीं त्याची स्मृति जोंपर्यंत लोकांना होती, मग ती दंतकथांत राहिलेली असो, भाटांच्या पोंवाड्यांत असो, जोंपर्यंत तिच्या अंगात शिळेपणा शिरला नव्हता व त्या युद्धांतील समरचमत्कारांच्या कथांनीं कवींच्या चित्तवृत्ती उचंबळून जाऊन, त्यांची प्रतिभा प्रदीप्त होऊन मागें झालेला वृत्तान्त, त्याची गोष्ट निघतांच अथपासून इति पर्यंत डोळ्यांसमक्ष जसा काय पुन्हा घडून येत आहे असें कवींस ज्या काला पर्यंत वाटत होतें त्या कालाच्या आंतच ट्रोजनयुद्धांतील एकभाग वर्णन करणारें हें इलियड रचिलें गेलें असावें. ह्मणजे ३०० वर्षांपेक्षां जास्त काळ ट्रोजनयुद्धानंतर इलियडच्या रचनेच्या वेळापर्यंत गेला नसावा.

सर्ग १२ पृष्ठ ३७१ आर्या १९९ । २०० पहा. ग्रीकांच्या भिंतींचें दार

फोडण्यास हेक्तर एक दगड उचलतो तो आतांच्या दोन मनुष्यांना गाडीवर उचलून चढवतांनाही यावयाचा नाहीं एवढा जड होता. आतांची माणसें अशीं निर्जीव होत चाललीं आहेत असें कवि ह्मणत आहे. पृष्ठ ३६८ आर्या १६९ यांत आजक्षानें एक दगड शत्रूच्या कपाळांत घालण्यास उचलला. तो दोघां पुरुषांस भर ज्वानींत असतां नुसता उचलतां येणार नाहीं अशीं आताचीं माणसें क्षीणबल झालीं आहेत असें कवि पुन्हा ह्मणत आहे. ट्रोजनयुद्धाचे वेळीं हेक्तर व आजक्ष हे जे दगड सहज उचलून फेंकीत ते आतांच्या ह्मणजे होमरच्या काळच्या लोकांस नुसते उचलतांही येत नाहींत इतके क्षीणबल लोक होण्यास ट्रोजनयुद्धानंतर पांच पंचवीस वर्षांचा काळ पुरेसा नाहीं. अडीचशें तीनशांचा काळ गेला पाहिजे. ह्मणून स्थूळ मानानें ख्रिस्तीशका पूर्वी ९०० वर्षांनीं इलियड रचिलें गेलें असावें.

नौकांची नावनिशी देतांना दुसऱ्या सर्गांत होमर ह्मणत आहे—या पूर्व वृतान्ताबद्दल मी अजाण आहें. कानीं येईल त्याची माहिती देत आहें— ह्मणजे ही यादी जेव्हां लिहिली गेली तेव्हां बराच काळ ट्रोजन युद्धानंतर गेला असावा. हींही जर ३०० वर्षें धरिलीं तर इलियडच्या रचनेचा काळ ढोबळ मानानें ख्रिस्ती शकापूर्वीं ९०० वर्षांचा धरावयाला हरकत नाहीं.

याच्यानंतर पुढचा प्रश्न असा निघतो, कीं इलियडचा कर्ता कोण. याचा जबाब मात्र सर्व शोधक एकच देतील असें नाहीं. पण ते एकदम उत्तर देतच नाहींत. शिवाय ते साशंकवृत्ति धरून बसले आहेत असें पाहून या प्रश्नाचें रूप जरा बदलूं. "होमर ह्मणून जो एक कवि कोणी होऊन गेला व ज्यानें इलियड रचिलें असें आपण समजतों त्यानेंच तें आज आमचे पुढें जसें आहे तसें रचिलें कीं काय ?" अथवा याहूनही दुसऱ्या शब्दांनीं थोडक्यांत विचारावयाचें ह्मणजे असें विचारूं. " इलियड हें एककर्तृक

आहे का अनेककर्तृक आहे ?" याचा जबाब इलियड हें अनेककर्तृक आहे असा देण्याचें धाडस **वुल्फ** ह्मणून एक टीकाकार आहे त्यानें केलें आहे ह्मणून एकानें त्यास विनोदानें हेक्तरस्वरूपी ह्मटलें आहे. त्याचें ह्मणणें असें पडतें.—आह्मीं समजतों तसा आमच्या पुढें असलेल्या इलियडचा होमर ह्मणून एक कर्ता होऊन गेला नाहीं. जर कदाचित् कोणी होऊन गेला असेल, व जर त्याचा त्रोजनयुद्धकथनाशीं कांहीं संबंध असेल तर तो एक इतर लघुकविकृत कृतींचा संग्रहकार व संविधानावर नजर ठेवून कथाक्रम व्यवस्थित रीतीनें जुळणी करणारा कलाकुशल पुरुष होऊन गेला असावा. पहाना! खुद्द होमर हा शब्द दोन शब्दांपासून झाला. आहे. होमू ह्मणजे एकत्र व **अरो** ह्मणजे जुळणें. अर्थात होमर ह्मणजे एकत्र जुळणारा. जो एकत्र जुळणारा आहे त्यानें स्वतां काव्य केलें नाहीं हें उघड आहे.—महाकाव्यांची वाढ सर्व देशांत एकाच तऱ्हेनें होते असें धरून चालल्यास या त्याच्या ह्मणण्यास साधर्म्यानें आमच्या इकडे पुराव्यानें पुष्टि मिळते. **व्यास** हे महाभारताचे कर्ते ह्मणजे त्यांनीं तें स्वतां रचिलें नाहीं. पूर्वकालीन लघु कवींच्या कृती एकत्र केल्या असें धरलें पाहिजे. हें त्यांच्या नांवाच्या व्युत्पत्तिवरून सिद्ध होत आहे. **व्यास** हें नांव विअस् ह्मणजे एकत्र जुळविणें या संस्कृत धातुपासून निघाला आहे. ह्मणून **व्यास** ह्मणजे पद्धतिनें एकत्र जुळविणारा असा होतो. हें मत एका वेदाच्या रचनेपुरतें तरी मोरोपंतासारख्या जुन्या मताच्या कवीस मान्य होतें *

असो. वरील मताच्या पुष्ट्यर्थ **वुल्फ**च्या पक्षांतील लोक असें ह्मणतात कीं ज्यावेळीं इलियड रचिलें गेलें त्याकाळीं ग्रीकांस लिपीचें ज्ञान नसल्यामुळें इलियडच्या कर्त्यास आपलीं काव्यें लिहून ठेवणें

---

* होतिल बहु कलिमलिन, प्राज्ञजन न पावतील भव्यास ।
वास्तव करी चतुर्धा वेदविभागासिं ह्मणुन तो व्यास ॥ १ ॥

अशक्य होतें. त्याच्या नांवावर मोडणारीं इलियड व **आ**देसी हीं दोन्हीं काव्यें तो स्वतां पद्यांप्रमाणें गात असला पाहिजे. तो गात नव्हता तर कोणीतरी इतर लोक गात असावेत. त्यांचीं गीतें ह्मणजे असंबद्ध स्वरूपाचे पद्यसमुच्चय असावेत. तीं आदि, मध्य, अवसान साधून एक कथेच्या रूपानें रचिलेलीं नसावींत. त्यांचें अस्तित्व सर्वत्र पठन करीत हिंडणाऱ्या भाटांच्या स्मृतीवर अवलंबून असावें. व तिनेंच त्यांचा जीव राखिला गेला यांत संशय नाहीं. तथापि मनुष्यांची स्मृति चलस्वभावी असल्यामुळें त्या पद्यसमुच्चयांतही पुष्कळ फेरफार झाले असले पाहिजेत. मागाहूनही भाषासैाष्ठव साधण्याच्या किंवा न्यूनें भरून काढण्याच्या सद्बुद्धीनें हे फेरफार आपल्या अकलेनें कुणी तरी केले असावेत. त्यामुळें बहुत ठिकाणीं असंबद्धता उत्पन्न झाली आहे. ती पूर्वीं फार असे. **अ**लेक्झान्ड्रिआ येथें पुस्तकालय स्थापन-झाल्यावर ख्रि. पू. ५४० वर्षांनीं **पि**सिस्ट्रेटसनें सर्व प्रतींचा संग्रह करून **ग्री**कांच्या २४ मूळाक्षरांचीं नांवें देऊन इलियडचे २४ भाग अथवा सर्ग त्यानें केले. तेथपर्यंत इलियडचें स्वरूप अव्यवस्थित होतें.

तथापि ज्यानें मूळ इलियडचा चित्रपट काढण्यास प्रारंभ केला असेल त्यानें बराच भाग पुरा केला असेल. ज्या कवितासमुच्चयांतून **हो**मरचें व्यवस्थित काव्य निष्पन्न झालें त्यांतील बऱ्याचशा त्याच्या हातच्या असतील एवढेंच या पक्षाच्या लोकांचें ह्मणणें आहे. यांची सर्व भिस्त एकाच मुद्यावर आहे व तो हा कीं प्रथम सांगितल्या प्रमाणें **हो**मरच्या काळीं ह्मणजे (ख्रि. पू. ९०० वर्षां पूर्वीं) **ग्री**कांस लिपीचें ज्ञान नव्हतें, तें साधारणपणें ख्रि० पू० ७०० वर्षांपर्यंत. **लै**कर्गसचे कायदे लिहिलेले नव्हते. नंतर केलेले **लो**क्रिअनांचे कायदे मात्र लिखित होते; ते ख्रि. पू. ६६४ त केले गेले व **लै**कर्गसच्या कायद्यांच्या

मागून ७० वर्षांनीं करण्यांत आले होते ह्मणून लैकर्गसच्या कायद्यांचा काळ ह्मणजे खि. पू. ७०० वर्षांचा होय. इलियड खि. पू. ९०० वर्षांतलें असल्यामुळें तें लिखित नसलें पाहिजे. या ह्मणण्याच्या पुष्ट्यर्थ खुद्द होमरच्या काव्यांत अतंर्गत पुरावा ह्मणून जो देतात तो असा. सर्ग ७ पृष्ठ २११ आर्या ७५ पहा. युद्धांमध्यें सकलांचा संहार होऊं नये ह्मणून हेक्तराशीं कुणी तरी एक ग्रीक वीरानें द्वंद्व खेळावें व त्याच्या निकालावर युद्धाचा शेवट करावा असें ठरलें. नऊ वीर मी मी करीत पुढें आले होते. त्यांतील कुणी जावें हें निश्चित करण्याकरतां सोडत काढण्याचें ठरल्यावर ज्यानें त्यानें आपआपल्या चिठीवर नांवाची खूण करून दिली. व नंतर चिठ्या जमवून घोळावयांस दिल्या. पुढें चिठ्या घोळल्यावर एक चिठी उचलून घेऊन खूण कोणाची ह्मणून भालदार प्रत्येकास विचारीत गेला. त्यावेळेस लोकांस लिहितां आलें असतें तर त्यांनीं आपलें नांव लिहिलें असतें व तें भालदारानें पटकन वाचलेंही असतें. सर्वांना दाखवीत फिरण्याची गरज पडली नसती. परंतु यावर किती विश्वास ठेवावा हें सांगतां येत नाहीं. ज्या वेळेस ग्रीकांस लिहितां येत नव्हतें त्या वेळेस सोडत काढण्याचा असा प्रसंग आला असतां खुणा करावयाची जी जुनी पद्धत असेल तीच पद्धत या वीरांनीं लिहितां येत असूनही अद्याप कायम ठेवली असेल. लैकर्गसनें कायदे लिहिले नाहीं याचें कारण ते लोकांनीं आपल्या स्मृतिपटलावरच लिहावे अशी त्याची इच्छा होती. पाठ करूनच अधिक कडक रीतीनें त्यांचें पालन होईल असें त्याचें मत होतें. ह्मणून खिस्ता पूर्वी ७०० वर्षांपर्यंत लिपी नव्हती हेंही निश्चित सत्य आहे असें निघत नाहीं. खि. पू. ११०० वर्षांच्या सुमारास फीनिशिअनांस लिहितां येत असे. त्यांच्याशीं व्यापारासंबंधें दळण वळण ग्रीकांसारख्या बुद्धिसंपन्न लोकांचें चालू असतां लेखनकला त्यांस लवकरच साध्य होऊं नये हें असंभाव्य दिसतें. दगडावर, चर्मावर

किंवा मेणासारख्या मऊ पदार्थावर लिहिण्याचें काम चालू झालें असलें पाहिजे. कदाचित ख्रि. पू. ७०० वर्षांपर्यंत लेखनकला सामान्य जनांस अवगत झाली नसेल. पण आधीं कवींत व पंडितांत तिचा प्रवेश झाला असला पाहिजे. **हो**मरच्या महा काव्यासारखे ग्रंथ निर्माण होउन ते तोंडींच जीवन्त ठेवावयास अगडबंब संस्था अस्तित्वांत असल्या पाहिजेत. त्यांचा मागमूस कोठें लागत नाहीं. हिंदुस्थानाप्रमाणें ऋषी व त्यांचे आश्रम, त्यांच्या श्रुति व स्मृति, व त्यांचे ते उलट सुलट पाठ, जटापाठी व घनपाठी शिष्य-वर्ग इत्यादींचें अस्तित्व **ग्री**कांत नव्हतें; ह्मणून **हो**मरचीं काव्यें लिखित असावीं मग तीं चामड्यावर असोत किंवा दुसऱ्या एकाद्या मेणासारख्या मऊ पदार्थावर असोत.

सर्ग ६ पृष्ठ १८५ आ. ६७ पहा. **प्री**तसनृपाच्या राणीची अनीतिमूलक विनंति तरुण **बे**लेरोफनानें अमान्य केली ह्मणून त्याच्याविषयीं **प्री**तसनृपा-च्या मनांत राणीनें कांहीं वाईट भरून दिलें. कांहीं छद्मपत्रें व मुद्रित लेख **बे**लेरोफनजवळ **प्री**तसनें आपल्या सासऱ्यास ह्मणजे **आ**योबेटीस नृपास देण्या करतां दिले. **आ**योबेटीसनें **बे**लेरोफनला जीवें मारावें असा त्यांचा मतलब होता. हा लेख कांहीं चिन्हांकित असावा, अक्षरांकित नसावा असें आक्षेपकारकांचें ह्मणणें आहे. ह्मणजे तात्पर्य कीं **हो**मरला लिहितां येत नसावें. परंतु वरच्या मुद्यापेक्षांही हा मुद्दा जास्त निरर्थक दिसत आहे. **बे**लेरोफनसारख्या तरुण सुस्वरूप वीराला जीवें मारावें व तें विश्वासघातानें असें **आ**योबेटीससारख्या गुणग्राही * नृपाच्या मनांत यावें इतका मुद्देसूद तो लेख असल्याशिवाय तसें करणें शक्य नव्हतें ह्मणून तो लेख अक्षरांकित होता चिन्हांकित नव्हता असें धरल्यास कांहीं प्रमाद होणार नाहीं.

---

* **बे**लेरोफन हा सुरसंभव असून पराक्रमी आहे असें कळतांच त्यानें बेलेरोफनाचा जीव न घेतां उलट आपली मुलगी व राज्य त्या तरुणास अर्पण करून आपली गुणग्राहकता दाखविली.

आक्षेपकारांनीं आणखी एक प्रमाण पुढें आणिलें आहे. **हो**मरचें दुसरें काव्य जें **आ**देसी त्यांतील ८ व्या सर्गांत एका जहाजावरील तांडेलाचा उल्लेख आहे. त्याच्या जवळ जहाजावर असलेल्या मालाची लेखी यादी नव्हती तो सर्व जिन्नस नीट व्यवस्थित रीतीनें लेखी यादीप्रमाणें स्मरणांत ठेवीत असे. व लागेल तेव्हां लागेल त्यास ह्मणून दाखवी. ह्मणून त्याला किंवा त्याला नोकरींत ठेवणाऱ्या जहाजाच्या मालकासही लिहितां येत नव्हतें असें धरावयाचें. परंतु या मुद्यांतही विशेष अर्थ नाहीं. तांडेलापर्यंत लेखनकलेचा प्रसार झाला नव्हता एवढेंच समजावयाचें. अशा एका **फी**निशिअन तांडेलाची कीर्ति **सॉक्रे**टीससुद्धां लोकांत गात असे ह्मणजे **सॉक्रे**टीसाच्या वेळेस **फी**निशिअन लोकांत लिपी नव्हती असें ह्मणतां येईल काय ! जर ह्मणतां येईल तर **आ**देसींतलें हें जेव्हां वृत्त घडलें तेव्हां **ग्री**कांत लिपी नव्हती असें ह्मणावें. **सा**क्रेटीस ख्रि. पू. ४६९ वर्षीनीं झाला व **फी**निशिअनलोकांत लिपिज्ञान ख्रि. पू. ११०० वर्षीपासून होतें. **ग्री**कांस लिहितां येत नव्हतें हा काल **ट्रो**जनयुद्धाचा असेल **हो**मरनें काव्य लिहिलें तेव्हांचा नसेल.

ग्रीकांना लिपिज्ञान नव्हतें ह्मणून होमरचीं काव्यें अनेककविकृत होतीं या ह्मणण्यांत आतां फारसा जीव उरत नाहीं कारण **ग्री**कांस **हो**मरच्या काळीं लिपिज्ञान नव्हतें हें चांगलेंसें सिद्ध होत नाहीं. शिवाय या काव्याच्या अन्तर्रचनेकडे बारीक नजर दिली असतां इलियड हें एकाचीच कृति असावी असें ह्मणणें भाग पडतें. इलियडचे एकंदर सर्ग २४ आहेत. त्यांमध्यें भिन्न भिन्न स्वभावाच्या पात्रांचें वर्णन आहे परंतु त्यांतील मुख्य व गौण पात्रें यांमधील भेदाचें निदर्शन बिनचूक केलेलें आहे. अनेक वीर रणांत मृत झाले. त्यांचे मरणाचे प्रकारही अनेक दिले आहेत. त्या सर्वांचें वर्णन एकावळणाचें आहे. तें कसें तें पुढें दाखविलें आहे.

कथा प्रबंधाची जुळणी अविच्छिन्न स्वरूपाची असून सर्व भागांत अन्योन्य

संबंध चांगला दिसून येत आहे. कोठल्याही दोन वृत्तांमध्यें विरोध दिसून येत नाहीं. सर्व वृत्ताची घटना अशी साधली आहे कीं, आरंभापासून शेवट पर्यंत एकत्वाचा भंग होत नाहीं. शब्दांची रचनाही सर्वभर सारखी दिसत आहे. कसलेंही वर्णन करतांना योजलेल्या उपमा एका वळणाच्या आहेत ह्मणजे त्या एकाच कर्त्याला साध्य असूं शकतील अशा विशिष्ट स्वरूपाच्या आहेत. या स्वरूपाचें विवेचन पुढें विस्तारानें केलेलें आहे. अशा सर्वांगसुन्दर काव्याची रचना अनेककर्तृक असणें संभवनीय नाहीं. सर्व अवयव यथा-प्रमाण घडविलेले असल्यामुळें जी सजीवच दिसत आहे अशी एक मूर्ति पाहून जर कोणी ह्मणेल कीं तिचा एक डोळा एका शिल्पकारानें घडविला, दुसरा डोळा दुसऱ्यानें घडविला, तद्वतच पाठ तिसऱ्यानें व पोट चवथ्यानें, तर त्याचें ह्मणणें ज्याप्रमाणें ऐकणाऱ्याला हसूं आणल्या शिवाय रहाणार नाहीं, त्या प्रमाणेंच इलियड सारख्या काव्याची निर्मिति अनेक कवींनीं केली आहे असें जर कोणी ह्मणेल तर ऐकणाऱ्याला त्याचें ह्मणणें हसूं आणल्या शिवाय रहाणार नाहीं. वरील मूर्तींचा घडविणारा शिल्पकार जसा एकच असला पाहिजे तसा इलियडचाही कर्ता एकच पाहिजे. सृष्टीचें प्रसवनसामर्थ्य मोठें आहे. परंतु एकाच वेळीं एकाच अगाध बुद्धिसामर्थ्याचे दोन कवि जन्मास तिनें घातले नाहींत. दोन कालिदास, दोन मिल्टन किंवा दोन तुकाराम एकाच वेळीं झाले नाहींत. दोन होमरही एकाच काळीं होऊन एकाच्याच हातचें आहे असें दिसणारें जें इलियड तें रचूं शकणार नाहींत. बापानें आरंभ केलेल्या कादंबरीचा आधींच काढून ठेवलेला नकाशा पुत्राला मिळाला होता असें जरी ह्मणतां येणार नाहीं तथापि कादंबरीचा वृक्षरोप उत्तम भूमिमध्यें बापानें लावल्यामुळें त्याचा विकास आधींच झालेला होता व त्याच्या शाखांच्या विस्तारावरून कुसुमोदय कोठें होईल व फलोदय कसा होईल हेंही समजण्या सारखें होतें व तेवढ्यावरून पुत्रानें पुरी केलेली कादंबरी अशी उतरली आहे

कीं जर बाणानें पहिला भाग मुळींच लिहिला नसता तर त्याची कादंबरी सर्व संस्कृत भाषेंतील इतर कादंबरींत अग्रस्थान मिळवती, असें असूनही बापाच्या कादंबरीशीं पुत्राच्या कादंबरीची तुलनासुद्धां करतां येणार नाहीं. या प्रमाणें पिता पुत्रांनीं अनुकूल स्थितींत केलेल्या निरनिराळ्या भागांत जसा फरक आहे तसा इलियडच्या कोणच्याही भागांत नाहीं. ह्मणून होमर अनेक होते असें निःशंक पणें ह्मणतां यावयाचें नाहीं. व असलें काव्य लिखित नव्हतें व तुणतुण्याची तार लागल्यावर ज्यांची नीटपणें गाण्याची तार लागावयाची असल्या असंगत कविताप्रबंध गाऊन दाखवून पोट भरणाऱ्या काव्यपाठकांनींच हें काव्य जीवन्त ठेवलें असाही संभव नाहीं.

व्हिको ह्मणून एक टीकाकार आहे त्याचें ह्मणणें असें आहे कीं "होमर हा शब्द समुदायवाचक असून एका मागून एक त्याच्याच कुलांत उत्पन्न होणाऱ्या पुरुषांनीं (ते सर्व उपजतच कवि असले पाहिजेत!) पहिल्या होमरचा चित्रपट वाढवीत वाढवीत शेवटास नेला. व पिसिस्ट्रेटसनें तो नीट जुळविला." परंतु पितापुत्रांनीं लिहिलेली कादंबरी जशी समानमूल्य होऊं शकली नाहीं तशीच एकाच कुळांत उत्पन्न झालेल्या अनेक होमरांनीं पूर्ण केलेल्या इलियडची रचना समानमूल्य होऊं शकणार नाहीं हें उघड आहे. व्हिको याच्या ह्मणण्यास उत्तर देतांना जास्त खोलांत शिरण्याची जरूर नाहीं. पिसिस्ट्रेटसनें अगदींच होमरच्या काव्याला हात लाविला नसेल असें नाहीं. त्यानें अनेक प्रतींवरून शुद्ध करून एक प्रत तयार केली असेल. कांहीं न्यून दिसल्यास भरून काढलें असेल असें शक्य आहे.

एवढ्यावरून इलियड हें अनेककर्तृक होऊं शकत नाहीं हें सिद्ध आहे. तरी येथें एक प्रश्न उद्भवतो कीं इलियडमध्यें कित्येक ठिकाणीं हीनकवींच्या काव्यांत आढळणारा नीरसपणा आढळतो; क्वचित्प्रसंगीं विसंगतपणाही दिसतो तथापि काव्यांतील एकत्व नष्ट झालेलें नाहीं, याचा अर्थ काय ? तर मूळ

चित्रपट होमरनेंच रचिला. परंतु मागूनच्या कवींनीं सद्बुद्धिनें अधिक सौन्दर्य आणावयाचा प्रयत्न केला असेल त्या योगानेंच पाठान्तरें भिन्नप्रतींत आढळून येतात. हीच गति सर्व काव्यांची असते. हे कवी अधिक चरण घालीत असले पाहिजेत. शिवाय मागून होऊन गेलेले होमरचे पाठ करणारे भाट हेही भर घातल्या शिवाय रहात नसत. हें या भाटांच्या पूर्वेतिहासाकडे लक्ष दिलें ह्मणजे समजेल.

होमरच्या काव्यांचे पाठ करणारे भाट इलियड होमरनें रचिलें तेव्हां नसावे, कारण इलियडमध्यें त्यांचा उल्लेख नाहीं. थोडासा उल्लेख आहे तो थामिरिस कवीचा आहे. काव्यपाठकांचा नाहीं. पृष्ठ ८३ ओव्या ५४–५६ पहा. हा कवि गर्वानें ह्मणाला कीं वाग्देवता स्वतां गाणीं गातील, तरी त्यांच्यावर मींच जय मिळवीन; मीं हरणार नाहीं. याला पुढें वाग्देवतांनीं अंधत्व आणिलें. यावरून होमरच्या वेळेस चांगले कवि आपआपलीं पद्यें आपणच गात असें दिसतें. पुढें आदेसीनामक दुसरें काव्य होमरनें रचिलें तेव्हां वैतालिक पाठ करूं लागले. पेनिलोपीच्या दरबारांत प्रणयिजनांचें रंजन करण्याकरतां एका भाटाची योजना केलेली होती. या वेळेस श्रीमन्त सरदारांकडे काव्यपठनाची चाल पडून गेली असावी. पुढें मात्र ख्रि. पू. ६०० वर्षांनीं यात्राप्रसंगीं होमरचीं काव्यें ह्मणण्याचा प्रघात पडला. ख्रि. पू. ४०० वर्षांच्या सुमारास आयन ह्मणून एक होमरकाव्यांचा अलौकिक पाठक होऊन गेला तो महायात्राप्रसंगीं उंच भूमीवर अधिष्ठित होऊन भरजरी पोषाख करून साभिनय पाठ करीतसे. होमरशीं तादात्म्य पावून रसपुष्ट स्थलीं त्याला आवेश चढून त्याचे डोळे भरून येत असत व त्याचें सर्वांग पुलकित होत असे. २०००० रांवर श्रोतृसमुदाय सागराप्रमाणें पुढें पसरला असतां लोकांच्या मुखांवर आश्चर्य, क्रोधादि विकार उत्पन्न करून हर्षानें त्यांची चित्तवृत्ति उचंबळून टाकीत असे. पाठ झटल्यावर टीका करून त्यांतील उपमा स्पष्ट करून सांगत

असे. अशी त्याची वाक्चापल्याबद्दल ख्याति असे. तेव्हां हस्तचापल्य करून त्याच्या सारख्या मागच्या पुढच्या पाठकांनीं होमरच्या काव्यांत भर घातली नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. आपल्या घमेंडींत अथवा यजमानास खूष करण्यास त्यांच्या वंशावळी हे आंत घालीत असत. याप्रमाणें दुसऱ्या सर्गांतील नौकांचीं * नावनिशी अंशतः अगर समग्र प्रक्षिप्त असावी. ह्मणून जे काहीं असंबद्ध व नीरस भाग दिसत आहेत ते सर्व या काव्यपाठकांच्या हौसेचे परिणाम होत.

सारांशः—त्रोजन युद्ध ख्रि. पू. १२०० च्यासुमारास झालें. त्यानंतर ३०० वर्षांनीं ह्मणजे ख्रि. पू. ९०० च्या सुमारस होमरनें इलियड रचिलें, तें मुख्यत्वें एककविकृत आहे. कांहीं भाग मागून झालेल्या वैतालिकांनीं व हीनगुण कवींनीं इतिहासकथनाच्या हौसेनें प्रक्षिप्त केले आहेत. वर निर्दिष्ट केलेल्या सर्व शोधकांच्या वर्गाहून ज्याचें मत निराळेंच आहे असा एक शोधकवर्ग आहे. त्याच्या मतांचा येथें नुसता उल्लेख करून ठेवला आहे. ह्या शोधकांनीं सर्व महाकाव्यांची विल्हेवाट सूर्याच्या आधारें लक्षणेनें लावण्याचा प्रघात पाडला आहे. त्यांस या काव्यांत इतिहासाचा अल्पांश सुद्धां दिसत नसून सर्वच काव्यें रूपकमय आहेत असें वाटतें. उदाहणार्थ हेलनचें पारिसनें हरण केलें ह्मणजे Helos जी सूर्यप्रभा तिचें अंतर्धान झालें व त्राय ह्मणजे सूर्यप्रभावगुंठित अरुणोदयस्थान. या रीतीनें सर्व काव्यांची विचित्र पद्धतीनें त्यांनीं वाट लाविली आहे. रामायणांतील सीता ही कृषिकर्मदर्शक होय ह्मणून ती भूमींत सांपडली व भूमींत अंतर्धान पावली. या मताला अद्याप फारशी पुष्टि मिळाली नाहीं. यांचे ह्मणणें कबूल केलें तरी यांना या

---

* ती अंशतः खरी असली किंवा नसली तरी अस्तंगत झालेल्या नृपकुलांतील वंशज पूर्व वैभवाची खूण ह्मणून पूर्वजांच्या पराक्रमाची आठवण देण्याकरतां शें दोनशें वर्षें या नावनिशीकडे बोट दाखवीत रहाले असतील.

काव्यांत इतिहास आहे असें कबूल करावें लागेल. नायक व नायिका यांची कशीही उत्पत्ति धरिली तरी त्या काळची राजनीति, समाजव्यवस्था, राजसत्ता व समाज यांच्याधारणार्थ केलेले कायदे, नीती, कला, कौशल्य, तत्वज्ञान, आचारविचार, शास्त्रें इत्यादींचा इतिहास काव्यांत असतोच. नदीचा उगम कोठून ही असला तरी समुद्राला मिळण्यास ज्या देशांतून ती नदी जाईल त्या देशाच्या जमिनींतील गूण तिच्या पाण्यांत उतरल्याशिवाय रहाणार नाहींत. त्याप्रमाणें महाकाव्यांतील पात्रांचें मुख्य अस्तित्व रूपकावर अवलंबून आहे असे धरिलें तरी त्या महाकाव्यास निर्माण करणारे कवी ज्या राष्ट्रांत ते उदय पावले असतील त्य राष्ट्राच्या तत्कालीन इतिहासावर प्रकाश पाडून त्याचें रंग रूप सर्वभर स्पष्टपणें दृश्य केल्याशिवाय रहाणार नाहींत. काव्यरूप शरीर जरी काल्पनिक धरिलें तरी त्याला सजीव करणारा आत्मा मात्र इतिहासरूपीच असला पाहिजे इलियड हें ३००० वर्षांपूर्वींच्या ग्रीकांचा इतिहास कथन करितें व रामायण हें आर्यांच्या सुधारणेचा इतिहास कथन करितें यांत संशय नाहीं. कारण वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें पुराणें हींच आद्यकालीन लोकांचा इतिहास, कविता ही त्यांची अंतःप्रेरित भाषा, काव्यांतच त्यांचा इतिहास, भूगोल, तत्वज्ञान, धर्म, राज्यविस्तार, वंशावळी इ० येतात. राष्ट्राच्या सबंध नियतीचें वर्णन यांतच असतें. या प्रस्तावनेंत पुढें इलियडमधली ध्यानांत ठेविण्यासारखी ऐतिहासिक माहिती दिली आहे.

अदमासानें खणलें असतां ट्राय शहराच्या खाणाखुणा सांपडतात व त्यांशीं होमरचें वर्णन कित्येकांच्या मताप्रमाणें जुळतें. त्यांची भिंत स्कीअनद्वार, प्रायममंदिर, बुरूज, प्रस्तरमय राजपथ, हत्यारें, सुवर्णभूषणें रजताचे प्याले इ. सांपडतात. नाण्याचें नांव सुद्धां मिळत नाहीं. या गोष्टींकडे लक्ष दिलें ह्मणजे होमर हा इतिहास कथन करीत आहे यांत संशय नाहीं. हेंच उत्तर चवथ्या प्रश्नाचें होय. पांचव्या प्रश्नाकडे वळण्या पूर्वी अल्पसें होमरचरित्र दिलें पाहिजे.

होमरचा जन्म आमचे येथें झाला असें ह्मणत सात भिन्नभिन्न नगरें पुढें येतात. तथापि स्मिर्नानगरांत त्याचा जन्म झाला असेल, असें पुष्कळांचें मत आहे. तो आपला निर्वाह एक शाळा चालवून करीत असे. मेन्तीसनामें एक व्यापारी होता त्यानें त्याला आपल्या बरोबर जलप्रवासाला नेलें. परंतु तो त्यास डोळ्यांचा आजार झाल्यामुळें सोडून द्यावा लागला. त्या वेळेस मेन्तर ह्मणून एका स्नेह्यानें त्याची सुश्रूषा केली. तरीही तो शेवटीं अगदीं आंधळा झाला. त्या विपन्नास्थितींत ज्यांनीं त्यास आश्रय दिला त्यांचा त्यानें आपल्या काव्यांत त्यांच्या स्वभावाचीं पात्रें घालून बहुमान केला आहे, असा कित्येकांचा समज आहे. आदेसी मधील युलिसीसाच्या कष्टमय प्रवासवृत्तांशीं याचे जे प्रवासांत हाल झाले त्यांचा संबंध असावा. किंबहुना युलिसीसवरील संकटें याच्या प्रवासवृत्तांताचीं प्रतिबिंबेंच होत. तथापि या गोष्टींचा येथें विस्तार करणें जरूर नाहीं; कारण याविषयीं निश्चित अशा फार थोड्या गोष्टी आहेत. १ तो कवि होता, २ शिक्षक होता, ३ पुष्कळ फिरलेला होता व शेवटीं आंधळा झाला. इतक्या त्याविषयीं मुख्य गोष्टी आहेत. वाटेल तर ध्यानांत ठेवाव्या नाहींतर सोडून द्याव्या इतक्याच त्या विश्वसनीय आहेत.

आतां होमरची कवि या नात्यानें योग्यता केवढी आहे त्याचा विचार करूं. याची ख्याति वीररसप्रधान, वीरचरितवर्णनात्मक काव्यांचा कर्ता ह्मणून आहे. अशीं काव्यें यानें दोन रचिलीं १ इलियड व २ आदेसी. तूर्त इलियडमध्यें दिसून येणाऱ्या होमरच्या विशिष्ट गुणांचें परीक्षण करून वर्णन करावयाचें आहे. प्रस्तुतचें पुस्तक हें मूळ ग्रीक भाषेंतील काव्याच्या इंग्रजी भाषांतरावरून मराठींत केलेलें भाषांतर आहे. तेव्हां हें काव्य कोणत्या प्रतीचें आहे हें ठरवितांना युरोपांतील अरिस्टॉटल सारख्या विद्वानांनी केलेल्या वीरचरित वर्णनात्मक काव्याची व्याख्या यास लावावयाची किंवा आमच्या

इकडील साहित्यशास्त्रांत प्रवीण अशा पंडितांनीं दिलेली महाकाव्याची लावावयाची, हा प्रश्न आहे. इलियडला आमच्या पंडितांची व्याख्या लावून पहावी हें जास्त बरें दिसतें. कारण ग्रीक पंडितांनीं आपल्या व्याख्या इलियड काव्यांत जे उत्तम गुण आहेत त्यांवरून मुख्यांशीं बांधलेली असावी. ह्मणून तींत दिलेलीं लक्षणें सर्व प्रकारानें इलियडमध्यें जे होमरचे विशिष्ट गुण आढळून येतात त्यांशीं जमलींच पाहिजेत. व तीं जमलीं ह्मणजे त्या वादाला स्वरूप कसें येतें तें पहा. इलियड हें उत्तम काव्य कशावरून? तर अमुकव्याख्येंत दिलेलीं लक्षणें त्यांत आहेत ह्मणून. व ती व्याख्या तरी निर्दोष कशावरून तर इलियड ह्मणून जें सर्वमान्य काव्य आहे त्याच्या लक्षणांवरूनच ती बांधलेली आहे ह्मणून. ह्मणजे या ठिकाणीं अन्योन्याश्रय दोष येतो. किंबहुना स्वस्कंधारोहणन्यायही येतो. आमच्या इकडील पंडितांची महाकाव्याची व्याख्या जी रामायणासारख्या काव्यांतील उत्तम गुणांवरून बांधलेली आहे तिच्या साहाय्यानें जर रामायणाचें परीक्षण केलें व तें उत्तम ठरविलें तर वर सांगितल्याप्रमाणें दोष उत्पन्न होईल. एवढ्या करतां आमच्या पंडितांनीं दिलेली व्याख्या इलियडला लावून पाहिली पाहिजे. व तें जर या दृष्टीनेंही चांगलें ठरेल तर त्यांत विशेष आहे. तेव्हां इलियड हें कोणच्या तऱ्हेचें काव्य आहे हें समजण्यास काव्य ह्मणजे काय हें समजलें पाहिजे. कवि* या शब्दाची उत्पत्ति कु—करणें या धातूपासून झाली आहे. कवि ह्मणजे करणारा अर्थात कल्पनेनें नवीन सृष्टि करणारा होय. आनंदवर्धनकृत ध्वन्यालोकांत ह्मटलें आहे. “ अपारे काव्यसंसारे कविरेव प्रजापतिः । यथास्मै रोचते विश्वं तथेदं परिवर्तते ॥ ”

* कवि याचा वाचक इंग्रजी शब्द जो poet त्याची व्युत्पत्ति अशीच आहे poeo to make (ह्मणजे करणें) याच धातूपासून झाली आहे ह्मणून काव्याच्या व्याख्येबद्दल युरोपीअन पंडित व संस्कृत पंडित यांत मतभेद होणार नाहीं हें उघड आहे.

अर्थः—कवी हे काव्यसृष्टि निर्माण करणारे ब्रह्मदेवच आहेत. त्यांच्या आवडी नावडीवर विश्वाचें परिवर्तन होत असतें.

*कवींनीं कल्पनेनें केलेली जी शब्दसृष्टि तिलाच काव्य ह्मणावयाचें. 'सुकल्पनांस कवि वी ' असें पंत ह्मणतात. याच चांगल्या कल्पनांच्या प्रबन्धाला काव्य ह्मणावयाचें. याच कल्पनांपासून, याच शब्दसृष्टीपासून एक्या तऱ्हेचा अनिर्वाच्य आनंद वाचकांचे मनाला होत असतो. कारण त्या कल्पना कधीं कधीं रसमय असतात. तो रस कांहीं एक अवर्णनीय प्रकार आहे. षड्रसयुक्त अन्नाची चव ते चर्वित केल्यापासून जशी होते, तशी काव्यरसाची गोडी काव्याच्या चर्वणानें ह्मणजे मननानें होते . तो रस कसा ह्मणून विचारल्यास सांगतां येणार नाहीं. कित्येकांनीं या काव्यरसास ब्रह्माची उपमा देऊन ब्रह्मानंदाप्रमाणें काव्यरसाचा आनंद मानला आहे. " रसोवै सः, रसं हि एव लब्ध्वा आनंदी भवति" अशी ब्रह्मानंदाचें वर्णन करणारी श्रुति आहे. तिचाच उपयोग यांनीं काव्यरसाचें वर्णन करण्याकडे केला आहे. ब्रह्म हें स्वसंवेद्य आहे. त्याच्यासारखें तेंच. तें स्वानुभवानेंच जाणावयाचें आहे. त्याचें ज्ञान झालें तरच आनंद होतो. त्याप्रमाणें काव्यरसाला कोणाची उपमा नाहीं. तो स्वसंवेद्य आहे. तो स्वानुभावानेंच कळणारा आहे व कळल्यावर आनंद होत असतो. आणखी सर्वांनीं असा अनुभव घेऊन पहावा कीं कविता वाचतांना ज्या स्थलीं कांही आकस्मिक आनंद होतो त्या स्थलीं कांहीं

---

* आतां वंदूं कवीश्वर । जे शब्दसृष्टीचे ईश्वर । नातरी हे परमेश्वर वेदावतारी ॥ १ ॥ कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसाचे वोघ लोटले । नाना सुखाचे उचंबळले । सरोवर हे ॥ २ ॥ कीं ह्या ईश्वराचा पवाड । पहातां गगनाहून वाड । ब्रह्मांड रचनेहून जाड । कविप्रबंधरचना ॥ ३ ॥ रामदास

कवी हे शब्दांनीं प्रतिसृष्टि निर्माण करतात व त्यांचीं काव्यें रसात्मक आहेत अशी बरोबर व्याख्या दासांसारख्या अध्यात्मक पंडितांनींही केली आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

अर्थचमत्कृति, शब्दचमत्कृति, अथवा कांहींतरी रसनिष्पत्ति आहे असें हटकून समजावें. मागाहून शोध करून पाहिल्यास कांहीं शब्दालंकार, कांहीं अर्थालंकार तेथें दृष्टीस पडेल, तेथें कोणत्यातरी रसाचा परिपोष झालेला आढळेल. मिळून जेथें आनंद होतो तेथें वाईट बरा काव्याचा मासला असतोच. शब्दालंकार व अर्थालंकार यांनीं युक्त जें काव्य तें अधम किंवा अवर काव्य व रसानें युक्त तें उत्तम काव्य समजावें. "रसात्मकं काव्यं" ही उत्तम काव्याची व्याख्या होय.

शब्दालंकार व अर्थालंकार यांनीं युक्त जें काव्य तें अधम काव्य असें जें वर सांगितलें आहे तें थोड्याशा दृष्टान्तानें स्पष्ट होइल. एक अत्यन्त रूपवती स्त्री घ्या, ती अशी कीं तिला पाहून कोणी ह्मणतील हिला निर्माण करतेवेळेस प्रत्यक्ष काम हाच ब्रह्मदेव झाला असावा; अशी स्त्री कला कौशल्य व वनदेवता जीं जीं आभरणें देऊं शकतील त्यांनीं मंडित असूंद्या. ती आपल्या अगदीं तारुण्यांत आली आहे असेंही समजा. परंतु तिच्या विभ्रमांस चालन देणारा कोण आहे तर आंतील जीव होय. तो नसेल तर तिच्या रूपाची व अलंकारांची काय शोभा आहे! तिचें शरीर निर्जीव प्रेत आहे ! त्याचप्रमाणें शब्दालंकार व अर्थालंकार यांनीं युक्त परंतु रसविवर्जित अशी जी कविता ती शोभन वस्त्रांनीं आच्छादित व अनेक अलंकारांनीं मंडित अशी जीवरहित कुडी आहे. एवढ्याकरतां आमचे साहित्यकार रसात्मक काव्यास फार मान देतात व तो वास्तविक आहे. अधमकाव्यांत वर सांगितल्याप्रमाणें शब्दचमत्कार व अर्थचमत्कार असतो. ह्मणून तीही व्याख्या इलियडचें परीक्षण करतांना ध्यानांत ठेवावी.

येथें थोडें रसांचें विवेचन केल्यास वाउगें होणार नाहीं. रसांचे भेद आठ आहेत

शृंगार—वीर—करुणा रौद्र—हास्य—भयानकाः ।
बीभत्साद्भुतसंज्ञौ चेदष्टौ नाट्ये रसाः स्मृताः ॥ १ ॥

कोणी कोणी "शान्तोऽपि नवमोरसः" असें ह्मणतात. शृंगार, वीर, करुण, रौद्र, हास्य, भयानक, बीभत्स, अद्भुत व शान्त असे नऊ रस आहेत. रसात्मक काव्यापासून होणारा आनंद अनिर्वाच्य खरा. तथापि कोणत्या रसाची उत्पत्ति कोठून होत्ये व कां होत्ये त्याचा विचार साहित्यशास्त्रप्रवीणांनीं केला आहे.

मनुष्याच्या चित्तांत उपजतच कांहीं विकार किंवा भाव केव्हां केव्हां उत्पन्न होतात. तो मनुष्याच्या चित्ताचा धर्मच आहे. ह्मणून त्या भावांस किंवा विकारास स्थायिभाव ह्मणतात. कारण त्यांचें अस्तित्व मनुष्याचा चित्तांत स्थायिक आहे. त्या विकारांचेंच तें केलेलें आहे. या नऊ स्थायिभावांचीं नांवें रति, उत्साह, शोक, हास्य, भय, जुगुप्सा (किळस), क्रोध, निर्वेद (शम) अशीं आहेत. या स्थायिभावांची व शृंगारादि नऊ रसांची अनुक्रमानें संगति आहे. जेव्हां रत्यादि विकार चित्तांत उत्पन्न होतात तेव्हां शृंगारादि रस पुष्ट होतात, असें साहित्यशास्त्रकारांचें मत आहे. या स्थायिभावांस उत्पन्न करणाऱ्या पदार्थांस वस्तूंस किंवा स्थलांस विभाव ह्मणतात व स्थायिभावांचीं जीं कार्यें त्यांस अनुभाव ह्मणतात. व दुसरीं कांहीं लक्षणें हर्षोन्मदादि जीं एकाहून अधिक रसांत मिसळतात त्यास व्यभिचारिभाव ह्मणतात. या सर्वांनीं ह्मणजे विभाव, अनुभाव, व व्यभिचारिभाव यांनीं स्थायिभाव उत्पन्न होतात व त्याचेने जे रस असतील ते व्यक्त होतात. * या सर्वांचा विचार विस्तारानें येथें करण्याचें कारण नाहीं. " रसात्मकं काव्यं " याची कल्पना येण्याकरतां रसांचें थोडक्यांत स्वरूप सांगितलें आहे. "रसात्मक काव्य" तें उत्तम होय व शब्दालंकारयुक्त अथवा अर्थालंकारयुक्त तें अधम किंवा चित्रकाव्य होय एवढेंच वाचकांनीं इलियडचें परीक्षण करतांना ध्यानांत ठेवावें.

इलियडच्या विषयाकडे पाहिलें तर तो अकिलीसाचा तीव्र रोष होय.

---

* विभावानुभावव्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पत्तिः । असें भरतनाट्यशास्त्रांत वचन आहे.

या रोषाच्या मुळें त्यानें धैर्यात्मक वीरांचे आत्मे यमपुरीला धाडून दिले व त्यांच्या प्रेतांची मेजवानी क्षुधार्त व फाडफाडून खाणाऱ्या खगांस व श्वानांस दिली. अशा तीव्र रोषाचें वर्णन इलियडमध्यें आहे यांत वीररस हा प्रधान आहे. त्याच्या अनुसंगानें करुणरसाचा परिपोष झालेला आहे. एवढ्यावरून यास वीररसप्रधान काव्य म्हणतां येईल. परंतु हें नाव नवीन काढलेलें आहे. आमच्या साहित्यांतलें नव्हे. अगदीं लहान काव्यास खण्डकाव्य आणि मोठ्यास महाकाव्य म्हणतात. तथापि महाकाव्याचें लक्षण साहित्यदर्पणकार असें देतात.

> संध्या सूर्येन्दुरजनी प्रदोषध्वान्तवासरा: ।
> प्रातर्मध्याह्नमृगया शैलर्तुवनसागरा: ॥ १ ॥
> संभोगविप्रलंभौ च मुनिःस्वर्गपुराध्वरा: ।
> रणप्रयाणोपयममंत्रपुत्रोदयादय: ॥ २ ॥
> वर्णनीया यथायोगं साङ्गोपाङ्गा अमी इव ।

ही महाकाव्याची व्याख्या आहे असें म्हणण्यापेक्षां वर्णन आहे असें म्हटलें पाहिजे. लघुकाव्याचा विस्तार करून महाकाव्य कसें करावें हें वरच्या श्लोकांत सांगितलें आहे. सूर्य व चंद्र; संध्या, प्रदोष, रजनी, अंधःकार, प्रातःकाल, मध्याह्नकाल, दिवस, मृगया, पर्वत, ऋतू, दोन्हीं शृंगार, मुनि, स्वर्ग, वनें, पुरें, यज्ञ, रणांत सैन्याची प्रयाणें; सागर, उपयमादि विधि, मंत्र, पुत्रोदय इत्यादींचीं वर्णनें महाकाव्यांत आलींच पाहिजेत असें नाहीं. काव्याचा विस्तार करतांना रसपोषण चालू ठेवण्याकरतां जसा योग येईल तशीं सांगोपांग वरील वर्णनें करावीं. तीं अवश्यच आहेत असें नाहीं. हीं सर्व रामायणांत आढळतात. व त्यावरूनच ही व्याख्या बसविली असल्यामुळें रामायणाला लागू पडेल. आतां हिच्या कसोटीस लावून पाहिलें असतां

इलियड कसें काय उतरतें तें पाहूं. वर निर्दिष्ट केलेलीं सर्व वर्णनें इलियड मध्यें शक्य नाहींत. इलियड मुळींच दोन महिन्याचे आंत संपतें. दोन महिन्याचा एक ऋतु या मानानें एक किंवा दोन ऋतूंचेंच वर्णन यांत येणें शक्य आहे. पर्वत ह्मणाल तर त्याचा अभावच आहे. ग्रीकांची छावणी व त्रायपुरी यांमध्यें डोंगर नव्हता. नाहीं ह्मणायला आलिम्पसपर्वताचा उल्लेख अनेक वेळा येतो. इदाशिखराचें वर्णन त्याप्रमाणें आलें आहे पृ. २२७ आ. २३-२४ पहा. संभोगशृंगाराचें वर्णन यांत आहे, रणांतून विमुख झालेल्या पण महालांत सन्मुख बसलेल्या पारिसाची हेलनशीं भेट व्हीनस घडवून आणिते तेव्हां एक (पृष्ठ ११६ व ११७ पहा.) व दुसरें ४३०-३१ पृष्ठांतील जोव्ह व जूनो यांच्या भेटी नंतरचें. मुनींचें अस्तित्व ग्रीकांत त्या वेळीं नव्हतें. ह्मणून त्यांचें वर्णन अशक्य आहे. स्वर्गाचें मधुन मधून आहे. नगराचें एकादेवेळेस आहे. थीबाचें वर्णन पहा पृष्ठ २६८ आर्या १७५। ७६. यज्ञाचें आहे. गोमेध व शतमेध यांहून मोठाले यज्ञ ग्रीक करीत नसत. रणप्रयाणांचें मात्र सर्वत्र वर्णन आहे. मंत्रांचें नाहीं. पण ईशप्रार्थनेचें आहे. उपयम व पुत्रोत्सवादींचा योगच आला नाहीं. आतां वर्णनविषय राहिले ते सूर्य व चंद्र, ऋतु, संध्याकाळपासून रात्रीचे भाग, तसेच दिवसाचे भाग, मृगया, सागर व वनें- परंतु यांचीं वर्णनें होमरच्या काव्यांत निराळ्या पद्धतिनें आलीं आहेत तीं त्यानें स्वतंत्ररूपानें जरी केलेलीं नाहींत, तरी विस्तृतस्वरूपाच्या उपमा योजतांना त्यानें केलेलीं आहेत असेंच त्याला करावयास पाहिजे होतें असें नाहीं परंतु जीं वर्णनें त्यानें उपमेच्या विस्तारांत आणिलीं आहेत तीं तो जर स्वतंत्रपणें करता तर जितकीं उत्तम त्यानें केलीं असतीं तितकींच उत्तम तीं आहेत. पृ. १३५ आर्या १५६-८ पहा. समरोत्सुक ग्रीक सैन्याच्या पंक्ति संक्षुब्ध सागराच्या चलित ऊर्मींप्रमाणें दिसत होत्या असें ह्मटलें आहे. यांत सागराचें वर्णन आलें. पृष्ठ २४९ आ. २४५। ५० यांत रात्रौ पहारा करते वेळेस

ट्रोजनांनीं परसे पेटविले होते ते दुरून पूर्ण इन्दूच्या सभोंवार नक्षत्रगण जसा शोभतो तसे शोभत होते असें ह्मटलें आहे. यांत निर्वात गगनांत इन्दु प्रकाश पाडीत असतां शिलोच्चय व वनराजि यांस कशी शोभा येते व त्यांत रंगाची काय मजा असते तें वर्णिलेलें आहे. यांत इन्दूचें वर्णन आलें.

पृष्ठ ३३० आ. १८८-१९१ पहा-एकटा युलिसीस शत्रुसंघांत सांपडला असतां त्याची तुलना श्वान व पारधि यानीं वेष्टिलेल्या रानडुकराशीं केलेली आहे. यांत रानडुकराच्या शिकारीचें वर्णन आलें.

पृ० ३६४ आर्या १२२–२६ पहा. ग्रीकांनीं अरीवर केलेली दगडांची वृष्टि हिमवृष्टीशीं तोललेली आहे. तिच्या योगें पर्वतशृंगें कशीं बुझून जातात; कमलवनें, शस्यसंपत्ति, यांचा नाश कसा होतो तें विस्तृत वर्णन आहे. यांत हेमन्तांतील हिमवृष्टीचें वर्णन आलें.

४५५ पृ. आ० १३६–३७ पहा. शिळेच्या आड लपलेल्या मृगांची शिकार श्वानांच्या मदतीनें करणारे गांवढळलोक अवचित येणाऱ्या सिंहास जसे भिऊन पळतात तसे लढत असलेले ग्रीक हेक्तराला पाहून पळाले असें वर्णन यांत आहे. हें मृगयेचें वर्णन आहे असें ह्मटलें पाहिजे.

पृ. ४९७ आ. १८८–९२ पहा. अतिवृष्टीनें नद्या फुगून समुद्राला मिळतांना जेवढा उत्ताल शब्द करतात तेवढा हेंगा शब्द ट्रोजन वाजिनींनीं केला असें ह्मटलें आहे. यांत पावसाचें वर्णन आलें आहे.

मिळून वर लिहिल्याप्रमाणें सागर, इन्दु, मृगया, हिमवृष्टि, वर्षाकाल इत्यादींचें वर्णन पर्यायानें येत आहे. ही वर्णन करण्याची तऱ्हा ज्ञानेश्वरांमध्यें दिसून येते. भगवद्गीतेसारखा तत्वज्ञानाचा अवघड विषय स्पष्ट करून सांगतांना त्यांनीं कवितेचा उपयोग केला आहे. आपला ग्रंथ वृत्तांत लिहिला ह्मणून त्यांचा ग्रंथ काव्य असें नव्हे. कारण नुसत्या वृत्तांनीं ग्रंथास काव्यस्वरूप प्राप्त होत नाहीं. झालें असतें तर अमरकोश, वाग्भट इ० ग्रंथही काव्येंच झालीं

असतीं. ज्ञानेश्वरांनीं आपल्या ग्रंथांत रसनिष्पत्ति केली आहे. सामान्य जनांस अर्थ स्पष्ट करून सांगतांना उपमानांच्या शोधांत त्यांनीं सर्व सृष्टि उच्छिष्ट करून टाकिली आहे. स्वतंत्ररीतीनें जे सागरादि विषय महाकाव्यांत वर्णिले पाहिजेत ते त्यांनीं तसे स्वतंत्रपणें वर्णिले नाहींत (व त्यांनीं तसे वर्णन करतां कामा नये; कारण ते कांहीं महाकाव्य लिहावयास बसले नव्हते), परंतु उपमेदाखल त्यांनीं त्यांचें सागरादि विषयांचें वर्णन पर्यायानें केलें आहे.

मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ।

माझी मायारूप नदी जे तरून जातात त्यांस माझी प्राप्ति होते. या भगवद्वचनाचा अर्थ स्पष्ट करण्याकरतां मायापुराचें केवढें भव्य वर्णन त्यांनीं केलें आहे पहा. त्यांतील थोडा भाग येथें घेतला आहे.

जे सृष्टिविस्ताराचेनि वोघें । चढत कालकलनेचेनि वेगें । प्रवृत्ति निवृत्तीचीं तुंगें । तटें सांडी ॥ १ ॥ जे गुणघनाचेनि वृष्टिभरें । भरली मोहाचेनि महापूरें । घेऊनि जात नगरें । यमनियमांचीं ॥ २ ॥ जे द्वेषाच्या आवर्तीं दाटत । मत्सराचे वळसे पडत । माजि प्रमादादि तळपत । महामीन ॥ ३ ॥...... रतीचिया बेटा । आदळती कामाचिया लाटा । जेथ जीवफेन संघाटा । सैंघ दिसे ॥ ४ ॥ संमोह विभ्रम मासे । गिळिताती धैर्याचीं आमिषें । तेथ देव्हडे भोंवत वळसे । अज्ञानाचे ४...तया पाणियाचेनि वहिलेपणें । अझुनी न धरिती वोभाणें । ऐसा मायापूर हा कवणें । तरिजेल गा ॥५॥ येथ एक नवलावो । जो जो कीजे तरुणोपावो । तो तो अपावो । होय तें ऐक ॥ ६ ॥ येथ एकाचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले । तयां ऐलीचथडीं सरलें । मायाजळ ॥७॥ केवढें भव्य चित्र मायानदीचें ज्ञानेश्वरांनीं काढिलें आहे ! हें काढण्यास महाप्रतिभासंपन्नच कवि पाहिजे. मुख्य वर्ण्य विषय माया व तिचे साथिदार कालगति, प्रवृत्ति, निवृत्ति, गुण, यम, नियम, द्वेष, प्रमाद, विभ्रम, धैर्यध्वंस इ. आहेत. वृष्टिपुष्ट संक्षुब्ध सागर व त्यांत दिसून येणारे भोंवरे, मीन, उसळणाऱ्या लाटा,

फेन, इत्यादींस उपमानार्थ योजून कवीनें अर्थ स्पष्ट केला आहे. हीच होमरची पद्धत आहे. तिचा पुढें विस्तारानें विचार केला आहे.

असो. वर ह्मटल्याप्रमाणें साहित्यदर्पणांत जे वर्ण्य विषय दिले आहेत त्यांचीं वर्णनें पर्यायानें होमरनें आणिलीं आहेत. कांहींचें वर्णन, ट्रायभूमीच्या परिस्थितिमुळें अशक्य झालें आहे. कांहींचें ह्मणजे दिवसाविभागांचें वर्णन मात्र त्यास करतां आलें असतें; परंतु त्यांतील भव्यपणाचें स्वरूप ओळखण्यास इतकें कोणाचें चित्त स्वस्थ नव्हतें. दिवसास आरंभ झाला कीं लढाईस आरंभ व्हावयाचा; दिवसाचें अवसान झालें कीं वैरावसान झालें असें समजून भोजन करून आधींच भागले असल्यामुळें सर्व वीरांनीं झोंप घ्यावयाची. ह्मणून दिवसाच्या अत्यन्त मनोहर भागाचें ह्मणजे सकाळचेंही वर्णन होमर करीत बसला नसावा, असें ह्मटलें पाहिजे. यथायोग रसपुष्टि होण्याकरतां होमरनें त्याच्या परिस्थितीला शोभेल अशीं वर्णनें केलीं आहेत. वीरसभा व त्यांतून झालेलीं वाग्युद्धें, देवसभा, सार्वजनिक मिनर्वापूजन, द्वंद्वयुद्धें, शिष्टाई, मृतवीरांस मूठमाती देणें, शहरांचे वेढे, सांग्रामिक खेळ इत्यादींचें वर्णन त्यानें केलें आहे. या शिवाय तारकाधिष्ठित आकाश, लग्नाची वरात, न्यायसभा, शेताची मळणी, द्राक्षांचें पीक, गाईंचें चरावयास जाणें, वनांत त्यांची व सिंहांची भेट, नाचाचा थाट, नदी, इत्यादींचीं वर्णनें कवचनिर्मितीचा प्रसंग आणून त्यानें केलीं आहेत. हीं दोन महिन्यांचा जो काळ युद्धास मिळाला आहे तितक्यांत त्यानें आणिलीं हें त्यास फार भूषणावह आहे.

पुष्कळ विषयांचें वर्णन करण्यास त्यास जसा कालसंकोच आड आला तसा स्थलसंकोचही नडला आहे. बहुतेक काव्यांतील वृत्तान्त समरभूमि, ग्रीकांची छावणी, व ट्रायनगरी यांतच घडलेला आहे. देवांचें वृत्त स्वर्गांतील आहे. १८ व्या सर्गाचा शेवटला भाग व्हल्कनमंदिरांतला आहे. रामायणाची गोष्ट तशी नाहीं. त्यास काळ रामज-

न्मापासून तो लहु व कुश यांस कौमारदशा प्राप्त होई तों सांपडला. रामविवाह १६ वे वर्षी झाला. २८ व्या वर्षी राज्याभिषेक होणार होता. १४ वर्षे वनवास झाला. त्याच्या पुढें सीताविवासन व लहु व कुश यांचा जन्म व वाल्मीकीच्या आश्रमांत त्यांचें वाढणें इतक्या एका मनुष्याच्या अर्ध्या अधिक आयुष्याचा काळ वाल्मीकिला मिळाला. रामाचा प्रवास तरी अयोध्येपासून लंकेपर्यंत विस्तृत होता. मग त्यांत ऋतु, वेला, मृगया, शैल इ. साहित्यदर्पणकारांच्या व्याख्येंत आलेल्या विषयांचें वर्णन कसें शक्य होणार नाहीं? सर्वांच्या वर्णनास अवकाश मिळाला होता. ही व्याख्या रामायणास उत्तम लागू पडते. परंतु इलियडच्या भिन्न परिस्थितींत जेवढा फरक करणें इष्ट आहे तेवढा केला असतां ती इलियडलाही लागू पडते. ह्मणून इलियड हें महाकाव्य आहे असें ह्मणावयाला कांहीं हरकत नाहीं.

आतां होमरचे मुख्य गुण कोणचे ते पाहूं. त्याचा पहिला गूण ह्मटला ह्मणजे सरळ व साधी भाषा. अर्थबोध होण्यास कोणासच अडचण पडत नाहीं. हा केवळ त्याचाच गूण ह्मटला पाहिजे असें नाहीं. त्या वेळेस शास्त्रांची फार वृद्धि झाली नव्हती ह्मणून वर्णन करतांना रानावनांतील पशू, पक्षी, आकाशांतील तारे, वणवे, झरे इ. रोजच्या सर्वांच्या परिचयांतील उपमानांचाच उपयोग त्यानें केला आहे. ह्मणून सर्वांना अर्थबोध चांगला होतो. परंतु कवी शास्त्रसंपन्न झाले ह्मणजे त्यांची भाषा दुर्बोध होते. उदाहरणार्थ क्वचित्प्रसंगीं मोरोपंत घ्या.

नलगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती।
वैकुंठपेठ मोठी नामावरि हीन दीन लटपटती ॥

यांतील खटपट किती मोठी आहे हें समजावयास कार्यकारणभाव, समवायि कारण, असमवायि कारण इत्यादींचें ज्ञान पाहिजे मग त्या खटपटीपेक्षां नुसता नामोच्चार किति सोपा आहे हें तुलनेनें जास्त कळतें.* वाल्मीकीची भाषा त्याचें

*मोरोपंत स्वतां विद्वान होते. व विद्वान लोकांकरतांच त्यांनीं काव्यें लिहिलीं कीं काय असा कित्येक वेळां भास होतो. त्यांची कठिण भाषा व तिचें स्वारस्य व गूढ सौख्य सामान्य जनांस प्राप्त होत नाहीं. परंतु सर्वच आर्या तशा नाहींत. त्यांत साध्या, सरळ व सरस अशा पुष्कळ आहेतच.

काव्य पुरातन असल्यामुळें होमरच्या प्रमाणें साधी, सरळ व मनोवेधक आहे.

दुसरा इलियडमध्यें गुण आढळून येतो तो असा कीं त्यांत अनेक ठिकाणीं रसपरिपोष चांगला साधला आहे. ह्मणून तें ' रसात्मकं काव्यं' या व्याख्येप्रमाणें उत्तम काव्यांत गणलें पाहिजे.

एक दोन ठिकाणीं शृंगार रस साधला आहे. परंतु मुख्य रस वीररस होय. तो सर्वभर संचरलेला आहे म्हणून त्याचीं स्थलें दाखवून देण्यास नको आहे. करुण रस कित्येक वेळा वीररसास पुष्टि देण्याचें कार्य करीत आहे. कित्येक वेळा स्वतंत्ररीतीनें त्याचा परिपाक झालेला आहे. याचीं मुख्यस्थलें येणें प्रमाणें आहेतः—हेक्तरवधानंतर त्याच्या मातेचा विलाप पृष्ठ ६९३, आर्या. २१७–२२१; त्याहून विशेष त्याच्या पत्नीचा विलाप, पृष्ठ ६९६ आर्या. २४१–६१. परंतु सर्वांत करुणरसपुष्ट असा सरस भाग पृष्ठ १९५ आर्या १५५—२०८ येथें आला आहे. रणांत जाण्यापूर्वीं आपल्या सत्यव्रत पत्नीचा निरोप घेण्याकरतां हेक्तर मंदिरांत येतो. ती तेथें नसते. ती भ्रमिष्ठ होऊन हेक्तरासच शोधित आहे व मागून दासी अर्भक घेऊन फिरत आहे. अशा स्थितींत त्याची गांठ पडतांच 'रणांत जाऊन लढूं नको शहरांतूनच माऱ्याची जागा पाहून लढ. मला आई, बाप, बन्धू कोणी नाहीं. तीं सर्व मृत असून तुला पाहिलें कीं जीवन्त आहेत असें मी समजतें. या अर्भकाला अनाथ करूं नकोस ' इ. ती विनवण्या करिते. हेक्तरही कठिण काळ आला हें जाणूनसुद्धां अब्रूकरतां लढलें पाहिजे असें सांगतो. तथापि त्राय शहर शत्रु जिंकील व स्त्रीला दास्यत्व करण्याचा प्रसंग येईल असा त्यास संभव वाटतो व ह्मणतो. " कोणी निष्करुण ग्रीक प्रमदा तुला पाणी आणावयास लावील. तुझे नेत्र पाण्यानें भरून येतील व तिसरीच कोणी एक स्त्री ह्मणेल ' ही पहा! प्रसिद्ध वीर हेक्तर ह्मणून जो त्रायाचें रक्षण करणारा होऊन गेला त्याची स्त्री आज शत्रूची दासी बनून पाणी आणीत आहे. हिचा पति जवळ नाहीं. तो उगीच जगत आहे. ' इ. हे

शब्द कानीं पडल्या पूर्वींच धरणीनें ' आ ' करून मला पोटांत घ्यावें. " असें ह्मणून मुलास मोठ्या पदवीस चढव अशी प्रार्थना करून हेक्तर रणांत निघून जातो व तो अद्यापि जीवन्त असूनही तो कसचा परत येतो ह्मणून सर्वजण शोक करूं लागतात. इतका करुणरसपुष्ट भाग क्वचितच आढळतो. या बाबतींत होमर, कालिदास, वाल्मीकि, मोरोपंत हे सारख्याच योग्यतेचे आहेत मधून मधून तुलनेकरतां उतारे दिले आहेत.

होमरच्या काव्यांतील हा रसात्मक भाग वगळला तरी अधमकाव्याचा जो भाग ज्याला कोणी चित्रकाव्य ह्मणतात ह्मणजे ज्यामध्यें फक्त शब्दालंकार किंवा अर्थालंकार येतात, तोही चांगलाच आहे. हा सर्व उपमालंकारांनीं शोभित आहे. यांत जरी रस नाहीं तरी अप्रत्यक्षरीतीनें रसपरिपोष झाला आहे. उत्तम अर्थनिष्पत्ति साधली आहे. होमरचें बाह्यसृष्टीचें अवलोकन फार दांडगें असल्यामुळें त्यानें काढलेलीं चित्रें फार भव्य आहेत. व तीं कशीं हें दाखवितांना त्याच्या फक्त उपमांचा विचार केला पाहिजे. दुसरे अलंकार रूपक, प्रतीप, भ्रांतिमान् अपन्हुति इ० त्यानें फारसे वापरलेच नाहींत; व खरें ह्मटलें ह्मणजे ते वापरण्याची गरज नाहीं. कारण उपमा ही एकाच नाटकांत भिन्न भिन्न पात्रांची सोंग घेणारी नटीच आहे. उपमा हीच अन्य अलंकारांचें रूप धारण करते. एवढें मोठें गणितशास्त्र, ज्याचा भागाकार, गुणाकार, त्रैराशिक इत्यादि विपुल विस्तार झाला आहे, त्याच्या मूळाशीं मुख्य अंगें दोनच. एक बेरीज व दुसरें, वजाबाकी. गुणाकार ही बेरीज आहे. व भागाकार ही वजाबाकी आहे. ८×२=१६. येथें सोळा हा आंकडा जरी आठांस दोहोंनीं गुणून लब्ध झाला आहे, तरी तो एक बेरजेचाच प्रकार आहे. पूज्यांत ८ वेळा दोन मिळवा ह्मणजे १६ येतील. याच रीतीनें भागाकार हा वजाबाकीचा प्रकार आहे असें कळून येईल. त्रैराशिक हें गुणाकार व भागाकार यांचें केलेलें आहे; ह्मणजे बेरीज व वजाबाकीचेंच केलेलें होय. हेंच नातें उपमेचें इतर अलंकारांशीं

आहे. होमरनें इतर अलंकार वापरले नाहींत ह्मणून त्यास कमीपणा येऊं शकत नाहीं. त्यानें एका उपमेचीच वृद्धि केली आहे. परंतु तींत एक विशिष्ट वळण आहे. तें होमरीय आहे. तें कसें तें पाहूं.

ज्याचें वर्णन करावयाचें तें उपमेय होय. ज्याच्याशीं त्याचें साधर्म्य असल्यामुळें त्याची तुलना करावयाची तें उपमान होय; जो दोहोंत सामान्यपणें गुण एकच आहे त्यास समान धर्म ह्मणतात व तोच उपमेला कारण होतो. उपमेच्या या तीन भागांशिवाय साधर्म्याचे दर्शक ह्मणून शब्द असतात त्यांस वाचक शब्द ह्मणतात. उदाहरणार्थ जसा, सारखा इ. रणांत लढणारा वीर जो वर्ण्य आहे तो उपमेय; तो लांडग्याप्रमाणें लढतांना क्रौर्य दाखवतो ह्मणून लांडगा हें झालें उपमान व क्रौर्य हें झालें समान धर्म. ट्रोजनांवर तुटून पडणारे मिर्मिदन वीर हे लांडग्या प्रमाणें क्रूर होते. असें इतर कवि ह्मणता; पण होमरची पद्धति निराळीच आहे. होमर हा नेहमीं उपमानाचें ह्मणजे लांडग्यांचें फार विस्तृत वर्णन करीत जातो. वर्णन करतां करतां त्या क्रूरप्राण्यांच्या सवयींचें ज्यांत क्रौर्यधर्म विशेष खुलून दिसतो व ज्या क्रौर्य धर्मामुळेंच त्यांचा लांडगेपणा जगांत गाजत असतो त्यांचें चित्र काढतो. व तेणेंकरून समानधर्म जें क्रौर्य त्याचा उत्कर्ष होत होत पराकाष्ठा झाली ह्मणजे एकदम उपमेय, उपमान व समानधर्म यांची वाचक शब्दाशीं गांठ घालून उपमा पुरी करतो. येथें उपमेय विस्तृत मुळींच नसतें. इतक्या इतक्या गुणांनीं विशिष्ट जे लांडगे त्यांच्याप्रमाणें मिर्मिदनलोक ट्रोजनांवर धांवत गेले असें होमर ह्मणतो पृ. ४८६ आ. ७५–७९ पहा. मांसाशन करणारे लांडगे ज्यांची शक्तिं मृगांचा वध करण्यांत विशेष दिसून येते; जे प्रथम मोठ्या शृंगांच्या मृगाला धरून फाड फाडून खातात व ज्यांच्या दंष्ट्रा ह्मणून लाल भडक होतात; व मग जे नदीचें गढूळ पाणी लांब जिव्हांनीं चाटित चाटित जातात, ज्यांच्या मुखांतून भूमीवर रुधिरबिन्दू

गळतात व रानांत सांकून जातात, जे लांडगे सतत कळप करून धांवत सुटतात व ज्यांच्या उदरास खालीं ओढ लागते त्या लांडग्यांप्रमाणें धांवत हे मिर्मिदन वीर त्रोजनांवर धांवत गेले. इतर कवी कोणाचेंही सविस्तर चित्र काढीत नाहींत. उपमेयाचाही विस्तार करीत नाहींत व उपमानाचाही करीत नाहींत. उपमेय, उपमान, समानधर्म व वाचकशब्द इतकीं वाक्यांत आणून वाचकांस चित्र कल्पनेनें काढावयास लावतात. व तें चित्र वाचकांच्या कल्पनाशक्तीवर अवलंबून असतें. परंतु येथें प्रतिभासंपन्न कवीनें तें काढलेलें असल्यामुळें त्याहून जास्त चांगलें चित्र कल्पनेनें काढणें सामान्य वाचकांस शक्य नाहीं. अतिप्रसिद्ध उपमान जर घेतलें तर वाचक तसें काढील. परंतु कवीचें जें अवलोकनसामर्थ्य असतें तें त्याच्यांत नसल्यामुळें कल्पनेचाही विकास होत नाहीं. या ह्मणण्याच्या पुष्ट्यर्थ होमरच्या आणखी एक दोन उपमा पाहूं. पृष्ठ १३५ आ. १५७–१५९ पहा. ग्रीकसैन्याच्या पंक्ती एकीमागून एक तीराकडे येणाऱ्या समुद्राच्या लाटांशीं तोलिल्या आहेत. अन्य कवि ह्मणता कीं लाटांप्रमाणें ग्रीक सैन्य त्रोजनांवर चाल करीत गेलें. वाचकांच्या मनांपुढें ही प्रक्षुब्ध सागरांचें साधारण स्वरूप कल्पनेनें उभें राहलें असतें. होमरची तऱ्हा पहा. होमर ह्मणतो जेव्हां वायव्य मारुत वहावयास लागतात, व सागराचें जल उत्सुक होऊन नभासच भेटावयास निघतें, व प्रचण्ड वृद्धि पावून दर्पानें वर फेनाचें उद्गमन करतें, व उंच शिलांचा त्यास प्रतिरोध झाला असतां दीर्घ आक्रोश करीत एकीमागून एक लाटांनीं तीरावर धांव घेतें त्याप्रमाणें पंक्तींवर पंक्ती लावून ग्रीकसैन्य शत्रूवर चाल करीत गेलें. उपमानभूत प्रक्षुब्ध सागराचें हें भव्य चित्र आहे.

पृष्ठ २७६ आ. २९-३० पहा. येथें नेप्चून वेगानें निघून गेला असा अर्थ आहे. इतर कवि ह्मणता श्येनवेगानें नेप्चून निघून गेला. श्येनाच्या चापल्यावरून कांहीं कल्पना वाचकांस झाली असती. पण आतां होमरीय वळण कसें आहे

तें पहा. होमर ह्मणतो. शिलोच्चयावर आपल्या स्थानीं बसलेला श्येन आपलें भक्ष्य जो कोणी लघु पक्षी त्यास धरण्याकरतां ज्या वेगानें जातो त्या वेगानें नेप्चून गेला. येथें वेगाची पराकाष्ठा दाखविण्याकरतां श्येनाचें विहगानुसरण श्येनाच्या शिलोच्चयावरील निलयापासून रेखाटलें आहे; ह्मणजे श्येन हा भक्ष्य धरण्याचे आपलें स्वाभाविक कार्य करीत आहे; परंतु त्याच वेळेला त्याच्या वेगाची पराकाष्ठा झालेली असते ह्मणून त्याची ती अवस्था उपमेंत विस्तारेंकरून वर्णिली आहे. नेप्चून स्वस्थानास गेला. तो कोणाचे ही पाठीस लागला नाहीं. साम्य फक्त जवा पुरतेंच आहे. या चित्र काढण्याच्या हौसेनें होमरीय उपमेंत प्रत्यक्षदृश्यत्व हा गुण फार येतो. लांडगे, सिंह यांच्या विस्तृत उपमा योजून पूर्वकालीन शौर्य गुणाची त्यानें पुनरावृत्ति करून दाखविली आहे. हीं चित्रें काढण्याची हौस होमरच्या अंगांत इतकी प्रबल होती कीं त्याच्या मनांतलीं चित्रें उपमामिषानें तृप्ति होईतों काढतां आलीं नाहींत ह्मणून व्हल्कनकरवीं जी ढाल अकिलीसाकरतां त्याच्या मातेनें निर्माण करविली तीवर भव्य चित्रें व्हल्कनकडून कोरविलीं. सर्ग १८ पृष्ठ ५८० आर्या २३२–२९० पहा. ही पद्धति चांगली वाटते याचें कारण असें आहे कीं कवि हे चित्रकारच आहेत व कविता हें चित्रच आहे. येथें वाचक असें विचारतील कीं चित्रकाराच्या चित्रास काव्य ह्मणावयाची तयारी आहे. उपमा या चित्रेंच असतात व त्यांचीं चित्रें किती भव्य असतात तें होमरीय उपमेवरून समजतच आहे. मग ज्या उपमांचीं चित्रें इतकीं भव्य असतात, त्याच उपमांनीं युक्त जो काव्याचा भाग त्याची गणना अधम काव्यांत कशी करतां येईल ? कशी तें पहा. बाह्यसृष्टीच्या आधारें ह्मणजे समुद्र, लांडगे, श्येन इत्यादींकडे आरसा धरूनच त्यांत त्यांचें प्रतिबिंब घेऊन पटावर चित्र-कार चित्र काढतो तें सत्यस्वरूपी असतें. कवि ही त्याचेंच चित्र शब्दांनीं काढितो. परंतु चित्रकाराचें चित्र निर्जीव आहे. कवीच्या शब्दसृष्टींत जीव

आहे. काव्यांत गोंवलेल्या उदात्त विचारांस द्विगुणित, त्रिगुणित, शतपटही करण्याचें सामर्थ्य कवीच्या शब्दांत आहे. ब्रह्मदेवाची उत्पादक शक्ति कवीच्या अंगांत आहे. "England expects every man to do his duty." आंग्ल माता आपला प्रत्येक पुत्र आपलें कर्तव्य करील अशी आशा करीत आहे. " या नेलसनच्या काव्यमय शब्दांनीं पुष्कळ कर्तव्यदक्ष इंग्रज उत्पन्न केले आहेत, हेच काव्यमय शब्द सांप्रत आणखी उत्पन्न करीत आहेत व पुढेंही करतिच रहातील. " करिष्ये प्रतिजाने च रामो द्विर्नाभिभाषते " वचन दिल्याप्रमाणें पित्राज्ञेनें १४ वर्षें वनवास भोगणाऱ्या रामाच्या या वाक्यांत लोकांस एकवचनी करण्याचें अगाध सामर्थ्य आहे. * ही सजीवता चित्रांत नाहीं. त्यांची निर्जीवता साधुशिरोमाणि तुकाराम महाराजांनीं स्पष्ट करून सांगितली आहे.

चंद्र सूर्य चित्रें लिहितात भिंती
प्रकाशाचें अंग लिहितां न ये;

उत्तम चिताऱ्यानें जरी भिंतीवर उत्तम सूर्य चंद्रांचीं चित्रें रेखाटलीं तरी आंत प्रकाशाचें अंग नसल्यामुळें रात्र झाल्यावर तो सूर्य व तो चंद्र प्रकाश देऊं शकत नाहींत; एवढेंच नाहीं पण ते दुसऱ्यास दिसावे ह्मणून दिवा आणावा लागतो. ह्मणून उपमादि अलंकारांनीं केवढेंही भव्य चित्र काढितां आलें तरी त्यास उत्तम काव्याची सर येणार नाहीं. उपमायुक्त काव्य हें अधमच आहे असें वाचकांच्या लक्षांत येईलच.

होमरच्या बहुतेक उपमा विस्तृत स्वरूपाच्या आहेत. होमरीय उपमांचा दुसरा गुण वैचित्र्य हा होय. यांतील उत्तम उत्तम उपमांत खालील उपमानांचा उपयोग त्यानें केलेला आहे:—पर्वतावरील वणवा,

*कै. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांना जी अत्यंत मोठी पदवी प्राप्त झाली होती तिचें मूळ त्यांच्या तोंडीं असलेल्या " रामो द्विर्नाभिभाषते" या वाक्यांत होतें.

सागर, शस्यसंपत्ति, गांधिलमाशा, अतिवृष्टि, वृक्षपतन, गृध्र, स्रोतःप्रवाह, हिमपात, विद्युत्प्रकाश, झंझावात, प्राण्यांमध्यें वराह, लांडगे व सिंह, (यांवरून २५–३० उपमा आहेत.) त्यांतील उत्तम ह्मटली ह्मणजे **प**त्रोक्लशाच्या शवाचें रक्षण **आ**जक्ष करतो त्यावेळेस त्याला आपल्या पिलांचें रक्षण करणाऱ्या सिंहीची उपमा दिली आहे ती होय. पृ. ५२८ आ. ६६–६७ पहा. रागामुळें ती अधिकच शक्तिमान दिसत असून भ्रुकुटीचें चर्म खालीं ओढून घेऊन आपले नेत्र झांकीत आहे असा तिचा विस्तार केलेला आहे.

पुष्कळ उपमा अगदीं साध्या असून रोजच्या वहिवाटींतल्या आहेत. उपमेय स्पष्ट करण्यास उपयोग होत असेल तर उपमानाच्या साधेपणाकडे **हो**मर लक्ष देत नाहीं. तथापि त्यांत मार्मिकपणा फार आहे. **प**त्रोक्लशाचें शव **ट्रो**जन हरून नेत होते. **ग्री**क हरूं देत नव्हते. ह्मणून त्यांची ओढाताण ज्या वीरांनीं केली त्यांस चामडें कमविण्याकरतां ओढाताण करणाऱ्या चर्मकारांशीं तोलिलें आहे. पृष्ठ ५३९ आ. १८५–८७ पहा.

ट्रोजनांच्या तावडींत सांपडलेला चिंवट वीर **आ**जक्ष व द्वाड पोरांच्या तावडींत सांपडलेला बडग्यांचा मार खाणारा गाढव हे सारखेच ह्मटले आहेत. पृष्ठ. ३३७ आ. २५९–६१पहा. सडण कांडण व मळणी काढणें यांवरून हीं उपमा घेतलेल्या आहेत. पृ. ६३६ आ. २४४–४६ पहा.

ग्रीकांचा विनाश होत आहे असें **प**त्रोक्लश पहातो व समरांत जाण्या करतां **अ**किलीसाचीं परवानगी रडून रडून मागतो. तेव्हां आईच्या जवळ जाऊन तिचे ओंचे धरून ती उचलून घेईतों तिच्याकडे सास्र-मुखानें बघत राहणाऱ्या लहान मुलगीशीं **प**त्रोक्लशाची तुलना केली आहे. पृ.४७९ आर्या ३–४ पहा.

कोणच्या पक्षास जय येईल हें आनिश्चित ठेवणाऱ्या समरप्रगतीस, काटकसर

करून पोरांचें पोट भरेल या हेतूनें थोडा थोडा कापूस काढून घेऊन तोल केल्यावर स्थिर राहणाऱ्या कापूस विकणाऱ्या वृद्ध बाईच्या पारड्यांशीं तोलिलें आहे. पृष्ठ ३७१ आर्या १९३–१९४ पहा.

ग्रीकांची भिंत फीबसनें लीलेनें त्वरित मोडून टाकिली ती खेळांत वाळवेचीं केलेलीं चित्रें मुलें जशीं भुसुकन् मोडून टाकतात तशी, असें ह्मणून समरांगण हें मुलांचें खेळाचें अंगणच बनविलें आहे. पृ. ४६० आ. १८२–१८३

वरील सर्व उपमांमध्यें सौन्दर्य हा गुण आहे, हें सांगावयास नको. त्या शिवाय या विस्तृत उपमांच्या चित्रांत एक खुबी आहे ती वरच्या सर्व उपमांचें निरीक्षण केल्यावर कळेलच. चितारी इष्ट वस्तूंचें चित्र काढितो परंतु त्या वस्तूच्या मध्यवर्ती चित्रास शोभविण्याकरतां पार्श्वभागीं किंवा अग्रभागीं इतर वस्तूंचा किंवा जागेचा भरणा लागतो तो सर्व यथादर्शन शास्त्राप्रमाणें यथाप्रमाण काढला ह्मणजे चित्राला उत्तम शोभा आणतो. असें शोभा आणण्याचें जें चित्रकाराचें चातुर्य तें होमरमध्यें विस्तृत उपमा योजण्याच्या हौसेनें साध्य झालें आहे.

सृष्टीमध्यें कांहीं काहीं पदार्थांचे रंगच अतिशय सुरेख असतात. त्यांचें सौंदर्य स्वयंभूच असतें. ते रंग ज्या वस्तूंच्या अगीं आहेत त्यांच्या चित्रांस शोभा देण्यास पार्श्वभाग किंवा अग्रभाग यांच्या अलंकृतीची फारशी अपेक्षा नसते. ते रंग साधारणपणें येणेंप्रमाणें वस्तूंत दिसून येतात. जमीनींत रुजून वर येणाऱ्या वृक्षादींचे रंग (उदाहरणार्थ केळीच्या कोंक्याचा), आकाशाचा रंग, पाण्याचा रंग–मग तो स्फटिकवन्निर्मळ असणाऱ्या झऱ्याच्या पाण्याचा असो किंवा हिमानें थिजून बर्फ झाल्यामुळें सूर्यकिरणांचें पृथक्करण करून त्यांस परावृत्त करण्याचें ज्याच्या अंगीं सामर्थ्य आलें आहे अशा गोठलेल्या पाण्याचा असो, अथवा ढगाचे ठिकाणीं घनीभूत झालेल्या नीलवर्ण पाण्याचा असो, किंवा संक्षुब्ध झालेल्या सागरांतील फेनमय पाण्याचा असो–विजेचा रंग, मयूराच्या-

पिसाऱ्याचा रंग, इन्द्रधनुष्याचा रंग, फुलांचा रंग इ. अनेकांचीं उदाहरणें देतां येतील. या वस्तूंचा उपमानाचे ठिकाणीं उपयोग केला असतां रंगाची कांहीं अवर्णनीय शोभा दिसत असते. व ज्या दोन भिन्न वस्तूंचे किंवा पदार्थांचे भिन्न भिन्न रंग जवळ जवळ आले असतां केवळ सान्निध्यानें फार खुलून दिसतात असे दोन भिन्न पदार्थ एके ठिकाणीं आणून उपमान सज्ज केलें कीं त्या उपमेनें अनुपम आनंद होतो.*

ही जी रंगाची खुबी आहे तीही होमरला क्वचित्प्रसंगीं साधली आहे. मेनिलासाला पंदारसानें कमरेवर क्षत केलें त्यांतील रक्त त्याच्या हिमशुभ्र जानूंवर पाघळलें तेव्हां त्यास लालरंगानें रंगविलेल्या हस्तिदंतफलकांची शोभा आली असें म्हटलें आहे. पृ. १२४ आ. ५२।५३ पहा.

पृष्ठ २४९ आ २४५–५० पहा. ट्रोजनांनीं पहारा करण्यास रात्रभर परसे पेटविले होते ते आकाशांत इन्दूच्या सभोंवार चमकणाऱ्या नक्षत्रांप्रमाणें शोभत होते असें ह्मटलें आहे. यांत चंद्रप्रकाशानें सृष्टीला लावण्य कसें आलें आहे तें दाखविलें आहे. पर्वत स्पष्टपणें आपले उंच भाग दाखवूं लागले आहेत. वनराजींस कान्ति चढली आहे व आकाश अगदीं विमल झालें आहे. हा चित्रमय देखावा पाहून मेषपालासारखा अजाण मनुष्यही आनंद पावून या दीप्तीस धन्य ह्मणत आहे.

या शिवाय वणव्याच्या उपमा आहेत त्यांत अग्निज्वालेच्या रंगाची खुबी आहे. पृ. ६३६ आ. २४१–४२ पहा.

रंगाची शोभा ज्यांत आहे असल्या उपमा देण्याची खुबी वाल्मीकीला चांगली साधली आहे.

---

*मात्र जवळ जवळ आणलेल्या दोन वस्तूंचे रंग जात्याच जुळते पाहिजेत. नाहीं तर कांहीं लोक ७–८ रंग आणून आपल्या घराचीं दारें किंवा भिंती एकाखालीं एक असे वाटेल त्या रंगाचे चौकोनी पट्टे रंगवून भरून टाकतात व साऱ्या रंगाचा बेरंग करतात, तसा प्रकार न होण्याची खबरदारी कवीनें घेतली पाहिजे.

बालेन्द्रगोपान्तरचित्रितेन विभाति भूमिर्नवशाद्वलेन ।
गात्रानुपृक्तेन शुकप्रभेण नारीव लाक्षोक्षितकंबलेन ॥ १ ॥

येथें पावसाळ्यांत शेवाळीनें आवृत झालेली भूमि हिरवीगार दिसत असून ती लालभडक रंगाच्या मृगांच्या किड्यांनीं चित्रित झाल्यामुळें एकाद्या पोपटीरंगाच्या व लाखेच्या टिपक्यानीं चित्रित अशा अंगाबरोबर पांघरलेल्या तंग शालीनें शोभणाऱ्या नारीप्रमाणें दिसूं लागली,असें ह्मटलें आहे. येथें हिरवा व तांबडा रंग हे सान्निध्यानें फार खुलतात ह्मणून हें चित्र फार रम्य झालें आहे.

सुवर्णपंखैर्विशिखैः संपतद्भि समंततः । बभूव रजनी चित्रा खद्योतैरिवशारदा

रामाचे सुवर्णपंख लावलेले बाण जेव्हां सर्वभर उडूं लागले तेव्हां ती रात्र शरद् ऋतूंतील सर्वभर चमकत उडणाऱ्या तेजोमय काजव्यांनीं चित्रित होणाऱ्या काळोख्या रात्रीप्रमाणें दिसली असें ह्मटलें आहे. येथें काळा व सोनेरी रंग यांच्या सान्निध्यानें उपमेच्या चित्रास शोभा आली आहे.

सीतेला रावण खांद्यावर घेऊन आकाशमार्गें पळत असतां ती कृष्णघनांतर्गत विजेप्रमाणें शोभत होती असें ह्मटलें आहे.

सा पद्मपीता हेमाभा रावणं जनकात्मजा ।
विद्युद्घनमिवाविश्य शुशुभे तप्तभूषणा ॥ १ ॥

कमलाच्या केसराप्रमाणें जिचा वर्ण असून हेमाप्रमाणें जिची कांति उज्ज्वळ आहे व जिनें दीप्तिमत्कांचनाचीं भूषणें धारण केलीं होतीं ती रावणाच्या सान्निध्यांत, मेघांत प्रविष्ट झालेल्या वीजेप्रमाणें दिसूं लागली. येथें कृष्ण वर्ण घनाचा रंग व विजेचा उज्ज्वल रंग हे सान्निध्यानें खुलत असल्यामुळें उपमेच्या चित्रास फार शोभा आली आहे.

असो वरील साध्या व रंगाच्या उपमा यांत बाह्य सृष्टीतील वस्तू किंवा प्राणी उपमेला घेतले असल्यामुळें त्यांचें भव्य चित्र पटावर काढतां येण्या-

सारखें आहे. परंतु होमरच्या कांहीं उपमा मनोव्यापारावरून घेतल्या आहेत. त्यांचें चित्र स्मृतीच्याच पटावर काढलें पाहिजे. इदापर्वता-वरून देवसभेस जाणाऱ्या जूनोच्या जवास मनोजवाची उपमा दिली आहे. अनेक देशांत प्रवास केलेला माणूस प्रवासाचें स्मरण करून येथें होतों तेथें होतों अशी ज्या शीघ्र जवानें मागील वृत्तांताची आठवण करतो त्या शीघ्र जवाची उपमा जूनोच्या जवास दिली आहे. ही उपमा सुरेख आहे. लंकेंत गेल्यावर प्रथम दर्शनीं मारुतीला रामविरहपीडित सीता देवी कशी दिसली त्याचें वर्णन वाल्मीकीनें केलें आहे.

तां स्मृतिमिव संदिग्धां ऋद्धिं निपतितामिव ।
विहतामिवचश्रद्धामाशां प्रतिहतामिव ॥
सोपसर्गां यथा सिद्धिं बुद्धिं सकलुषामिव ।
अभूतापवादेन कीर्तिं निपतितामिव ॥ २ ॥

अर्थाविषयीं संशयित असलेल्या स्मृतीप्रमाणें, निराश झालेल्या आशेप्रमाणें, असत्य दूषणांनीं मलिन झालेल्या कीर्तीप्रमाणें सीता देवी दिसली असें झटलें आहे. हें चित्र पटाशिवाय काढलेलें आहे. मनांतल्या मनांत बिनचूक सोडवलेल्या गणिताच्या उदाहरणाप्रमाणें अथवा भूमितीच्या सिद्धान्ताप्रमाणें तें सुखदायक आहे.

होमरच्या लढाईच्या वर्णनांत एक निराळेंच वळण दिसून येते तें नावां-जण्यासारखें आहे. हातघाईवर वीर आले झणजे तशा युद्धाचें वर्णन सर्व कवी एकसारखेंच करतात. इलियड पृ. १३७ पहा.

ढालीवरतीं ढाली, भाल्यांवर आदळोनियां भाले ।
कवचांचें भान सरुनि वीरांवर वीर पालथे झाले ॥ १६८ ॥
हत हंता आक्रोशा जयशब्दा करिति एक समयाला ।
रुधिराचे पाट झणीं भूवरतीं लागले वहायाला ॥ १६९ ॥ होमर.

राक्षसोऽसीति हरयः वानरोऽसीति राक्षसाः ।
अन्योन्यं समरे जघ्नुस्तस्मिंस्तमसि दारुणे ॥ १ ॥
हत, दारय चैहीति कथं विद्रवसीति च ।
एवं सुतुमुलः शब्दस्तस्मिन्सैन्ये च शुश्रुवे ॥ २ ॥ रामायण.

'अरे ! हा राक्षस' असें ह्मणून वानर व "अरे हा वानर" असें ह्मणून राक्षस, एकमेकांला भयंकर काळोख पडला असतां मारूं लागले. "ठार मारा"! "फाडा"! "ये ये"! "पळतोस कां"? याप्रमाणें प्रक्षुब्ध ध्वनि सर्व सैन्यांत ऐकूं येऊं लागला.

घ्नंतमन्यं जघानान्यः पातयन्तमपातयत् ।
गर्हमाणं जगर्हान्यो दशन्तमपरोऽदशत् ॥ १ ॥
देहीत्यन्यो ददात्यन्यो ददामीत्यपरो पुनः ।
किं क्लेशयसि तिष्ठेति तत्रान्योन्यं बभाषिरे ॥ २ ॥ रामायण

अर्थः—एक दुसऱ्याचा वध करूं जातां त्याच्या हातून मृत्यु पावला; दुसऱ्याला पाडूं लागतांच त्याच्या हातून पतन पावूं लागला; निंदा करूं लागला तोच निंदा करून घेऊं लागला; ज्याला एक चावूं पहात होता तोच त्याला चावूं लागला; एक मार ह्मणतांच दुसरा मारूं लागला; व मीच मारतों असें पहिला ह्मणूं लागला. अरे कशाला एवढे क्लेश घेतोस स्वस्थ उभा रहा ! याप्रमाणें ते (वानर व राक्षस) एकमेकांस बोलूं लागले.

झांकी शरपटलांनीं आढ्य जसा दुर्गतांसि वस्त्रांनीं ।
तात सुता, सुत ताता, भ्राता भ्रात्यास, मित्र मित्रास ।
मारित होते राया ! होउन विकरुण विखेद वित्रास ॥ १ ॥
न दिसे, न कळे स्वपर ध्वांत परम गाढ वाढवी रजनी ।
केला अवहार नृपा ! होय क्षतताप बाढ वीरजनीं ॥ २ ॥ मोरोपंत.

या उताऱ्यांवरून असें आढळून येईल कीं, सामान्य प्रकारानें युद्धाचें

वर्णन सर्व कवी एकच तऱ्हेनें करतात; परंतु होमरमध्यें वैचित्र्य फार आहे. त्याच्या योगानें लढाईच्या वर्णनांकडे होमरनें १२ सर्ग लाविले आहेत तरीही तीं वर्णनें वाचकांस कंटाळवाणी होत नाहींत. अशी तींत काय जादू आहे तें पाहिलें पाहिजे. संग्रामप्रसंग निरनिराळे असतील एवढें ह्मणून चालणार नाहीं. कारण एवढें मोठें युध्द चालू झालें असतां निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे योध्दे थोडे थोडे सैन्याचे विभाग करून आळी पाळीनें लढत बसतील अथवा एकदम छापा घालून एकत्र रणसंभ्रम मातवतील, व प्रत्येकीं द्वंद्वयुध्दें खेळतील अशा रीतीनें भिन्नता वर्णनांत येईल. अनेक वेळा स्थलभेदानें भिन्नता येईल. ह्मणजे एकवेळ समरक्षेत्राच्या मध्यभागीं तर दुसऱ्यावेळीं ग्रीकांच्या तटबंदीशीं, किंवा प्रत्यक्ष नौदेशांतच युध्द चालू राहील, अथवा उलट बाजूनें त्रायाच्या पुरद्वारीं, किंवा स्कामन्दर-नदीच्या तटींही युध्द सुरू होईल. परंतु याशिवायही होमरची युध्दवर्णनास वैचित्र्य आणण्याची रीति निराळी आहे. ज्या ज्या वीरांस मरण प्राप्त झालें आहे त्यांना त्यांना तें विविधप्रकारानें प्राप्त झालें आहे असें होमरनें दाखविलें आहे. त्यामुळें त्याचें कल्पनावैचित्र्य दिसून येत आहे. हे प्रकार कधीं कधीं त्या वीरांचा स्वभाव, वय, अधिकार, धंदा, व्यापार, राष्ट्र, व वंश यांत भेद असल्यामुळें एकाच करुणरसाचा परिपोष अनेकधा करण्यांत आला आहे. उदाहरणार्थ. एक नववयस्क ह्मणून ज्याला बापानें रणांत न पाठविण्याचा आग्रह धरिला होता तो मरतो; दुसरा मरतो तो त्याचा जनक मोठा देवोपासक असूनही संचित केलेल्या पुण्यानें त्याचें रक्षण करूं शकत नाहीं, ह्मणून मरतो; तिसरा प्रत्यक्ष दायानेपासून त्यानें धनुर्विद्या प्राप्त करून घेतली असतां ती गुरूची विद्या व गुरु हीं दोन्हींही कामीं आलीं नाहींत ह्मणून मरतो; आणखी एकादा रणलोभी लांबून आलेला घरास परत जाऊं शकत नाहीं, कारण तसें करण्याच्या आधींच मरतो. कोणाच्या मरणानें

उत्तम कुलाचा वंशक्षय होतो, कोणी आत्मश्लाघी गर्वाचें वचन पुरें न करतां मरतो, कोणी जीवरक्षणार्थ शत्रूच्या पायां पडतां पडतां मरतो, कोणाच्या अंगीं कांहीं गुण नसला तर स्वभाव तरी विचित्र असतो, किंवा विचित्र शस्त्रास्त्रें आणतो व त्यांचा उपयोग न करतां मरतो.

कित्येक वेळां वीर मरतांना जे धरणीवर पतन पावतात, त्या पतन पावण्यांत सुद्धां विशेष प्रकार दाखवितात; पृ. १६३ आ. २२६–२८ पहा. येथें मिदनाच्या मृत्युप्रकाराचें चित्र पहा. त्याच्या कोंपरावर आघात होतांच हात लुला पडल्यामुळें धरलेल्या रश्मी खालीं गळून पडतात व सरपटत रहातात. मग कपाळावर कोनांत वार होतांच रथावरून खालीं डोकें वर पाय होऊन तो भूमीवर पतन पावतो. तें स्थल बिलबिलीत असल्यामुळें स्कंधांपर्यंत त्याची काया जमिनींत बुडून कवचाच्या भारानें कुशीवर न लवंडतां तशीच राहते व पायमात्र वर हलत रहातात. पुढें रथाखालीं चेंगरण्यानें त्यास मरण येतें.

पृष्ठ ५१४ आर्या ३६१ पहा. सेब्रिआनीसला भ्रुकुटिद्वयावर वार लागून तें चुरून गेलें व डोळे निखळून धुळींत पदार्थीं गळून पडले.

आल्काथोअसाच्या उरांत शूल रुतून राहिला तो बरोबर हृदयावर ! तेणेंकरून शूलाचें दुसरें अग्र हृदय धडधड करीत होतें तोंवर हलतच राहिलें. दुसऱ्या कोणाचें शिर कापून शत्रूनें फेंकून दिल्यावर तें घडघडत गेलें.*

समरांगणीं वीरांस जखमा होतात व मरतात असें पुष्कळ कवी दाखवितात. परंतु पुष्कळ कवींची चाल कपाळावर किंवा उरावर जखमा करून वीर नष्टशुद्धि होऊन मृत झाले असें दाखविण्याची आहे. परंतु त्यास जखम झाली ती कशी झाली याचा विचार करतां त्या जखमेनें तरी त्यांस मृत्यु येऊं नये असें खात्रीनें वाटूं लागतें. अशा जखमांस

* करती रणांगणीं भट शत्रुशिरःकंजकंदुकक्रीडा । मोरोपंत.

फक्त यांच्या कवनांतच एवढें भयंकर व प्राणहानिकारक स्वरूप प्राप्त होत असल्यास नकळे. कवीला एवढ्याकरतां थोडें शारीर रचनेचें ज्ञान पाहिजे. तें शस्त्रवैद्यास लागेल एवढें नको पण चितार्‍यास जेवढें लागेल तेवढें पाहिजे. तें होमरचे अंगीं होतें हें त्यानें पतन पावलेल्या वीरांस कशा जखमा केल्या आहेत तें पाहिलें ह्मणजे कळेल. पत्रोक्लश अकिलीसाचें कवच घालून लढत होता. त्याला मारून तें कवच हरण करून आपल्या अंगांत घालून हेक्टर लढत होता. त्यास जीवनाशक वार अकिलीसानें केला तो मानेंत केला. कारण तेवढीच जागा तें कवच धारण करणार्‍या वीराची शस्त्रानें विद्ध होण्यासारखी होती. तेथें अकिलीसानें वार केला. त्यानें हेक्टराचा जीव गेला, हेंहि खरें; परंतु हेक्तराच्या तोंडून अकिलीसाचें मरण वर्तवावयाचें होतें; तेवढ्याकरतां श्वासनलिका फुटणार नाहीं अशा रीतीनें वार अकिलीसानें केला हें सांगण्याची कवीनें खबरदारी घेतली आहे.

होमरच्या स्वभाववर्णनांतही हेंच वैचित्र्य दिसून येत आहे. एकट्या शौर्यगुणाचेंही त्यानें निरनिराळ्या वीरांत निरनिराळे प्रकार दाखविले आहेत. अकिलीस हा शौर्याचा नमुनेदार वीर असून अत्यंत कोपीष्ठ पण कांहींसा उदासीन वृत्तीचा व क्वचित्प्रसंगीं वीराला उचित अशा हृदयाच्या कोमलतेनें शोभत आहे असें होमरनें दाखविलें आहे. डायोमीद हा मोठा धाडसी व अतिप्रसंग करणारा आहे. पुत्रवात्सल्यानें ईनिआसाचा बचाव करण्याकरतां आलेल्या व्हीनसला भाल्याचें क्षत तळहातावर प्रसाद ह्मणून डायोमीदाशिवाय कोण देईल? तथापि कोणी चांगलें सांगेल तर त्याचें तो ऐकत नाहीं असें नाहीं.

मध्यरात्रीच्या काळोखांत शत्रूच्या गोटांत शिरून कांहीं वीरांचे प्राण घेण्याचें व त्यांच्या अश्वांचें हरण करण्याचें साहस युलिसीसाशिवाय दुसर्‍याच्यानें झालें नसतें.

आजक्षानें परबलाची अपेक्षा केव्हांही केली नाहीं. होईल तेवढें कार्य स्वतां

करण्याची त्याची उमेद असे. हेक्तर हा वीर अगदीं अनलस व सदोदित दक्ष असा असे; त्याचें जास्त वर्णन पृष्ठ ९९ च्या खालीं टीप आहे तींत दिलें आहे.

अगमेम्नन हा रणशूर असून नीतिवेत्ता असा वर्णिलेला आहे. कोणाला चढवून, कोणाला चिढवून काम कसें करून घ्यावें हें याला चांगलें समजत असे, पण हा जरा लोभी होता यामुळें अकिलीसाचें व त्याचें एका स्त्रीवरून भांडण झालें. याचप्रमाणें प्रत्येक वीरासंबधें ह्मणतां येतें.

ही सर्व वीररूपी ग्रहमाला होमरनें जी निर्माण केली ती मध्यवर्ती अकिलीसरूप प्रतापसूर्याचे वाटोळी फिरून त्याचें वर्चस्व स्थापन करण्याकरतांच होय. यांच्या अंगीं एवढा पराक्रम आणलेला नसता तर अकिलीस हा अतिशयोक्तीचा पुतळाच दिसला असता. हेक्तर, सर्पिदन, व ग्लाकस या ट्रोजनांच्या अंगीं जर एवढा पराक्रम दाखविला नसता तर त्यांच्यावर जय मिळविणें ग्रीकांस भूषणास्पद न होतां उपहासास्पद झालें असतें. बाकीच्या ट्रोजनांनीं जो मारा शत्रूवर केला तो लपून छपून आडवाटेनें केला. तथापि हेक्तरला अकिलीसाचे हातून जें मरण आलें तें कपटप्रयोगानें आलें. मिनर्वेनें हेक्तराच्या बन्धूचें रूप घेऊन त्यास अवसानीं फंसविलें. आकिलीसानें हेक्तरास शूल मारिला. त्याचा नेम साधला नाहीं. ह्मणून तिनेंच त्याला तो परत आणून दिला ६८९ पृ. टीप पहा. पत्रोक्लशास तरी अपालोनें आधींच वार केला होता. मागून हेक्तरानें त्याचा वध केला; यांत कांहीं भूषणावह नाहीं. हे दोन्हीं प्रकार कवित्वाला न्यून आणणारे आहेत.

युलिसीस व नेस्तर हे शहाणपणाचे आगर असून शौर्यविहीन नाहींत. नेस्तर हा पूर्वकालीं केलेले पराक्रम गाऊन आत्मस्तुति करण्याची हौस दाखवितो.

स्त्रियांचे स्वभाव होमरनें फार व्यापक स्वरूपाचे दाखविले आहेत. व तसे दाखविले असतां ते जास्त संभाव्य दिसतात. स्त्रियांमध्यें वैलक्षण्य कमी असतें; कारण विलक्षण व्यक्ति त्यांच्यांत निपजत नाहींत. स्त्रीधर्मास त्या कधीं झुगारून

देत नाहींत, यामुळें साधेपणा त्यांच्यांत बहुशः पुष्कळ असतो व कृत्रिमपणा कमी असतो. ह्मणून स्त्रीस्वभावाचें वर्णन करावयाचें ह्मणजे स्त्रियांचे दोन चारच वर्ग केले ह्मणजे झालें. कान्ता, माता, मुख्य; व दुहिता, भगिनी किंवा कुमारी हे गौण. नायिका यापैकीं कोण हें समजलें कीं ती पुढें अमुक प्रसंगीं काय करील तें सांगतां येतें इतका साधेपणा होमरनें स्त्रीपात्रांत आणिला आहे. त्यांत चाणाक्षपणा दाखविला आहे. पुत्रप्रसवानें जिच्याकडे नुकतेंच मातृपद आलें आहे ती हेक्तराची तरुण पत्नी अॅन्द्रोमाकी हेक्तराच्या विनाशास सर्वनाश ह्मणत आहे ती व्या. (पृ. १९८ आ. १७७ पहा.) अथवा चाणाक्ष, पश्चात्तापसंपन्न, व त्रायपुरींत प्रायमगृहीं तिला दाखविली जाणारी माया लज्जास्पद व खेदकारक आहे असें पूर्णपणें जाणणारी हेलन व्या. (पृ. ७८२ आ. ३८८ पहा.) तरी दोहोंवर होमरची स्वत्वाची खूण दिसेलच. इतर कवींनीं अनुकरण करण्याजोगे स्त्रीस्वभावाचे हे नमुने होमरनें निर्माण केले आहेत; ते पुढें ठेऊन व्यक्तिस्वरूपांचीं पात्रें कोणींही निर्माण करावीं.

देवादिकांच्या पात्रांतही स्वभावांचें वर्णन सुरेख आहे. जोव्ह हा उद्धत आहे. पराक्रमासहिष्णुता त्याच्या अंगांत आहे परन्तु कन्याप्रेमानें बद्ध झालेला असा आहे. जूनो मात्र आपला मुद्दा ह्मणजे ग्रीकांचें कल्याणसाधन तें कधींही सोडीत नाहीं. परंतु ती फार धूर्त आहे. उद्दाम वृत्ति अंगीं असूनही लडिवाळपणाशिवाय पतीच्या हातून कार्यभाग व्हावयाचा नाहीं हें उमजण्याची अक्कल स्त्रीजातींत सामान्यतेनें असणारी तिच्या अंगांत होती.

व्हीनस ही सौंदर्याची देवता होय. जोव्हाला जूनोनें कपटप्रयोग करून निद्रित करून ठेविलें त्या वेळेस त्यास कामवश करण्याचें साधन ह्मणून एक रशना हिनेंच जूनोला दिली. जारकर्मी हेलनला हिनेंच दिली. हेलन तिला जवळ जवळ कुण्टिणीच्या इतकाच मान देत असे. पृष्ठ ११५ आ. १४२–१४९ पहा.

आतां इलियड वाचून ग्रीकलोकांबद्दल ध्यानांत ठेवण्याजोग्या गोष्टी काय आहेत त्या पाहूं.

राजसत्ता.

ग्रीकांत राजसत्तेला मान चांगला असे. राजास ही सत्ता जोव्हानें दिली असा त्यांचा समज असे. जोव्हप्रसाद नृपति या शब्दावरून हें उघड होत आहे. यालाच कायदे करण्याचा अधिकार आहे. पृ. ५९ श्लो. ५९ । ६० पहा. राजाच त्यांचा सेनाध्यक्ष, व सभाध्यक्ष असे. त्यास लोकनायक ही पदवी असे *. सार्वजनिक यज्ञसमयीं त्यास अग्रस्थान असे. + अगमेम्नन हा बलिदान व प्रार्थना स्वतां करी. पृ. ७२ श्लोक ११८ व पृ. २३ श्लो. १०४ पहा.

लोकमत.

ग्रीक राजसभेंत लोकमताला कांहीं मान असे. कारण वीरसभेंत इतर वीर बोलूं शकत. व त्यांच्या भाषणांस इतर जन टाळ्या वाजवून संमति देत. पृ. ६७ श्लो. ९६ पहा. पृ. १० श्लो. ४० यांत जनहितार्थ स्वार्थ सोडण्याला ह्मणजे क्रैसीसकन्येला परत लावून देण्यास लोकांच्या सांगण्यानें अगमेम्नन तयार झाला ×

---

* अराजक स्थिति सर्वथा अनिष्ट ठरवून रामायणामध्यें राजसंस्थेला फार तर महत्व दिलेला आहे.

राजा सत्यं च धर्मश्च राजा कुलवतां कुलम् ।
राजा माता पिता चैव राजा हितकरो नृणाम् ॥ १ ॥

अर्थ–राजा सत्यस्वरूपी व धर्मस्वरूपी आहे. राजा कुलवंतांतही श्रेष्ठ आहे. तो प्रजेचा मायबाप होय. व तोच मनुष्यांचें हित करतो.

+ रामायणांतही रामानें वनांत गेल्यावर लक्ष्मणानें उटज बांधल्यावर यज्ञ केला होता तसा अधिकार त्या वेळेस क्षत्रियाला होता हें उघड आहे.

× अप्यहं जीवितं जह्यां युष्मान्वा पुरुषर्षभान् ।
अपवादभयाद्भीतः किं पुनर्जनकात्मजाम् ॥ १ ॥

लोकापवादाकरतां मी माझे प्राण खर्ची घालीन. किंवा तुह्मीं पराक्रमी पुरुष असून तुह्मांस सोडून देईन. फार काय सांगूं प्रत्यक्ष जानकीचाही त्याग करीन. यावरून लोकरंजनार्थ झटणारा राम लोकमताला मान केवढा देत असे तें उघड होत आहे.

धर्मनीति.

लोकांची देवावर भक्ति फार असे. योग्य पूजा केली असतां देव मानवांची संकटें टाळण्यास त्यांस साहाय्य करण्यास तयार असत. यज्ञ व प्रार्थना या दोन उपायांनीं देवाच्या कोपाची शान्ति होते असें ते समजत. समरसंकटीं प्रार्थना करण्याची वहिवाट सर्वांची असे. ही प्रार्थना ज्याची तोच करी.

हेक्तर समरांगणीं गेला तेव्हां स्त्रीचा निरोप घेतेवेळीं परत सुरक्षित येणें घडेल कीं नाहीं अशी भीति उभयतांस वाटत असतां हेक्तरानें **जो**व्हाची प्रार्थना केली कीं, माझ्या अर्भकास कीर्तिमान कर. विजय प्राप्त करून तो नगर-प्रवेश करील तेव्हां बापापेक्षां बेटा सवाई निघाला असें लोक ह्मणोत. ही प्रार्थना फार सुरेख आहे. पृ. २०० आ. १९७--१९९ पहा.

जोव्हानें रणभूमि तमानें व्याप्त केली असतां **ग्री**कांना **त्रो**जनांपासून फार त्रास झाला व अंधेरांत **ग्री**क पटापट मरूं लागले. तेव्हां **जो**व्हाची **आजक्षा**नें अशी प्रार्थना केली कीं तुझी आह्मांला मारावें अशी इच्छा असल्यास एकच मागणें आमचें ऐक. तें हें कीं सर्व तम नाहींसें कर ह्मणजे आम्ही उजेडांत तरी मरूं. ही प्रार्थना वीरास शोभणारी आहे. पृ. ५५१ आ. ३०९ पहा. याहून सरस प्रार्थना **अ**किलीसानें **स्कामन्दरनदीं**त बुडत असतां केली ती होय. पृ. ६५३ आ. १३९ पहा. " मला गुराख्याच्या पोराप्रमाणें पाण्यांत बुडून मरणें नको. मी ज्याला मारण्याचा निश्चय केला आहे त्या हेक्तरानें मला वधिलें तरी चालेल. त्यांत वाउगें काय आहे? शूरानें शूरास वधिलें ! दुसरें काय ?*

---

* राम जरी ईश्वराचा अवतार समजलेला आहे तरी त्याच्यावर आलेलीं संकटें मानवाप्रमाणें त्यानें सोशिलीं आहेत. सीता त्यानें कष्टानें मिळविली परंतु तो कोठें देवांची प्रार्थना करीत बसलेला आढळत नाहीं. स्वतांच्या पराक्रमावर भिस्त रामायणांतले वीर जास्त ठेवीत, असें दिसतें. रावण हा शंकरभक्त होता, तथापि देवांची प्रार्थना करीत तो बसला नाहीं. कशाला बसेल ! देवांसच त्यानें बंदींत टाकिलें होतें. तो ह्मणतसे:—

देव व दैव.

इलियडमध्यें देव आणि दैव यांत सलोखा आहे. जोव्हानें एकवेळ ट्रोजनांस किंवा एकवेळ ग्रीकांस जय दिला तो दोघांच्या दैवांचा तोल केल्याशिवाय दिला नाहीं. पृ. ६८० आ. १०६ पहा. *

कुटुंबनीति.

कुटुंबाचीं बन्धनें पवित्र मानिलीं जात. प्रायमाला बहुकलत्रयोग असतां कुटुंबकलह झाला नाहीं. तो दशरथाचे घरीं झाला व तोच रामायणास कारण झाला. प्रायम व हेक्युबा यांसारखें जोडपें विरळा. त्यांचे अंगीं अपत्य-वात्सल्य हा गूण फार होता. हेक्तरासारखा भ्राता विरळा, इतर बन्धूंतही भांडण नव्हतें. हेक्तर व त्याची स्त्री यांच्यांत पतिपत्नींचें प्रेम मूर्तस्वरूपानें दिसत आहे. रामायणांत अपत्यवात्सल्य दशरथाचे ठायीं, सवतीमत्सर कैकेयीचे ठायीं, आज्ञाधारकत्व रामाचे ठायीं, सतीत्व सीतेचे ठायीं, विश्वास्य दास्य मारुतीचे ठायीं, निर्घृण वैर रावणाचे ठायीं या प्रमाणें सर्व गुणांचा उत्कर्ष झालेला वाल्मीकीनें दाखविला आहे.

कालस्य चाप्यहं कालो दहेयमपि पावकम् ।
मृत्युं मरणधर्मेण संयोजयितुमुत्सहे ॥ १ ॥
न हि मे विप्रियं कृत्वा शक्यं मघवता सुखम् ।

मीं काळाचा काळ आहें. मी अग्नीचें जाळून भस्म करीन. मृत्यूला ठार मारीन अशी मला धमक वाटत आहे. मला नुसता ढका लावील तर इंद्रालाही सर्व सुखाला मुकावें लागेल.

* रामायणांत दैव प्रबल धरिलें आहे.

दैवं चेष्टयते सर्वं हतं दैवेन हन्यते ॥

अर्थ—या सर्व चेष्टा दैवाच्याच आहेत. ज्या कुणाचा वध होतो तो दैवानेंच होतो. हें दैवाचें प्राबल्य अजूनही आमचे इकडे थोड्या फरकानें मानिलें जातें.

अरुण रवीचा सारथि, दहनाचा वायु, यत्न कीं विधिचा । मोरोपंत.

विवाहपद्धति.

मुलींचीं लग्नें आईबापांचे संमतीशिवाय होत नसत. पृ. ६०३ आ. १३६ पहा.

रामायणामध्येंही अशीच चाल होती. वायुनें कुशनाभाच्या मुलींशीं लग्न लावण्याचें मनांत आणून त्यांचें मत काय आहे तें विचारूं लागला, तेव्हां त्या ह्मणाल्या " पिता हाच आमचा प्रभु आहे, आमचें दैवत आहे, ज्या पुरुषाला तो आह्मांस देईल तोच आमचा भर्ता होईल. *

अथितिपूजन.

अतिथीचा सत्कार हा गृहस्थाश्रमाचा धर्म ग्रीक पाळीत असत. पृ. १७८ आ. ६ पहा. राजपथीं आतिथिभाराचें पूजन करून तियुथ्रास हा आरिस्बा नगरींत राही असें वर्णन आहे. +

सभ्य संभाषणपद्धति.

अकिलीसाच्या मातेचा व्हल्कन भार्येनें चांगला सत्कार केला आहे. " आज भेटीचा सुयोग आला. वरचेवर येण्याचा तुझा पाठ नव्हता; थोडा फराळ कर ये" असे गोड व सभ्य शब्द तिनें उच्चारिले आहेत.

---

* पिताहि प्रभुरस्माकं दैवतं परमं च सः ।
यस्य नो दास्यति पिता सनो भर्ता भविष्यति ॥ १ ॥ रामायण.

मातापिता भ्राता इ० कन्यादान करणारे अधिकारी कोणी नसतील तर कन्येनें राजाकडे जावें व त्याच्या संमतीनें लग्न करावें. स्वतंत्र अधिकार जुन्याकाळीं आमच्या देशांत तिला नव्हता.

यदा तु नैव काश्चित्स्यात् कन्या राजानमाश्रयेत् ।
अनुज्ञया वरं तस्य प्रतीत्यवरयेत्स्वयम् ॥ १ ॥ नारदस्मृति.

\+ श्रीकृष्ण ह्मणे सूता ! सर्वांत गृहस्थधर्म सन्मत रे । मोरोपंत.

यस्मात्रयोप्याश्रमिणो ज्ञानेनान्नेन चान्वहम्
गहस्थेनैव धार्यंते तस्माज्येष्ठाश्रमो गृही मनु.

रामायणकालांतही अशीच मनाची वृत्ति होती. वसिष्ठानें सकल सेनेसह विश्वामित्राचा आदर केला होता हें प्रसिद्धच आहे. त्याचा स्वीकार करतांना विश्वामित्रानें फारच सप्रश्रय वाणी योजिली आहे.

राजन् त्वमतिथिश्रेष्ठः पूजनीयः प्रयत्नतः ।
एवमुक्तो वसिष्ठेन विश्वामित्रो महामुनिः ॥ १ ॥
कृतमित्य ब्रवीद्राजा पूजावाक्येन मे त्वया ।
फलमूलेन भगवन्विद्यते यत्तवाश्रमे ॥ २ ॥
पाद्येनाचमनीयेन भगवद्दर्शनेन च ।
सर्वथा च महाप्राज्ञः पूजार्हेण सुपूजितः ॥ ३ ॥
नमस्तेस्तु गमिष्याभि मैत्रेणेक्षस्व चक्षुषा ।

सारांश—" मुने ! तुझा सत्कार करतों एवढ्या पूजावाक्यानें तुह्मीं तो माझा केलात असेंच समजतों. आपलें दर्शन झालें. आणखी काय पाहिजे ! आतां येतों. नमस्कार. कृपादृष्टि ठेवा "

शब्दप्रहार व खड्गप्रहार.

शब्दांचा प्रभाव विलक्षण आहे असें होमरनें दाखविलें आहे. शब्दांस खड्गाइतकीच प्रखर धार आणिली आहे. शब्दांनीं जनसमूहाचा चित्तक्षोभ होई. २००० वर्षांनंतरही, इलियडमध्यें जे वक्तृत्वाचे मासले आहेत त्यांहून सुंदर अद्यापपर्यंत दुसरे झाले नाहींत. होमर झाला नसता तर अलेक्झान्डर झाला नसता असें जसें ह्मणतात तसेंच असें ह्मणतां येईल कीं होमर झाला म्हणूनच डेमास्थनीस झाला. हेंच दाखविण्याकरतां दोन तीन उतारे डेमास्थनीसच्या भाषणांतील मधून मधून दिले आहेत. त्यांतील विचार इलियडवरूनच त्याला सुचले असावे. डेमास्थनीस हा मोठा पद्धतवार व कलाकुशल वक्ता होऊन गेला. त्याचा तर्क निर्दोष असून वाणी रसपुष्ट असे. इतका आवेश व एवढें भाषासौष्ठव दुसऱ्या कोणांतही नाहीं. प्रस्तुत

प्रसंग बाजूला ठेवून राजकीय प्रकरणांतील त्रिकालाबाधित नियम तो पहिल्यानें सिद्ध करी. हें इतरांस साधलें नाहीं म्हणून इतर वक्त्यांचीं भाषणें सारस्वताचा भाग होऊन राहिलीं नाहींत. इंग्लदमध्यें बर्क, पिट इ० अप्रतिम वक्ते जन्मास आले त्यांस मुख्य कारण त्यांची पार्लमेन्ट सभा व न्यायाचीं कोडतें होत. तीं ही अंशतः उत्तम वक्त्यांस जन्म देतात.

रामायणकाळीं या तऱ्हेचें वक्तृत्व दिसून येत नाहीं त्यास कारण लोकसभा ही संस्था अस्तित्वांत नव्हती.

ट्रोजनलोकांत शौर्य कमी दाखविलें आहे; लोकमताचा अभाव दाखविलेला आहे. वक्तृत्वाचा नमुना हेक्तराच्या भाषणांशिवाय कोठेंही मिळत नाहीं. हा कवीचा प्रभाव नसेलना ?

> लंकापतेः संकुचितं यशो यत् । यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः ॥
> स सर्व एवाद्यकवेः प्रभावो । न कोपनीयाः कवयः क्षितीन्द्रैः ॥

अर्थः--लंकापति जो रावण त्याच्या यशाचा संकोच झाला, रघुकुलवंशांतील राजपुत्र जो राम त्याच्याच वांट्यास कीर्ति तेवढी गेली, हा सर्व आद्यकवि जो वाल्मीकि त्याचाच प्रभाव होय. म्हणून आपली कीर्ति व्हावी अशी ज्या पृथ्वीपालांना इच्छा असेल त्यांनीं कवींच्या वाटेस जाऊन त्यांस चिढवूं नये. अर्थात् यांत विनोदाचा भाग जास्त आहे.

न्याय.

खून हा सार्वजनिक स्वरूपाचा गुन्हा समजला जात नसे. तो इतर खासगी गुन्ह्याप्रमाणें मानला जाई. म्हणून मृताच्या नातेवाइकांशीं तडजोड करून खुनी अन्य ठिकाणीं सुखानें नांदे. पृ. ५८२ आ. २४० पहा. यांत न्यायसभेचें चित्र काढिलेलें आहे.

शस्त्रास्त्रें.

शिरकवच, उरकवच, कमरबंद, ढाल हीं शस्त्रें शरीररक्षणाचीं होतीं. तलवार, बाण व दगड हीं विघातक शस्त्रें होतीं. रथांत बसून युद्ध चालत असे.

रामायणकालीं बाणांशिवाय शक्ति म्हणून एक अस्त्र असे. परंतु वानर हे झाडें व दगडच वापरीत असत.

नाणीं.

प्रचलित नाणीं नव्हतीं. टॅलेन्तभर सोनें असें एक सोन्याचें माप असे. वीणकामांत कुशल अशा दासीची किंमत चार वृषभ असे. सुंदर तिवईस बारा वृषभ व सुवर्ण कवचास शंभर पडत. अनेक वृषभ जेव्हां द्यावे तेव्हां सुन्दर स्त्रीशीं लग्न लावावयास मिळे. नाण्यांचा उल्लेख रामायणांत नाहीं.

धंदेवाले.

धंदेवाले म्हटले म्हणजे ज्योतिषी, शस्त्रवैद्य व दूत होत. तेव्हां व्यापाराची वृद्धि फारशी नसे. उपमानांवरून आणखी धंदेवाले निघतात ते:—नौकाकार, रथकार, हस्तीदंतावर काम करणारे, लोंकर विकणारी स्त्री, अश्ववाहक व वकील इ.

प्रेतविधि.

शवाचें दहन करीत. चितेवर शव ठेवल्यावर बलिदान करीत. मृताच्या ऐपतीप्रमाणें पुष्कळ मेष व वृषभ कापून बलींच्या चरबींत शव माखीत. मद्यही अवश्य असे. शव जळाल्यावर अस्थि मद्यानें विझवीत. मित्रवर्ग अस्थि टिपून घेत. व जमिनींत पुरल्यावर वरतीं कबर बांधीत. पत्रोक्लुशाची क्रिया पहा पृ. ७०७ आ. ८७ पासून पुढें. इकडे अद्यापि चालू असलेल्या प्रेतविधिशीं हा विधि जुळतो. हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. चिता जाळण्यास बोरिआस व झेफिरस या वाऱ्यांस निमंत्रण करणें हें मरुतांचे आव्हान

प्रसंग बाजूला ठेवून राजकीय प्रकरणांतील त्रिकालाबाधित नियम तो पहिल्यानें सिद्ध करी. हें इतरांस साधलें नाहीं म्हणून इतर वक्त्यांचीं भाषणें सारस्वताचा भाग होऊन राहिलीं नाहींत. इंग्लदमध्यें बर्क, पिट इ० अप्रतिम वक्ते जन्मास आले त्यांस मुख्य कारण त्यांची पार्लमेन्ट सभा व न्यायाचीं कोडतें होत. तीं ही अंशतः उत्तम वक्त्यांस जन्म देतात.

रामायणकाळीं या तऱ्हेचें वक्तृत्व दिसून येत नाहीं त्यास कारण लोकसभा ही संस्था आस्तित्वांत नव्हती.

ट्रोजनलोकांत शौर्य कमी दाखविलें आहे; लोकमताचा अभाव दाखविलेला आहे. वक्तृत्वाचा नमुना हेक्तराच्या भाषणांशिवाय कोठेंही मिळत नाहीं. हा कवीचा प्रभाव नसेलना ?

लंकापतेः संकुचितं यशो यत् । यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः ॥
स सर्व एवाद्यकवेः प्रभावो । न कोपनीयाः कवयः क्षितीन्द्रैः ॥

अर्थः--लंकापति जो रावण त्याच्या यशाचा संकोच झाला, रघुकुलवंशांतील राजपुत्र जो **राम** त्याच्याच वांट्यास कीर्ति तेवढी गेली, हा सर्व आद्यकवि जो **वाल्मीकि** त्याचाच प्रभाव होय. म्हणून आपली कीर्ति व्हावी अशी ज्या पृथ्वीपालांना इच्छा असेल त्यांनीं कवींच्या वाटेस जाऊन त्यांस चिढवूं नये. अर्थात् यांत विनोदाचा भाग जास्त आहे.

न्याय.

खून हा सार्वजनिक स्वरूपाचा गुन्हा समजला जात नसे. तो इतर खासगी गुन्ह्याप्रमाणें मानला जाई. म्हणून मृताच्या नातेवाइकांशीं तडजोड करून खुनी अन्य ठिकाणीं सुखानें नांदे. पृ. ५८२ आ. २४० पहा. यांत न्यायसभेचें चित्र काढिलेलें आहे.

शस्त्रास्त्रें.

शिरकवच, उरकवच, कमरबंद, ढाल हीं शस्त्रें शरीररक्षणाचीं होतीं. तलवार, बाण व दगड हीं विघातक शस्त्रें होतीं. रथांत बसून युद्ध चालत असे.

रामायणकालीं बाणांशिवाय शक्ति म्हणून एक अस्त्र असे. परंतु वानर हे झाडें व दगडच वापरीत असत.

नाणीं.

प्रचलित नाणीं नव्हतीं. टॅलेन्तभर सोनें असें एक सोन्याचें माप असे. वीणकामांत कुशल अशा दासीची किंमत चार वृषभ असे. सुंदर तिवईस बारा वृषभ व सुवर्ण कवचास शंभर पडत. अनेक वृषभ जेव्हां द्यावे तेव्हां सुन्दर स्त्रीशीं लग्न लावावयास मिळे. नाण्यांचा उल्लेख रामायणांत नाहीं.

धंदेवाले.

धंदेवाले म्हटले म्हणजे ज्योतिषी, शस्त्रवैद्य व दूत होत. तेव्हां व्यापाराची वृद्धि फारशी नसे. उपमानांवरून आणखी धंदेवाले निघतात ते:—नौकाकार, रथकार, हस्तीदंतावर काम करणारे, लोंकर विकणारी स्त्री, अश्ववाहक व वकील इ.

प्रेतविधि.

शवाचें दहन करीत. चितेवर शव ठेवल्यावर बलिदान करीत. मृताच्या ऐपतीप्रमाणें पुष्कळ मेष व वृषभ कापून बलींच्या चरबींत शव माखीत. मधही अवश्य असे. शव जळाल्यावर अस्थि मद्यानें विझवीत. मित्रवर्ग अस्थि टिपून घेत. व जमिनींत पुरल्यावर वरतीं कबर बांधीत. पत्रोक्लशाची क्रिया पहा पृ. ७०७ आ. ८७ पासून पुढें. इकडे अद्यापि चालू असलेल्या प्रेतविधिशीं हा विधि जुळतो. हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. चिता जाळण्यास बोरिआस व झेफिरस या वाऱ्यांस निमंत्रण करणें हें मरुतांचे आह्वान

हिंदूंच्या प्रेतविधींत आहे त्याशीं जुळतें. ग्रीक चिता मधानें विझवीत. हिंदू मंत्रजलानें विझवतात. पत्रोक्लशाच्या पितरांस अकिलीसानें हांका मारिल्या हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अकिलीसानें आपले केश काढून शवाचे करावर ठेवले हें हिंदूंचें वपन होय. एवढें साम्य दोन देशांच्या चालींत कसें आलें हें विचार करण्यासारखें आहे.

प्लूतो अथवा यम.

पृथ्वीच्या व प्लूतोच्या पुरीमध्यें तमोमय एक प्रदेश असे. त्यास एरिबस ह्मणत. येथें मृतमनुष्यांस जावें लागे. यांचे आत्मे वर रहात. पण तेथें मृतशरीरांची गर्दी असे. द्वारावर सर्बीरस नांवाचा श्वान पहारेकरी असे. त्याला तीन डोकीं असत. याचा उल्लेख पृ. २४१–२६७ आर्यैत आला आहे. या श्वानाचा संबंध मृतांशीं येतो. झोरॅस्टरचे अनुयायी जे पारसी लोक तेही श्वानास मान देतात. त्यांच्यांत प्रेतविधि श्वानाशिवाय पूर्ण होऊं शकत नाहीं. कांहीं मंत्र ह्मटल्यावर एक श्वान प्रेत जिथें ठेवलें असेल तिथें आणतात. टाळी वाजवून मृताचे शरीरावर त्याची दृष्टि पाडतात. व पुन्हा दुसरे मंत्र ह्मणतात. त्यांच्या शास्त्रांत जसा श्वान असला पाहिजे ह्मणून सांगितलें आहे तसा मिळत नाहीं ह्मणून हवा तो श्वान चालतो. शक्य तर तो विशिष्ट स्वरूपाचा असावा लागतो. या दोन श्वानांशीं प्रेत सूक्तांतील श्वानांचें वर्णन ताडून पहा* ऋग्वेद मं. १०

---

* अति॑ द्रव सार॒मे॒यौ श्वानौ॑ ।
च॒तु॒र॒क्षौ श॒बलौ॑ सा॒धुना॑ प॒था ॥
अथा॑ पि॒तॄन्त्सु॑वि॒दत्राँ॒ उपे॑हि ।
य॒मेन॒ ये स॑ध॒माद॒ं मद॑न्ति ॥

हें परेतास उद्देशून ह्मटलेलें आहे.

अर्थ—धांवा ! शरमेच्या दोन शबल वर्णाच्या व चारनेत्रांच्या श्वानांस मागें टाका. यमाजवळ आंनंदानें राहणाऱ्या आपल्या पितरांस भेटाल.

सू. १४ मध्यें तें वर्णन येतें. त्यांत वर्णन केलेले श्वान शबल असून चार डोळ्यांचे आहेत. दोन डोळे पुढें व दोन मागें. मृतांचे आत्मे त्यांच्या स्वाधीन असल्या-मुळें तो पुढें जाणाऱ्यांवर पुढल्या डोळ्यांनीं नजर ठेवतो व मागल्यांवर मागल्या डोळ्यांनीं ठेवतो.

पुढल्या सूक्तांत त्यांस रक्षितारौ ह्मटलें आहे. येथें प्रश्न असा उद्भवतो कीं ही तीन्हींही लोकांत सारखी चाल कोठून आली. कोणी कोणाची चोरली कीं काय ? तर नाहीं. आर्यांच्या मूळ वसतिस्थानापासून इराणांत गेलेले लोक तरी आर्यच. हिंदुस्थानांत आलेले तरी आर्यच व युरोपांत **ग्री**समध्यें गेलेले तरी आर्यच. हे सर्व कोक आपल्या मूलस्थानापासून इतक्या ठिकाणीं जेव्हां गेले तेव्हां कांहीं आचार विचार आपले बरोबर घेऊन गेले. ते आतां सामान्यस्वरूपानें तीन ठिंकाणीं दिसून येत आहेत असा तर्क बांधण्यास कांहीं हरकत नाहीं.

ग्रीकांचें तत्त्वज्ञान.

ग्रीकांची तत्त्वज्ञानाबद्दल ख्याति आहे. व तत्त्वज्ञानाचा व कवितेचा थोडासा संबंध असल्यामुळें तें त्यांच्या कवितेमध्यें दिसून येतें. सत्यान्वेषण हें तत्त्व-ज्ञानाचें कार्य आहे. तत्त्वज्ञान हें नुसतें विचारात्मक असतें. त्याला कवि दृश्यरूप देऊन साकार बनवतो. त्यांतील नीरसपणा काढून टाकतो. व मनुष्याला समजेल असें तें सुलभ करतो; त्याप्रमाणें **हो**मरनें आपल्या कवितेंत थोडें सुलभ तत्त्वज्ञान आणिलें आहे. **दा**योमीद व **ग्ला**कस हे समरांत भेटतात.

यौ ते श्वानौ॑ यम रक्षि॒तारौ॑ ।
चतु॒रक्षौ प॑थि॒रक्षी॑ नृ॒चक्ष॑सौ ॥
ताभ्या॑मेनं॒ परि॑ धेहि राज ।
न्स्व॒स्ति चा॑स्मा अनमी॒वं च धेहि ॥

हे यम ! तुझे जे हे दोवे पालक श्वान आहेत, जे मार्गांचें व लोकांचें रक्षण करतात, त्यांच्या ताब्यांत यास हे राजा ! दे. यास शरीरसंपत्ति व धनसंपत्ति दे.

पृ. १८४ आ. ५७–५८ पहा. "तूं मानवांतील कोण" म्हणून एक दुसऱ्यास प्रश्न विचारतो. दुसरा त्यास उत्तर देतो. "पर्णांची जशी जात तशी मानवांची जात ! पर्णें एकवेळ वायूनें खालीं गळालीं कीं पुन्हा वसन्तसमयीं फुटावयाचीं तद्वत् एक माणसांची पिढी निर्गत व्हावयाची व तिच्या जागीं दुसरी यावयाची." येथें शत्रु मित्र ही भाषा विसरून जाऊन, एकंदर मानवजातीबद्दल वाटलेल्या दुःखांत कवि विरघळून गेला आहे.*

हिंदुस्थान देशांत आस्तिक वादापासून नास्तिक वादापर्यंत सर्व तऱ्हेचीं मतें व पन्थ होऊन गेलेले आहेत. तेव्हां अमुक तऱ्हेचें तत्त्वज्ञान येथें नव्हतें असें बहुशः होत नाहीं. वरील **ग्ला**कसानें विदित केलेलें तत्त्व गीतेंत आहे.

जातस्यहि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्यच ॥

ज्ञानेश्वरांनीं हेंच तत्त्व स्पष्ट करून सांगितलें आहे.

उपजे तें नाशे । नाशलें तें पुनरपि दिसे । हें घटिकायंत्र तैसें । परिभ्रमेगा. ॥ १ ॥

उपनिषत्कालापर्यंत मागें गेलें तरी वरील तत्त्व **हो**मरच्याच शब्दांत सांपडतें. **क**ठोपनिषदांत अशी एक कथा आहे. **वा**जस्रवसऋषीनें स्वर्ग मिळविण्याची इच्छा धरून विश्वजित् नांवाचा यज्ञ केला. आणि आपली सर्व संपत्ति ब्राह्मणांस देऊन टाकिली. त्याला **न**चिकेता नांवाचा मुलगा होता तो फार श्रद्धावान् असल्यामुळें त्याच्या मनांत एक शंका उत्पन्न झाली. ती अशी होती.

---

* सर्वे क्षयान्ता निचयाः पतनान्ताः समुच्छ्रयाः ।
संयोगा विप्रयोगान्ताः मरणान्तंच जीवितम् ॥ १ ॥
यथा फलानां पक्वानां नान्यत्र पतनाद् भयम् ।
एवं नरस्य जातस्थ नान्यत्र मरणाद् भयम् ॥ २ ॥

अर्थः—सर्व संचयांचा शेवट क्षयांत आहे. चढण्याचा पडण्यांत, संयोगाचा वियोगांत व जीवितांचा मरणांत. ज्याप्रमाणें पक्व फळांस पतनावांचून भय नाहीं त्याप्रमाणें जन्मास आलेल्या मनुष्यास मरणावांचून भय नाहीं.

भ.वण्ड बुद्बुदांचें वपु बहु निःसार मित्र फेंसाचें । मोरोपंत.

दक्षिणा ह्मणून ज्या गाई **वा**जश्रवसानें दिल्या होत्या त्यांचें स्वरूप असें होतें. गाईंना पुन्हा पाणी पिण्याचें सामर्थ्य नव्हतें अशा त्या वृद्ध होत्या. त्यांना गवंत खाण्याचें सामर्थ्य नव्हतें व दूध देण्याचें त्यांच्या नशिबीं नव्हतें व त्यांचीं इंद्रियेंही विगलित झालीं होतीं. अशा गाईंचें दान करणें ह्मणजे धर्माचा उपहास आहे. तसें दान करणारा पुरुष, जेथें कोणत्याही प्रकारचें सुख मिळत नाहीं अशा अनंद नामक ठिकाणीं जातो. हा विचार **न**चिकेताचे मनांत येऊन त्यास दुःख झालें व हा प्रसंग टाळावा व आपल्या स्वतांचें दान बापानें करून यज्ञसाफल्य करावें अशा हेतूनें बापाजवळ जाऊन तो ह्मणाला–बाबा! तुह्मीं मला कोणत्या ऋत्विजाला देऊन टाकणार? बापानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. ह्मणून दोन तीन वेळा मुलानें तोच प्रश्न विचारला. तेव्हां बाप क्रुद्ध होऊन ह्मणाला "तुला मृत्यूला देऊन टाकिला आहे." नंतर मुलगा मनांमध्यें विचार करता झाला कीं, मीं चांगल्यापैकीं मुलगा आहें. निदान मध्यमप्रतीचा तरी आहें. यमाला देऊन टाकण्यासारखा नाहीं. तर अशा दानानें यमाचा किंवा बापाचा काय कार्यभाग होणार ? ह्मणून बापानें दिलेला जबाब विचार करून दिलेला नसावा तथापि त्याचें वचन हें खरें झालेंच पाहिजे. ह्मणून पुन्हां बापाला ह्मणाला " बाबा! मला यमाला द्या व वचन पुरें करा." तें ऐकून बापाला पश्चात्ताप झाला व आपण काय बोलून गेलों हें! असें वाटून तो शोक करूं लागला. तेव्हां **न**चिकेता शान्तपणें ह्मणाला.

अनुपश्य यथा पूर्वे प्रतिपश्य यथाऽपरे ।
सस्यमिव मर्त्यः पच्यते सस्यमिवाऽऽजायते पुनः ॥

अर्थः–"आपले पूर्वज कसे सत्यशील होते, वर्तमानकालीं शिष्टलोक कसें सत्याचरण करतात तें पहा. वचनभंग तुमच्या हातून होऊं देऊं नका. बाबा! वचनभंग करणारा प्राणी अजर किंवा अमर होतो काय ! मनुष्याची स्थिति संभोवार दिसणाऱ्या गवतासारखी आहे. कांहीं काल तीं रुजून जगतात व मरतात व

पुन्हां रुजतात." बापानें पुढें मुलाचे आग्रहास्तव आपलें वचन पुरें केलें. मुलगा ही यमानें परत पाठविला. तो भाग येथें सांगण्याचें कारण नाहीं. होमरचें तत्त्वज्ञान मात्र नचिकेताच्या तत्त्वज्ञानाशीं किति बरोबर जुळत आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

ग्रीकांच्या ह्या तत्त्वज्ञानाचे मुळाशीं उदासीन वृत्ति आहे. *

अकिलीसाकडे प्रायम हा हेक्तराचें शव सोडविण्याकरतां खण्डणी घेऊन गेला. तेव्हां त्याचें शान्तवन करतांना अकिलीस ह्मणाला (पृष्ठ ७७१आ.२६३–६ पहा.) जोव्हानें आपल्या मंदिरीं दोन पेले ठेविले आहेत, एकांत दुःख व एकांत सुख भरलेलें आहे. त्यांचें मिश्रण करून जोव्ह लोकांस वांटित असतो. कोणाला कधीं सुख तर कोणाला कधीं दुःख लाधतें इ. ग्रीकांच्या उदासीनतेचाच हा एक मासला आहे. या दुःखाच्या स्वरूपाचा मासला न्यायसूत्रांवर केशवमिश्रांनीं नैयायिक तर्कभाषा लिहिली आहे तींत आढळतो.

मोक्षोऽपवर्गः सच एकविंशतिभेदभिन्नस्य दुःखस्य आत्यन्तिकी निवृत्तिः। एकविंशतिभेदास्तु । शरीरं षडिंद्रियाणि षड्विषयाः षड्बुद्धयः सुखं दुःखंचेति गौणमुख्यभेदात् । सुखमपि दुःखानुषंगाद्दुःखम् । अनुषंगो अविनाभावः । सचायमुपचारो मधुनि विषसंयुक्ते मधुनोऽपि विषपक्षनिक्षेपवत् ।

अर्थ—दुःखाचे जे एकवीस प्रकार आहेत त्यांपासून जी परिपूर्ण निवृत्ति त्यास मोक्ष ह्मणजे अपवर्ग ह्मणावें. एकवीस भेद कोठले ह्मणाल तर १ शरीर ६ इंद्रियें, ६ विषय ६ बुद्धि, १ दुःख व १ सुख. यांत कांहीं गौण व कांहीं मुख्य समजावे. परंतु हें $\frac{1}{21}$ प्रमाणाचें जें सुख सांगितलें आहे तेंही दुःखच समजावें. कारण दुःखाचा अनुषंग सुखाला आहे. अनुषंग म्हणजे मिश्रण.

* ही ग्रीकांची उदासीन वृत्ति इतकी वाढत चालली कीं हिरोदोतसनें एका थ्रेशिअन जातीची अशी चाल नमूद करून ठेविली आहे कीं जन्मास कोणी आला कीं ते लोक रडत व मेला ह्मणजे आनंदानें त्यास पुरीत.

म्हणून त्याचे योगानें असें ठरत आहे कीं मधांत विष पडलें असतां मधसुद्धा विषमय होतो तसें सुखही दुःखमयच होय. यांत व होमरच्या अकिलीसमुखांत घातलेल्या तत्त्वज्ञानांत फार साम्य आहे.

पाप

होमरमध्यें पापाची कल्पना नाहीं पृ. ५९३ आ. ३७ पहा. अकिलीसाच्या वांट्यास आलेली स्त्री अगमेम्ननानें हरण केली. "या अपराधाचें कारण मीं स्वतां नसून कलहदेवता जी एटी तीच आहे व ती तर जोव्हाची मुलगी म्हणून सर्व अपराधांचें मूळ जोव्हच" असें आपली जबाबदारी झाडून टाकण्यास अगमेम्ननानें म्हटलें हें उघड आहे.*

असो यानंतर सहाव्या प्रश्नाकडे वळूं.तो प्रश्न इलियडचा रामायणाशीं संबध काय हा होय. रामायणांतील कांहीं भाग बौद्धग्रंथांतून व कांहीं भाग होमरच्या काव्यांतून वाल्मीकीनें घेतला आहे असें विधान जर्मन पंडित वेबरसाहेब यांनीं केलें आहे. रामायणाची कथाच इतकी मनोहर आहे कीं तिच्याशीं कांहीं तरी करून आपलें नातें जुळवून आणावें अशी इच्छा सहृदय पंडितांस होणें

* श्रावणवध ही जी लहानच पण अत्यन्त करुणरसपुष्ट अशी रामायणांत कथा आहे व जी रामविरहाचें मूळ धरतां येईल व पर्यायानें सबंध रामायणाचेंही मूळ धरतां येईल. त्या कथेंत असें वृत्त सांगितलेलें आहे कीं दशरथानें बाण सावजावर ह्मणून जो सोडला तो श्रावणास लागला. त्याच्या विनंतीवरून त्याच्या वृद्ध व तृषाक्रांत मातापितरांस पाजण्याकरतां पाणी घेऊन न बोलतां दशरथ गेला. दशरथ जर मुखांतून शब्द काढील तर श्रावणवधाचें वृत्त ऐकून तीं पाणी न पितां प्राण टाकतील. ह्मणून त्यांच्या प्रश्नास दशरथ जवाब देईना, व तीं पाणी पीतना. तेव्हां दशरथ ह्मणतो—

क्षत्रियोऽहं दशरथोनाहं पुत्रो महात्मनाम् ।
सज्जनावमतं दुःखमिदं प्राप्तं स्वकर्मजम् ॥

अर्थ—"मी क्षत्रिय दशरथ आहें. आपला महात्म्यांचा पुत्र नव्हे. सज्जनानीं निंद्य मानलेली (ही श्रावण वधाची) दुःखकारक गोष्ट पूर्वसंचितामुळें माझे हातून झाली आहे" यांत पापाचें मूळ स्वतांचें कर्म धरलेलें आहे.

साहजिक आहे. आमचे सर्व ग्रंथ फार जुने आहेत असें ठरविण्याची हौस
जशी आह्मांस वाटते तशी ते ग्रंथ अगदीं अलिकडचे नवीन आहेत असें
ठरविण्याची हौस पाश्चात्य पंडितांस वाटत असावी. शिवाय विद्वान लोकांच्या
शोधक बुद्धीला कांहीं एकेतऱ्हेची अल्पसाम्यदर्शनानें भूल पडत असते.
अशा स्थितींत अमुक एक मत सिद्ध आहे असें ते एकदां धरून चालूं लागले व
त्यांची दृष्टि रंगली कीं ज्या पदार्थांवर ती पडते त्या पदार्थांवर त्यांच्या दृष्टीचाच
रंग चढतो. त्यांत त्यांचा अपराध नसतो. कांहीं वस्तूंमध्येंच भ्रामकपणा भरलेला
असतो. व त्यामुळें शोधकांची दृष्टि भ्रमली कीं त्यांच्या दृष्टीचे सर्व विषयही भ्रमूं
लागतात. त्याचप्रमाणें होमरचीं काव्यें व रामायण यांत जीं कांहीं साम्यें दिसतात
त्यांवरून वेबरसाहेबांस कांहीं भूल पडून त्यांचा एक ग्रह होऊन गेला आहे
कीं "रामविवासन व रामवनवास हे भाग वाल्मीकीनें दशरथजातकावरून
घेतले व सीताहरण व लंकेचा वेढा हे भाग होमरच्या काव्यांवरून
घेतले. वाल्मीकीचा होमरच्या काव्यांशीं संबंध आला तो शिकंदर
बादशहाच्या हिंदुस्थानावरील स्वारीनंतर म्हणजे ख्रि. पू. ३२०
वर्षांनंतर होय. दशरथजातक हें रामायणाच्या आधींचें आहे. कारण त्यांत
राम व सीता यांचें भाऊ व बहिण यांचें नातें असतां, त्यांचें लग्न लागलेलें
आहे. ही स्थिति अति प्राचीन कालींच समाजांत असणें शक्य
आहे. रामायणांत राम व सीता हीं भावण्डें नव्हतीं असें दाखविलें आहे.
अर्थात समाज सुधारल्यावर रामायण झालेलें असलें पाहिजे. ह्मणून जातक
आधीचें, रामायण मागूनचें. सीता हरण व लंकेचा वेढा व धनुर्भंग हे प्रसंग
जातकांत नाहींत व होमरच्या काव्यांत आहेत. म्हणून वाल्मीकीनें ते प्रसंग
होमरच्या काव्यांतून घेतले आहेत".*

---

* याला नामदार काशिनाथ त्रिंबक तेलंग यांनीं आपल्या विद्वत्तेला
व तीव्र बुद्धीला शोभेल असें उत्तर एक इंग्रजी पुस्तक लिहून दिलेलें आहे. त्याचें
नांव "रामायण हें होमरच्या काव्यांची नक्कल आहे काय?" असें आहे. त्यानंतर दुसरें उत्तर
रा. ब. चिंतामणराव वैद्य एम्. ए. एल. एल. बी. यांनींही पुष्कळ शोधक बुद्धीनें आपल्या
"रामायणांतलि कोडें" या नांवाच्या इंग्रजींत लिहिलेल्या पुस्तकांत सप्रमाण दिलें आहे.

रामायण हें अलेक्झान्डराच्या स्वारीच्या आधींचें आहे व दशरथजातक हेंही रामायणाच्या मागूनचें आहे एवढेंच नव्हे तर तेंच रामायणाच्या संविधानकांत बदल करून रचिलेलें आहे असें सिद्ध करतां येतें. हल्लीं आमच्यापुढें जें रामायण आहे तें आद्य रामायणाहून विस्तारानें जरा मोठें आहे. कारण त्यांत वारंवार प्रक्षिप्त भाग येऊं लागले, ते अलेक्झान्डरच्या स्वारी नंतरही येत राहिले होते. पूर्वींच्या आर्यांना राशींची माहिती नव्हती. ते चंद्रामध्यें व इतर ग्रहामध्यें असलेल्या अंतरावरूनच आपलीं धर्मकृत्यें करीत असत. राशींचें ज्ञान ग्रीकांपासून अलेक्झान्डरच्या स्वारीनंतर त्यांस झालें असा विद्वानांचा समज आहे. तें ज्ञान झाल्यावर रामाचा जन्म कर्कलग्नावर* पांच ग्रह उच्चीचे असतां झाला म्हणून कथन करणारा श्लोक हा शेवटला प्रक्षिप्त भाग होय.

रामावताराची मजा अशी आहे कीं रामानें भूतलावर असें आचरण केलें कीं दैविक चमत्कार कांहीं एक न करतांना मनुष्याप्रमाणें आपल्यावर आलेलीं संकटें त्यानें सहन केलीं. ईश्वराप्रमाणें जर त्यास वागावयाचें असतें तर मायामय सुवर्णमृगाचें कपट त्यानें आधींच ओळखिलें असतें. सीताहरण झाल्यावर मानवाप्रमाणें विलापही केला नसता. किंवा सीतेची प्राप्ति करून घेण्याला वानरांच्या साहाय्याची अपेक्षा न करतां एकदमच सीता परत आणिली असती. परंतु जनसंग्रहार्थ मानव उत्तम आचरणानें किति पूज्य पदवीला पोंचतो हें त्याला दाखवावयाचें होतें. शिक्षाध्यायांतील " धर्म चर " या आज्ञेचें मूर्त स्वरूप जसें महाभारतांतील धर्म हा होय तसें राम हा 'सत्यं वद' या आज्ञेचें मूर्तस्वरूप होय. परमेश्वरानें अनेक वेळां अनेक देशांत अवतार घेतले असतील पण रामाहून अधिक पुण्यमय देह प्रवेश करण्यास त्यास

---

* नक्षत्रे दितिदैवत्ये स्वोच्चसंस्थेषु पंचसु ॥ ग्रहेषु कर्कटे लग्ने वाक्पताविन्दुना सह ॥ १ ॥
बालकाण्ड स. १८ श्लो. ९ पहा.

कचितच मिळाला असेल. हजारों वर्षें होऊन गेलीं तरी अद्यापि कोट्यावधी लोक त्याची भक्ति करीतच आहेत. व पुढेंही हजारों वर्षें तशीच करीत राहतील. तरीही **वा**ल्मीकीला पहिल्यापासून लीलेनें मानववेष **रा**मानें घेतला होता व मानवाप्रमाणें त्यानें आचरण केलें असें दाखवावयाचें होतें झणून पहिल्यापासून आद्य**रा**मायणांत त्याला विष्णूचा अवतार करावा ही कल्पना **वा**ल्मीकीच्या मनांतही नव्हती. बालकाण्डांत **ना**रद **वा**ल्मीकीच्या प्रश्नाला उत्तर देतांना **रा**म हा " विष्णुना सदृशो वीर्ये " झणजे पराक्रमानें विष्णूसारखा आहे असें झणाले. विष्णूचा अवतार आहे असें झणाले नाहीं. बौद्धांची समज अशी आहे कीं बुद्ध हा ईश्वराचा अंश आहे, अवतार आहे. व अवतार कल्पना ही सर्वांना मोह पाडणारी असल्यामुळें बौद्धांच्या अवतारकल्पनेला तोडीला तोड झणून राम हा विष्णूचा अवतार आहे असें स्वरूप रामायणास आद्यरामायणानंतर देण्यांत आलें असावें. या संबंधानें बालकाण्डांतील १७ वा सर्ग नवीन घालावा लागला असावा. विष्णूनें दशरथाचे पोटीं जन्म घेतला व तो रावणवधाकरतांच परंतु **रा**माला साहाय्यकर्ते कुणी तरी पाहिजेत व त्यांस उत्पन्न करण्याचें काम ब्रह्मदेवानें इंद्र, वरुण, अग्नि इ० देवतांना सांगितलें. त्याप्रमाणें सूर्यापासून सुग्रीवाची उत्पत्ति झाली, विश्वकर्म्यानें **न**ल-उत्पन्न केला, व अग्नीनें **नी**ल उत्पन्न केला. **ह**नुमान् वायूनें उत्पन्न केला. व **वा**ली हा इंद्रानें उत्पन्न केला. परंतु पुढें पहातां **वा**लीनें **रा**मास साहाय्य न करतां उलटें त्यास अडविलेंच. झणून **रा**मानें त्याचा वध केला. येथें अवतारकल्पनेंत थोडा विसंगतपणा येतो. **वा**ली साहाय्य करण्यास उत्पन्न केलेला तो विपक्षवत् आचरण करून **रा**माचे हस्तें मरण पावतो ! आणखी एक उदाहरण पहा. **ना**रद पुढें झणत आहेत. (सर्ग १ श्लोक ९७ बालकाण्ड)

दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च ।
रामोराज्यमुपासित्वा ब्रह्मलोकं प्रयास्यति ॥

अर्थः—"अकरा हजार वर्षें राज्य करून राम ब्रह्मलोकास प्रयाण करील." येथें राम विष्णूचा अवतार पहिल्यापासून मानिलेला असता तर विष्णुलोकाप्रत जाईल असें ह्मणावयाला पाहिजे होतें. ह्मणून राम हा विष्णूचा अवतार होता असें स्पष्ट शब्दांनीं काव्यांत व्यक्त करावें अशी इच्छा होऊन कोणी तरी ह्या अवतार-कल्पनेचा भाग वरील आद्यरामायणांतील श्लोकाच्या मागाहून प्रक्षिप्त केला असावा.

उत्तर काण्डांमध्यें आणलेल्या लांब लांब कथा या सुद्धां प्रक्षिप्त मानिलेल्या आहेत. अयोध्याकाण्डांतील राजनीतीवर भरताला केलेला उपदेश अस्थानीं दिसत आहे. भरत कांहीं राज्याधिष्ठित झाला नव्हता. झाला असता तर तसा उपदेश करणें इष्ट झालें असतें. वरच्या कुशलप्रश्नांशिवाय दुसरें कांहीं विचारणें उचित दिसत नाहीं. हा सर्ग महाभारतांतून शब्दशः उतरलेला आहे. तो सभापर्वामध्यें युधिष्ठिराच्या संबंधें चांगला शोभत आहे. नारदांनीं त्याजवळ सुराज्यासंबंधें चर्चा करावी हें रास्त दिसत आहे. याप्रमाणें प्रत्येक काण्डांत कांहींना कांहीं तरी प्रक्षिप्त सांपडतें. तथापि ग्रीकांपासून राशी घेतल्यानंतर कांहींही भाग प्रक्षिप्त झाला नसावा. कारण यावेळेस जसें रामायण होतें तसेंच पूर्ण आहे असें धरून कालिदासानें रघु रचिलेला आहे. त्यानंतर रामायणाचें स्वरूप बदललें नाहीं.

असो. आतां आद्यरामायण व संक्षिप्त किंवा विस्तृत होत गेलेलीं रामायणें यांचा साधारण क्रम कसा ठरतो तो पाहूं. रामायणाचा उल्लेख महाभारतांत त्रोटक त्रोटक असा अनेक वेळां आलेला आहे. यावरून महाभारत हें रामायणाच्या मागूनचें आहे. शिवाय रामोपाख्यान हें एक समग्र प्रकरणच महाभारतांत घातलेलें आहे. त्यांत बालकाण्ड व अयोध्याकाण्ड व कांहीं अरण्यकाण्डाचा भाग असे नाहींत. सीताहरणापासून पुढला भाग आहे. मागला देण्याची गरज नाहीं; कारण स्त्रीच्या झालेल्या विटंबनांपासून हळहळणाऱ्या धर्माचें शान्त-

वन करण्याकरतां तें सांगितलेलें आहे. तें उघड उघड मोठ्या कथा-भागावरून संक्षिप्त केलेलें कथानक दिसत आहे. यावरून महाभारताच्या पूर्वींही ज्यांतील कथेला संक्षेप देऊन रामोपाख्यान केलेलें आहे असें एक रामायण असलें पाहिजे. म्हणून रामायणांचा क्रम असा लागतो.

१ आद्य रामायण.

२ रामोपाख्यान.

३ विस्तृत रामायण.

या सर्वांच्या वर दशरथजातक ठेऊन त्यावरून अर्धा भाग रामायणाचा वाल्मीकीनें घेतला व अर्धा होमरच्या काव्यांतून घेतला असें ह्मणून खि. पू. पहिल्या दुसऱ्या शतकांत रामायण रचिलें गेलें असें ठाम मत देऊन वेबर साहेब स्वस्थ बसले. दशरथजातक सर्वांच्या आधींचें कां ? तर वेबर साहेब ह्मणतात बहिण भावंडांचें लग्न त्यांत लागलें आहे व तशीं लग्नें अति प्राचीन कालींच संभवतात; रामायणांतील लग्नें तशीं नाहींत ह्मणून.

असो. तूर्त अवताराची कल्पना जी बौद्धांच्या अवतारकल्पनेला तोड ह्मणून मागाहून घातलेली आहे. ती रामोपाख्यानांत असल्यामुळें रामोपाख्यान हें जातकाच्या मागाहूनचें आहे असें धरलें पाहिजे व तें तसें धरलें ह्मणजे आधींचें कोणचें, जातक का आद्य रामायण, हाच प्रश्न उरतो. तो नीट सोडवण्यास आद्यरामायणाची समाजास्थिति कशी होती तें पाहिलें पाहिजे. ती समाजस्थिति फार प्राचीनकाळची असल्यामुळें अतिशयोक्तिरहित साध्या व सरळ भाषेंत वर्णिलेली आहे. या काळांत यज्ञयागादिकांस फार महत्व असे. क्षत्रियही संध्यादि विधि करीत असत. स्त्रियांसही वैदिक कर्मांचा अधिकार असे. मांसाशनासंबंधें निर्बन्ध नसे. बौद्धांच्या अहिंसेच्या तत्त्वाचा प्रसार झाला नव्हता.

कौशल्या तं हयं तत्र परिचर्य समंततः ।

कृपाणैर्विशशासैनं त्रिभिः परमया मुदा ॥ १ ॥

बालकाण्ड १४. सर्ग ३३ श्लोक पहा. यांत सांगितल्याप्रमाणें अश्वमेधांतील अश्वाला स्वतां तलवारीनें कापणारी क्षत्रियभार्या कौसल्या प्राचीनकाळची होय. क्षत्रिय संध्या करीत ही चाल प्राचीन काळची होय.

सा क्षौमवसना हृष्टा नित्यं व्रतपरायणा ।
अग्निं जुहोतिस्म तदा मंत्रवत्कृतमंगलम् ॥

अयोध्याकाण्ड सर्ग २० श्लोक १५

या श्लोकांत वर्णिलेली सोंवळें नेसून अग्नींत मंत्रवत् हवन करणारी कौशल्या प्राचीन काळची.

मारुती लंकेमध्यें सीतेलीं अशोकवनांत शोधित असतां ह्मणतो.

संध्याकालमनाः श्यामाध्रुवमेष्याति जानकी ।
नदीं चेनां शुभजलां संध्यार्थे वरवर्णिनी ॥

(सुन्दरकाण्ड स. १४ श्लोक ४९)

अर्थ—"संध्याकाळचें कर्म करण्याचें मनांत आणून ती श्रेष्ठ स्त्री जानकी या पुण्यतीर्थावर येईल." याप्रमाणें संध्यावंदन करणारी सीता ही प्राचीन काळची होय. हें संध्याकर्म तुळशीला दिवा दाखवण्यापेक्षां जास्त होतें यांत संशय नाहीं.

रामःस्नात्वा तु नियतो गुणवाञ्जपकोविदः ।
संग्रहेणाकरोत्सर्वान्मंत्रान्सत्रावसानिकान् ॥

अयोध्याकाण्ड सर्ग ५६ श्लो. २९

यांत सांगितल्याप्रमाणें जपजाप्य करून मंत्रपठणानें चित्रकूटावर नवीन बांधलेल्या उटजाची वास्तुशान्ति करणारा राम प्राचीन काळचा.

अयं सर्वः समस्ताङ्गः श्रितः कृष्णमृगो मया ।
देवता देवसंकाशो यजस्व कुशलो ह्यसि ॥

अयोद्ध्याकाण्ड सर्ग ५६ श्लो. २८

व याग करण्याकरतां समग्र मृग भाजून तयार करणारा लक्ष्मणही प्राचीन काळचा. अर्थात या वेळच्या पशुहिंसेविरुद्ध व यज्ञांतील कर्मकाण्डाविरुद्ध बंड करणारा बुद्ध हा आद्यरामायणाच्या मागूनचाच असला पाहिजे. परमेश्वर तरी अवतार घेतो तो एकदम घेत नाहीं. धर्मामध्यें कांहीं चुकत आहे असें कांहीं बुद्धिमान मनुष्यांच्या डोक्यांत येऊन त्यावर ते सारखा विचार करीत रहातात व दुसऱ्यांच्या मनांत त्याच विचारांची जागृति उत्पन्न करतात व आपल्या ह्मणण्याच्या सत्यतेबद्दल इतर जनांची खात्री करून देतात तेव्हांच सर्वांच्या मनांत सारखी खळबळ उडून जाते. त्या वेळेस लोकचित्तरूपी जो परमेश्वर ह्मणजे भक्तांच्या हृदयांत सतत वास करणारा जो परमेश्वर तो धर्माची झालेली ग्लानि घालवण्याकरतां कोणाचे नाहीं कोणाचे तरी रूपानें अवतार घेत असतो,* तशी खळबळ आद्यरामायणाचे सुमारास ही नुकतीच व्हावयास लागली असून बुद्धाचीं मतें बीजरूपानें कोठें तरी होतीं अगर त्याचा वाढलेला वृक्ष तरी लोकांच्या मनांत सलूं लागला होता. ह्मणून रामायणांत एके ठिकाणीं बुद्धाची निंदा केलेली आहे.

यथाहि चोरःस तथाहि बुद्धः । तथागतं नास्तिकमत्र विद्धि ॥

अयोध्याकाण्ड सर्ग १०९ श्लो० ३४

यांत बुद्धाला चोर ह्मटलें आहे. व त्याची व नास्तिकाची योग्यता एकच ठरविलेली आहे.

हा श्लोक जरी प्रक्षिप्त धरिला तरी बुद्धाचा अवतार आद्यरामयणाच्या नंतर झाला यांत शंका नाहीं. ह्मणून दशरथजातक हें आद्यरामायणाच्या नंतरचें व रामोपाख्यानाच्या आधीचें असें ठरत आहे. रामोपाख्यान हें आद्यरामायणाचेंच संक्षिप्तरूप आहे व त्याचा उल्लेख महाभारतांत आहे.

*यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ॥ भगवद्गीता.

महाभारत पूर्ण विस्तृत असें ख्रि. पू. २०० वर्षांनीं झालेलें आहे. त्याच्या आधींचें रामोपाख्यान धरून त्याच्याहि आधींचें जातक धरिलें व त्याच्या आधींचें आद्यरामायण धरिलें ह्मणजे अलेक्झान्डरच्या स्वारीचा कांळ (ख्रि. पू. ३२० वर्षें) आद्यरामायणानंतरचाच ठरेल.

शिवाय दशरथजातकाच्या अन्तःस्वरूपाकडे लक्ष दिलें ह्मणजे तें आद्य-रामायणाच्या कथेवरूनच बौद्धांच्या धर्मकल्पनांना जुळेल अशा संक्षिप्त स्वरूपाचें रचिलेलें असावें, असें दिसतें. त्याचें निरीक्षण करण्यास त्याची कथा येथें दिली पाहिजे. ती कथा अशी आहे.

एक कुटुंबी पितृविरहानें उद्विग्न होत्साता कामधंदा टाकून शोक करीत बसला. ह्मणून त्याचें शान्तवन करण्याकरतां त्याला जातकाची कथा बुद्धानें सांगितली.

वाराणसी नगरींत दशरथनावाचा एक राजा राज्य करीत होता. त्याला १६००० स्त्रिया होत्या. त्यांतील पट्टराणीला दोन पुत्र व एक कन्या अशीं अपत्यें झालीं होतीं. मोठ्या पुत्राचें नांव राम व धाकट्याचें लक्ष्मण. कन्येचें नांव सीता असें होतें. कांहीं काळानंतर पट्टराणी स्वर्गवासी झाली. दशरथानें कांहीं दिवसांनंतर दुसऱ्या एका स्त्रीला राज्ञीपद दिलें. तिची त्याला फार आवड असे. तिला कांहीं काळानंतर एक पुत्र झाला. त्याचें नांव भरत असें राजानें ठेवलें. भरतावर राजाचें अनिवार प्रेम जडल्यामुळें त्याच्या मातेला हांक मारून दशरथ ह्मणाला, “मी भरताला एक वर देत आहें तो काय देऊं तो माग.” भरत आठ वर्षांचा होईतों राणीनें तो वर न मागतां शिलकेंत ठेऊन दिला; व त्यास आठवें वर्ष लागतांच, राजाला त्याच्या वचनाची आठवण देऊन ह्मणाली कीं, भरतास राज्य देऊन आपलें वचन पुरें कर. राजा संतापानें हात आपटून ह्मणाला “दरिद्रे ! माझे मुलगे अग्नीप्रमाणें लोकांत प्रकाश पाडीत असतां त्यांना मारून तुझ्या भरताला

राज्य देऊं कीं काय ?" राणी त्रासून अंतःपुरांत निघून गेली. परंतु आपला हट्ट न सोडतां ती राजास सारखा त्रास देऊं लागली. राजानें विचार केला कीं, स्त्रिया या घातकी आहेत. ही राणी माझ्या मुलांच्या जीवांस कपटोपायानें अपायही करील. ह्मणून त्यानें रामलक्ष्मणांस जवळ बोलावून सांगितलें " बाळानों ! तुह्मीं परराज्यांत अगर वनांतही गमन करा. माझ्या मृत्यूनंतर क्रिया करण्याकरतां परत येऊन राज्य घेऊन बसा." ज्योतिषी आणवून शेष आयुष्य किति आहे तें वर्तवून सांगण्यास त्यांस राजानें विनंति केली. तें १२ वर्षें आहे असें समजतांच तितक्या वर्षांनीं परत या ह्मणून राजानें पुत्रांस सांगितलें. सीता आपणच होऊन ह्मणाली कीं, मीही बन्धूंबरोबर वनांत जातें. तिघेंही बरोबर परिवार घेऊन हळुहळु हिमालयाच्या तपोवनांत प्रवेश करतीं झालीं व कंदमुळें व फळें यांवर निर्वाह करूं लागलीं. रामाला लक्ष्मण व सीता ह्मणाली कीं, तूं वडिल आहेस ह्मणून उटजांत रहात जा. कन्दमुळें इ० आह्मीं जमवून आणूं. त्याप्रमाणें तीं करूं लागलीं. असे दिवस लोटतां लोटतां दशरथ राजा अपत्यविरहानें नवव्या वर्षीं मृत्यु पावला. अन्त्यक्रिया झाल्यावर राणी मन्त्रिजनांस ह्मणूं लागली " माझ्या मुलास राज्य अर्पण करा." मंत्रिजन होय ह्मणत ना. व भरतही ऐकेना. तो ह्मणाला रामास मी स्वतां जाऊन घेऊन येतों. भरत सैन्यासहवर्तमान जो निघाला तो राम वसत होता तेथें आला. लक्ष्मण व सीता फलसंचय करण्याकरतां गेलीं होतीं. भरतानें रामाला पाहिलें तों तो अगदीं निरीच्छ दिसला. त्यानें रामास पितृनिधनवृत्त कळविलें व तद्पदीं लीन होऊन राहिला. रामाला मुळींच खेद झाला नाहीं. लक्ष्मण व सीता यांचें मन कोमळ असल्यामुळें तीं परत आल्यावर रामानें त्यांस पाण्यांत उभीं करून, भरत असें असें पितृनिधनवृत्त कथन करीत आहे, ह्मणून सांगितलें. त्यांस मूर्छा आली. असें त्यानें आणखी दोन वेळां पितृनिधनवृत्त कथनें

केलें. आणखी दोन वेळां त्यांस मूर्छा आली. नंतर सेवकांनीं त्यांस पाण्याबाहेर काढलें व मग रामाशिवाय सर्व शोक करीत बसलीं तें पाहून भरतानें रामास प्रश्न केला "पितृनिधन शोच्य असतां तूं कां शोक करीत नाहींस ? तुझें मन इतकें दृढ कशानें केलेंस ?" तेव्हां प्रबुद्ध राम ह्मणालाः—शोक करूनही जें वांचवितां येत नाहीं त्याचा शोक प्राज्ञ पुरुषानें कशाला करावा ? पक्क फळास पतनाचें भय आहेच इ०. या उपदेशानें सर्व शोकवियुक्त झाल्यावर भरत रामाला ह्मणाला " तूं वाराणसीच्या राज्याचा स्वीकार कर." रामानें उत्तर दिलें, "लक्ष्मण, सीता व तूं जाऊन राज्य करा. पित्याची आज्ञा बारा वर्षे वनांत राहण्याची आहे तितकीं वर्षें मीं वनांत राहीन व परत येऊन राज्य घेईन " भरत त्यावर ह्मणाला. " तितके दिवस कुणी राज्य करावें ? आह्मीं तर करणार नाहीं ! " असें ऐकतांच रामानें आपल्या तृणमय पादुका भरतास दिल्या. त्यांची मंत्रिजनांनीं सिंहासनावर स्थापना केली. न्याय करण्यांत मंत्री जर चुकले तर त्या पादुकांचें एकमेकांवर घर्षण सुरू होई. तीन वर्षांनीं राम वनांतून परत गेला व राज्य करूं लागला तें त्यानें १६००० वर्षें केलें.

शेवटीं बुद्धांनीं गोष्ट पुरी केल्यावर असें सांगितलें कीं या कथेंतील जो महाराजा दशरथ तोच **शु**द्धोदन होय. राममाता ह्मणजे **म**हामाया होय. **सी**ता ह्मणजे **रा**हुलाची माता होय. भरत तो **आ**नंद होय. **ल**क्ष्मण ह्मणजे **सा**रिपुत्त होय. रामाचा परिवार ह्मणजे बुद्धाच्या परिषदेचे सभासद होत. व राम ह्मणजे मींच.

(**शु**द्धोदन हा **गौ**तम बुद्धाचा पिता; **म**हामाया ही माता; **रा**हुल हा मुलगा; व **आ**नंद हा सापत्न बन्धू होता.)

हीं सर्व जातकें एकवार वाचलीं म्हणजे ईसापनीति किंवा पंचतत्रें यांच्याप्रमाणेंच त्यांची रचना कल्पित आहे असें दिसून येते.

रामायणांतील संविधानकामध्यें व वर दिलेल्या जातकाच्या संविधानकामध्यें पुष्कळ भेद आहेत. रामायणांतील संविधानक स्वाभाविक दिसतें. व जातकांतील संविधानक रामायणाच्या संविधानकाचें बौद्धकल्पनांशीं जुळेल असें रूपांतर असल्यामुळें तेंच असंभाव्य दिसतें.

जातकांत सीता ही रामाची बहिण केलेली आहे. व पुढें तिच्याशींच त्यानें लग्न लाविलें आहे. बुद्धाच्या पूर्वजांची उत्पत्ति एकवेळ बहिणभावंडांपासून झाली होती तिचें दर्शक ह्मणून हा फरक संविधानकांत केला आहे. परंतु ह्या फरकामुळें संविधानकांत आणखी एक विसंगतपणा येत आहे तो हा कीं, वनांत जावयास मुलांस राजानें सांगितलें ह्मणून बहिणीला बरोबर जाण्याचें कांहीं कारण नव्हतें. सापत्नमातेच्या राज्यलोभाच्या आड ती येत नव्हती. रामायणामध्यें सीता वडिल मनुष्यें नको ह्मणत असतां गेली तो स्त्रीधर्म ह्मणून गेली हें फारच तिचें करणें स्वाभाविक व प्रशस्य दिसत आहे.

जातकांमध्यें नवीन राणीला वर राजानें कां दिला हें समजत नाहीं. नुसती प्रीति हें कारण पुरेसें नाहीं. रामायणामध्यें दशरथानें वर दिला त्याचें कारण असें आहे कीं शंबर नामक राक्षसापासून दशरथाचे प्राण तिनें वांचविले होते. तेवढ्याकरतां कृतज्ञपणानें राजानें दोन वर दिले होते. एका वरानें रामविवासन व दुसऱ्यानें भरतास राज्यार्पण ही वर मागतांना कैकेयीनें केलेली जुळणी चांगली दिसते. जातकांत एकच वर दिलेला होता त्यानें भरतास राज्यार्पण मागतां आलें. परंतु रामलक्ष्मणांस वनांत धाडण्याचें कारणच उरत नाहीं. रामायणामध्यें सत्यवचनी राजा दशरथ यानें दिलेलें वचन रामायणांतील सत्यपराक्रमी रामानें पाळावें यांत मनाचा थोरपणा जास्त आहे. जातकांतील राम वनांत गेला तो स्वतांच्या हिताकरतां गेला ह्मणून हा भाग अगदीं नीरस वाटत आहे.

वनांत गेल्यावर रामायणांतील रामलक्ष्मणांनीं वराह व हरिणें मारून त्याचा चट्टामट्टा केला.

तौ तत्र हत्वा चतुरो महामृगान्।
वराहमृश्यं पृषतं महारुरुम्॥
अयोध्याकाण्ड सर्ग ५३ श्लोक ॥ १०२ ॥

परंतु अहिंसा हे बौद्धांचें ब्रीद असल्यामुळें मांसाशनाचें नांव सुद्धां जातकांत नाहीं.

जातकांतील दशरथ पुत्रविरहानें नऊ वर्षांनीं मरतो. आपलें मरण इतकें लांबवून वृद्धानें पुत्रविरहाची थट्टा केलेली दिसत आहे. शिवाय तो जर इतके दिवस मरत होता व तो जर वचनानें बांधलेला नव्हता, (कारण राणीचें मागणें भरताला राज्य द्या एवढेंच होतें) तर मुलांस परत कां बोलाविलें नाहीं? रामायणांतील दशरथ रामविवासन करण्यास वचनानें बद्ध होता. व पुत्रविरहानें तो कांहीं दिसांनींच मृत्यु पावला. त्यावेळेस त्याला श्रावणाची गोष्ट आठवली* व त्याच्या वृद्ध पितरांचा शाप डोळ्यांपुढें उभा राहिला व 'राम राम' ह्मणतच मृत्यु पावला. ही रामायणांतील दशरथाच्या मरणाची सरस कथा कोणीकडे व जातकांतील दशरथाच्या अकारण दीर्घसूत्री एखाद्या प्रहसनांत योग्य दिसेल अशा मरणाची कथा कोणीकडे!

बौद्धांच्या बहुतेक गोष्टींचा वाराणसीपुरीशीं संबंध असतो. ह्मणून अयोध्येला वाराणसी जातकांत बनविली आहे हें ठीकच आहे. शिवाय तेथूनच हिमालयांतलें प्रयाण सोईचें होतें.

जातकांत लक्ष्मण व सीता यांस पितृनिधनानें अनिवार दुःख झालें असें दाखविलें आहे तें कां तर ही गोष्टच मुळीं पितृनिधनानें उद्विग्न झालेल्या माणसास कथन केलेली आहे व त्याचें शान्तवन करण्याकरतांच राम बुद्धाप्रमाणें शान्त असा दाखविलेला आहे.

---

*रामायणांतील ही श्रावणाची कथा सर्वांगसुंदर आहे. हिच्यांतच सर्व रामायणाचें बीज आहे. इतकी लहान पण इतकी चटकदार गोष्ट वाल्मीकीशिवाय दुसऱ्या कोणी लिहिली नाहीं. एवढी एक गोष्ट लिहिल्याबद्दलच कोणत्याही कवीला अमरत्व प्राप्त होईल यांत संशय नाहीं.

वेबर साहेबांची चुकी येथेंच झाली असें वाचकांच्या लक्षांत येईल. जातकाला आधींचें धरून आद्यरामायणाला मागूनचें धरलें आहे. वास्तविक प्रकार असा आहे कीं, आद्यरामायण हें मूळ होय व त्याची संक्षिप्त केलेली नक्कल जातक होय.

येथेंच वेबरसाहेबांस भूल पडल्यामुळें रामायणाचा संबंध होमरच्या काव्याशीं सीताहरण व धनुर्भंग या प्रसंगांकरतां जुळवण्याच्या भानगडींत ते पडले.

शिवाय सीताहरण व हेलनचें हरण यांतील साम्य भ्रान्तिमूलक आहे. सीतेचें हरण रावणानें कपटोपायानें केलेलें आहे. रावण तिचें मन वळविण्याची खटपट करीत असतां तिनें जबाब दिला आहे तो पहा. अरण्यकाण्ड स. ४७.

"अरे कोल्ह्या, तूं सिंहीची प्राप्ति होण्याची इच्छा धरीत आहेस! तूं नागाच्या मुखांत त्याच्या दंष्ट्रा उपटावयास अंगुलि घालीत आहेस! तूं काळकूट विष प्राशन करून दीर्घायु होण्याची आशा धरीत आहेस! तूं वस्तऱ्याची धार जिभेनें चाटीत आहेस! तूं प्रज्वलित अग्नि वस्त्रांत बांधून घरीं आणिला आहेस! जें अन्तर सिंह व शृगाल यांमध्यें आहे, ओढ्यांत व समुद्रांत आहे, सोन्यांत व शिशांत आहे, हत्तींत व मार्जारांत आहे, हंसांत व गिधाडांत आहे तें रामांत व तुझ्यांत आहे." यांत पतिव्रतेचें तेज केवढें दिसत आहे! ही वश होण्याकरतां हिचा छळ कसा कसा करावा हें राक्षसिनी आपल्या सभेंत ठरवीत होत्या; कोणी कांहीं कोणी कांहीं उपाय सांगूं लागल्या तेव्हां एकजण ह्मणाली "बायांनों मला वादविवाद आवडत नाहीं. हिला चिरूं व वांटून खाऊं." त्यांस सीता देवीनें जबाब दिला आहे:— माझे तुकडे करून तुह्मी त्या तुकड्यांचे तुकडे केलेत, अथवा अग्नींत टाकिलीत तरीही मी रावणाला वश होणार नाहीं. तुह्मीं उगाच बडबड कां करीत अहांत!*

*छिन्ना भिन्ना प्रभिन्ना वा दीप्ताग्नौ वा प्रदीपिता।
रावणं नोपतिष्ठेयं किं प्रलापेन वश्चिरम् ॥ १ ॥

हा जबाब देणारी पातिव्रत्याच्या तेजानें चमकणारी जनकाची नंदिनी सीता देवी कोणीकडे व घरीं आलेला जो पाव्हणा त्याचा हात धरून जाणारी नीच काम्यलीला करणारी हेलन कोणीकडे ! यांत कांहीं एक साम्य दिसत नाहीं. तसें इतर पात्रांत तरी कोठें दिसत आहे ? सीतेचें हरण करणारा रावण केवढा पराक्रमी! व हेलनचें हरण करणारा पारिस किति नेभळा ! रामायण हें काव्य सीतेचें हरण करणाऱ्या रावणाचे व त्याचा वध करणारा जो राम त्याचे पराक्रम वर्णन करणारें आहे. इलियड हें काव्य अकिलीसाचा रोष वर्णन करतें. अकिलीस हा हेलनचें हरण करणाराही नाहीं किंवा हरण करणारा जो पारिस त्याचाही वध करणारा नाहीं. उलट पारिसनेंच त्याचा वध एका बाणानें केला आहे. *

रामानें धनुर्भंगानें नूतन स्त्रीची प्राप्ति केली. परंतु आदेसी नामक होमरच्या काव्यांत युलिसीसानें लग्नाची स्त्री अनेक वर्षांनीं आपली आपणच मिळविली. ×

रावणाचें वर्तन पापी आहे असें जाणून बिभीषण त्याला सोडून रामाला येऊन मिळाला; कारण त्याचें शील राक्षसाचें नव्हतें. तसें पारिसचा बन्धू हेक्तर असत्पक्षीं पितृप्रेमाला गुंतून मरेतों लढला. ह्मणून येथेंही कांहीं साम्य दिसत नाहीं. जर साम्यच शोधावयाचें आहे तर प्रायम व धृतराष्ट्र यांत साम्य आहे असें ह्मणावें लागेल. धृतराष्ट्राला शंभर मुलगे होते. द्रौपदीला द्यूतांमध्यें हरवून

---

* ही गोष्ट इलियडमध्यें कथन केलेल्या वृत्तान्तानंतरची आहे.

× त्रोजनयुद्धानंतर मार्गांत अनेक कष्ट काढून २० वर्षांनीं युलिसीस घरीं पोंचला. व पहातो तों अनेक तरुण राजपुत्र त्याच्या स्त्रीशीं लग्न होण्याच्या आशेनें तिला मागणी घालून मंदिरांत बसून होते. ती एकटी त्यांच्यांत सांपडल्यामुळें कोणास नाहीं न ह्मणतां सांगे कीं हातांतील वस्त्र विणून झालें कीं सांगतें. दिवसा वस्त्र विणून रात्रीं उलगडून ठेवी. शेवटीं युलिसीस आल्यावर धनुर्भंगाचा तिनें पण लावला. तें धनु युलिसीसचेंच होतें. त्यानें तें उचलून सर्वांस यमपुरास हाकून दिलें व स्त्रियेला ओळख दिली इ. इ. कथा आहे.

घेण्यांत सर्वांचें अंग एकट्या विकर्णाशिवाय होतें. व त्यांचा युद्धांत संहार झाला. प्रायमालाही पन्नास मुलगे होते. त्यांतील बहुतेक मृत्यू पावले. स्त्रीहरण एकानें ह्मणजे पारिसानें केलें होतें.

असो. रामायणाच्या अन्तःस्वरूपावरूनही अलेक्झान्डराच्या स्वारीच्या आधींचें तें असावें असा पुरावा सांपडतो.

रामायणांतील कौशल्या,कैकयी, पौलस्त्य वगैरे शब्द पाणिनीच्या ग्रंथांत आढळतात. भाष्यकार पतंजलि ख्रिस्तापूर्वी १५० वर्षे होऊन गेले. तेव्हां पाणिनि त्याच्या आधींचे होते व रामायण त्यांच्याही आधींचें होय. ह्मणजे अलेक्झान्डरच्या स्वारीच्या आणि रामायणाच्यामध्यें किती वर्षें गेलीं तें सांगतां येत नाहीं. आधीं कोण हेंहीं एवढ्यावरून सांगतां येत नाहीं. परंतु काव्यकल्पनांचा विनिमय व्हावयाला मध्यें अंतर असेल तर तें पुरेसें नाहीं.

राजतरंगिणीमध्यें दामोदरनृपतीविषयीं उल्लेख सांपडतो तो असा—

अशेषमेकेनैवाह्नाश्रुत्वारामायणं तव ।
शापस्य शान्तिर्भवितेत्यूचिरे ते प्रसादतः ॥

एक दिवसांत रामायणाचा पाठ ऐकशील तर शापाची शान्ति होईल असें दामोदरनृपाला सांगितलेलें आहे. ह्मणजे या कालीं रामायणाचे पाठ श्रद्धायुक्त होऊं लागले होते. दामोदर ख्रि. पू. १७५ वर्षांनीं होऊन गेला त्याच्या आधीं पुष्कळ वर्षें रामायण रचिलें गेलें असलें पाहिजे.

शूद्रकरचित मृच्छकटिक नाटकांत शकाराचें पात्र आहे. त्यांची अर्थाचा अनर्थ करण्याबद्दल ख्याति आहे. नामदार तेलंग ह्मणतात "त्यांचें अज्ञान फक्त राजशालकाला शोभेल असेंच आहे." या अज्ञान महोदधींनीं कुंती व रावण, हनुमान् व सुभद्रा या रामायण महाभारतांतील पात्रांचा संयोग जुळवून आणला आहे. हो! कां आणणार नाहींत ! हे मुळींच ह्मणतात " आह्माला पुष्पांचा गंध कानांनीं ऐकू येतो. पण नूपुरध्वनि

डोळ्यांनीं दिसत नाहीं." यांच्या ह्मणण्याचें स्वारस्य लोकांस बरोबर कळावयाला रामायण व महाभारत यांचा लोकांस उत्तम परिचय या नाटकाचे वेळेला झाला असला पाहिजे. शूद्रक ख्रि. पू. २१ वर्षांनीं होऊन गेला. रामायण त्याच्या आधीं बरेंच वर्षें होऊन गेलें असलें पाहिजे. हें उघड आहे. मग काव्यकल्पनांचा विनिमय व्हावयाला किती काळ पाहिजे तें लक्षांत आणतां होमरच्या काव्यांतून कल्पना घेण्यास फुरसत उरत नाहीं.

सारांश—आद्य रामायण हें फार जुनें आहे. तें मागाहून विस्तृत होत गेलें. बौद्धधर्माच्या ग्रन्थकारांनीं त्याला संक्षिप्त स्वरूप आपल्या धर्मकल्पनांस जुळेल असें दिलें व दशरथजातक रचिलें. त्यांतील अवतारकल्पना रामायणामध्यें आली. जातकाचें मूळ रामायण व रामायणाची नक्कल जातक होय. होमरच्या कथांच्या आधारें रामायण रचिलें गेलें असें ह्मणण्यास आधार नाहीं. कारण असा विनिमय फक्त अलेक्झान्डरच्या स्वारीनंतरच होणें शक्य आहे. परंतु तीनंतर तसा विनिमय होण्यास मध्यें अवधि उरत नाहीं. आद्यरामायण त्या स्वारीच्या बरेंच आधींचें असण्याचा पुष्कळ संभव आहे.

सबंध पुस्तक छापून झाल्यावर प्रस्तावनाही छापत आल्यावर प्रोफेसर आर्थर लिली यांचें एक पुस्तक माझ्या पाहण्यांत आलें त्यांत असें प्रतिपादन केलेलें आहे कीं होमरनेंच आपलीं काव्यें रामायणकथेवरून रचिलीं असावींत. त्यांच्या दृष्टीला दोहेंत साम्यें एक दोनच दिसत नसून प्रत्येक वृतान्तांत तो लहान असो मोठा असो—दिसत आहेत. श्रावणाची कथाही त्यांस ग्रीकांच्या पुराणांत मिळत आहे. व त्यांचा मुख्य मुद्दा असा आहे कीं, या सर्व कथांची वाढ हिंदुस्थानांत होणें स्वाभाविक आहे. ग्रीकांच्या पुराणांत मात्र त्या परकीय स्वरूपाच्या दिसत आहेत. ह्मणून होमरनेंच रामायणाच्या आधारें आपलीं काव्यें रचिलीं असावींत. यांचा विचार करतांना त्यांनीं पुरातन काळीं युरोप व एशिआ खण्डामध्यें पसरलेल्या आर्यांच्या धर्माचें स्वरूप कसें बदलत गेलें याचाही विचार केला आहे.

यांच्या ह्मणण्याचा विचार करतांना आर्यांची मूळ ठिकाणावरून फुटाफूट होण्यापूर्वी त्यांच्यामध्यें ज्या कांहीं प्रचलित कथा होत्या त्या त्यांच्या बरोबरच गेल्या असल्या पाहिजेत व थोड्याशा भेदानें त्यांचें स्वरूप एकच असलें पाहिजे, हा मुद्दा ध्यानांत ठेवला पाहिजे. उदाहरणार्थ याच प्रस्तावनेंत कथन केलेली यमाच्या श्वानांची कथा घ्या; जळप्रळयाची कथा **बायबल**मध्यें आहे तशी ती **शतपथ** ब्राम्हणांत आहे व **पारसीकांच्या** धर्मग्रन्थांतही आहे हें विसरतां कामा नये. तेव्हां या कथांतील सार एकानें दुसऱ्याचें चोरिलें हें ह्मणावयास नको. सार एकच असणार. तथापि **लिली**-साहेबांच्या पुस्तकानें :विद्वान लोकांत चर्चा चालू होऊन या वादाला काय स्वरूप येतें तें पाहणें फार मनोरंजक होईल.

विजयादशमी शके १८३५ } **गणेश रामकृष्ण हवलदार.**

भाषांतरकर्ता.

ता. ९ अक्टॅबर १९१३.

ऐतिहासिक नांवांचा कोश.

अ

अकिलीस. याचा पिता **पेलिअस** व माता **थेटिस.** हा सर्व **ग्रीकांत** शूर होता. मातेनें बालपणीं याला पादतलानें धरून **स्तिक्षनदी**-च्या जलांत बुडविलें; ह्मणून पादतलाशिवाय त्याचें सर्व शरीर अभेद्य झालें होतें. तुझा मुलगा दीर्घायु व्हावा अशी इच्छा असेल तर तो घरीं बसून आपला जन्म प्रसिद्धीस न येतां घालवील, पण तोच जर अल्पायु चालत असेल तर **त्रायचे** समरभूमीवर तो मोठी कीर्ति संपादन करील असे वैकल्पिक वर त्याच्या मातेला प्राप्त झाले होते. तिनें अर्थात शेवटला वर पतकरिला होता. याचें मरण **त्रायाचे** समरभू-मीवर आहे हें जाणून त्याच्या मातेनें त्याला **लैकोमेदीस**-नृपाचे दरबारीं स्त्रीवेषानें पाठवून दिलें. राजकन्यांशीं याची मैत्री झाली. एकीपासून त्याला **नी**आतोलेमस नांवाचा **पुत्रही** झाला होता. **अकिलीसाशिवाय त्राय** घेणें शक्य **नव्हतें** ह्मणून त्याच्या शोधार्थ **युलिसीस** सौदागराच्या वेषानें तेथें गेला व त्याच्यापुढें रत्नें व शस्त्रें मांडून बसला. त्यानें शस्त्रें उचलतांच तो पुरुष आहे हें निदर्शनास आलें. मग **अकि**-लीस रणांत गेला. तेथें **हेक्तराचा** वध त्यानें केला. **मिनर्वे**-च्या देवळांत **पालिझिनेला** मागणी घालीत असतां **पारिसानें** पादतलावर वार करून त्याचा वध केला.

अगमेम्नन. हा **मेनिलासाचा** भ्राता. दोघेही **एत्रिअसाचे** मुलगे होते असें **होमर** ह्मणतो. **अगमेम्नन** व **मेनिलास** यांस पित्याच्या

मरणानंतर चुलत्यानें राज्यांतून घालविलें व राज्य बळकाविलें. त्यांनीं स्पार्टायेथील नृपाच्या कन्यांशीं लग्नें लाविलीं. क्लातेम्निस्त्रा अगमेम्ननाची स्त्री झाली व हेलन ही पारिसाची झाली. अगमेम्ननानें मिसिनी व अर्गास येथें राज्य वसविलें व मेनिलास यानें स्पार्टा येथें वसविलें. हेलनचें हरण पारिसानें केल्यावर ट्रायवर स्वारी ग्रीकांनीं केली. त्यांचें आधिपत्य याकडे होतें. तेथें यानें पराक्रम पुष्कळ केला. लुटींत अकिलीसाच्या वांट्यास आलेली स्त्री यानें हरण केल्यावरून याचें त्याच्याशीं भांडण झालेलें प्रसिद्ध आहे. ट्राय पतन पावल्यावर घरीं जातां याच्या स्त्रीनें जाराच्या साहाय्यानें यास जीवें मारिलें.

अर्गास अगमेम्ननाच्या राजधानीचें नगर.

अन्कैसीस हा ट्रोजनवीर फार सुन्दर होता. व्हीनस त्याला पाहून मोहित झाली व त्याशीं रममाण होतां गर्भवती झाली. ईनिआसाला तिनेंच जन्म दिला.

अन्तिनार प्रायमाच्या दरबारांत, हेलनला परत द्या असें सांगणारा हा एकटाच होता. यानें रणांत थोर पराक्रम केला. याचे मुलगे रणांत लढत होते. दारुमय अश्व करून ट्राय जिंकण्याची कल्पना ग्रीकांस यानें सुचविली असा फितुरीचा अपराध यानें केला असें ह्मणतात.

अपालो हा लाटोनेच्या उदरीं जन्मलेला जोव्हाचा पुत्र होय. याला फीबस ह्मणतात व सूर्यही ह्मणतात. कला, कविता, गायन व वक्तृत्व यांची हा देवता आहे असा समज आहे.

अलास्तर हा ट्रोजनवीर सर्पिदनाचा शस्त्रवाह होता.

ॲन्द्रोमाकी इइशन नृपतिची मुलगी व हेक्तराची पत्नी. पतीवर तिचें प्रेम अनिवार होतें. ती त्याच्या घोड्यांस स्वकरानें चारा घालीत असे. घरकामांत सदा दक्ष असे. रणांत जाण्यापूर्वी तिचा निरोप घ्यावयास हेक्तर महालांत आला होता. त्यावेळेचें पतिपत्नीचें भाषण फारच करुणरसानें भरलेलें असें आहे. पतिनिधनवृत्त ऐकून तिनें फार शोक केला. आस्तिआनक्ष हा तिचा मुलगा होता. त्राय पतन पावतांच अग्निमुखांतून तिनें त्यास वांचविलें परंतु अकिलीसानें त्याला तटावरून फेंकून देऊन जीवें मारिलें. तिला ग्रीकांनीं हरण करून नेलें होतें.

आजक्ष (बन्धू)हे दोघे होते. त्यांतील एक तेलामनाचा मुलगा. यास तेलामोनिअन अथवा तेलामनज आजक्ष ह्मटलेलें आहे. हा अकिलीसाला वर्जून सर्व ग्रीकवीरांत पहिल्या प्रतीचा शूर वीर होता. तो हेक्तराशीं द्वंद्व खेळला. समानबल ठरल्यामुळें शस्त्रांची अदलाबदली दोघांनीं केली व द्वंद्व थांबविलें. अकिलीसाच्या मृत्यूनंतर युलिसीस व हा आजक्ष असे दोघे त्याचीं शस्त्रें मिळावीं या हेतूनें भांडले. एत्रिअसपुत्रानें तीं युलिसीसाला दिलीं, त्याबरोबर यानें रागानें १०० अजापुत्र तलवारीनें कापिले—मनांत समजत होता कीं, ते एत्रिअसाचे शंभर पुत्रच होते. नंतर वैतागून त्यानें आत्महत्या केली. लोक्रिअनांचा राजा जो ओइलीअस त्याचा मुलगाही आजक्ष या नावानेंच प्रसिद्ध होता. त्यास ओइलीअन आजक्ष किंवा ओइलीअसज ह्मटलेलें आहे. हा ४० नौका घेऊन ग्रीकपक्षीं शौर्यानें लढत होता.

आजीआस या राजाच्या गोठ्यांत अगणित गुरें ढोरें व शेळ्या मेंढ्या असूनही तो गोठा केव्हांही झाडीत नसत; व दिवसानुदिवस तो स्वच्छ करतां येईल कीं नाहीं, याची शंका वाटूं लागली. हर्क्यूलीसनें गोठा झाडून साफ करण्याचें कबूल केलें. त्याबद्दल त्यानें गोठ्यांतील जनावरांपैकीं दहावा हिसा द्यावा असा करार आजीआसानें त्याच्याशीं केला. हर्क्यूलीसानें आल्फिअस नदीचा प्रवाह फिरवून गोठ्यांतून लावून दिला. त्यानें सर्व गोठा स्वच्छ झाला. पुढें राजा करार पुरा करीना; कारण तो ह्मणे कीं हर्क्यूलीसला श्रम मुळींच पडले नसून नुसत्या युक्तीनें त्यानें काम केलें. फैलीअस राजपुत्रानें हर्क्यूलीसाचा पक्ष घेतला ह्मणून त्यालाही राज्याबाहेर राजानें घालविलें. पुढें हर्क्यूलीसानें राजाचें नगर जिंकलें; पण पुत्राचे विनंतीवरून त्याचे प्राण राखिले.

आतोमीदन ग्रीकवीर. हा आकिलीसाचा रथ हांकीतसे.

आन्तिआ प्रीतसची भार्या. बेलेरोफन शब्द पहा.

आन्तिमाकस ट्रोजन वीर. जेव्हां मेनिलास व युलिसीस हे हेलन परत द्या ह्मणून शिष्टाई करण्यास लढाईचे आधीं ट्रायपुरास गेले होते तेव्हां पारिसनें यास लांच दिली व हेलन परत देण्याचें कारण नाहीं असें याच्या तोंडून वदविलें. याला हिप्पोलोकस व पिसान्दर असे दोन मुलगे होते. त्यांस अगमेम्ननानें रणांत वधिलें. पित्याचें वर्तन त्यांस नडलें.

आन्तिलोकस नेस्तराचा मुलगा. पितापुत्र ग्रीकपक्षांत लढत होते.

आमाझन्स आमच्या पुराणांतील स्त्रीराज्यांतील स्त्रियांप्रमाणें ह्या झुंझार होत्या. यांचें एक राष्ट्रच बनलेलें असे. यांचा सारा जन्म लढतां

लढतां जात असे. प्रजोत्पत्तीपुरताच यांचा पुरुषांशीं संबंध असे. कन्या झाल्यास ठेवून घेत. पुत्र झाल्यास त्यांच्या पित्यांस देऊन टाकीत. उजवा स्तन त्या कापून किंवा भाजून नष्ट करीत असत. ह्मणजे त्यांस तीर मारणें सुलभ होत असे. बेलेरोफन यानें असल्या कांहीं स्त्रियांचा पराभव केला होता. अशांचें एक राज्य आफ्रिकेंतही होतें. आमच्या पुराणांतील स्त्रीराज्य प्रसिद्धच आहे.

आयोबेतीस प्रीतसचा सासरा. बेलेरोफनास त्याच्या पराक्रमास्तव राज्य व कन्या अर्पण करिता झाला. बेलेरोफन शब्द पहा.

आर्गस याला शंभर डोळे होते. यास मर्क्युरीनें वधिलें ह्मणून त्याला आर्गसरिपु ह्मणत.

आरोरा ही ग्रीकांची उषा होय. ही गुलाबीरंगाच्या रथांत बसून सूर्यापुढें सदोदित असते. सूर्योदय होणार असें ही पुढें येऊन सुचविते. ही येतांच तारका मावळतात. अरुणवसना, अरुणांगुलि अशीं विशेषणें तिला कवि देतात. तैथोनसावर हिचें प्रेम होतें. तिच्याशीं रमतांना यानें अमरत्व मागून घेतलें. परंतु तो दिवसानुदिवस अशक्त होत गेला. शक्ति व सौन्दर्य तसेंच रहावें असा वर मागावयास तो चुकला होता. मरण येण्यास त्यानें विनंति केली. त्याचें तिनें रूपान्तर करून त्याचा नाकतोड्या बनविला.

आर्सिलोकस. हा ट्रोजनवीर इदामिनिअसाचा मुलगा होता. याचा वध युलिसीसानें केला.

आल्क्मीना. अर्गासपुरीच्या एका नृपाची कन्या. ईतोलिअनांनीं या नृपतीच्या एका खेरीज सर्व पुत्रांचा नाश केला होता. त्याचा सूड घेण्यास त्यानें आंफित्रिअन नृपाची विनंति केली. व आपलें

राज्य आणि कन्या त्यास अर्पण करण्याचें कबूल केलें. आंफित्रिअन या कामगिरीवर गेला असतां जोव्हाच्या मनांत आल्क्मीना भरून गेली. व शयनसुख घेण्याचा त्यानें निश्चय केला व या कामांत पूर्ण यश येण्यास त्यानें-जोव्हानें-आंफित्रिअनाचें स्वरूप धारण केलें व तिच्याजवळ जाऊन सांगूं लागला कीं, विजय मिळवून आलों आहें. खूण काय, तर हा पेला शत्रूकडील खजिन्यांतून मुद्दाम लुटून आणला आहे. आल्क्मीना फसून गेली. मर्क्युरीला जोव्हानें सांगितलें कीं सूर्याला लवकर उगवूं देऊं नकोस. तेणेंकरून रात्र तिप्पट मोठी झाली. तितका वेळ तेथें राहून जोव्ह चालता झाला. आंम्फित्रिअन मागाहून विजय मिळवून आला. तिच्यांत आर्द्रभाव जरा कमी दिसला म्हणून आंफित्रिअनानें अधिक चौकशी करतां कपटरूपधारी कोणी येऊन गेला म्हणून तिनें सांगितलें व त्यानें दिलेला पेलाही दाखविला. आंफित्रिअन पहातो तों त्याच्या लुटींत मुद्दाम राखून ठेवलेला पेला नाहीं. भविष्यकथकाकडे जाऊन प्रश्न विचारतां जोव्हाचें कपट त्याला कळून आलें. आल्क्मीनेनें दोघांपासून दोन गर्भ धारण केले. दिवस पूर्ण भरत येतांच जोव्हानें देवलोकीं गर्वोक्ति केली कीं आज एक मुलगा जन्मास येऊन त्यास साम्राज्यवैभव प्राप्त होणार आहे. जूनोला जोव्हानें आल्क्मीनेशीं ठेवलेला संबंध आवडला नाहीं. तिनें जोव्हाकडून त्यानें केलेल्या भविष्याच्या सत्यतेबद्दल शपथ घेववली व आल्क्मीनेचा प्रसूतिकाळ लांबविला व स्थेनिलसाची स्त्री सात महिन्याचीच गर्भवती असतां तिचा प्रसूतिकाळ त्याच दिवशीं आणविला. स्थेनिलसाच्या भार्येच्या पोटीं युरि-

स्थिअस जन्मला व आल्कमीनेच्या उदरीं हर्क्यूलीस व इफिक्लस हे जन्म पावले. तेवढ्यांत युरिस्थिअस जोव्हानें सांगितलेल्या वेळेवर आधीं जन्मास आल्यामुळें हर्क्यूलीसावर त्याचें वर्चस्व स्थापित झालेंच.

आल्सायोनी. या ईव्हीनसकन्येचें हरण लग्नानंतर अपालोनें केलें तिचा पति धनुष्य घेऊन पाठीस लागला, त्या वेळेस ती आल्सा- योनी नामक पक्ष्यांप्रमाणें स्वर काढून ओरडली ह्मणून पित- रांनीं तिचें नांव आल्सायोनी असें ठेविलें.

आलिम्पस थेसालि व मासिडोनिआ या प्रांतांतील एक पर्वत. याचीं शिखरें स्वर्गाला पोंचतील इतकीं उंच आहेत असा प्राचीन लोकांचा समज होता, ह्मणून त्यानीं या पर्वतास देवांचें अधिष्ठान बनविलें. येथें वारा व पाउस यांचा त्रास नसून वसंताचा स्थायिक वास असे असा प्राचीन लोकांचा समज असे.

आस्तिआनक्ष हेक्तराचा मुलगा. याचें खरें नांव स्कामन्द्रिअस असें होतें हा पित्यासारखा शूर निघावा असें त्रोजन इच्छीत होते ह्मणून त्यांनीं त्याचें नांव आस्तिआनक्ष ह्मणजे 'नगरकोट' असें ठेवलें होतें. त्रायपतनाचे वेळीं हा लहान बालक होता मातेनें उराशीं धरून याला पेटत्या नगरांतून वांचविलें होतें परंतु मोठा होऊन सूड घेईल ह्मणून शत्रूनें त्यास तटावरून खालीं फेकून मारिलें.

आस्तीरोपीअस पेलीगनाचा पुत्र. त्रायमपक्षीं लढतांना अकिलीसहस्तें मृत्यु पावला.

इ.

इतिआक्लीस हा पालिनिकीसाचा भ्राता. राज्यविभागणीवरून यांचा तंटा झाला होता. बाहेरून सैन्य दोघांनीं जमा केलें होतें. शेवटीं दोघे द्वंद्व खेळले व मेले. शवें जाळल्यावर त्यांची राखसुद्धां आपोआप निराळी झाली. जणूं काय सजीव होऊन एकमेकांचा द्वेष किती होता तें दाखवीत होती. तैदिअस या भांडणांत सामील झाला होता.

इथिओपिया हा प्रदेश आफ्रिकेंत होता. येथील नृपकुलांतील लोक देवपूजक होते ह्मणून जोव्हाचे आवडते होते.

इदा त्रायाजवळील एक पर्वत. हा निर्झरमय होता व वनाच्छादित होता. उंचावरून लांबचा देखावा दिसे ह्मणून देवांना हें स्थान प्रिय झालें होतें.

इदामिनिअस हा क्रीतन नृपति जो द्युकालिअन, त्याचा पुत्र. ग्रीकपक्षीं लढत होता. यानें पराक्रमानें पुष्कळ त्रोजनांचा संहार केला.

इदास यानें ईव्हीनसकन्या जी मार्पेसा तिशीं लग्न लाविलें होतें. तिचें हरण अपालोनें केलें. यानें त्याच्यावर धनुष्य चालवून स्त्री परत मिळविली.

इरिस देवांची दूती. हिलाच इन्द्रधनुष्य समजतात.

इलियम त्रायांतच एक लहान किल्ला होता. पुढें लोक त्राय व इलियम एकच समजूं लागले.

ई

ईआकस जोव्हाचा पुत्र. याचा पुत्र पेलिअस व त्याचा पुत्र अकिलीस.

ईआसेदीस हें नांव ईआकसाच्या कुळांत उत्पन्न झालेल्या सर्व पुरुषांस लावीत असत.

ईजिस **जो**व्हाची ढाल.

ईनिआस **ट्रो**जन वीर. **व्ही**नस व **अन्कैसीस** यांचा मुलगा. **ट्रो**जन युद्धांत यानें फार पराक्रम केला. **ट्राय** शत्रूनें जाळल्यावर खांद्यावर वृद्ध पित्याला घेतलें आहे, घरच्या देवांस डोक्यावर ठेविलें आहे, मुलगा हात धरून चालत आहे व स्त्री मागून येत आहे! अशा थाटानें अन्यत्र रहावयास निघून गेला.

ईनियुस **का**लीदनचा राजा. **आ**ल्थीआ याची पत्नी होती. हिच्यापासून याला पुत्र झाला. त्याचें नांव **मी**लीएजर. यानें **आ**ल्थीएच्या मरणानंतर **पे**रिबीएशीं लग्न लाविलें, तिचे पासून **तै**दिअस झाला. एक वर्ष शेतांत उत्पन्न चांगलें आलें ह्मणून यानें सर्व देवांस तुष्ट करण्याकरतां यज्ञ केला. परंतु **डा**यानेचें त्यास स्मरण झालें नाहीं. कोपाविष्ट होऊन **डा**यानेनें आसपासच्या लोकांस याच्या विरुद्ध चिथविलें व एक मस्त वराह याच्या शेतांत नासाडी करावयास पाठविला. त्याचा वध **मी**लीएजरानें केला.

ए

एइशन (इइशन) **हे**क्तराची पत्नी ॲन्द्रोमाकी ती याची कन्या. याला अकिलीसानें वधिलें.

एकियन अनेकनगरांतील लोक एकमतानें **ए**किअस नामक राजाला नेतृपद देउन लढत असत. शेवटीं हें नांव **ग्री**कांनाच प्राप्त झालें.

एटी ही ग्रीकांची कलहदेवता होय. तिनें स्वर्गीं असतां सर्व देवांचें आपसांत वांकडें आणलें. **जो**व्हानें तिचे केश धरून तिला

ओढीत आणलें व स्वर्गांतून घालवून दिलें. पृथ्वीतलावर आल्यावर मनुष्यमात्रांमध्येंसुद्धां तिनें कलहाग्नि पेटविण्याचा सपाटा लाविला होता.

एत्रिअस — अर्गासचा नृपति हा मेनिलास व अगमेम्नन यांचा पिता म्हणून या दोघांस एत्रिअसज असें म्हटलें आहे.

एरिन्निस — फरी शब्द पहा.

एरिबस — हा पातालवासी देव होता. याला नरकाचा स्वामी म्हणत. याचें तमसेशीं (रात्रीशीं) लग्न झालें होतें. तिनें प्रकाश व दिवस यांस जन्म दिला. परंतु कविजनांनीं एरिबस हें नांव पाताळाच्या एका विशिष्ट भागाला दिलें होतें. या भागांतून पुण्यवान मनुष्यांचे आत्मे मृत्यूनंतर एलिसियम म्हणून सर्व सुखांचें एक आगर आहे तेथें जातात असा प्राचीन समज होता.

एस्क्युलेपिअस हा ग्रीकांचा धन्वंतरी होय. हा अपालोचा पुत्र. हा मनुष्यांस मरूं देत नाहीं अशी प्लूतोनें (यमानें) जोव्हाकडे फिर्याद केली होती. वैद्यविद्या यानें स्थापित केली. याला मेकाअन व पोदालिरिअस असे दोन पुत्र होते.

ऐ

ऐलिथिया — ही प्रसवाधिष्ठात्री देवता होय. प्रसूतिवेदनांची कारक हीच होय

ऐसस — ऐसस व आन्तिफस हे दोघे प्रायमाचे पुत्र होते. पहिला हेक्युबेचा व दुसरा दासीचा. इदागिरीवर शेळ्या चारीत असतां त्यांस अकिलीसानें पकडून नेलें होतें. त्यांना खण्डणी देऊन प्रायमानें सोडविलें. नंतर ते दोघेही अगमेम्ननाच्या हस्तें रणांत मृत्यू पावले.

ओ

ओइलीअस. एक्या आजक्षाचा पिता. दुसरा आजक्ष तेलामनाचा पुत्र होता.

ओथ्रिओन्यूस प्रायमाची कन्या कासान्द्रा हिची प्राप्ति व्हावी ह्मणून त्या अटीवरच तो प्रायमाशीं करार करून ट्रोजनपक्षीं लढत होता. तो इदामिनिअसाचे हस्तें मरण पावला.

ओशिअनस सागराधिष्ठित देव. टेथिसशीं यानें लग्न लाविलें. त्याला नदीरूप कन्या पुष्कळ झाल्या. पुष्कळ देवांचें पितृत्व याकडेस होतें.

क

कल्कास हा प्रसिद्ध भविष्यवादी ट्रायास ग्रीकांबरोबर गेला होता. क्रैसीसकन्या परत दिल्याशिवाय तापाची साथ दूर व्हावयाची नाहीं ह्मणून यानें अगमेम्ननाला स्पष्ट सांगितलें. ट्राय दहाव्या वर्षाच्या आधीं हस्तगत होणार नाहीं ह्मणून त्यानें सांगून ठेवलें होतें. प्रश्न सांगण्यांत याच्याहून कोणी कुशल पुरुष निर्माण झाला कीं याला मृत्यु यावयाचा होता. ट्रोजनयुद्धानंतर गांवीं गेल्यावर याला एका झाडाचीं फळें नेमकीं किती तें सांगतां येईना. त्याचें उत्तर मोप्ससनें बरोबर दिलें. तेव्हां हा मृत्यु पावला.

कासान्द्रा प्रायमाची मुलगी. अपालोनें तिच्या सौन्दर्यास भुलून तिच्या समागमाची इच्छा तिच्या जवळ प्रदर्शित केली व ह्मणाला तुला मी मागशील तें देतों. तिनें वर मागितला कीं, मला भविष्य जाणण्याचें सामर्थ्य यावें. तिला तसें सामर्थ्य प्राप्त होतांच आपला करार तिनें मोडला. अपालोनें रागानें आपली जीभ तिच्या ओंठावरून फिरवून ते ओले केले. त्याचा परिणाम असा झाला कीं, कळलेल्या भविष्याचा तिनें उच्चार केला कीं

तें व्यर्थ व्हावें. त्रोजनलोक तिला वेडी समजत व तिच्या बडबडण्याकडे कोणी लक्ष देत नसत. त्राय पतन पावल्यावर अगमेम्नन तिला स्त्री ह्मणून घरीं घेऊन गेला. त्याच्यावर येणारा प्रसंग तिनें आधींच वर्तवून ठेवला होता तिकडे अगमेम्ननानें लक्ष दिलें नाहीं. व शेवटीं क्लातेम्निस्त्रा त्याची जी स्त्री तिच्या हस्तें मृत्यु पावला.

किमीरा राक्षसस्वरूपी सिंहीण. हिच्या तोंडांतून अग्नीच्या ज्वाला निघत असत. हिला सिंहाचें तोंड व अजाचा मध्य होता. पार्श्व भाग सर्पाकृति होता. आयोबेटीसच्या सांगण्यावरून बेले-रोफनानें हिचा वध केला. ह्या कथेचा अर्थ कोणी रूप-कानें लावतात. लिसिआ प्रातांत एक ज्वालामुखी पर्वत होता. त्याच्या शिखरावर सिंहांची वसाति होती. मध्यभागीं अजाकुलांचा संचार असे. पायथ्याशीं दलदलीचे मऊ भागीं सर्प असत. बेलेरोफनानें अशा रूपाच्या राक्षसीचा वध केला. ह्मणजे त्या डोंगरावर पहिल्यानें जाऊन वसति केली.

केरिस. व्हल्कनची भार्या.

क्रीसा या नगरांत अपालोचें देऊळ होतें.

क्रैसीस अपालोचा पुजारी. लिर्नेसस शहर ग्रीकांनीं लुटिलें तेव्हां त्याची कन्या आस्तिनोमी अगमेम्ननाच्या वांट्यास आली. पित्याला कळतांच तो कन्येस मुक्त करण्याकरतां खण्डणी घेऊन ग्रीकां-च्या छावणींत आला. त्याच्या विनवण्या फुकट गेल्या. त्यानें अपालोची प्रार्थना केली. अपालोनें रोगाची सांथ पाठविली. तिला भिऊन कल्कासच्या सांगण्यावरून क्रैसीसकन्येला नृपानें घरीं पोंचविलें.

क्लातेम्निस्त्रा ही अगमेम्ननाची स्त्री होय. अगमेम्नन त्रायास गेला तेव्हां याच्या स्त्रीनें शुद्ध आचरण केलें नाहीं. वे अगमेम्नन परत येतांच जाराचे साहाय्यानें पतीचा खून केला. अगमेम्ननानें त्रायाहून आणलेल्या प्रायमकन्येचा (कासान्द्रेचा) ही तिनें खून केला. ओरिस्तीस ह्मणून अगमेम्ननाचा मुलगा होता त्याला बहिणीनें पळविलें. त्यानें मोठा झाल्यावर माता व तिचा जार जीं दोघें सुखानें राज्य करीत होतीं त्यांचा खून करून सूड घेतला.

ग.

गानिमीद् त्रासनृपतीचा पुत्र. हा सौंदर्यवान होता. शेळ्या चारीत असतां जोव्हानें यास उचलून नेलें त्याचेकडे भोजनसमयीं पेले भरून देण्याचें काम दिलेलें होतें.

ग्लाकस. हिप्पोलोकसाचा मुलगा व बेलेरोफनाचा नातू होता. यानें प्रायमास उत्कृष्ट साहाय्य केलें. हा फार उदार मनाचा होता. दायोमीद् व याची रणांत गांठ पडली व पित्रागत ओळख निघाली तेव्हां यांनीं पगडीभाई केली. त्याप्रसंगीं दायोमीदाचें लोहाचें कवच घेऊन हा त्यास सोन्याचें अर्पण करिता झाला.

च

चिरन. हा एक सेन्तार होता. ह्मणजे याच्या शरीराचा मागचा भाग अश्वाचा व पुढचा मनुष्याचा होता. ह्याची उत्पत्ति सेंतर्नापासून होती. हा वैद्यकी उत्तम जाणत असे. अकिलीस व हर्क्यूलीस इत्यादि वीरांचा शिक्षक होता.

ज

जूनो. ही **सॅ**तर्नाची मुलगी, **जो**व्हाची भगिनी व भार्या. **प्लू**तो, **ने**प्च्यून इ. तिचीं भावंडें होत. **जो**व्ह तिच्या रूपानें मोहित झाला. एके दिवशीं त्यानें मोठें वादळ उत्पन्न केलें. थंडी पडल्यामुळें जिकडे तिकडे गारठा आला. अशा प्रसंगीं कोकिलाचें रूप घेऊन **जू**नोजवळ **जो**व्ह कुडकुडत गेला. तिला त्याची दया आली व तिनें त्यास उचलून उराशीं धरिलें. त्यासरसें त्यानें मूळरूप धारण करून तिच्याशीं लग्न लावण्याचें वचन देऊन आपली समागमेच्छा पुरती करता झाला. लग्नसमारंभास सुर नर पशु पक्षी सर्व हजर होते. फक्त एक मानवस्त्री हजर नव्हती. **म**र्क्युरिनें तिला कांसवीण केलें. **जू**नो आतांपासून देवांची राणी झाली. परंतु **जो**व्हाचे चाळे तिला आवडत नसत. त्याला दुसऱ्या स्त्रियांचे ठिकाणीं संतति होई. त्याचा तिला राग येत असे व तो ती त्या संततीवर काढीतसे. **ह**र्क्यूलीस **ट्रा**यांतून परत येतांना **जो**व्हाला निद्रित करून **जू**नोनें मोठें वादळ उत्पन्न करून त्याच्या मार्गांत विघ्न उत्पन्न केलें होतें तें **जो**व्हास कळतांच त्यानें तिचे पाय ऐरणीशीं बांधून ठेविले. **व्हु**ल्कनानें तिला साहाय्य केलें ह्मणून त्यानें त्यालाही स्वर्गांतून खालीं डोकें वर पाय करून फेकून दिलें. यानें **जू**नो जास्त चिढली. व **जो**व्हास पदच्युत करण्याचा कट तिनें केला. तें **थे**टिसला पित्याचे मार्फत कळलें. तिनें **ब्रा**एरिअस नामें राक्षसाच्या मदतीनें तो प्रसंग टाळिला. तिला **मा**र्स, **ही**बी, वगैरे अपत्यें झालीं. **मि**नर्वा ही **जो**व्हानें मस्तकांतील मगजांतून

उत्पन्न केली होती. या चमत्काराचे जोडीला तिनें व्हल्कन निर्माण केला तो नुसती एक वनस्पति हुंगून केला. जूनो निद्रित असतां हर्क्यूलीसाला जोव्हानें तिच्या स्तनाशीं लाविलें. त्या वेळेस तिच्या स्तनांतून दुग्धाचा स्राव स्वर्गांत झाला. दुग्धाच्या रंगाचा जो तारकापथ आकाशीं दिसतो ज्यास आपण आकाशगंगा ह्मणतों व इतर दुग्धमय पथ ह्मणतात तो ह्या स्तन्यापासून उत्पन्न झालेला आहे. तिचें वर्णन रोमन लोकांनीं केलेलें आहे तें फार भव्य आहे. ही सुवर्णसिंहा-हासनावर बसलेली आहे, हातीं सुवर्ण राजदण्ड धरलेला आहे, त्यावर कोकिल बसलेला आहे, मागें इरिस आपल्या इन्द्रधनुष्याचे रंग पाडीत आहे, पार्श्वीं मयूर बसला आहे, इत्यादि. सौन्दर्याबद्दल लावलेलें बक्षिस पारिसानें व्हीनसला दिलें व जूनोला दिलें नाहीं. याच गोष्टींत ट्रोजनयुद्धाचें व प्रायमावरच्या अघोर संकटांचें मूळ आहे.

जोव्ह (जुपितर) सॅतर्नचा पुत्र. सॅतर्नाला एक तितन ह्मणून बन्धू होता. तुला मुलगे होतां कामा नये या अटीवर तितनापासून सॅतर्नानें राज्य मरेतों घेतलें होतें. ह्मणून त्याला जे मुलगे होत ते तो खाऊन टाकी हें त्याच्या भार्येला आवडत नसे. तिला जेव्हां जोव्ह झाला तेव्हां तिनें जोव्हाला दूर नेऊन ठेविलें व पती पुढें एक दगडाचा गोळा आणून ठेविला. तो त्यानें लागलाच भक्षण केला. यास मुलगा झाल्याचें वृत्त तितनास कळलें. त्यानें यास कैदेंत टाकिलें. जोव्ह वर्षाचा होतांक्षणींच तितनाचें पारिपत्य करण्यास समर्थ झाला. व तितनाचा पराभव करून त्यांनें पित्यास बन्धमुक्त केलें. परंतु मुलगा इतका

प्रबळ झाला हें सॅतर्नला आवडलें नाहीं. तोही कपटोपाय योजूं लागला. जोव्हाला समजतांच पित्याला त्यानें पिटाळून लाविलें. जोव्हाला, प्लूतो व नेप्चून असे दोघे बन्धू होते. त्यांनीं सर्व पृथिवीचें राज्य वांटून घेतलें. स्वर्ग जोव्हानें घेतला नेप्चूनाला सागरप्रदेश दिला; व प्लूतोला नरकप्रांत दिला, पृथिवी समाइकच राहिली. पृथिवीवरील कांहीं राक्षसी प्रजेस तितनाचा पराभव झालेला आवडला नाहीं. कारण त्यांचें व तितनाचें नातें होतें. त्यांनीं पर्वतांवर पर्वत रचून स्वर्गास चढत जाऊन जोव्हाशीं युद्ध करावयाचा निश्चय केला. सर्व देव इजिप्तदेशांत पळून गेले व पशुरूप धारण करून वनांत लपून बसले. जोव्हानें हर्क्यूलीसाच्या साहाय्यानें या राक्षसांचा नाश केला.

अशारीतीनें निष्कंटक राज्य झालें असतां जोव्हानें विषयसुखाचा उपभोग घेण्यास प्रारंभ केला. त्यानें जूनोसकट सात बायका केल्या. त्यांतच लाटोना होती. आर्या १४४ पृ ४४९ पहा. त्यानें दानाईला सुवर्णाच्या वर्षावांत गांठिलें, आन्तिओपीला वनचर देवाचें रूप घेऊन गांठिलें; लीडेला, हंसाचें; युरोपेला, वृषभाचें; ईजिनेला, अग्निज्वालांचें; इ. इ. त्याला या क्रमानें अपत्येंही पुष्कळ झालीं. यालाच जुपितर ह्मणतात. गरुड हा त्याचा आवडता पक्षी होय. तो सर्व सुरनरांचा शास्ता होय. क्रीतन लोक याचें ध्यान काढीत तेव्हां त्याला कान दाखवीत नसत ह्मणजे यानें कमीअधिक कोणाचें ऐकून पक्षपात करूं नये अशी त्यांची भावना होती.

झ

झान्थस — यालाच **स्का**मन्दर नदी ह्मणत. या नांवाचाच अकिलीसाचा घोडा होता. त्यानें अकिलीसाचें मरण वर्तविलें त्यावेळेस त्याला मनुष्यवाचा फुटली होती.

झेंफिर — एक वायु. **ग्री**कांमध्यें वायू अनेक होते.

ट

टेथिस — **ओ**शिअनसाची भार्या. एक जलदेवता. मुख्य मुख्य नद्यांची जन्मदात्री.

त

तॅलेन्त — सोनें वजन करण्याचें माप होतें. नाणीं प्रचारांत नव्हतीं ह्मणून याचा उपयोग करीत असत.

तार्तारस — नरकाचा एक भाग. महापातक्यांस मरणानंतर येथें जावें लागे. येथें काळोख फार असे.

तितन — **सॅ**तर्नाचा भ्राता. जास्त माहितीकरतां **जो**व्हशब्द पहा.

तेलामन — **पे**लिअसाचा भ्राता. याला **आ**जक्ष व **त्यू**सर असे दोन पुत्र होते.

तैदिअस — ईनियुसाचा पुत्र व **दा**योमीदाचा पिता. हा **का**लिद्नचा राजपुत्र. तेथें चुकून मित्राचा यानें प्राण घेतला ह्मणून **अ**र्गासांत जाऊन तेथील नृपति जो **अ**द्रास्तस त्याच्या आश्रयाला राहिला त्यानें याला जामाता केला. त्याचा दुसरा जामाता जो **पा**लिनिकीस, **थी**बचा राजा, त्याचें व त्याच्या इतिआक्लीस नामक भावाचें गादीवरून भांडण चाललें होतें. एक एक वर्षाची पाळी करून दोघांनीं राज्याचा उपभोग घ्यावा असें आपसांत प्रथम ठरलें होतें. परंतु एक वेळ इतिआक्लीस हा राज्यावर येतां तो तें बळकावून बसला व पाळीप्रमाणें भावास राज्य देईना

ह्मणून **अ**द्रास्तसानें **तै**दिअसाला इतिआक्लीसाजवळ युद्ध करण्यास पाठविलें. त्यानें द्वंद्वयुद्धास आव्हान करून अनेकांस हरविलें. **तै**दिअस परत यावयास निघाला असतां वाटेंत ५० **थी**बन लोक दबा धरून बसले होते. त्यांतील एकच वडलेलें वृत्त घरीं जाऊन सांगण्यास यानें उरविला. त्यानें, पुढें युद्ध झालें त्यांत थोर पराक्रम केला. **मे**नालिप्पसानें शेवटीं त्यास बाणानें वार केला परंतु वार झाल्यावरही **मे**लानिप्पसास त्यानें एका बाणानें ठार मारलें. इतकें सामर्थ्य वायाळ झाल्यावरही त्याचे अंगीं होतें. मरण्यापूर्वीं त्यानें **मे**लानिप्पसाचें प्रेत आणवून त्याचें मस्तक तोडून आणल्यावर दांतानी मेंदू काढूं लागला **मि**नर्वा यांस वांचविणार होती परंतु हें अमानुष क्रौर्य पाहून तसाच याला टाकून निघून गेली.

तैथोनस **आ**रोराचा कामुक वल्लभ. **आ**रोरा शब्द पहा.

त्यूसर **ते**लामनाचा पुत्र. यानें **ग्री**कपक्षीं लढून फार पराक्रम केला.

त्राय (**त्रो**जा) हें शहर **त्रा**सनृपानें इदापर्वताजवळ वसविलें होतें. येथून समुद्रतीर २ कोस लांब होतें. **दा**र्देनस यानें या प्रांतात राज्य स्थापिलें. त्याला त्यानें **दा**र्देनिआ हें नांव दिलें होतें. त्याच्याच कुळांतील **त्रास** नामक नृपानें तें बदलून **त्राय** असें ठेविलें. तेथील लोकांस ह्मणून **दा**र्देनिअन किंवा **त्रो**जन ह्मणत. **त्रा**यचा राजा **प्रा**यम याच्या पुत्रानें,**पा**रिसानें, **हे**लनचें हरण **मे**निलासाच्या घरांतून केलें. त्यावरून सर्व **ग्री**क जमा होऊन १२०० नौका घेऊन एक लाख सैन्यानिशीं **त्रा**याला वेढा देऊन बसले. **अगमेम्नन** त्यांचा सेनापति होता. **त्रो**जनलोकांस साहाय्य शेजारच्या **ए**शिआ **मा**यनर प्रदेशांतील

राजांनीं केलें. आसपासच्या नगरांत ग्रीकांनीं लूट फार चालविली होती. युद्ध सुरू झाल्यावर दोहों पक्षीं प्राणहानि अगणित झाली. **प्राय**माचे बहुतेक पुत्र मृत्यु पावले. मध्यंतरीं सांथीनें ग्रीकांच्या छावणींत प्राणहानि केली. व **अ**किलीस व **अ**गमेम्नन यांचें भांडण झालें तरी युद्ध थांबून राहिलें नव्हतें. नदीनाले शस्त्रांनीं व शवांनीं चोंदून गेले होते. १० वर्षें युद्ध चालल्यावर **ई**निआस व **अ**न्तिनार यांनीं फितुरी करून ग्रीकांस **त्रा**य हस्तगत करून दिलें. परंतु कविजन असें सांगतात कीं ग्रीकांनीं अति मोठा लांकडी घोडा केला. त्यांत गुप्तपणें सैनिक भरून ठेवले. व सर्व सैन्य घरास निघून गेलें असें दाखविलें. **त्रो**जनांनीं तो घोडा आपण होऊन रणमैदानांतून शहरांत ओढून आणला. व अपरात्रीं आंत लपून बसलेले **ग्री**क भराभर बाहेर आले व त्यांनीं नगरद्वारें खुलीं केलीं. त्यांतून बाहेर लपून बसलेले **ग्री**क आंत शिरले व त्यांनीं **त्रो**जनांची कत्तल केली. याच शहराचें दुसरें नांव **त्रो**जा असें आहे. त्यावरून तेथील लोकांस **त्रो**जन असें नांव पडलें.

त्रास हा **त्रा**यचा राजा होता. याच्यावरून तें नांव पडलें होतें.

त्रितोनिया **मि**नर्वेचें नांव.

थ

थर्सायतीस हा फार कुरूप व अनुदार ग्रीक शिपाई होता. हा **अ**गमेम्नन, **अ**किलीस व **यु**लिसीस यांचा फार द्वेष करी व त्यांची निर्भर्त्सना करी.

थेटिस जलदेवता. अमरांपैकीं एवढीनेंच मर्त्याशीं लग्न लाविलें होतें. हिच्यापासून पुत्र होईल तो पित्यापेक्षां वरचढ होणार असें

भविष्य होतें ह्मणून हिच्याशीं कोणी अमरांपैकीं लग्न लावावयाला तयार होईना. पेलिअस तयार झाला. अकिलीस हा त्याचा पुत्र. हेक्तरवधाकरतां तिनें व्हल्कनाकडून कवच व ढाल घडवून आणून दिली होती. (अकिलीस शब्द पहा.)

थिम्त्रीअस हें अपालोचेंच एक आडनांव होतें.

द

दानाई ग्रीकांचें नांव.

दार्देनस हा जुपितराचा पुत्र. प्रायम घराण्याचा हा मूळ पुरूष. यानें दार्देनिआ शहर वसविलें. या कुळांत उत्पन्न झालेल्या त्रास नामक नृपानें त्याचेंच नांव त्राय हें ठेविलें ह्मणून प्रायमाच्या प्रजेस दार्दन, दार्देनिअन किंवा त्रोजन ह्मणतात.

दायाना मृगयेची देवता. धनुर्विद्येंत फार निष्णात असे. उंच काळवीट ज्याला जोडलेले आहेत अशा रथांत आरूढ होऊन एका हातांत वक्र धनु घेऊन खांद्यावर बाणांनीं भरलेला भाता आहे व सारमेय संगतीस आहेत असें हिचें ध्यान आहे.

दायोन जुपितरची एक भार्या. हिच्या पासून व्हीनस झाली.

दायोमीद तैदिअसाचा पुत्र. ईतोलिएचा राजा. ग्रीकसरदारांत अत्यन्त शूर ह्मणून हा प्रख्यात होता. हेक्तर व ईनिआस यांच्याशीं यानें युद्ध केलें होतें. यानें अपरात्रीं जाऊन थ्रेशिअन नृपतीस मारण्यास व घोडे पळवून आणण्यास युलिसीसाला साहाय्य केलें होतें. यानें प्रत्यक्ष व्हीनसला जखमी केलें होतें.

दीइफोबस हेक्तराचा सोदर भ्राता. रणांत मेरिआनीसासह यानें चांगलें शौर्य दाखविलें. पारिसवधानंतर हेलनशीं यानें लग्न लाविलें. तिनें विश्वासघातानें मेनिलासकरवीं त्याचा निर्दयपणें वध करविला. व पहिल्या नवऱ्याची प्राप्ति करून घेतली.

दोलन — **त्रो**जन हेर. ग्रीकांच्या छावणींत ठेहळणी करण्यास **हे**क्तरानें पाठविला. **दा**योमीद् व **यु**लिसीस त्याच कामाला **ग्री**कांच्या छावणींतून निघाले होते. त्यांनीं यास पकडून त्रोजनांच्या साहाय्यकर्त्यांची माहिती काढून घेऊन यास जीवें मारिलें.

न

नाइआद्. — या जलदेवता होत. नद्या, झरे, वापी व तडाग यांवर त्या कुमारीरूप धरून अम्मल करतात.

नायोबी. — **लि**डिएच्या राजाची स्त्री. तिला सात कन्या व सात पुत्र होते. ती **जो**व्हभार्या **ला**टोना हिला हंसून ह्मणाली. "मला मान जास्ती. कारण मला १४ अपत्यें आहेत. तुला दोनच." **ला**टोना क्षुब्ध झाली व मुलांस तिचें पारिपत्य करावयास सांगितलें. अपालो व **दा**याना यांनीं तिच्या मुलांचा संहार केला. तें ऐकतांच दुःखानें **ना**योबी पाषाणस्वरूपी झाली. नऊ दिवस तिच्या अपत्यांचीं शवें पुरल्याशिवाय होतीं. कारण जे पुरावयास जात त्यांस जोव्ह पाषाणस्वरूपी करी. दहाव्या दिवशीं सर्वांस अमरांनीं पुरलें.

नेप्चून. — सागरदेवता, सर्व नद्या व समुद्र यांवर याचा अम्मल असे. जोव्हाचा भ्राता.

नेरीअस दुहिता — सागरदेवता. या ५० होत्या.

नेस्तर — **ने**लिअसाचा पुत्र. ग्रीकपक्षीं लढत होता. हा संभाषणकुशल वक्ता, न्यायी, सुज्ञ व दूरदर्शी असा होता. **त्रो**जनयुद्धानंतर हा घरीं सुखानें शेष आयुष्य घालविता झाला.

नेलिअस. — **पै**लसचा राजा व **ने**स्तराचा पिता.

प

पत्रोक्लश **मी**नीशीअसाचा पुत्र. यानें मनुष्यवध केला म्हणून देश सोडून **अ**किलीसाच्या पित्याच्या दरबारांत आश्रय घेतला होता. हा **अ**किलीसाचा प्राणप्रिय मित्र होता. **त्रो**जनयुद्धांत त्याच्या तंबूंत सारखा पडून होता. **अ**किलीसाच्या बरोबर **अ**गमेम्नन नृपतीवर हाही रागावला होता. यांच्या अभावें **त्रो**जनांचें चांगलें फावलें व जेव्हां ते **ग्री**कांचा संहार करूं लागले तेव्हां **ने**स्तरानें रणांत सामील होण्यास याचें मन वळविलें. यानें रडून **अ**किलीसाची परवानगी मिळविली. त्याचें कवच घालून तो लढाईस गेला व **त्रो**जनांस त्यानें नगर तटांच्या आंत भयानें पळविलें. तो तटभंग करणार इतक्यांत **अ**पालोनें (जो त्रोजनांचा कैवारी होता.) त्यास **हे**क्तराकडून मारविलें. **हे**क्तरानें त्याचें कवच हरून नेलें. तो मुंडकें कापून नेणार होता परंतु **आ**जक्षानें नेऊं दिलें नाहीं. छावणींत त्याचें शव **ग्री**कांनीं नेल्यावर **अ**किलीसानें अत्यन्त शोक केला. त्याचा अन्त्यविधि त्यानें मोठ्या समारंभानें केला. **प**त्रोक्लशाचे मरणानें युद्धास नवें स्वरूप आलें कारण **अ**किलीसाची समजी झाली. युद्धांत सामील होऊन त्यानें **हे**क्तरवध केला.

पलास **मि**नर्वा शब्द पहा.

पन्दारस **लि**काअनाचा पुत्र. यानें **ग्री**क व **त्रो**जन यांचा तह झालेला पहिल्यानें मोडला व आडून **मे**निलासाला क्षत केलें. यानें पुष्कळ पराक्रम केला. **दा**योमीदानें याचा वध केला.

पॅनोम्फीअन **जो**व्हाचें विशेषण.

पालिदामास **त्रो**जनवीर. अन्तिनाराचा पुत्र. **आ**जक्षहस्तें मृत्यु पावला.

पालिनिक्रीस हा इतिआक्लीसाचा भ्राता. इतिआक्लीस शब्द पहा.

पिसान्द्र **आ**न्तिमाकसाचा पुत्र. **अ**गमेम्ननानें रणांत वधिला. हातापायां पडत असतां जीवदान दिलें नाहीं. कारण याच्या पित्याचें वर्तन यास नडलें. **आ**न्तिमाकस शब्द पहा.

प्रासर्पैनी **सी**रीसच्या पोटीं झालेली **जो**व्हाची कन्या. **प्लू**तोनें हिला उपवनांत रमत असतां पाताळांत हिरावून नेऊन लग्न लाविलें.

प्रीतस **आ**योबेतीसचा जामाता. **बे**लेरोफन शब्द पहा.

प्रोतीसिलास **त्रो**जनयुद्धांत यानें पहिल्यानें **त्रा**यभूमीवर पाय ठेवला. देवाच्या कौलाप्रमाणें अशाला तत्काल मृत्यु यावयाचा होता त्याप्रमाणें याचा वध **हे**क्तरानें लागलाच केला.

प्लूतो (**ग्री**कांचा यम) **सॅ**तर्नाचा पुत्र. **जो**व्हाचा भ्राता. याच्या वांटणीस पाताळांतील सर्व प्रदेश आला. याचेंच नांव **हे**दीस असें होतें. याच्या मुलखांत सर्वभर अंधार भरलेला होता म्हणून कोणीही याची स्त्री होण्यास कबूल होईना म्हणन **प्रा**सर्पैनी नामक **सी**रीसची (धान्यदेवतेची) कन्या उपवनांत मैत्रिणींसह रमत होती. तीस बळेंच धरून भूमींत त्रिशूलानें विवर पाडून हा पाताळांत निघून गेला. त्याच्या जवळ **स**र्बीरस नांवाचा श्वान नेहमीं असतो. याच्या हातांत किल्ल्यांचा जुडका असतो. त्याच्याकडे गेलेला कोणी परत यावयाचा नाहीं असें त्या किल्ल्या सुचवितात.

पेलिअस यानें **थे**टिसनामक सागरदेवतेशीं लग्न लाविलें होतें. यांचा पुत्र अकिलीस.

पोदालिरिअस हा **ए**स्क्युलेपिअस धन्वंतऱ्याचा पुत्र. **ग्री**कांबरोबर होता.

पिग्मिअन हीं मनुष्यांची जात फार ठेंगणी होती. हे भूच्या विवरांत रहात असत. त्यांतून निघून शस्त्रें करांत घेऊन शेतें कापावयाला येत असत जसें कोणी ह्मणेल यांस अरण्यांतील वृक्षच्छेदच करावयाचा आहे. यांना लांबून येऊन बगळे त्रास देत त्यांच्यावर हे बोकडांवर बसून हल्ला करीत.

फ

फरी. यांची उत्पत्ति सॅतर्नाच्या रक्तापासून झाली होती. कोणी ह्मणतात त्या प्लूतोच्या कन्या आहेत. त्या तीन आहेत. यांचें स्वरूप अक्राळ विक्राळ आहे. केसांचे बद्दल यांच्या डोक्यावर सर्पांचीं वेटाळीं चळवळ करीत असतात. या एका हातांत मशाली धरतात. व विंचवांनीं भरलेल्या दोऱ्यांचा चाबुक दुसऱ्या हातांत घेतात. पाप्यांना जाच करण्यांत प्लूतोच्या ह्या मन्त्रीच आहेत. यांना दया कधीं सुटत नाहीं. यांचा संचार नरकप्रदेशांत व पृथ्वीवरही असतो. व पाप्यांस शिक्षा करणें हें यांचें काम आहे. यांस एरिन्निस ह्मणतात. वडील भावांचा अपमान व कृतघ्नपणा या पापांवर याचा मोठा कटाक्ष आहे.

फीबस अपालो शब्द पहा.

फीनिक्स आमिन्तराचा पुत्र. हा आकिलीसाचा शिक्षक होता. आमिन्तराला एका वेश्येचा नाद फार लागला. फीनिक्साच्या मातेला तेणेंकरून दुःख झालें. फीनिक्साला तिनें आग्रहानें सांगितलें कीं कसें तरी करून तूं स्वतां त्या वेश्येला मोहित कर ह्मणजे तुझा तिला नाद लागला कीं पित्याचें वेड कमी होईल. हा तरुण असल्यामुळें

फीनिक्साला या कार्यांत यश आलें. पित्याला मुलाची कृति समजतांच रागानें त्याचे डोळे फोडिले. मुलगाही सूड घेण्याकरतां पित्याचा वध करणार होता. परंतु असला अधर्म करणें इष्ट नाहीं असें समजून तो **अ**किलीसाच्या पित्याकडे गेला. त्यानें **चि**रनाकडून त्याचे डोळे नीट करविले. त्याच्याकडे **अ**किलीसाचें शिक्षण सोंपविलेलें होतें. त्याबद्दल कांहीं प्रांताचें राज्यही त्यास दिलेलें होतें त्याचा त्यानें बराच काळ उपभोग घेतला. शिष्याबरोबर हा **त्रा**यास गेला होता. **आ**किलीसाची समजूत करण्यांत हा प्रमुख होता.

ब

बाकस — **से**मीली याची माता व **जो**व्ह पिता होय. हा मदिरापान करणाऱ्यांचें दैवत होय. डोक्यावर द्राक्षफळांचा मुकुट घातलेलें वयोवृद्ध असें याचें ध्यान दाखवितात. अमितपान केलें कीं मनुष्य ज्ञाताऱ्याप्रमाणें हवेंतसें बरळत सुटतो, असा याचा अर्थ होय.

बेलेरोफन — बन्धूचा वध करून आपला ग्राम टाकून **प्री**तस नृपाच्या आश्रयानें हा राहिला होता. हा देखणा होता. याला पाहून **प्री**तसजाया मोहित झाली. तिच्या अनीतिमूलक विनंतीला यानें मान दिला नाहीं. म्हणून पतीजवळ ती म्हणाली " हा अविचारी तरुण मजला बलात्कारानें भ्रष्ट करूं पहात आहे. " **प्री**तस नृपानें स्वतां कांहींएक न करतां कपट-लेख लिहून याच्या जवळ देऊन त्याला **आ**योबेटीस नामक श्वशुराकडे लावून दिलें. हेतु असा कीं ते लेख पाहून याला श्वशुरानें जीवें मारावें. जामाताचें म्हणणें पुरें करण्याकरतां

बेलेरोफनास किमीरानांवाच्या भयंकर प्राण्यास वधून आणाव-यास सांगितलें. त्याला वाटलें हा परत कसचा येतो. परंतु तो विजय मिळवून परत आला. आमाझन्सां विरुद्ध लढावयास याला नृपानें लाविलें तरी हा लढून यश मिळवून आला इ० तेव्हां निरपराधी लोकांचा त्राता परमेश्वर आहे हें त्यांस कळून हा सुरसंभव कोणीतरी नृपच असावा असें समजून आपली कन्या राज्यासह त्यास देता झाला.

बेलोना समरदेवता. हिला चुकून कोणी मिनर्वा असें ह्मणत. ही केश मोकळे टाकून एका हातांत चाबूक घेऊन दुसऱ्या हातांत मशाल घेऊन वीरांस उत्तेजन देत रणांत धिंगाणा घालीत असते.

बोरिआस उत्तर दिशेकडून वाहत येणारा वायु.

ब्रिएरिअस या राक्षसास १०० हात व ५० डोकीं होतीं. जूनो, नेप्चून व मिनर्वा यांनीं जोव्हास पदच्युत करावयाचा कट केला तेव्हां थेटिसनें जोव्हाच्या रक्षणार्थ याला त्याजवळ बसवून ठेविलें. त्याला भिऊन आपला हेतु जूनो वगैरे देवांनीं सोडून दिला.

ब्रैसीसकन्या हिचें नाव हिप्पोदेमिआ. लिर्नेसस शहर ग्रीकांनीं हस्तगत करून लुटिलें तेव्हां ही आकिलीसाच्या वांट्यास आली. अगमेम्न-नाच्या वांट्यास आलेली, अपालोचा पुजारी जो क्रैसीस त्याची कन्या त्याला परत करावी लागल्यावर, अगमेम्ननानें ब्रैसीसकन्येलाच अकिलीसाच्या ताब्यांतून हिरावून नेलें. एवढ्यावरून अकिलीस रुसून बसला होता. समजी झाली त्या वेळेस अगमेम्नन यानें शपथ वाहिली होती कीं मी ब्रैसीस-कन्येला स्पर्शसुद्धां केला नाहीं.

म

मर्क्युरि जोव्हाचा पुत्र. प्रवाशांचा, व्यापाऱ्यांचा व चोरांचाही हा देव होय; मार्साची तरवार नेप्चूनाचा त्रिशूल, व जोव्हाचा राजदण्ड चोरून यानें आपली कुशलता दाखविली. तेवढ्यानें त्याची शिफारस होऊन जोव्हानें दूत ह्मणून त्याला ठेऊन घेतलें. हेक्तराचें शव सोडून आणतांना हाच प्रायमाचे बरोबर अकिलीसाच्या छावणींत गेला होता.

मार्पेसा ईव्हीनसकन्या. हिनें इदासाला वरल्यावर अपालोनें तिचें हरण करण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर इदास धनु घेऊन त्याच्यावर शरसंधान करूं लागला. जोव्हानें मध्यें पडून ठरविलें कीं मार्पेसेला वाटेल त्याच्याकडे तिनें जावें. तिनें इदासाकडेच जाण्याचें ठरविलें. तो तिच्यावर फार प्रेम करीत असे.

मिनर्वा जोव्हानें मस्तकांतून निर्माण केलेली कन्या. ही कलांची देवता होय. हिचें दुसरें नांव पलास असें आहे.

मिर्मिदन हे वीरलोक अकिलीसाबरोबर त्रोजन युद्धाकरतां गेले होते.

मीनीशिअस पत्रोक्लशाचा बाप.

मीलीएजर ईनियुसाचा पुत्र. मार्पेसा व इदास यांची कन्या जी क्लीओपात्रा ती याची भार्या होय. याच्या पित्यानें दायानेचें यज्ञांत स्मरण ठेवलें नाहीं ह्मणून तिनें रागानें क्षेत्रांत नासाडी करावयास एक वराह पाठविला. व सर्व लोकांस चिथविलें. युद्ध फार वेळ झालें. शेवटीं वराहास मीलीएजरनें वधिलें. त्यानें त्याचें चर्म व मुंडकें आटालान्टा नामक स्त्रीस दिलें. त्यावरून पुन्हा युद्ध झालें. विशेषतः त्याच्या मातुलांस तें फार नडलें. कारण त्यांचा यानें वध केला. तें आल्थीआ ह्मणजे याची माता

हिला जेव्हां कळलें तेव्हां तिनें बोटें मोडून यास शिव्या श्राप दिले.

मेकाअन एस्क्युलेपिअसाचा पुत्र. हा उत्तम वैद्य होता. ग्रीकांबरोबर ट्रोजनयुद्धांत क्षतें बरीं करण्यांत यानें फार कौशल्य दाखविलें.

मेरिआनीस इदामिनिअसाचा रथवाह. ग्रीकपक्षीं लढून फार शौर्य दाखविता झाला.

य

युलिसीस इथाकाचा राजा लाअर्टीसनामक होता. त्याचा हा पुत्र. हा हेलनच्या पित्याच्या घरीं तिचें पाणिग्रहण करण्याच्या इच्छेनें बरेच राजे जमले होते त्यांपैकीं एक होता. हेलनची प्राप्ति होणार नाहीं असें वाटून यानें हेलनच्या चुलत बहिणीला (पेनिलोपीला) मागणी घातली. ती मान्य झाली. व पत्नीला घेऊन घरीं आला. पित्यानें वानप्रस्थाश्रम पतकरून राज्य याच्या स्वाधीन केलें होतें. नवदारपरिग्रहाचे आनंदांत त्याला फार दिवस मग्न होऊन रहातां येईना. पारिसनें हेलनचें हरण केलें तेव्हां इतर ग्रीक राजपुत्रांबरोबर त्यास लढाईस जावें लागलें. कारण सर्वांनीं तिच्या लग्नप्रसंगीं अशी शपथच घेतली होती कीं तिच्या पित्याकडून जो वर पसंत करण्यांत येईल त्याच्या पासून जर कोणींही तिचें हरण केलें तर बाकीच्या इतर राजांनीं तिची प्राप्ति फिरून करून देण्याकरतां हरण करणाऱ्याशीं युद्ध खेळलें पाहिजे. या शपथेप्रमाणें नूतन भार्येला सोडून जावें लागेल ह्मणून यानें वेड्याचें सोंग घेतलें. नांगरास एक घोडा व एक बैल जोडून धान्याबद्दल मीठ

पेरूं लागला. एकानें त्याच्या नांगरा पुढें त्याचें लहान बालक (तालिमाकस) आणून ठेवलें. त्यावरून यानें नांगर फिरविला नाहीं. त्याबरोबर हा वेडा नाहीं हें जगाच्या निदर्शनास त्यानें आणून दिलें. त्याला युद्धास जावें लागलें. तेथें त्यानें थोर पराक्रम केला. दायोमीदाच्या मदतीनें काळोख्या रात्रींत त्रोजनांच्या छावणींत छापा घालून ऱ्हीसस राजास मारिलें. वाटेंत दोलन नामक त्रोजन हेरास मारिलें.त्यानें वेळोवेळीं उपदेश करून आपलें शहाणपण दाखविलें. अकिलीसाच्या मृत्यूनंतर त्याचें कवच यालाच देण्यांत आलें. आजक्षाला तें पाहिजे होतें. त्रोजनयुद्धानंतर तो घरीं जावयास निघाला. वाटेंत तो आफ्रिकेच्या किनाऱ्यावर वादळांत उतरला नंतर सिक्लाप्स-नामक एकाक्ष राक्षसाचे हातीं सांपडला. त्यास मद्य पाजून त्याचा एक डोळा यानें फोडला. व शेळीच्या पोटास विळखा मारून चरावयास ती कळपासकट जात असतां आपली सुटका करून घेतली. नंतर पुन्हा वादळांत सांपडून तो एका जादुगारिणीच्या सपाट्यांत सांपडला. त्याचे पासून तिला एक पुत्र झाला. तिथून सुटल्यावर आणखी एके ठिकाणीं ७ वर्षें काढून पुन्हा एकवार वादळांतून सुटून इथाकाला २० वर्षांनीं परत आला. तेथें त्याला समजलें कीं आपल्या प्रिय व सुस्वरूप स्त्रीला अनेक राजपुत्र पाणिग्रहणार्थ छळीत आहेत. ती कोणा-सच नाहीं न ह्मणतां सांगे कीं हातीं घेतलेला पट विणून झाला कीं होय कीं नाहीं तो जबाब देईन. ती दिवसा विणी तेवढा भाग रात्रीं उलगडून टाकी. असें बरेच दिवस चाललें आहे तों तेथें तो भिकाऱ्याच्या वेषानें गेला. त्याच्या प्रामाणिक कुत्र्यानें

त्याला ओळखून पायांशीं प्राण टाकला. **मि**नर्वेच्या उपदेशानें **यु**लिसीसानें मुलाला ओळख दिली. लवकरच त्याच्या स्त्रीनें सर्व राजपुत्रांस सांगितलें कीं माझ्या पतीचें धनुष्य आहे तें वांकवून त्यास दोरी चढवून बाण लावून दांडा घालावयाला जें कुऱ्हाडीस विवर असतें त्या विवराशीं विवर लावून अनेक कुऱ्हाडी ठेविल्या आहेत त्यांच्या सर्वांच्या संयुक्त विवरांतून जो बाण मारील त्यालाच मी पतित्वानें वरणार आहें. हें कौशल्य एकट्या **यु**लिसीसाशिवाय कोणाच्या आंगांत नव्हतें. स्वयंवर प्रसंगीं आपण आंत आल्यावर त्यानें आधींच मंदिराचे दरवाजे बाहेरून लावून घेववले. कोणास धनुर्भंग साधेना. शेवटीं **यु**लिसीसानें तो प्रयोग करून दाखविला. व त्याच धनुष्यानें स्त्रीचा याच्या पश्चात् छळ केल्याबद्दल सर्व राजपुत्रांचा जीव घेतला. अशा रीतीनें स्त्रीचा पुन्हां लाभ करून घेऊन १६ वर्षे तो सुखांत नांदला.

ल

लाओमीदन **त्रा**यचा राजा. हा **प्रा**यमाचा पिता होय. याला एक कन्या **हे**सिओनी या नांवाची होती. यानें **त्रा**यपुरी भोंवतीं तट बांधिला. त्या कामावर त्यानें **अ**पालो व **ने**प्चून यांस लाविलें होतें. कारण यांस **जो**व्हानें वर्षपर्यंत स्वर्गांतून हद्दपार केलें होतें. काम पुरें झाल्यावर राजानें बिदागी देण्याचें नाकारिलें. त्यांनीं शहरावर अनेक अरिष्टें आणिलीं. पुष्कळ यज्ञयाग करूनही देवांचा कोप शान्त होईना. त्यांनीं असा कौल दिला कीं प्रतिवर्षीं समुद्रांत मोठा राक्षसरूपी मत्स्य येईल त्याला एका कुमारीचा बलि देत जावा. नगरांतील सर्व कुमारी नेमल्या

दिवशीं तीरावर जमून सोडत काढीत. जिचें नांव निघेल तिला बळि देत असत. याप्रमाणें ५।६ वर्षे गेल्यावर राजकन्येची (हेसिओनीची) पाळी आली. ती फार आवडती असल्यामुळें राजा तिला बाळि द्यावयास कबूल होईना. ही वाटाघाट चालली आहे तों हर्क्यूलीस तेथें आला व ह्मणाला मी तुझी कन्या राक्षसापासून वांचवितों. त्याच्या बद्दल तूं तुझ्याजवळ असलेले उत्तम घोडे मला दे. राजानें होय ह्मटलें. परंतु कन्येला राक्षसाचा वध करून जेव्हां हर्क्यूलीसानें सोडविलें तेव्हां दिलेलें वचन राजानें मोडलें. हर्क्यूलीसानें त्रायावर स्वारी केली व बळेंकरून घोडे नेले. लाओमीदनास त्यानें जीवें मारिलें.

लाटोना अथवा (**ला**तोना) **जो**व्हाची एक भार्या. हिला **अपालो** व **डा**याना हीं दोन अपत्यें झालीं. **ना**योबी शब्द पहा.

लैकर्गस **थ्रे**सचा राजा. यानें **बा**कसाला (मदिरादेवताला) राज्यांतून हद्दपार केलें व त्याची पूजाही बंद केली. सर्व देवांचा याच्यावर कोप झाला. यानेंच आपल्या पुत्राचा वध केला. व देवांनीं कौल दिला कीं **लै**कर्गस जीवन्त आहे तों कोणींही मद्य पितां कामानये. त्याबरोबर त्यांनीं आपल्या नृपाचा वध केला.

स

सर्पिदन **जो**व्ह व **यु**रोपा यांचा पुत्र. यानें **त्रो**जनपक्षीं लढत असतां पुष्कळ पराक्रम केले. याचा वध **प**त्रोक्लशानें केला. त्याच्या आधीं **जो**व्हानें रक्ताचा पाऊस पाडून दुश्चिन्ह दाखविलें होतें.

सॅतर्न **जो**व्हाचा पिता. **जो**व्ह शब्द पहा.

सीरीस धनधान्यदेवता. ही **सॅ**तर्नाची मुलगी. हिला **प्रा**सर्पैनी नांवाची मुलगी होती. तिच्याशीं **प्लू**तोनें लग्न लाविलें होतें.

स्तिजिअनजल **स्तिक्ष** नदीचें पाणी.

स्तिक्ष नरक प्रांता वाटोळी वाहणारी नदी. हिच्यावरून वाहिलेली शपथ सर्व देव अत्यन्त पवित्र मानीत.

स्पर्किअस **थे**सली प्रांतांतील नदी. **अ**किलीस रणांतून सुरक्षित परत येईल तर डोक्यावर मुद्दाम राखलेले केश तो तुला अर्पण करील असा नवस या नदीला **अ**किलीसाच्या पित्यानें केला होता.

सेन्तार यांचा आकार पुढला अर्धा मनुष्याचा व मागील अर्धा अश्वांचा. यांची वसति **थे**सली प्रांतांत होती. पुरातन काळीं **थे**सली प्रांतांतील लोक घोडे पाळून वर स्वार होऊन बाहेर निघत. अशी चाल कोठेंही आसपास नव्हती. दुरून हे स्वार घोड्यांवर चिकटलेल्या माणसांप्रमाणें दिसत. त्यावरून लोकांनीं ठरविलें कीं हे नरमुखी अश्व आहेत.

स्तेन्तर **ग्री**क वीर. याचा आवाज ५० मनुष्यांच्या आवाजाएवढा मोठा होता.

ह

हर्क्यूलीस **आ**ल्क्मीना व **जो**व्ह यांचा पुत्र. याच्या उत्पत्तीच्या वृतान्ताकरतां **आ**ल्क्मीना शब्द पहा. **चि**रन हा याचा गुरु होता. **यु**रिस्थिअस हा आधीं जन्मास आल्यामुळें हर्क्यूलीसावर त्याचें वर्चस्व चालणार असें ठरलें होतें. त्याप्रमाणें **यु**रिस्थिअसनें वाटेल ती कामगिरी त्याकडून करवून घेण्यास त्याला आमंत्रण पाठविलें. त्याच्या मनांत जावयाचें नव्हतें परंतु देवांनीं कौल देऊन सांगितलें कीं **जो**व्हाचीच तशी इच्छा असल्यामुळें त्याला इलाज़ नाहीं. १२ वर्षे ह्याच्या आज्ञेंत राहिल्यास मग त्यास स्वतंत्र होतां येईल. एवढ्यावर हर्क्यूलीसानें त्याच्या दरबारांत

जावयाचें कबूल केलें. तेथें गेल्यावर **युरिस्थिअस**नें १२ कामगिऱ्या फार कठीण अशा करावयास सांगितल्या. सिंहाची, व १०० शिरांच्या राक्षसाची शिकार; सुवर्णशृंगांचा हरिण जीवन्त धरून आणणें; रानडुकराची शिकार; **आजीआसा**चा गोठा झाडून स्वच्छ करणें; (**आजीआस** शब्द पहा.); एके ठिकाणच्या मांसभक्षक पक्ष्यांचा नाश करणें; **क्रीत** बेटांतील मस्त वृषभास सजीव धरून आणणें; तशाच एके ठिकाणच्या मांसभक्षक घोड्या धरून आणणें; **आमाझन्सां**ची जी राणी होती तिचा कमरपट्टा आणणें; **जर्यन** नामक राक्षसाचा वध करणें; एका बागेंतील अलभ्य फळ आणणें; व **प्लूतो**च्या जवळून **सर्बीरस** श्वान धरून पृथ्वीवर आणणें. या सर्व कामगिऱ्या त्यानें बजावल्या. यानें **ट्राय** लुटिलें होतें. (**लाओमीदन** शब्द पहा) यानें अनेक शौर्यांचीं कामें केल्यावर त्याला **जोव्हा**नें देवत्व प्राप्त करून दिलें. त्याचीं देवळें लोकांनीं बांधिलीं होतीं. शरीरानें बळकट, सिंहाचें कातडें पांघरलेला, बाकी नग्न, गदा हातांत घेतलेला असा याचा पुतळा करतात.

हीबी जूनो, व **जोव्ह** यांची कन्या. ही तारुण्यदेवता होय. हिचें काम स्वर्गांत देवांस **अमृत** पाजण्याचें होतें.

हेक्तर **ट्रोज**नांचा राजा **प्रायम** याचा पिता व **हेक्युबा** ही माता. **ग्रीकां**सह युद्ध चालवणाऱ्या सर्व **ट्रोजन** सरदारांत हा शौर्यगुणानें श्रेष्ठ होता. इइशननृपतीच्या कन्येशीं (**ऑन्द्रोमाकीशीं**) याचें लग्न झालें होतें. तिच्यापासून त्याला एक मुलगा झाला. त्याचें नांव **आस्तिआनक्ष** असें ठेविलें होतें. **ग्रीकां**नीं **ट्रायपुरीस** वेढा दिल्यावर त्यांच्याशीं जेवढें

ट्रोजनपक्षीं सैन्य लढत होतें त्याचें आधिपत्य **हे**क्तराकडे होतें. व त्यानें समरांगणांत पराक्रम करून तो त्या मानास पात्र होता असें जगाच्या नजरेस आणून दिलें. **ग्री**कांतील मुख्य मुख्य वीरांशीं यानें युद्ध केलें होतें. शत्रु पक्षांतील एकतीस **ग्री**कवीरांस यानें यमसदनास धाडून दिलें. **अ**किली-साची समजी झाल्यावर त्यानें **ट्रो**जनांस नगरतटाच्या आंत पिटाळून लाविलें. तरी हा बाहेरच राहिला. वृद्ध पितरांनीं नगरांत परत येण्यास त्यास पुष्कळ विनविलें. परंतु त्यानें ऐकिलें नाहीं. **अ**किलीस दृष्टीस पडतांच तो भयग्रस्त होऊन पळूं लागला. त्या वेळेस **मि**नर्वेनें कपटप्रयोग केला व त्याचा वध **अ**किलीसानें सुलभ रीतीनें केला. त्याचें शव रथास बांधून जमीनीवरून फरफटवीत **अ**किलीसानें छावणींत नेलें व **प**ट्रोक्लुशाच्या थड्या भोंवती फिरविलें (कारण **प**ट्रोक्लुशाचा वध **हे**क्तरानें केला होता. त्याबद्दल **अ**किलीसानें सूड उग-विण्या करतां अशी विटंबना त्याच्या शवाची केली) नंतर मातेच्या विनंतीवरून **अ**किलीसानें **प्रा**यमाच्या विनंतीस मान देऊन बरीच खण्डणी घेऊन **हे**क्तराचें शव त्याच्या स्वाधीन केलें. अन्त्यविधि करण्यास बारा दिवसांचा तहही त्यानें केला होता.

हेक्युबा — **प्रा**यमाची दुसरी भार्या व **हे**क्तराची जननी. पातिव्रत्याबद्दल हिची ख्याति आहे. परंतु ही फार दुर्दैवी होती. **पा**रिसाच्या खेपेस गर्भवती असतां हिला स्वप्न पडलें कीं तिनें प्रसूत होऊन एक मशाल जन्मास आणली. त्याचा अर्थ भविष्यकथकांनीं सांगितला कीं तुझ्या पोटीं असलेला पुत्र तुझ्या देशाचा

नाश करील. पुत्र प्रसवतांच तिनें त्याला इदा पर्वतावर टाकून दिलें. तेवढ्यानें भविष्य खोटें ठरलें नाहीं. त्रोजनयुद्धामध्यें तिचे पराक्रमी मुलगे मृत्युमुखीं पडले. त्यांच्या मरणानें विशेषेंकरून हेक्तराच्या मरणानें तिला फार शोक झाला. तो होमरनें फार सुरेख रीतीनें वर्णन केला आहे.

हेदीस — **ग्री**कांचा यम. **प्लू**तो शब्द पहा.

हेलन — **ला**सिदीमन देशांत **तिन्दा**रस ह्मणून राजा होता. त्याची पत्नी **लि**डानामें प्रख्यात होती. तिचें रूप पाहून **जो**व्ह मोहित झाला. हंसाचें रूप घेऊन त्यानें तिच्याशीं समागम केला. तिला दोन अंडीं झालीं त्यांतील एकांतून हेलन जन्मास आली. व दुसऱ्यांतून हिचे जुळे बन्धू **का**स्तर व **पो**लक्ष असे आले. हेलनसारखी सौंदर्यवान स्त्री दुसरे कोठें त्यावेळेस नव्हती. **थे**सिअसनामक नृपानें तिचें दहाव्या वर्षीच हरण केलें होतें. तिला तिच्या बन्धूंनीं परत सोडवून आणिलें. ती उपवर झाल्यावर **ग्री**स देशांतील तरुण राजपुत्र तिचें पाणिग्रहण करण्याच्या इच्छेनें पित्याकडेस जमले. त्यांतील मुख्य मुख्य ह्मटले ह्मणजे **यु**लिसीस, **आ**न्तिलोकस, **स्थे**निलस, **दा**योमीद **पा**लिझेनस, **आ**जक्ष, **मे**काअन, **यु**रिपैलस, **प**त्रोक्लश, **मे**निलास **मे**रिआनीस, **इ**दामिनिअस इ०. **तिन्दा**रस, एवढी राजपुत्रांची सेना पाहून घाबरून गेला. व एका शिवाय सर्व नाखुष होणार हें भविष्य त्याला कळून चुकलें व चिंतेंत पडला. परंतु **यु**लिसीसानें आपल्या शहाणपणानें त्याला वांचिवलें. **यु**लिसीसाची सुज्ञपणाबद्दल ख्याति आतांच होऊं लागली होती. **यु**लिसीसानें असा विचार केला कीं आपली डाळ येथें शिजणार नाहीं ह्मणून

त्यानें तिन्दारसास सांगितलें कीं तूं आपली पुतणी पेनिलोपी मला देशील तर तरुणोपाय कथन करितों. राजानें त्याची मागणी कबूल केली. त्यानें अशी युक्ति सांगितली कीं सर्व नृपांस अशी शपथ घ्यावयास सांग कीं हेलन मुळींच स्वयंवर करील. व स्वयंवरांत जो राजपुत्र ती पसंत करील त्यापासून तिचें हरण जर दुसरा कोणी करील तर बाकीच्या सर्व राजपुत्रांनीं ती ज्याची त्याला परत मिळवून देण्याकरतां युद्धास तयार झालें पाहिजे. सर्वांस ही अट मान्य झाली. हेलननें मेनिलासाला वरिलें. तीन वर्षें सुखांत त्यांचा काळ गेला; त्यांत एक कन्या झाली; तिचें नांव हार्मिओनी ठेविलें होतें. नंतर पारिस हा अपालोचे मंदिरांत यज्ञ करण्याचे निमित्तानें आला असतां मेनिलासानें त्याचें घरीं चांगलें आदरातिथ्य केलें. तेव्हां हेलनला पारिसानें भुलविलें व तीही त्याचा हात धरून त्रायला निघून आली. मेनिलासानें सर्व राजपुत्रांस त्यांनीं स्वयंवराच्या वेळेस घेतलेल्या शपथेची आठवण देऊन त्यांना युद्धास सज्ज केलें. प्रथम त्यानें तिला परत देण्याकरतां शिष्टाई केली तीं व्यर्थ गेली. ह्मणून त्रायावर सर्व ग्रीक राजांनीं स्वारी करून वेढा दिला. युद्धांत पारिस नवव्या वर्षी मारला गेल्यावर त्याच्या बन्धूशीं ह्मणजे डीइफोबसाशीं तिनें लग्न लाविलें. व त्राय पतन पावल्यावर मेनिलासाची प्राप्ति होण्याकरतां डीइफोबसाचा विश्वासघातानें वध करविला. स्पार्टीपुरीं परत गेल्यावर मेनिलासानें तिचे सर्व अपराध क्षमा करून तिचें ग्रहण केलें.

-हीया सॅतर्नाची एक भार्या.

-हीसस हा थ्रेस देशाचा राजा. प्रायमाच्या मदतीस त्रोजनयुद्धाचे वेळीं

आला होता. देवांनीं असा कौल दिला होता कीं **त्राय**च्या मैदानांत जेथपर्यंत **ऱ्हीस**साचे घोडे तृण भक्षण करून रहातील तेथपर्यंत **त्राय** शत्रूच्या हातीं लागणार नाहीं एवढ्याकरतां **दायोमीद** व **युलिसीस** यांनीं अपरात्रीं जाऊन छापा घालून याचा प्राण घेतला व ते घोडे हरण करून आणिले.

व्हल्कन अग्निदेवता. हा **ग्री**कांचा **मया**सुर होय. हा **जूनो**चा पुत्र होय. **जो**व्हानें मस्तकांतून **मिनर्वा** निर्माण केली ह्मणून **जूनो**नें नुसत्या फुलाचा वास घेऊन **व्हल्कन**ला जन्म दिला. जूनोला कांहीं अपराधावरून **जो**व्हानें तिचें शासन करण्याकरतां सुवर्णशृंखलेनें बद्ध करून ठेविलें होतें. मातेचा कळवळा येऊन **व्हल्कन** तिला सोडविण्यास गेला. ह्मणून **जो**व्हानें त्यास स्वर्गांतून खालीं ढकलून दिलें. **ले**म्नासपुरांत जाऊन पडला तेव्हां तो लंगडा झाला होता. हा फार कलाकुशल होता. यानेंच **अकिलीसास** कवच व ढाल करून दिलीं होती.

☞ या शिवाय या काव्यांत अन–प्रत्ययान्त बरेच शब्द आहेत ते लोकसमुच्चयवाचक आहेत. उदाहरणार्थ **थ्रे**शिअन **पाफ्ला**गोनिअन, **त्रो**जन, **अथी**निअन, **दार्दे**निअन इ० यांचा अर्थ अनुक्रमानें **थ्रे**स, **पाफ्ला**गोनिआ, **त्रो**जा (**त्राय**) अथेन्स, **दार्दे**निआ इ० नगरांतील नागरिक लाक असा आहे.

सूचना.

हा कोश प्रथम वाचून मग काव्य वाचावयास प्रारंभ केल्यास कथानक समजण्यास पुष्कळ मदत होईल.

॥ श्रीसरस्वती प्रसन्न ॥



इलियड.

सर्ग १ ला.

सारांशः–**ग्रीक** व **ट्रोजन** यांचें युद्ध चालू असतां **ग्रीक** सरदारांनीं आसमन्तात् भागीं लुटालूट चालविली होती. तींत **क्रैसीसकन्या** **आस्तिनोमी** व **ब्रैसीसकन्या** **हिप्पोदेमिइआ** या दोघींस त्यांच्या रूपाबद्दल धरून आणून पहिलीस **अगमेम्नना**स अर्पण करून दुसरीस **अकिलीसा**स देण्यांत आलें होतें. तें ऐकतांच पहिलीचा बाप **क्रैसीस**–**फीबस अपालो**चा (रवीचा) वृद्ध पुजारी–खण्डणी घेऊन आपल्या कन्येस बन्धमुक्त करण्यास **ग्रीकां**चे छावणींत येतो. येथें युद्धाचे दहाव्या वर्षी काव्याचे कथानकास आरंभ होतो. **अगमेम्नन** वृद्धाचा धिक्कार करितो. तो सूड घेण्याबद्दल आपल्या उपास्य देवतेची प्रार्थना करतो. **फीबस ग्रीकां**स सांथीच्या रोगानें पीडा देतो. **अकिलीस** वीरसभा भरवितो. व भविष्यवादी जो

कल्कास त्याच्या मुखानें सांथीचें खरें कारण वदवितो. पूज्य पुरोहिताचा अपमान हें कारण आहे असें तो स्पष्ट मत देतो. नाइलाज ह्मणून राजाला क्रैसीसकन्येला बंधमुक्त करावें लागतें. त्यावरून अकिलीस व अगमेम्नन यांचें वाग्युद्ध होतें. नेस्तर मध्यें पडून तें मिटवितो. परंतु अगमेम्ननाकडे सकळ सेनेचें आधिपत्य असल्यामुळें तो ब्रैसीसकन्येस धरून आणवितो. अकिलीस असंतुष्ट होत्साता आपली सेना ग्रीक सैन्यांतून काढून घेतो. व आपल्या मातेजवळ, थेटिसजवळ, हें गाऱ्हाणें गातो. ती जोव्हाकडे जाऊन प्रार्थना करिते कीं, ट्रोजनांस यश देऊन माझे पुत्राला किती अन्यायानें वागविण्यांत आलें हें ग्रीकांस चांगलेंच कळूं दे. जोव्ह तिची विनंति मान्य करितो. त्याचा जूनोला फार क्रोध येतो. व दोघांचें भांडण सुरू होतें. तें व्हल्कन मध्यें पडेतों चालतें.

या सर्गाचें कालमान बेवीस दिवसांचें आहे. नऊ दिवस सांथीचा कहर चालतो. एक दिवस सभेमध्यें झालेल्या भांडणांत जातो. बारा दिवस जोव्ह अन्यत्र पाहुणचार सेवन करण्यांत घालवितो. त्यानंतर थेटिस जोव्हाची प्रार्थना करते.

स्थलमानः–प्रथम ग्रीकांची छावणी, नंतर क्रीसा, व शेवटीं आलिम्पसशिखर.

तो तीव्र रोष अकिलीस सुयोधनाचा ।
गा शारदे ! अतुल पेलिअसोद्भवाचा ॥
ग्रीकांस उत्प्लव अनर्थपरंपरांचा ।
उत्कर्ष ऊर्जित अमोघ पराक्रमाचा ॥ १ ॥
देहांतुनी हरुनि जीव जयें अकालीं ।
हेदीसकंदरिं दिले ढकलून खालीं ॥
खाती क्षुधार्त खग कुक्कुर त्या शवांस ।
× स्वेच्छानुरूप करि जोव्ह जगीं विलास ॥ २ ॥

× ईश्वरेच्छा बलीयसी, अथवा आलें देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना. या लोकोक्त्या वरील अर्थाच्याच आहेत.

तें काय कारण घडे कथिं भांडणासीं ।
ते कोण भूप करिती अशुभां पणांसीं ॥
सांगें रणात कवणें अमरें तयांस ।
वैरप्रवृद्धि करुनी दिधले प्रयास ॥ ३ ॥

वैषम्य भाव धरिला अगमेम्ननानें ।
संतप्त होत अकिलीस अनादरानें ॥
उच्छेदकारक अमर्षण जोव्हपुत्र ।
सैन्यांत चालवुन सांथ करीत सत्र ॥ ४ ॥

धिक्कारुनी नृपति पूज्य पुरोहितातें ।
साधील का कधिं तरी अपुल्या हितातें ? ॥
क्रैसीस घेउन अमूल्य धना निघाला ।
तो बंधमुक्त करण्या दुहितेस आला ॥ ५ ॥

यष्टीवरी दिनकरप्रतिमा विराजे ।
ती दावुनी विनवितो मग सर्व राजे ॥
त्यांतून एत्रिअसवंशसमुद्भवास ।
बन्धुद्वयास विनवी जुळुनी करांस ॥ ६ ॥

" राजन् जयोस्तु " " विजयोस्तु " विभूकृपेनें ।
हें त्रायपत्तन रिघो शरण त्वरेनें ॥
देशास जाल कुशली अपुल्या गृहास ।
कान्ता मुलें सुखवतील पुन्हा तुह्मांस ॥ ७ ॥

देऊन आधिं तनया मम सुस्वभावा ।
द्या वृद्ध दैवहत या पितया विसावा ॥
ही स्थूल रास गुरु भारवती धनाची ।
भंगील काय दृढ गांठ न बन्धनाची ? ॥ ८ ॥
नाहीं दया! सुजनभीति! कुलाभिमान ! ।
द्या सर्वसाक्षि रविला तर अल्प मान" ॥
ते ग्रीक अन्य ह्मणती *गुरु मान्य आहे ।
द्या सुंदरी परत; घेउन संपदा हे ॥ ९ ॥
उन्मत्त एत्रिअसपुत्र कठोर राजा ।
धिक्कारुनी गुरुवरास म्हणे "घरा जा! ॥
येथें क्षणैक न रहा रणभूमिमाजी ।
जातां वळूनहि बघें इकडे न आजी ॥ १० ॥
तूतें इथें वधिन तूं पडतांच दृष्टी ।
राहील यष्टिवर तीं रविमूर्ति कष्टी ॥
ह्या खंडण्या विनवण्या मजला कशाला? ।
घालीन भीक न कधीं रडण्या अशाला ॥ ११
येतां +जरा रतिसुखा मुळिं योग्य जी न ।
कोमेजल्या कलिपरी क्षणिं ती त्यजीन ॥

---

* घरच्या उपाध्यायाला गुरु म्हणण्याची देशावर वहिवाट आहे.
+वार्धक्य.

अर्गासपूर बहु दूर तिथें तिला मी।
लावीन सूत विणण्या अथ अन्य कामीं ॥ १२ ॥
होती जियेवर करीत विलास रोज।
ती सेज ती रचिल घेउनियां सरोज ॥
मत्क्रोध दीप्त न करीं अधिकोत्तरानें।
*वांचीव इष्ट तर जीव पलायनानें ॥ १३ ॥
वृद्धास कंप सुटला! ठरती न पाय!।
गेला निघून तिथुनी न चले उपाय ॥
उच्चारितां न मग अक्षर एक वाचे ॥
गांठी पदीं तट महारव अर्णवाचें ॥ १४ ॥
गावोनियां प्रथम निर्भर थोरवीला।
प्रार्थीतसे नयनसाक्षिस तो रवीला ॥
"हे रौप्यसायक! सिलापुररक्षका हे!।
क्रीसार्चिता अखिल तेनिदसेश! पाहें ॥ १५ ॥
उद्धारुनी भवन जीर्ण तुझें नव्यानें।
बांधून दारुमय ती वलभि श्रमानें ॥
आणून वन्य अज पीनकलेवरांचे।
तैसे अदम्य वृष भूषण गोकुलाचे ॥ १६ ॥
ऱ्यां पूजिलें तुज असेल बलिप्रदानें।
ग्रीकांस शासन करीं तर सायकानें ॥

---

*यःपलायते स जीवति.

अश्रान्त या ढळढळां रडतां बघोंवे ।
तेव्हां मदश्रु परिमार्जन तें घडावें " ॥ १७ ॥
हें ऐकतांच रवि तो करण्यास घाला ।
आलिम्पसोच्च शिखरावरुनी निघाला ॥
पृष्ठीं सजे धनु भयानक वांकलेलें ।
भात्यांत बाण करितीं ध्वनि कीं भुकेले ॥ १८ ॥
घेरीत रात्रिसम हा कटकास जेव्हां ।
ग्रीकां कळे न, करि कोण अपाय तेव्हां ॥
टंकारितां धनु सुटे धरणीस कांप ।
' घे घे ' ह्मणून शर सोडित वक्रचाप ॥ १९ ॥
श्वानांस आधिं चपलां मग खेंचरांस ।
उच्छेदुनी मनिं अणी वधण्या नरांस ॥
त्या पेटल्या तरि चिता किति जागजागीं ।
हा! हा! कशी दहनभूमि सदैव जागी ॥ २० ॥
जातां नऊ दिन; विचार करावयातें ।
ग्रीकां करीत अकिलीस निमंत्रणातें ॥
* जूनो द्रवे बघुन वीरविनाश घोर ।
वेळीं उपाय सुचवी नृपतीस थोर ॥ २१ ॥

---

* जूनोचा ओढा ग्रीकांकडे नेहमीं असे कारण एक तर ग्रीकांचे प्रदेशांत तिचा बहुमान होत असे व दुसरें असें कीं थेटिस व पेलिअस यांच्या विवाह प्रसंगीं मिनर्वा व व्हीनस हीं दोघेंजण सौंदर्याबद्दल जें बक्षिस लावलेलें होतें तें मिळविण्यास झटत असतां जूनो ही एक उमेदवार ह्मणून उभी राहिली. परंतु ट्रोजन राजपुत्र पारिस ज्याला परीक्षक नेमलें होतें त्यानें आपलें मत जूनोचे विरुद्ध दिलें. तेव्हांपासून ही ट्रोजनांस पाण्यांत पाहूं लागली व ग्रीकांची फार तरफदारी करूं लागली; तेवढ्याकरतांच मिनर्वा व व्हीनस यांनीं ट्रोजनांचा पक्ष उचलिला होता.

ते ग्रीक सर्व जमतां आकिलीस बोले ।
" दैवें मनोरथ पहा विलयास गेले ! ॥
सांथींत सांपडति जे रणिं नाहिं मेले ।
हें पाहिजे त्यजुनियां स्थल दूर गेलें ॥ २२ ॥

सिद्ध प्रशस्य, कुणि धर्मगुरु स्तवावा ।
दैवज्ञ वा सुमहिमा पुजुनी पहावा ॥
स्वप्नार्थविद् कथिल कां रविकोप झाला ।
स्वप्नांत जो व्ह सुचवी निज आशयाला ॥ २३ ॥

झाला असेल जर का व्रतभंग कांहीं ।
ते होम चालु करुं गोशतमेध पाहीं ॥
संतुष्ट देव बलिदानसमर्पणानें ।
वारील संकट असें धरिलें मनानें " ॥ २४ ॥

तों वृद्ध विश्रुत शुचिव्रत सुस्वभावी ।
जो जाणतो विबुध * भूतभवच्चभावी ॥
जो सांगतो शकुन सत्वर अप्रमादें ।
ज्या सिद्धिलाभ घडला रविच्या प्रसादें ॥ २५ ॥

दावोनियां पथ सुरक्षित सागरांत ।
ग्रीकां जयें इलियमा अणिलें सुखांत ॥

---

* या त्रिकालवाचक शब्दसमुच्चयावरून काळाचें अनंतत्व होमरचे परिचयांतलें असावें असें वाटतें.

कॅल्कास भक्त रविचा करि तो वचातें ।
" मान्या तुझी विनति ही आकिलीस मातें ॥ २६ ॥
सांगेन रुष्ट रवि कां, पुससी म्हणून ।
ग्रीकांत एक नृप जाइल तो चिढून ॥
ज्याच्या समस्त जन वार्णिति वैभवातें ।
तेवीं असंख्यजन पाळिति शासनातें ॥ २७ ॥
आणोनियां नृपतिचें मनिं आज नातें ।
द्यावें मला अभय, साक्षिस घे जनांतें ॥
बोलूं नये अजि शहाणपणा खरा हा ।
वाक् सत्य निष्ठुर पडे परि बोलण्या हा ! ॥ २८ ॥
सुज्ञ प्रजा शिकवितां मनिं भूप कोपे ।
रोष क्षणैक शमतो न परंतु सोंपे ॥
घेईल सूड न कळे कुठुनी कसा तो ।
*भूपा सदा सुलभ दुर्बलघात जातो " ॥ २९ ॥
तों त्यास पेलिअस पुत्र वदे क्षणांत ।
"निःशंक बोल! भय कां धरिशी मनांत ? ॥
जों हा सजीव अकिलीस असे जगांत ।
तों वी न माय सुत जो तुज लावि हात ! ॥ ३० ॥

---

*याच्या उक्तीचा व खालीं दिलेल्या मारीच राक्षसानें रावणास उद्देशून केलेल्या उक्तीचा भावार्थ एकच आहे.

"सुलभाः पुरुषा राजन् सततं प्रियवादिनः । अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता भोक्ता च दुर्लभः" ॥ वाल्मीकि रामायण.

सनाधिपास अपुल्या अगमेम्ननाही ।
कालत्रयांत बघ मी कधिं भीत नाहीं ॥
ज्या पूजुनी कथिशि गोष्ट सदा हिताची ।
घेतों पहा शपथ त्या तव दैवताची " ॥ ३१ ॥

आश्वासितां वदत वृद्ध विशुद्ध वाचा ।
" विघ्नास हेतु नच तो व्रतभंग साचा ॥
तो यज्ञलोप न निमित्त; पुरोहिताला ।
धिक्कारितां नृपवरें अजि घात झाला ! ॥ ३२ ॥

स्वीकारिलें न धन मान दिला न मान्या ।
भूपें पित्या दिलि न मुक्त करून कन्या ॥
जों आंवरून रवि कोप न हा धरील ।
तों सांथ घात अधिकाधिक ही करील ॥ ३३ ॥

या पेटल्या बहु चिता विझतील कैशा !
तो रोष तीव्र शमण्या दिसते न आशा ॥
वामा विशुभ्रनयना परतून गांवीं ।
घेतां न मूल्यलवही पितयास द्यावी ॥ ३४ ॥

देवा तसेच कुपिता मग शान्तवाया ।
जातील ते नवस यज्ञ न सर्व वांया " ॥
बोलून साधु बसला परि तद्बचाला ।
ऐकून कोप चढला अगमेम्ननाला ॥ ३५ ॥

भ्रू वक्र तो करित होऊन तप्त अंगीं ।
आरक्त नेत्र वमती जणुं अग्निलागीं ॥
बोले " अहा शुभ तुझे नसती विचार ।
उच्चारिसी म्हणुन शब्द अभद्र फार ॥ ३६ ॥

आचारही तव अमंगल सर्व पाहीं ।
देतोस दूषण उगा मजला नृपा ही ॥
ग्रीकां भविष्य अजि कण्ठरवें कथून ।
माझी प्रजा चिढविसी मज ये कळून ॥ ३७ ॥

केल्या न मुक्त, धन घेउनियां कुमारी ।
तापा चढेल रवि कां वद चापधारी ? ॥
मी एवढा धरिन काय उगाच हेका ? ।
माझा तुह्मां उघड हेतु कळूं नये का ? ॥ ३८ ।

क्लातेम्निस्त्रा धर्मपत्नी बिचारी ।
वाटे हीशीं तोलितां निंद्य भारी ॥
वर्णूं कैशी तन्विची आकृती ती ।
रूपा गोडी आणिते सभ्य रीती ॥ ३९ ॥

स्वच्छन्दवर्तन परी बरवें दिसेना ।
नाहीं मला प्रिय दुजें जशि भव्य सेना ॥
तो स्वार्थ मी जनहितार्थ परी त्यजीन ।
द्या सुन्दरी परत गेलि घरास जी न ॥ ४० ॥

माझा विभाग मज अंतरतां अशानें ।
मी एकलाच फिरुं काय रित्या करानें ? ॥
द्या अन्यलब्ध मज भाग अतां अणून ।
येईल भक्ति नृपतीस खरी कळून" ॥ ४१ ॥

तैं तूर्णपाद आकिलीस वदे तयाशीं ।
तूं थोर एत्रिअसपुत्र तरी अघाशी ! ॥
ग्रीकांस जी मिळतसे लढता श्रमानें ।
ती लूट द्या मजसि हें ह्मणतोस मानें ॥ ४२ ॥

शूरास वाटुन दिली रणिं एकदांची ।
घ्यावें तिशीं परत रीति न ही नृपाची ॥
ती काय सांपडत खाण अह्मां लुटीची ।
आह्मीं करूं सकल कीं तुज भेट तीची ? ॥ ४३ ॥

तो जोव्ह आणिल मनीं तरि सर्व वीर ।
हें त्रायपूर लुटतील तयां न धीर ॥
देऊं अमूल्य धन तें तुज चौपटीनें ।
दे सुंदरीस परि सोडुन मान्यतेनें" ॥ ४४ ॥

सक्रोध उत्तर दिलें अगमेम्ननानें ।
"होसी उदार अकिलीस खरा मनानें ! ॥
दंभें असा ठकविण्या बघतोस मातें ।
तूतें वळेन सहसा न शठोत्तमातें ॥ ४५ ॥

तूं मात्र जाशि घरिं घेउन एक नार ।
मी काय पाहुन, तुझें वच ऐकणार ? ।।
माझ्या मनास उतरेल सुरेख जी ती ।
आणून तुल्यगुण द्या मजला दुजी ती ॥ ४६ ॥

आजक्ष आणि युलिसीस अशा द्वयाचा ।
तो भाग मी हरिन वा तव संशयाचा ॥
भूदण्ड आज तुमच्यांतुन ज्या पडेल ।
तो व्यर्थ सर्व दिन नंतर आरडेल ॥ ४७ ॥

ग्रीकांस मान्य अट हीच हवी कराया ।
तें मागुनी ठरवुं, आधिं कसे चलाया ॥
ऱ्या दक्ष नाविक सवें न जयां उणीव ।
न्यावी अनन्त जलधींत जपून नाव ॥ ४८ ॥

साधून दान बळिंचें अज एकदांचें ।
शुभ्राननेस घरिं लावुन द्या पित्याचे ॥
न्यावें इदामिनिअसास सवें, न येतां ।
आजक्ष येइल तसा युलिसीस घेतां ॥ ४९ ॥

तूं जा स्वतांच अकिलीस ! व यज्ञयागें ।
तत्काल रोगशमनार्थ वरास मागें " ॥
तैं कोपुनी वदत त्या अकिलीस ऐसें ।
" हे स्वार्थसाधक मदोद्धत भूप ! खासें ! ॥ ५० ॥

तो ग्रीक यांत कुठला तव शब्द आज ।
मानोनियां रणिं लढेल धरून काज ? ॥
त्रायस्थलोक मम शत्रु मुळीं नव्हेत ।
त्यांनीं गुरें न हरिलीं लुटिलें न शेत ॥ ९१ ॥

माझें थिया नगर भूषित भूधरांनीं ।
जें शोभलें सकल शूर अशा नरांनीं ॥
तें मी समुद्रवलयांकित एकलाची ।
शासीतसें मज न भीति तिथें कुणाची ९२ ॥

हें त्रायपूर अजि येउन वेढण्याला ।
बन्धुद्वयाविण तुह्मां, नच हेतु झाला ॥
तूं स्वार्थलाभपर मातविसी रणातें ॥
तें नीच निष्त्रप नृपा कळतें अह्मांतें ॥ ९३ ॥

नादास लागुन तुझ्या लढतों रणांत ।
त्याचें न कांहिं तुज वाटत रे मनांत ॥
जो भाग मी मिळविला स्वपराक्रमानें ।
ग्रीकां पसंत पडतां मज देति मानें ॥ ९४ ॥

तो ध्यावयास हरुनी अजि पाहतोस ।
धिक् ! धिक् ! नृपा तव जिणें नच लाजतोस ? ॥
माझे सदैव शिणती कर शस्त्रभारें ।
आणी तुझे उगिच वित्त हरून सारें ॥ ९५ ॥

मी चाललों अजि निघून थियापुराला ।
तूं स्वस्थ येथ बस दाखव विक्रमाला ॥
तीं लूट, ते विजय, तो बहुमान लोकीं ।
माझ्याविणें तुजसिं साध्य तरी विलोकीं " ॥ ९६ ॥

बोले तया नृवर " जा ! अधिं जा निघोन ।
तूं टाकितां मजसिं टाकिल जोव्ह तो न ॥
म्यां पाहिले नृपति, रक्षक जोव्ह ज्यांस ।
त्वत्तुल्य निंद्य परि मी न गणीं कुणास ॥ ९७ ॥

आहेस फार कलहप्रिय, त्या जनांचे ।
युद्धांत हाल, तुज कारण उत्सवाचें ॥
झाला असेल तुज गर्व अजी बलाचा ।
तेव्हांच ईश परिहार करील त्याचा ॥ ९८ ॥

राजा खरेंच घरचा असशील थोर ।
तो डौल सांग निज मिर्मिदनां समोरं ॥
माझ्या पुढें न गणना तव विक्रमाची ।
आहेस सुज्ञ तर वाट धरीं घराची ॥ ९९ ॥

म्यां घेतली सुदतिची चव ती जरी न ।
आज्ञा करी रवि तरी तिज पोंचवीन ॥
माझे सखे अणुन नाव बरी लहान ।
जातील संगतिस तूवर भार हा न ॥ ६० ॥

ये चीढ तूं करिशि बाष्कळ उक्ति तिची ।
ब्रैसीसजा हरिन मी तव आवडीची ॥
तेव्हां बळें अधिक कोण तुला कळेल ।
स्पर्धा कुणी न मजसी करण्या धजेल " ॥ ६१ ॥
दुर्वाक्य हें परिसतां अकिलीस फार ।
उद्विग्न होउन मनांत करी विचार ॥
त्यातें उपाय सुचले परि दोन होते ।
झालें द्विधा मन विशंकि ह्मणून हो तें ॥ ६२ ॥
" ग्रीकोद्धता वधुन घेउन खड्ग हातीं ।
जा मोड " कोप कथि " भूपतिची सभा ती " ॥
" क्रोधास आंवर अशेष " विवेक सांगे ।
* " क्रोधें जगीं सतत पाठिस दैन्य लागे " ॥ ६३ ॥
ऐसा विचार करतां असिला धराया ।
सारी करास सहसा अकिलीस राया ॥
स्वर्गांतुनी अवतरोन तिथें मिनर्वा ।
त्या दृश्य होत इतरांस तशी न सर्वां ॥ ६४ ॥
जूनो स्वतां तिजसिं योजित येथ याया ।
दोघांवरी करि सदैव समान माया ॥
मागें उभी सुखद हस्त कचांस लावी ।
तो पाहतां वळुन सन्निध होय देवी ॥ ६५ ॥

---

* क्रोधो मूलमनर्थानां क्रोधः संसारबंधनम् । धर्मक्षयकरः क्रोधस्तस्मात्क्रोधं विवर्जयेत् ॥

बोले तिला " कथय जोव्हसुते कशाला ।
केलेंस आगमन? आज सुयोग आला ॥
हें घोर कर्म बघ एत्रिअसोद्भवाचें ।
येईल या मरण आज मदोद्धताचें " ॥ ६६ ॥

बोले विलोलनयना मग ती तयाला ।
" रे शान्त हो करिशि साहस हें कशाला? ॥
जूनो तुम्हांस तर रेखितसे समान ।
धाडी मला म्हणुन दे वचनास मान ॥ ६७ ॥

सोडून वाक्शर यथोचित त्यास वेधीं ।
म्यानांत ठेव परि ती तलवार आधीं ॥
लागे मला कठिण काल असा दिसाया ।
देईल तो त्रिगुण वित्त पडून पायां " ॥ ६८ ॥

देई तियेस मग उत्तर दत्तचक्षू ।
" हे देवि! कोंवि तुमच्या वचना न लक्षूं? ॥
आज्ञा प्रमाण म्हणुनी शिरीं जो धरील ।
त्याचें सदैव हित देव न कां करील? " ॥ ६९ ॥

बोलून हें धरुन मूठ करीं रुपेरी ।
म्यानांत तो असि तसाच फिरून सारी ॥
देवी त्वरेंत तिथुनी मग जी निघाली ।
आलिम्पसावरतिं देवसभेस गेली ॥ ७० ॥

तों बोलता नृपतिला अकिलीस झाला ।
त्याचा समूल अजि कोप नसे विझाला ॥
" श्वानें दिलें मुख तुला जणुं भुंकण्याला ।
काळीज तें जणुं मृगें पळतां भिण्याला ॥ ७१ ॥

ग्रीकांस घेउन, दबा धरिला तुवा न ।
केलेंस मद्यप ! रणा कधिं सांग वा न ॥
अस्मादिकांसचि असें जगिं कृत्य ठावें ।
टाळून मृत्युसम तें दुरि तूं रहावें ॥ ७२ ॥

किंवा तुवां मदत एकियनांस घ्यावें ।
बोलेल जो तुज विरुद्ध तया लुटावें ॥
हे लोकभक्षक नृपा! जन नेभळे हे ।
कां सोशिती कृति तुझी मजला कळे हें ॥ ७३ ॥

त्यांच्यांत आज असतें जर वीर्य कांहीं ।
होतें तुझें वचन शेवटचें तथा ही ! ॥
तें राहुंदे; बघ करीं मम राज दण्ड ।
हा पालवेल न फुलेल न; हा अखण्ड ॥ ७४ ॥

हा शुष्क नीरस तसाच कठीण साचा ।
होईल वृद्धिकर सेक न या जलाचा ॥
ह्या छेदिलें परशुनें वनिं एक वार ।
कीं त्वां सभेंत करुनी मज वाक्प्रहार ॥ ७५ ॥

याची न साल उरली न तशींच पानें ।
हा नष्टमूल दृढसंधि बने कशानें ? ॥
जे न्याय जोव्हकृत देति जनां समस्त ।
त्यांच्या करीं सतत जो सजतो प्रशस्त ॥ ७६ ॥

त्याची पहा शपथ घोर अतां करून ।
मी सांगतों सकल ठेव मनीं जपून ॥
ग्रीकांवरी बिकट संकट ओढवेल ।
निर्वाणिचा समय त्यां मग तो दिसेल ॥ ७७ ॥

मातें समस्त जन मारिल हांक जेव्हां ।
तूं बैसशील दुरि दुर्बल दीन तेव्हां ॥
संहारितां सहज हेक्तर तो जनांतें ।
आक्रान्त होइल तदा स्मर मद्वचातें ॥ ७८ ॥

टोंचील तें मन तुझें तुझिया जिवाला ।
ग्रीकोत्तमास अवमानियलें कशाला ! ” ॥
बोलून हें अपटुनी भुवि राजदण्ड ।
स्थानीं बसे नृपति दावुन कोप चण्ड ॥ ७९ ॥

तैं क्रोध येत परि एत्रिअसोद्भवाला ।
लागे उठून वदण्या मग नेस्तराला ॥
वाणी रसाळ मधुरा सरला यदीय ।
तो गोड तीहुन नसे मधु माधवीय ॥ ८० ॥

जो बोलतां विसरुनी निज देहभान ।
होती समस्त जन ज्या वश थोर सान ॥
पाहून दोन तिसऱ्या उरला पिढीला ।
ज्या धन्य सर्व ह्मणती जन भूपतीला ॥ ८१ ॥

तो बोलतो उठुन पैलसिंचा मराळ ।
राहे तटस्थ जन मार्मिक सर्वकाळ ॥
" ग्रीकांवरी उलटलें आजि काय दैव ।
कीं सुज्ञ वीर करिती कलहा सदैव ॥ ८२ ॥

त्या प्रायमास अहितास, दुजांस आज ।
कां देतसां उगिच थोर सुखास काज ? ॥
अंगीं नवें दिसत खेळत रक्त भारी ।
तो आंवरा ह्मणुन कोप अपथ्यकारी ॥ ८३ ॥

ते कृष्णकेश अजि सेविति शुभ्रतेला ।
खोटा तुह्मांस उपदेश कधीं न केला ॥
वीरावली मजसिं ठाउक सर्व होती ।
नेत्रें फिरून बघण्या न मिळेल हो ती ॥ ८४ ॥

कैसा उदार पिरिथौस पुन्हां पहाल ।
द्रीआस तो अतुलविक्रम लोकपाल ॥
तो पालिफेमस वरी नवरी सुकीर्ति ।
तो कोठ थेसिअस थोर सुरम्य मूर्ति ॥ ८५ ॥

त्या श्रेष्ठ एक्सादिअसा सम कोठ अन्य ।
सीनीअसासम तसा न दुजा वदान्य ॥
अभ्यस्त शस्त्र विषयांत असे जगांत ।
झाले बलिष्ठ दुसरे नच पार्थिवांत ॥ ८६ ॥

सेन्तार भीषण बली गिरिगव्हरांत ।
ज्यांनीं वधून धरिली न दया मनांत ॥
ज्यांशीं लढून कुणि मर्त्य जयी न झाले ।
ते वीर निर्भय उदार कुठें निमाले ! ॥ ८७ ॥

त्यांनीं निमंत्रण दिलें मजला दुरून ।
मी पैलसांत बसलों न मनीं भिऊन ॥
त्यांच्यांत मीं प्रथमचे दिन घालवीले ॥
कित्येक ते तुमुल संगर मातवीले ॥ ८८ ॥

या नेस्तरें वळविलें असल्या नृपांही ।
मी बोलतां करि कुणी न विरुद्ध कांहीं ॥
होता असा जर मला तरुणास मान ।
वृद्धास द्याल तर तो तुह्मि आज कां न ? ॥ ८९ ॥

तूझें प्रसिद्ध अगमेम्नन सत्व फार ।
तेव्हां अयोग्य तुजला प्रमदापहार ॥
ग्रीकां रुचे ह्मणुन अर्पण जी करीती ।
ती तूं हरावित अशी नच सभ्य रीती ॥ ९० ॥

ही चिंत्य गोष्ट आकिलीस तुझ्या मनाशीं ।
कां मांडतोस कलहा अगमेम्ननाशीं ? ॥
जोव्हें दिलें विभव आजवरी जयांस ।
हा श्रेष्ठ होय नरपाल तयांत खास ॥ ९१ ॥

ही जोव्हकर्तृक दशा जगिं उच्च नीच ।
मात्सर्य्यभाव धरणें मग हें उगीच ॥
ठावें असे प्रसवली तुज देवता हें ।
गाती समस्त तव बाहुबलास पाहें ॥ ९२ ॥

सत्ता परी अधिक त्या अगमेम्ननाची ।
त्याची प्रजा विपुल; सांग तशी कुणाची ? ॥
हा क्रोध आधिं अगमेम्नन तूं त्यजावा ।
मीं याचितां फुकट शब्द कधीं न जावा ॥ ९३ ॥

क्रोधें रुसून बसतां अकिलीस भूप ।
घालीन नीट समजूत अशी हुरूप ॥
आधार जो रणिं अरिष्ट निवारण्याला ।
ग्रीकावतंस अकिलीस हवा अह्माला " ॥ ९४ ॥

तेव्हां करीत अगमेम्नन उत्तरातें ।
" केलेंत तात ! तुह्मि सत्य अशा वचातें ॥
न्याया धरून वदलां बहु तें तयाला ।
होईल मान्य न कधीं परि उद्धताला ! ॥ ९५ ॥

ती क्षुद्रता अधिक कोठ असे मनाची ? ।
इच्छा दिसे अशुभ फार अशी तयाची ॥
कीं राजलोक अजि त्या पुढतीं लवावा ।
त्याच्यावरी नियम निष्ठुर चालवावा ॥ ९६ ॥

ती कोण चालविल ? शौर्य अनल्प अंगीं ।
ईशें दिलें न करण्यास दुरुक्तिलागीं " ॥
" केलें यथोचित वदे " अकिलीस रागें ।
" धिक्कारितील अथवा जन खास मागें ॥ ९७ ॥

कीं भ्याड हा ! निरभिमान ! उगाच वांचे ।
आज्ञा धरीत शिरिं दास, मनीं न जांचे ! ॥
आज्ञापिजे जन दुजे ! परि मी निराळा ।
हा कोण चालविल नित्य अनिष्ट चाळा ? ॥ ९८ ॥

ध्यानांत ठेव, रणिं पाहुन शौर्य ज्यांनीं ।
जी पारितोषिक ह्मणून दिली अणोनी ॥
ती ग्रीक तेच मजपासुन आज घेती ! ।
ब्रैसीसजा मज नको तुजलाच घे ती ! ॥ ९९ ॥

मी युद्ध नाहिं करणार हिच्यावरून ।
झोंबे असीस कर, घेइन आंवरून ॥
नौकांत वस्तु भरल्या दुसऱ्या अलोट ।
कामा नयेत, जर लावीशि त्यांस बोट ! ॥ १०० ॥

पाहूं नको कथितसें, भलती प्रचीत ।
हा शूल माखिन तुझ्या रुधिरें खचीत !" ॥
वाग्युद्ध येथ सरलें, उठली सभा ती ।
दोघे मनांत अपुल्या नृप दांत खाती ॥ १०१ ॥

पत्रोक्तशासह तदा आकिलीस गेला ।
नौसाधनीं पटगृहात बसावयाला ॥
आणीत एत्रिअसपुत्र सुरम्य होडी ।
तीतें सुरेख सजवून जलांत सोडी ॥ १०२ ॥

साधून दान बळिंचें अपुल्या करानें ।
क्रैसीसजेस चढवी वरि गौरवानें ॥
तो जात सुज्ञ युलिसीस सवें सुखानें ।
नौका चले जलपथें न हले जवानें ॥ १०३ ॥

आरंभिली नृपवरें मग सैनिकांची ।
*संमार्जनादिविधिनें तनुशुद्धि साची ॥
तीर्थांत त्या जलधिच्या अवगाहनानें ।
होती समस्त जन पावन अर्घ्यदानें ॥ १०४ ॥

गोमेध तेविं अजमेध करी नृपाल ।
तेणें समुद्रतट संकुल सर्वकाल ॥

---

* पूज्य पुरोहिताचे कन्येचा अपहार केल्याचे पातकाचा डाग राजाचे मार्फत सर्व सैन्यास लागला म्हणून सर्व सैन्याची शुद्धि होणें राजास इष्ट वाटलें.

ती मण्डलाकृति उठे वर धूम्रराजी ।
आमोद तीव्र पसरे सुर होत राजी ॥ १०५ ॥

सोडी न एत्रिअसपुत्र परंतु नाद ।
त्यातें न चैन पडतें, धरिला विषाद ॥
तो तालथीबिअस आणि युरीबटीस ।
सेवेस सज्ज परिचारक संगतीस ॥ १०६ ॥
“ जा जा ” वदे “त्वरित पेलिअसोद्भवाची ।
ब्रैसीसजा करिं धरून अणा अतांची ॥
शोभा घडेल अडवील जरी तुम्हांशीं ।
स्वारी स्वतां करिल जाउन कार्य खाशी ” ॥ १०७ ॥

त्यां धाडिलें भरुन धाक, परी न धीर ।
होई तया, क्रमिति मंद समुद्रतीर ॥
ते पावले कटक मिर्मिदनाधिपाचें ।
आम्लान आनन दिसे बघतां नृपाचें ॥ १०८ ॥
दोघे पुढें सरकती किति भीत भीत ।
राखून अंतर उभे मग राहुटींत ॥
घोटाळती न उमटे मुखिं शब्द कांहीं ।
तन्नेत्र निश्चल निरोप कथीत पाहीं ॥ १०९ ॥

तें जाणुनी, नृपति बोलतसे तयांला ।
“या दूत हो, नमन मी करितों तुह्मांला ॥

हा दोष नाहिं तुमचा, परि भूपतीचा ।
धाडीत जो धरुन लोभ विलासिनीचा ॥ ११० ॥
पत्रोक्लशा उठ सख्या सुदतीस आण ।
दे यांस हे जपुन नेतिल तीस जाण ॥
हा ! धिक् ! असा मम तयें उपमर्द केला ।
भोगील कीं कटु फलें रणिं नाडलेला ॥ १११ ॥
सांगा नृपा अकरुणा, मनुजां दुजां कीं ।
तैसेंच सर्व अमरास सुरांस नाकीं ॥
ग्रीकांवरी कठिण येइल एक काल ।
त्यांचे तदा अहह ! होतिल हाल हाल ! ! ॥ ११२ ॥
माझें द्रवेल मन निष्ठुर अल्पही न ।
हें आज जाणत न भूपति बुद्धिहीन ॥
त्या मागचा न पुढचा न असे विचार ।
ग्रीकांकडून करवी भलतेच चार " ॥ ११३ ॥
पत्रोक्लशें दिधलि आणुन ती हतांत ।
" न्यावी " वदे " सुतनु मार्गिं जपून तात " ! ॥
निश्वास एक पद टाकित एक तीही ।
*जाई परी अडखळून वळून पाही ॥ ११४ ॥

---

* राजा-गम्यतां पुनर्दर्शनाय ।
उर्वशी-लताविटपे एकावली वैजयन्तिका मे लग्ना. चित्रलेखे मोचय तावत्.
कालिदासकृत विक्रमोर्वशीय नाटक.

उद्विग्न चित्त उठला अकिलीस धीर ।
क्षीराब्धिचें त्वरित गांठित जीर्ण तीर ॥
तो एकला निरखि नील गभीर नीर ।
मातेस बाहत उभारुनी हस्त वीर ॥ ११९ ॥
× " अल्पायुला जननि ! जन्म दिला कशाला ।
माझा तशांत अपमान बहूत झाला ॥

पुन्हा भेट होईलच या शब्दांनीं जाण्यास उर्वशीला राजाची परवानगी असतां " माझी एकसरी वैजयन्तिका मोत्यांची माळ लतेच्या शाखेंत अडकून राहिली आहे ती सोडीव ये आधीं " अशी विनंति चित्ररेखेला उर्वशीनें करून राजावर जडलेल्या प्रेमामुळें त्यास डोळे भरून पाहून घेत आहे व त्या प्रेमाचें आविष्करण करीत आहे. या विक्रमोर्वशीय नाटकांतील मार्मिक प्रसंगाची आठवण येथें झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

हाच प्रसंग कालिदासानें शाकुन्तलमध्यें आणिला आहे. मात्र उर्वशी पडली लक्ष्मीवन्त रंभा तिला मोत्यांची माळ अडकविण्यास मिळाली ती तापसकन्येला शकुन्तलेला कोठली ! तिचें वल्कलच कोरांटीसारख्या वन्य झुडुपांत अडकविण्यास उपयोगी पडलें.

एवढें सांगितल्यावर इतकें जास्त लिहिणें भाग आहे कीं हे दोन चरण मूळ होमरचे नसून त्याचे भाषांतरकार पोपमहाराज यांचे आहेत. ते आंत घेतल्याशिवाय मला पुढें पाउल टाकवेना.

× तुझा मुलगा दीर्घायु व्हावा अशी इच्छा असेल तर तो घरीं बसून आपला जन्म प्रसिद्धीस आल्याशिवाय घालवील, पण तोच जर अल्पायु चालत असेल तर ट्रायचे समरभूमीवर तो मोठी कीर्ति संपादन करील असे वैकल्पिक वर अकिलीसाच्या जननीस प्राप्त झाले होते. तिनें अर्थात शेवटला वर पतकरला होता.

केव्हां न तें विमल मद्यश कीं मळावें ।
जोव्हें न काय अवधान असें धरावें ॥ ११६ ॥

या मत्त एत्रिअसजें अवमानियेलें ।
मत्पारितोषिक उगीच हरून नेलें " ॥
ऐसें सशोक वदुनी रडला जरासा ।
कोणी पुसेल बघतां नृप लाजरासा ! ॥ ११७ ॥

होती तदीय जननी तळिं सागराच्या ।
गोष्टी करीत पितयाजवळी सुखाच्या ॥
वाणी पडे करुण कर्णिं तशी चपापे ।
आली वरी त्वरित ती जणुं बाष्प तापें ॥ ११८ ॥

पार्श्वीं उभी. कवण वर्णिल मातृमाया ! ।
हस्तें तयास कुरवाळित शान्तवाया ॥
बोले, " अहा ! कवण गांजित बालकातें ।
पाचारिलें मजसिं सत्वर सांग कां तें ॥ ११९ ॥

हे अश्रु कां मळविती तव आननातें ।
सारें कथीं उघड जाणुन मातृनातें ।
" तूं जाणसी " वदत टाकुन तो उसासा ।
माझ्या मुखें वदवुनी उपयोग कैसा ॥ १२० ॥

गेलों अम्हीं इइशनाख्य महीधराचें ।
योजून चित्तिं पुर थीब लुटावयाचें ॥

लूट प्रचण्ड अणिली गणना न कांहीं ।
ती घेतली मग विभागुनि सैनिकांहीं ॥ १२१ ॥
क्रैसीसजा बहुमतें अगमेम्ननाला ।
देण्यांत येत बहु योग्य गमे मनाला ॥
क्रैसीस घेउन अमूल्य धना निघाला ।
तो बंधमुक्त करण्या दुहितेस आला ॥ १२२ ॥
यष्टीवरी दिनकर प्रतिमा विराजे ।
ती दावुनी विनवि तो मग सर्व राजे ॥
त्यांतून एत्रिअसवंशसमुद्भवास ।
बन्धुद्वयास विनवी जुळुनी करांस ॥ १२३ ॥
ते ग्रीक सर्व म्हणती गुरु मान्य आहे ।
द्या सुन्दरी परत, घेउन संपदा हे ॥
उन्मत्त एत्रिअसपुत्र कठोर राजा ।
धिक्कारुनी गुरुवरास म्हणे ' घरा जा ' ॥ १२४ ॥
कोपायमान परि वृद्ध निघून गेला ।
त्या फीबसा स्तवितसे कुलदेवतेला ।
हांकेस धांवत अला धनु सज्ज केलें ॥
ग्रीकांस तीक्ष्ण शर सोडुन वेधियेलें ॥ १२५ ॥
वर्षाव चालवि तयांवर सारखा तो ।
वाटे तदा अहह ! ! सैन्य समग्र खातो ॥

तेव्हां भविष्यकथकें कथिला विचार ॥
कां कोप आज रविला चढला अपार ॥ १२६ ॥

मीं लागलेंच कथिलें कारिं देव तुष्ट ।
आराधनेविण टळेल कसें अरिष्ट! ॥
गर्जून एत्रिअसपुत्र करी प्रतिज्ञा ।
झाली समाप्ति तिचि ही मम कीं अवज्ञा ॥ १२७ ॥

क्रैसीसजा परत एत्रिअसोद्भवानें ।
लावून तातसदना दिलि गौरवानें ॥
गेले सवें जन तरींत दुजे बसून ।
देतील थोर करभार नृपा अणून ॥ १२८ ॥

मागून वर्तन नृपें अति निंद्य केलें ।
ते राजदूत नुकतेच निघून गेले ॥
त्यांनीं प्रवेश पटमंडपिं आज केला ।
ब्रैसीसजा मम विभाग हरून नेला ॥ १२९ ॥

होईल आज जर कांहिं तुझ्या हतून ।
साहाय्य काय करशील सुतास तूं न ॥
त्वां भाषणें मधुर, सत्कृतिनें जरी गे ।
केव्हांहि जोव्हमन मोहियलें तरी गे ॥ १३० ॥

आलिम्पसावर असेंच निघून जावें ।
जोव्हास त्या कळवुनी वळवूनि घ्यावें ॥

तूझी महत्कृति तुझ्याच मुखांतुनी जी ।
म्यां ऐकिली, विसरलों परि ती न आजी ॥ १३१ ॥

सॅतर्नजावरिल संकट एक कालीं ।
त्वां टाळितां स्तुति तुझी जगीं फार झाली ॥
जूनो महा कुटिल तेविं दुजी मिनर्वा ।
नेप्चून त्यांत मिसळे नच लाज सर्वां ॥ १३२ ॥

जोव्हास बांधुं ह्मणती झणिं शृंखलांनीं ।
आणीयला कठिण काळ खरा खलांनीं ॥
*तूं धांवलीस समयीं टळला अनर्थ ।
तो आणिलास शतबाहु बहू समर्थ ॥ १३३ ॥
नामें ब्रिएरिअस ठाउक जो सुरांतें ।
ती एजिआन अभिधा जन देति ज्यातें ॥

---

* जोव्ह हा स्वर्गामध्यें सर्व सत्ता बळकावून बसला व इतर अमरांशीं फार उद्धटपणें वागूं लागला. त्यामुळें त्यांच्या मनांत त्याचेविषयीं द्रोह उत्पन्न होऊन त्याला बंधनांत टाकण्याकरितां त्यांनीं एक व्यूह रचिला. त्याची बातमी पित्याचे मार्फत थेटिसला कळली. तिनें वेळींच धांवाधांव करून ब्राएरिअस नामें एका राक्षसाचे मदतीनें कट मोडून टाकिला. जोव्हानें जूनोचें हस्तबंधनानें पारिपत्य करून, थेटिसचें उतराई होण्याचें कबूल केलें होतें. त्याची आठवण जोव्हास दे ह्मणून अकिलीसानें मोठ्या खुबीनें आपल्या मातेस सांगितलें, कारण मागें जे देव त्याचे विरुद्ध वागले तेच आतां ग्रीकांस मदत करीत आहेत. त्यांच्या रागानें ग्रीकांस अकिलीसविषयक त्यांनीं केलेल्या अपराधाबद्दल शिक्षा करणें जोव्हाचे मनांत सहज भरेल.

सॅतर्नजा जवळ तात बसे तयाचा ।
त्याहून हा प्रबल, विश्रुतविक्रमाचा ॥ १३४ ॥

भ्याले तया सुर, भयानक रीत त्याची ।
जोव्हास बांधिति न, धन्य खरी तयाची ॥
ही त्यास आठवण दे धर गच्च पाय ।
त्यातें वळीव करिं कांहिं तरी उपाय ॥ १३५ ॥

या त्रोजनां कुणि सहाय बळी मिळावे ।
हे ग्रीक सागरजलीं पळतां भरावे ॥
शत्रू शिरें उडवितां वरचे वरून ।
क्षेम स्वतां कळवितील नृपा पुसून ॥ १३६ ॥

पाहील एत्रिअसपुत्र रणप्रदेशीं ।
निर्बुद्धिता निज विलक्षण ती विनाशी ॥
तो 'हाय हाय' म्हणुनी बडवील ऊर ।
ग्रीकावतंस अवमानियला नृवीर ! ॥ १३७ ॥

माता तदीय कुरवाळुनि आननाला ।
गाळीत अश्रुजल भूषण गौर गाला ॥
"वत्सा" वदे "तुजसिं वाढविलें कशाला ! ।
जन्मास लागलि तुझ्या जणुं पापवेला ॥ १३८ ॥

होतें सुरेख, असतास जरी घरास ।
नौकेंत अक्षत सुखा जरि सेवितास ॥

आयुष्य फार तव तें उरलें न आजी ।
अल्पायु अन्य तव तुल्य न दुःखभाजी ॥ १३९ ॥
आलिम्पसीं हिममयीं अजि जोव्ह आहे ।
जातें स्वतां विनविण्यास तयास पाहें ॥
तों वैरचिंतन करीत सदैव राहीं ।
नौसाधनीं बसुन युद्ध दुरून पाहीं ॥ १४० ॥
तो वंश + ओशिअनसीं इथिओपियाचा ।
नांदे तिथें दिसत संभ्रम भोजनाचा ॥
त्या कारणें ससुर कालच जोव्ह गेला ।
बारां दिशीं परत येइल तो घराला ॥ १४१ ॥
आश्वासुनी बहुत दुःखित पुत्रकाला ।
गेली निघून जननी अपुल्या स्थलाला ॥
तो एकलाची मग चिंतितसे बसून ।
नेली कशी सुरशना अधमें हरून ! ॥ १४२ ॥
क्रीसापुरीस इकडे युलिसीस गेला ।
होते बळी जवळ साधन शुद्धतेला ॥
इष्टस्थला पहुडल्यावर नाविकांनीं ।
गुंडाळिलीं झणिं शिडें सगळीं करांनीं ॥ १४३ ॥

+होमरच्या मताप्रमाणें पृथ्वी ही वर्तुलाकार समभूमि असून ओशिअनसाच्या प्रवाहाचें तिच्या भोंवतीं वलय पडलेलें आहे, सर्व नद्यांचा उगम तेथेंच होऊन त्या पृथ्वीकडेसच वाहत आहेत.

ठेवून नीट मग पाडुन डोलकाठी ।
नेली हळू हळु वलावुन नांव कांठीं ॥
बांधून नांव दृढ वातभयें जपून ॥
टाकून नांगर दिला उदकीं वरून ॥ १४४ ॥

वीचींस भंगुर वलांडुन सर्व जाती ।
तीराप्रती बलिंस घेउनियां तदा ती ॥
क्रैसीसजा उतरतां रविदर्शनाला ।
घेऊन तीस युलिसीस पुढें निघाला ॥ १४५ ॥

वेदीसमीप मग अंकिं तिला पित्याचे ।
ठेवोनियां वदत तो युलिसीस वाचे ॥
" क्रैसीस ! भो ! नृपवरें अगमेम्ननानें ।
धाडीयलें मज हिच्यासह सन्मनानें ॥ १४६ ॥

अर्पावया शुचि बली तव फीबसाला ।
हे आणिले, शमविं त्या निज दैवताला ॥
ते ग्रीक विव्हळति कोण घडे अनर्थ ! ।
वारावया न दुसरा दिसतो समर्थ " ॥ १४७ ॥

अंकावरून अजि हाय ! गमावलेली ।
जी शोधितां मुळिंच हातिं न लागलेली ॥
ती हन्त ! आज तनया सहजीं मिळूनी ।
आलिंगिली सुपितरें फिरुनी फिरूनी ॥ १४८ ॥

तेणें, प्रशस्य बलि शंभर आणिलेले ।
त्या स्थंडिला निकट, नंतर मांडियेले ॥
प्रक्षालितांजलिंत पिष्ट यव प्रशस्त ।
क्रैसीस घेउन करी स्तव ऊर्ध्वहस्त ॥ १४९ ॥

" हे रौप्यसायक ! सिलापुररक्षका हे ! ।
क्रीसार्चिता ! अखिल तेनिदसेश ! पाहें ॥
म्यां प्रार्थितां खचित धांवुनियां अलास ।
ग्रीकां व्यथा करुन मानियलें वचास ॥ १५० ॥

ही: प्रार्थना अणिक आइक देवराया ।
ग्रीकांस वांचिव, चलें धनु आंवराया ॥
ही साथ घातुक दुरी पळवून लाव " ।
मानीत फीब्स वचा समजून भाव ॥ १५१ ॥

घेती समस्त यवपिष्ट तदा करांत ।
शास्त्रोक्त सिंचनविधी करती क्षणांत ॥
रांगेंत वध्य बलिंच्या जुळवून माना ।
निश्चर्मकाय करिती वधुनी तयांना ॥ १५२ ॥

मेदांत घोळविति काढुन सक्थिखंड ।
आच्छादनार्थ वरि ठेविति मांसपिण्ड ॥
अर्पून आहुति अशी गुरु अग्निमाजी ।
ओती सुरा वरतिं निर्मल सर्वथा जी ॥ १५३ ॥

पंचाग्रशूळ करिं घेउनियां कुमार ।
झाले क्षणांत रससिद्धिंत गूढ फार ॥
वेऊन अंत्ररुचि, मांस उरे तयाचे ।
काढून काप रचिती भुवि ढीग साचे ॥ १९४ ॥

शूळाग्रलग्न परिपूत वसाविशिष्ट ।
मंदाग्निमाजि मग भाजिति मांस मिष्ट ॥
ऐशी कुमार करती झणिं सिद्धता ते ।
पात्रें विशाल बहु मांडिति एक हातें ॥ १९५ ॥

मिष्टान्न सेवुन यथेच्छ लहान थोर ।
प्याया सुरा सरस सर्व धरीत जोर ॥
द्राक्षासवें विलसती परिपूर्ण पात्रें ।
सौख्यांत आज म्हणती तरतील गात्रें ॥ १९६ ॥

प्याले करांतुन करीं किति नाचताती ।
सूर्यस्तुतिप्रचुर गायन लोक गाती ॥
गाना अशा परिसुनी रवि तुष्ट झाला ।
तों शीघ्र अस्तमनकाल तशांत आला ॥ १९७ ॥

अंधार धांवत अला, भरल्या दिशा या ।
होती प्रसुप्त जन नांव जयांस शय्या ॥
निद्रेस गाढ भर निर्भर येत पाहीं ।
होऊन जर्जरित जीर्ण जिरे क्षपाही ॥ १९८ ॥

आली जपाकुसुमपाटल अंगुलीची ।
साक्षात् प्रभात सुखदा जननी उषेची ॥
जायास सर्व मग एकियनांकडेस ।
घाईत लोक निघती मनिं फार हौंस ॥ १५९ ॥

दैवें मिळे पवनही अनुकूल त्यांस ।
जो कीं क्षणें फुगवि नौवसनोदरास ॥
नौका चले त्वरित गर्जत ऊर्मिमाला ।
ज्या भंगतां जल घुसे लघुसें तलाला ॥ १६० ॥

नौका पळे पुढतिं, लागत वायु मागें ।
ते ग्रीक, तें बल महत् दिसण्यास लागे ॥
आले कडेस पडले न बहु प्रयास ।
नौका भुईवरतिं ओढुन घ्यावयास ॥ १६१ ॥

वांसे विशाल मग मांडुन वाळवेंत ।
ठेवून नाव वर सर्व चमूंत जात ॥
रागें जळे निशिदिनीं अकिलीस राणा ।
नौकेंत बैसुन असे, दिसला न कोणा ॥ १६२ ॥

युद्धा करीत न, जरी रण रोज माजे ।
जाई सभे न, जमती जरि शूर राजे ॥
चित्तीं झुरे, स्फुरित बाहु करीत जांच ।
तो सिंहनाद पडतो श्रवणीं उगाच ॥ १६३ ॥

चारांदिशीं पुढतिं घालुन अन्य देव ।
आलिंपसावर अला परतून जोव्ह ॥
कार्यास थेटिस तदा स्मरुनी सुताच्या ।
आली वरी क्षणिं जलांतुनिं सागराच्या ॥ १६४ ॥

आलिंपसावरतिं थेटिस थेट जातां ।
शृंगें पहात अधिकाधिक उंच आतां ॥
आरूढ जोव्ह वर अन्य सुरां निराळा ।
डाव्या करें नमुन वंदित पाय बाळा ॥ १६५ ॥

हस्तें दुज्या हनु धरी विनवी तयाला ।
" सॅतर्नजा ! पितृवरा ! परिसें वचाला ॥
आभाषणें मधुर, सत्कृतिनें जरा मी ।
आलें असेन कधिंही अमरांस कामीं ॥ १६६ ॥

माझा मनोरथ पुरा करिं एवढाची ।
कीं मान्यता जगिं घडो मम पुत्रकाची ॥
अल्पायु तो, तरि पहा अगमेम्ननानें ।
वागविलें अहह ! त्या बहु सापमानें ॥ १६७ ॥

तद्भाग युद्धजित आज हरून नेला ।
हा पाहिजे तरि मनोरथ पूर्ण केला ॥
ते ग्रीक उद्धत धुळींत पुरे मिळाया ।
हो ट्रोजनां अजि सहाय, जयी कराया ॥ १६८ ॥

पायांस लागतिल ते मग आर्जवानें ।
माझ्या सुतास सगळे भजतील मानें " ॥
जोव्हें न उत्तर दिलें तिज अभ्रवाहें ।
सेवून मौन बहुकाळ तसाच राहे ॥ १६९ ॥

हें जाणुनी धरित थेटिस गच्च पाय ।
प्रार्थूनियां वदत " भीड करी अपाय ॥
तूं एक ' होय ' अथवा ह्मण आज ' नाहीं ' ।
ठावें तुला न भय, कां मग मूकता ही ? ॥ १७० ॥

मातें तरी समजुंदे अवमानितांत ।
तूं स्थान दोशि कितवें मज देवतांत " ॥
बोले दयार्द्र तिशिं जोव्ह " अगे फुकाचा ।
ऐसा प्रसंग अणिशी बहु संकटाचा ॥ १७१ ॥

जूनोस कोप अति येउनियां मला ही ।
देऊन दूषण अतां चिडवील पाहीं ॥
आक्षेप घेउन पुसे इतरां सुरांला ।
मी त्रोजनांवर दया करितों कशाला ॥ १७२ ॥

ऐशी कृती करि सदा जर एरव्हींच ।
मांडील तांडव तुला बघतांच नीच ॥
जा जा निघून अधिं वाट धरीं अजी ती ।
त्वत्कार्य होइल, असे मज काळजी ती ॥ १७३ ॥

मी पाहिजे तर अतां इतुकें करीन ।
संकेतपूर्वक शिरा अधिं चाळवीन ॥
विश्वास येइल तुला बहुधा कमी न ।
याहूनियां वचन देत सुरांहि मी न ॥ १७४ ॥

जें जें दिलें वचन मस्तकचालनानें ।
तें तें खरें करितसें पुरतेपणानें " ॥
देई तिला वचन जोव्ह सुखास आस ।
भ्रू श्यामवर्ण चढवी, हलवी शिरास ॥ १७५ ॥

पीयूषपूर्ण अलकां शिरिं चाळवी तो ।
आलिम्पसा गिरिवरासहि कांपवी तो ॥
तेथोनियां उठलिं नंतर शीघ्र दोघें ।
आलिंपसावरुन अर्णविं ती उडी घे ॥ १७६ ॥

तो जोव्ह जाय फिरुनी निज मंदिरास ।
उत्थापनें अमर आदरती तयास ॥
जों जोव्ह आसनिं बसे सुर तों अहो ते ।
जागीं उभे सभय वाट पहात होते ॥ १७७ ॥

लांबून थेटिस जरातुरसागराची ।
कन्या सुरेख रजतांघ्रि बघून साची ॥
जूनोस संशय अला आजि ही स्वतंत्र ।
बैसून येथ करिते बहु कानमंत्र ॥ १७८ ॥

जोव्हास बोलत कठोर वचें बरीच ।
"ती देवता कवण हे शठ! रे! उगीच ॥
चिंता करीत बसते कसली तुझ्याशीं ।
तूतें रुचे तरि कसें कथिशी न माशीं ॥ १७९ ॥

छद्मप्रबंध रचितां कथितां उपाय ।
कोणा नये कळुंहि अक्षर एक काय ! " ॥
तीतें वदे उलट थोर पिता जगाचा ।
"जूनो! नको मुळिंच हट्ट धरूं फुकाचा ॥ १८० ॥

शोधून मार्ग मम कुण्ठित होत सन्त ।
अर्धांगिलाहि तुजला न कळेल अन्त ॥
जें योग्य तें कथितसें तुज आधि सारें ।
माना न पात्र सुर मर्त्य हि या बिचारे ॥ १८१ ॥

जी काय गोष्ट मज गुप्त हवी रहाया ।
ती जाणण्या झटसि हे तव कष्ट वांया " ॥
जूनो विशालनयना वदली तयास ।
"सॅतर्नजा उगिच या करिशी वचास ॥ १८२ ॥

गुप्त प्रबंध करण्यास धरून हेका ।
प्रश्नानुयोग करुनी तुज पीडिलें का ? ॥
साधीं निराकुलमनें नयचिंतनास ।
त्याचें रहस्य कळण्या न धरीन आस ॥ १८३ ॥

भित्रा स्वभाव म्हणुनी मनिं येत शंका ।
ती कोण गोलि ? वद थेटिस ती नव्हे का ? ॥
कन्या पहा जलधिची रजतांघ्रि आली ।
गेली तुला वळविल्याविण का मराली ? ॥ १८४ ॥

होती धरून तव पाय उजाडतां जी ।
शब्दांत गुंतवुन गेलि असेल आजी ॥
ते ग्रीक कीं वधुन, तूं अकिलीस वीर ।
न्यावास मान्य पदवीस जनांत धीर " ॥ १८५ ॥

+प्रत्युत्तरा करित जोव्ह " उगीच शंका ! ।
त्वद्बुद्धि फार विपरीत सदैव ती कां ॥
माझेंहि वर्तन तुला स्थल संशयाला ।
निष्पन्न काय फल होइल शेवटाला ? ॥ १८६ ॥

प्रेमांत अंतर पडेल नडेल फार ।
मी देतसें तुजसिं उत्तर एकवार ।
तूझें खरें म्हण. बरें मग ! त्यांत काय ! ।
इच्छा तशीच मम ! तेथ नसे उपाय ! ॥ १८७ ॥

+ होमरनें पहिली वीरसभा जी भरविली तींत भांडण उत्पन्न झालें तेंच भांडण त्यानें भरविलेल्या पहिल्या देवसभेंत उद्भवलें हें अगदीं रास्त आहे. याच वेळेस जोव्हानें ट्रोजनांचा पक्ष प्रमुखत्वानें उचलला व जूनोनें त्यां विरुद्ध जाण्याचा हट्ट धरिला.

मी सांगतों बस उगीच बरें तुला तें ।
मी कोपतां कवण वारिल मत्करातें ? ॥
आलिंपसावरिल सर्वहि देवता या ।
नाहीं समर्थ समयीं तुज वांचवाया" ॥ १८८ ॥
जूनो अशा भयद ऐकुनियां वचाला ।
खालीं करून बसली निज आननाला ॥
उत्पन्न भीति मग जाहलि त्या सुरांत ।
होती बहू चकित बोलति आपसांत ॥ १८९
शिल्पी प्रसिद्ध जगिं व्हल्कन नाम ज्याचें ।
येई पुढें करित भाषण तो हिताचें ॥
"ही शोचनीय बहु गोष्ट असे पहा कीं ।
यावें वितुष्ट भलतेंच सुरांत नाकीं ॥ १९० ॥
घेवोनियां कड तुह्मी तर मानवांचा ।
कां आणितां वदनिं जाणुन दुष्ट वाचा ? ॥
देवां नडेल जर भांडण जें जनांत ।
आनंद अल्पहि उरेल न भोजनांत ॥ १९१ ॥
केला तुह्मीं कलह पुष्कळ थोडक्यांत ।
सप्रेम शान्ति कशि राहिल आपणांत ? ॥
बह्वर्थ वाक्य लघु घ्या मनिं आदरानें ।
*नासे बरें बहुत अल्पहि वाइटानें ॥ १९२ ॥

---

* हें वाक्य सुभाषितरूप आहे.

आहेस सुज्ञ तव लौकिक थोर माते ! ।
जोव्हा नको चिढवुं आज सुरोत्तमातें ॥
जोव्हास कोप जर येइल एकदां तो ।
आम्हां सुरक्षित न ठेविल कीं कदा तो ॥ १९३ ॥

सामर्थ्य थोर तुज ठाउक गे तयाचें ।
आम्हां पदच्युतिविषीं भय तें कशाचें ? ॥
× बोलून शब्द मृदु शान्तविं राग याचा ।
होईल तो मग अम्हां हितकाम साचा " ॥ १९४ ॥

पेला तयें द्विमुख पूर्ण भरून केला ।
देऊन हस्तिं वदला निज अंबिकेला ॥
" माते जरा कर विचार मनांत आज ।
कोपा गिळीं न दिसतो दुसरा इलाज ॥ १९५ ॥

होईल घोर अथवा परिणाम याचा ।
तो ताडितां तुज दुरून पहावयाचा ॥
दुर्वार्य्य जोव्ह चिढतां अटपेल काय ।
सोद्वेग मी करित राहिन हाय हाय ! ॥ १९६ ॥

× लुब्धमर्थेन गृह्णीयात् क्रुद्धमंजलिकर्मणा । मूर्खं छंदानुवृत्त्या च तत्त्वार्थेनच पण्डितम् ॥

*होण्या सहाय तव, जें मम चित्तिं आलें ।
मागून मात्र मज निस्तरण्यास झालें ॥
पायीं धरून मज लोटित जोव्हराया ।
स्वर्गांतुनी अहह ! कोणि न सांवराया ॥ १९७ ॥
गोलंट खात सगळा दिन एक गेलों ।
लेम्नासभूमिवर आदळलों न मेलों ।
ते येत सिंतियन धांवुन सुश्रुषेला ।
+झालों बरा अठवते आजि कष्टवेला " ॥ १९८ ॥

---

*एकेकाळीं त्रायपुर लुटून फस्त केल्यावर परत जातांना हर्क्यूलीसला कास देशांत आश्रय घ्यावा लागला. कारण त्याच्याशीं वैरभावानें वागणाऱ्या जूनो देवीनें मोठें वादळ उत्पन्न करून त्यास दूरवर वाहून नेलें. या कार्यांत विघ्न येऊं नये म्हणून तिनें कांहीं युक्तीनें जोव्हदेवास निद्रावस्थेंत बराच वेळ मग्न करून ठेविलें. जोव्हदेवास हें कपट जागा झाल्यावर समजून आलें. म्हणून या कपटाचरणाबद्दल तीस शासन करण्याकरतां क्रोधानें तिचे पाय लोखंडी ऐरणीशीं शृंखलाबद्ध करून ठेविले. तिला बंधमुक्त करण्यास व्हल्कन मदत करूं लागला. त्यावरून जोव्हानें त्यास स्वर्गांतून खालीं डोकें वर पाय करून फेंकून दिलें, अशी कथा आहे.

+जोव्हाच्या कोपाच्या तडाक्याचा अनुभव व्हल्कनला कसा आला त्याचें हें वर्णन होमरनें सरळ भाषेंत चांगलें केलें आहे. एक वेळ मारीच राक्षसानें कांहीं अपराध केल्यावरून रामाच्या कोपाचा अनुभव घेतला त्याचें वर्णन वाल्मीकीनें केलें आहे तें पहा. त्याची शैली कांहीं निराळीच आहे. मारीच रावणास म्हणतो:—नको रे बाबा ! त्या रामाचे वाटेस जाण्याची गोष्ट सुद्धां काढूं नकोस. कृष्णाजिन व वल्कलें धारण करून धनुष्य बाण हातीं घेऊन हातांत पाश घेतलेल्या यमाप्रमाणें राम माझे पाठीस लागला आहे असें प्रत्येक वृक्षाकडे पाहिलें म्हणजे मला वाटतें. राम एक नसून सहस्ररूपें धारण केलेला

जूनो विशुभ्रकर हांसुन घेत पेला ।
होता सुतें भरुन सादर ठेवियेला ॥
पीयूष पात्रिं मग तो भरपूर काढी ।
एकीकडून सकलांस सुरांस वाढी ॥ १९९ ॥
रंगेल व्हल्कन तदा बहु दंग झाला ।
चेष्टा बघून हंसत्यां दमवी सुरांला ॥
चाले समग्र दिन मादक मेजवानी ।
त्या देवता सकल गुंतुन जात गानीं ॥ २०० ॥
वीणा स्वतां रवि धरी सुख काय हो तें ।
जीवास तेथ मुळिं कांही उणें न होतें ॥
झालें तयां न कळलें दिवसावसान ।
निद्राभिलाष सुटला न सुरांस सान ॥ २०१ ॥
एकैक जात निज मांदिरिं ते उठून ।
जीं व्हल्कनें असुन पंगु दिलीं रचून ॥
ज्या मंचकावर पडून तयास गोड ।
येई निशासमयिं झोंप सुखास जोड ॥ २०२ ॥

आहे अशी भीतीनें माझी समजूत होते. दिवसा ज्या वनांत **राम** नाहीं तें सर्व वन **राम**मय दिसत असतें. रात्रौ स्वप्नांत **रामा**ला पाहून दचकून उठतों. फार काय सांगूं हे रावणा !

रकादीनि नामानि रामत्रस्तस्य **रा**वण । रत्नानिच रथाश्चैव विभासं जनयन्ति मे॥

अर्थ–रत्न, रथ इत्यादि दुसऱ्या कोणी उच्चारलेले रकारात्मक शब्द **राम**ाची धास्ती घेतलेल्या माझ्या कानीं पडतांच **राम** आला असा मला विशेषच भास होतो !

आरूढ मेघरव त्यावर जोव्ह झाला ।
ती पाहिजे श्रमविनोदन झोंप त्याला ॥
श्रान्तास झोंप पडतां क्षणिं गाढ आली ।
जूनो तशीच मग निद्रित तेथ झाली ॥ २०३ ॥

सर्ग २ रा.

सारांशः–थेटिसला दिलेलें वचन पुरें करण्याकरतां **जोव्ह अगमेम्रनास** कपटभाव मनांत धरून स्वप्न पाडतो. त्यास युद्ध करण्यास बुद्धि देतो. कारण युद्ध जर होणार नाहीं तर अकिलीसाची उणीव केव्हांच भासणार नाहीं. परंतु अगमेम्रनाला स्वप्नदर्शनानें अशी आशा सुटते कीं अकिलीसाच्या मदती-शिवाय त्राय तेव्हांच घेईन. तरी पण त्याचे मनांत एक संशय उत्पन्न होतो. तो असा कीं, अकिलीस रुसून बसल्यामुळें सैन्यांतील उत्साह कमी झालेला आहे व त्यांत ही सांथीची गडबड उडाल्यामुळें तें सैन्य सांगितलेलें ऐकेलच असा नियम नाहीं. ह्मणून सैनिकांचें मन पाहण्याचा तो निश्चय करतो. प्रथम तो सेनानायकांचे सभेंत जाहीर करतो कीं ग्रीकांनीं घरीं परत जावें हा उत्तम मार्ग होय असें मी सर्व ग्रीकांनां जमवून सांगतों व जर त्यांस तो मार्ग उत्तम वाटला व ते जाण्यास तयार झाले तर त्यांस आंवरून धरा. तो त्याप्रमाणें सर्व सैन्य एकत्र जमा करतो. घरीं जाण्याची शिफारस करतो. सर्व ग्रीक जाऊं लागतात. युलिसीस शहाणपणानें त्यांस थांबवून घेतो. व थर्सायतीस जो परत जाण्याकरतां फार गडबड करीत होता व कटुवाक्यें बोलत होता त्यास शासन करतो. पुन्हां वीरसभा भरते. पुष्कळ वीर भाषणें करतात. व नेस्तरानें केलेला उपदेश उत्तम ठरतो. तो लढाईचे कामाकरतां देशवार सैन्याचे विभाग करण्यास सांगतो. त्यामुळें लढाईच्या पूर्व तयारीस व्यवस्थित स्वरूप प्राप्त होतें. येथें ग्रीक व त्रोजन या दोघांच्या सैन्यांची नांवनिशी देण्यास कवीला चांगलाच अवकाश मिळतो.

कालमानः–जवळ जवळ एक दिवस.

स्थलः–ग्रीकांची छावणी, समुद्रतीर, व त्राय.

निद्रा अली सुरनरां मग शान्त फार ।
जोव्हास ती न परि ये करतां विचार ॥
पावेल केंवि अकिलीस जगांत मान ।
ग्रीकप्रणाश जलयानिं घडेल वा न ॥ १ ॥

अन्तीं उपाय सुचला रुचला तयासीं ।
स्वप्नासुरा दवडणें अगमेम्ननासीं ॥
पाचारुनी वदत त्या परुषार्थवाचा ।
"जा गांठ तो कटक एत्रिअसोद्भवाचा ॥ २ ॥

स्वप्नासुरा पळत जा करिं सर्व कावे ।
सांगेन तें कथिं तया न कुठें चुकावें ॥
'कीं आण एकियन ते रणिं दीर्घकेशी ।
तें त्राय विस्तृत मिळेल नृपा विदेशीं ॥ ३ ॥

जूनो सुरांस वळवी बहु आर्जवी ती ।
आलिंपसस्थ सुर एकमता वरीती ॥
त्या त्रोजनांस कुदशा अवचीत गांठी ।
कीं आज पुण्य उरलें बहुधा न गांठीं'"॥ ४ ॥

धांविन्नला असुर जोड नसे जवासीं ।
तंबूंत शोधुन बघे अगमेम्ननासीं ॥
निद्रासुधामय करि वश त्या नृपाला ।
पाही. क्षणांत मग युक्ति सुचे तयाला ॥ ५ ॥

ज्ञानें वयें बहुत वृद्ध म्हणून ज्याला ।
पूजी पित्यापरिस भूपति नेस्तराला ।
त्याचें धरून मग रूप बसे उशाशीं ।
बोलोनियां ठकवि वंचक तो नृपाशीं ॥ ६ ॥

" हें काय एत्रिअसजा ! जनपालका ! हे ! ।
हे वीरपुत्र ! बघ अश्वपरीक्षका हे ! ॥
विश्वासभू असशि मंत्रिवरा ! जनांची ।
घेतोस झोंप ! कशि आवड रंजनाची ! ॥ ७ ॥

रे ऐक, ऊठ नृप ! टाकुन सर्व झोंप ।
मी जोव्हदूत कथितों तुजला निरोप ॥
स्वर्गातुनी तुवर जोव्ह करीत बा जें ।
तें प्रेम निर्मल नृपा तुजलाच साजे ॥ ८ ॥

' रे आण एकियन ते राणिं दीर्घकेशी ।
तें त्राय विस्तृत मिळेल नृपा विदेशी ॥
जूनो सुरांस वळवी बहु आर्जवी ती ।
आलिम्पसस्थ सुर एकमता वरीती ॥ ९ ॥

त्या त्रोजनांस कुदशा अवचीत गांठी ।
कीं आज पुण्य उरलें बहुधा न गांठीं ' ॥
माझा निरोप नृप ! नीट मनांत ठेव ।
जाईल झोंप तव तों स्मृति ही तथैव " ॥ १० ॥

गेला घरा असुर भूप मनांत धन्य ।
योजीत एक नर योजित जोव्ह अन्य ! ॥
तो प्रायमाभिभव निश्चित वाटला त्या ।
होता खरा नृपति मूर्ख बराच जात्या ॥ ११ ॥

द्यायास दुःख उभयां अनुभूतिमूल ।
इच्छीत जोव्ह राणिं हें नुमगे नृपाल ॥
निद्रेंतुनी नृपति उत्सुक होत जागा ।
कर्णीं ध्वनी गुणगुणे " राणिं आज जा गा " ॥ १२ ॥

घालून चारु मृदु चोल नवा अंतून ।
लेई नृपाल मग अंगरखा वरून ॥
सेवी उपानह पदीं, आणि कंबरेसीं ।
लावीत रौप्य असि धाक भरे अरीसीं ॥ १३ ॥

अक्षय्य दण्ड करिं पैत्र्य धरून आला ।
युद्धास सज्ज नरवीर पहा निघाला ॥
×आलिंपसीं अरुण जाउनियां सुरांला ।
सांगे अला दिवस फार उशीर झाला ॥ १४ ॥

आणीवले नृपतिनें मग भालदार ।
केलें पुकारवुनि सैन्य रणीं तयार ॥
नौदेशिं नेस्तर नृपाल जिथें विशुद्ध ।
आले तिथें प्रथम भूपति वृद्ध वृद्ध ॥ १५ ॥

" ऐका सुहृज्जन !" वदे नृप " सावधान ।
दृष्टान्त काल मज होत तसा कुणा न ॥

× रात्र सरून नव्या दिवसास आरंभ झाला असें सांगून युद्धाच्या कथानकांतही अवस्थान्तर झालें आहे असें कवीनें ध्वनित केलें असावें.

निद्रा सुधामय अली मग त्या भरांत ।
त्यां पाहिला पुरुष, कोण म्हणें मनांत ॥ १६ ॥

या नेस्तरा परिस आकृति गोजिरी ती ।
बांधा तसाच, गतिचीहि तशीच रीती ॥
बैसे हळूच मग येउनियां उशाशीं ।
उद्देशुनी वदत शब्द गभीर माशीं ॥ १७ ॥

'हें काय एत्रिअसजा ! जनपालका हे ! ।
हे वीरपुत्र बघ अश्वपरीक्षका ! हे ! ॥
विश्वासभू असशि मंत्रिवरा जनांची ।
घेतोस झोंप कशि आवड रंजनाची ॥ १८ ॥

रे ऐक, ऊठ नृप टाकुन सर्व झोंप ।
मी जोव्हदूत कथितों तुजला निरोप ॥
स्वर्गांतुनी तुवर जोव्ह करीत बा जें ।
तें प्रेम निर्मल नृपा तुजलाच साजे ॥ १९ ॥

रे आण एकियन ते रणिं दीर्घकेशी ।
तें त्राय विस्तृत मिळेल नृपा विदेशीं ॥
जूनो सुरांस वळवी बहु आर्जवी ती ।
आलिंपसस्थ सुर एकमता वरीती ॥ २० ॥

त्या त्रोजनांस कुदशा अवचीत गांठी ।
कीं आज पुण्य उरलें बहुधा न गांठीं ॥

माझा निरोप नृप नीट मनांत ठेव ।
जाईल झोंप तव तों स्मृति ही तथैव ' ॥ २१ ॥

झाला अदृष्ट नर, झोंप निघून जाय ।
ग्रीकां रणांत जय साध्य असेल काय ? ॥
थांबा बरें सुचत. पाहुं मनें तयांचीं ।
दाटून त्यां कथिन ' वाट धरूं घराची ' ॥ २२ ॥

सांगा तयांस परि वेळिंच शब्द चार ।
स्थाना न लोक म्हणजे त्यजतील फार " ॥
तो बैसतां उठुन नेस्तर लोकपाल ॥
बोले तदा पुलिन पैलसचा मराळ ॥ २३ ॥

" हे मित्र हो ! सकल नायक सैनिकांचे ।
ग्रीकांस मान्य उपदेशक हो जनांचे ॥
हें स्वप्न आज असतें कथिलें दुजानें ।
होता न एक अवमानियलें न ज्यानें ॥ २४ ॥

सेनानिनें बघुनियां कथिलें स्वतां जें ।
येई न का अनुभवास असून ताजें ! ॥
या यत्न कांहिं करुं सत्य धरूं तया हो ।
ग्रीकांस सज्ज करुं धाडुं रणांत या हो " ॥ २५ ॥

बोलून हें वचन वृद्ध निघोन गेला ।
ते भूप मांडलिक लागति सिद्धतेला ॥

शैलोदरांतुन वनीं मधुलिट्समूह ।
येतो निघून फिरुनी फिरुनी सदाह ॥ २६ ॥

वासंतिकां सुकुसुमांवर धाड घाली ।
तैशी विचित्र करणी रणिं दृश्य झाली ॥
ते ग्रीक अर्णवतटीं जमुनी निघाले ।
नौकांतुनी त्वरित सर्व सभेस आले ॥ २७ ॥

तो वृत्तसिंह झळके मधिं जोव्हदूत ।
उत्साह सैनिकवरां अणितो बहूत ॥
येती थव्यांवर थवे बहु संभ्रमानें ।
होतां निविष्ट जन कांपत भू भरानें ॥ २८ ॥

उच्चस्वरें विनविती नउ भालदार ।
" ऐका अहो सुजन वीर तुम्हीं उदार ॥
हे जोव्हभक्त नृप इच्छिति बोलण्यास ।
ऐका ! उगाच बहु ओरड ही कशास " ? ॥ २९ ॥

स्थानीं तटस्थ बसले जन एकदांचे ।
झालें तदा वच सुरू अगमेम्ननाचें ॥
तो राजवेत्र धरि रम्य करांत मानें ।
त्या व्हल्कनें घडविला बहु जो श्रमानें ॥ ३० ॥

जोव्हा तयें प्रथम अर्पियला मुदानें ।
दूतास आर्गसरिपूस दिला तयानें ॥

पेलप्स घेत, आणि एत्रिअसास देत ।
थाइस्टिसा मिळत तेथुन तोच वेत ॥ ३१ ॥
देहावसान समयीं अगमेम्ननातें ।
तेणें दिला नृप म्हणून धरावयातें ॥
अर्गासमुख्य जलवेष्टित त्या पुरांचा ।
शास्ता असे नृपति, थोर विभाव याचा ॥ ३२ ॥
टेंकून यावर वदे नृप सैनिकांस ।
"हे वीर हो! मम सुहृत्तम मार्सदास! ॥
सॅतर्नजें लकटिलें मज संकटांत ।
दुष्टें मला ठकविलें ठक हा ठकांत ॥ ३३ ॥
होतें दिलें वचन ही शिर चाळवून ।
जिंकोनियां अरिस, जाल घरा फिरून ॥
छद्मप्रयोग करुनी मजला निदेशी ।
कीं जा अतां मलिनकीर्ति तसाच देशीं ॥ ३४ ॥
खचीं कितीक पडले पडतील लोक ।
जोव्हास मान्य दिसती कृति या अनेक ॥
विध्वंसिले तट तयें कितिकां पुरांचे ।
ध्वंसील अन्य बहु अक्षम तेज याचें ॥ ३५ ॥
तें ग्रीकसैन्य लढलें गणना जया न ।
थोडया रिपूंसह परी, मिळवी जया न ॥

ऐकावि का अशि कथा अमुच्या मुलांनीं ? ।
हा! धिक्! वृथा लढतसों रणिं आयुधांनीं ! ॥ ३६ ॥

इच्छा धरून करण्या गणना दलांची ।
केला म्हणा उभयतां तह तो अतांची ॥
वर्जून मित्र परदेशज आज यांचे ।
त्रायस्थ नागरिक फक्त गणावयाचे ॥ ३७ ॥

आणूं प्रसंग सहजीं मग भोजनाचा ।
त्रायस्थ भार शिरिं घेतिल वाढण्याचा ॥
हे ग्रीक सर्व अम्हि संधिस भोजनाच्या ।
पंक्ती करून बसुं नीट दहादहांच्या ॥ ३८ ॥

वाढील एक दर पंक्तिस पौर हातें ।
कित्येक पंक्तिंस हवें तरि तिष्ठण्यातें ॥
आम्हीं कितीक आणि पौर कितीक सारे ।
येईल हो कळुन, नीट मनांत ध्यारे ॥ ३९ ॥

बाहेरचे बहु बली परि वीर आले ।
साहाय्य त्यां करिति घेउन तीक्ष्ण भाले ॥
मार्गांत हे पसरले मम जेविं कांटे ।
ध्वंसूं न देतिल पुरा मज खास वाटे ॥ ४० ॥

हें जोव्हवर्ष सुरु होत अतां दहावें ।
नौका कुशींत कुसल्या अणि काय व्हावें ! ॥

शेडे ढिले पडति पीळ निघून सारा ।
बाळें सुकोमल घरीं रडतात दारा ॥ ४१ ॥
ज्या कारणें सकल चालुन येथ आलों ।
तें साध्य आज न, ह्मणून हताश झालों ॥
मीं सांगतों करुं अतां कथि जोव्ह तैसें ।
जाऊं घरा. प्रिय ह्मणूं न घरास कैसें ? ॥ ४२ ॥
हें त्राय दीर्घपथ केविं अह्मां मिळेल ।
जावें घरा परत सौख्य तयें घडेल " ॥
सर्वां नृपालवच मानवलें. तयांला ।
कावा मुळीं न कळला, जरि साध्य झाला ॥ ४३ ॥
जेवीं इकेरिअनसागरिं ऊर्मिमाला ।
वातें महा उठुन भेटति कीं नभाला ॥
येतां प्रभंजन धरून महा जवातें ।
तीं धान्यभारनत भंगति दाट शेतें ॥ ४४ ॥
झाली सभा क्षुभित तेविं; कुणी निघाला ।
नांवांकडे पळत; कोण पुसे कुणाला ! ॥
ते पादलग्न सिकताकण जे उडाले ।
व्योमावलंबन करून वरी रहाले ॥ ४५ ॥
कोणी ह्मणे " पकड नांव " " करीं कृपा ही " ।
" घे आंत आधिं मज " " लोट जलांत पाहीं " ॥

काढून घेत जन खालिल लांब वांसे ।
नौका जळीं ढकलती; श्रमती जरासे ॥ ४६ ॥

जाया घरास जन उत्सुक हांक मारी ।
आकाशमार्गिं रव मारितसे भरारी ॥
जूनोवचा परिसती न जरी मिनर्वा ।
ती पाहती विधिविरुद्ध घरांत सर्वा ॥ ४७ ॥

जूनो वदे " अहह ! जोव्हसुते घराला ।
हे ग्रीक जाति आजि लंघुन सागराला ॥
त्या प्रायमास जय हा ! अधमा घडेल ।
त्या त्रोजनां अहह ! हेलन ती मिळेल ॥ ४८ ॥

ग्रीकां तदर्थ रणिं मृत्यु अला विदेशीं ।
जा त्यांस नीट समजावुनियां निदेशीं ॥
थांबीव जा गलबतें डुलतीं तयांचीं ।
ही गोष्ट नीलनयने तुज साध्य साची " ॥ ४९ ॥

आलिम्पसोच्च शिखरावरुनी मिनर्वा ।
भेटावया पळत एकियनांस सर्वा ।
जोव्हासमान युलिसीस खरा शहाणा ॥
बोले " उगाच फसतो मनिंचा बहाणा " ॥ ५० ॥

नावेंत ठेवि न पदास सुखासनीं तो ।
पाहे तिशीं, मधुर ऐकुन शब्द घेतो ॥

"क्लाअर्टिसांगभव ! जोव्हज ! सुज्ञ ! हे ! तूं ।
जाशी अशांसह घरा वद काय हेतू ॥ ९१ ॥
त्या प्रायमास जय हा ! अधमा घडेल ।
त्या त्रोजनां अहह ! हेलन ती मिळेल ॥
ग्रीकां तदर्थ रणिं मृत्यु अला विदेशीं ।
जा त्यांस नीट समजावुनियां निदेशीं ॥ ९२ ॥
थांबीव जा गलबतें डुलतीं तयांची ।
कार्या प्रसंग मिळतो परि एकदांची " ।
तो ओळखी स्वर, वचा बहु मान देत ॥
धांवे झुगारुन झगा करिं दूत घेत ॥ ९३ ॥
भेटून एत्रिअसजा अगमेम्ननाला ।
तो राजदण्ड करिं घेत धरावयाला ॥
नांवांकडे पळतसे त्यजुनी भयाला ।
जो जो तया नृप मिळे चढवी तयाला ॥ ९४ ॥
" हें काय लक्षण विलक्षण ! शोभलें का ? ।
त्रेधा किती ! पळसि भीरु ! दिसे भलें का ? ॥
तूं थांब थांबिव दुजां; अगमेम्ननाचा ।
अंतस्थ हेतु कळला न अजून साचा ॥ ९५ ॥
पाहावया मन असा करुनी प्रकार ।
ग्रीकांस दंडिल अशी मज भीति फार ॥

तो जें सभेंत वदला कळलें न सारें ।
होईल घात तर दक्ष सदा असा रे ॥ ९६ ॥
तो कोण शान्तविल सांग नृपालकोप ।
याच्या करें करवि जोव्ह सदा प्रताप ॥
त्या मान्य हा, बहुत आवडतो तयास ।
ताडावयास सकलां न तया प्रयास " ॥ ९७ ॥
भेटे कुणी अरडतां जन अन्य साधा ।
दण्डें प्रहारुनि पुसे " अणितोस वांधा ? ॥
वत्सा उगीच अस ! लोक दुजे शहाणे ।
जें सांगतील तुज तें करुनी पहाणें ॥ ९८ ॥
तूं भ्याड दुर्बल, पुसे तुज कोण सांग? ।
नाहीं रणांत तव राजसभेंत अंग ॥
ग्रीकांत जो उठत तो नृप होउं पाही ।
* लोकीं प्रभुत्व बहुकर्तृक इष्ट नाहीं ! ॥ ९९ ॥
सर्वांस राज्यपद ईश्वर काय देतो ?
एकास देत मग ते करि कायदे तो ॥
तो एक नायक जनां अणि एक राजा ।
सांगेल तें, त्यजुन वैर, तुह्मीं करा जा " ॥ ६० ॥

---

* ना विष्णुः पृथिवीपतिः या वाक्याचा अनुवाद होमरनें येथें केला अ
एकतंत्री राजसत्तेचे भक्त आपल्या ह्मणण्याचे मण्डनार्थ ही उक्ति आधार ह
पुढें करतील.

"लाअर्टिसांगभव ! जोव्हज ! सुज्ञ ! हे ! तूं ।
जाशी अशांसह घरा वद काय हेतू ॥ ९१ ॥

त्या प्रायमास जय हा ! अधमा घडेल ।
त्या त्रोजनां अहह ! हेलन ती मिळेल ॥
ग्रीकां तदर्थ रणिं मृत्यु अला विदेशीं ।
जा त्यांस नीट समजावुनियां निदेशीं ॥ ९२ ॥

थांबीव जा गलबतें डुलतीं तयांची ।
कार्या प्रसंग मिळतो परि एकदांची" ।
तो ओळखी स्वर, वचा बहु मान देत ॥
धांवे झुगारुन झगा करिं दूत घेत ॥ ९३ ॥

भेटून एत्रिअसजा अगमेम्ननाला ।
तो राजदण्ड करिं घेत धरावयाला ॥
नांवांकडे पळतसे त्यजुनी भयाला ।
जो जो तया नृप मिळे चढवी तयाला ॥ ९४ ॥

" हें काय लक्षण विलक्षण ! शोभलें का ? ।
त्रेधा किती ! पळसि भीरु ! दिसे भलें का ? ॥
तूं थांब थांबिव दुजां; अगमेम्ननाचा ।
अंतस्थ हेतु कळला न अजून साचा ॥ ९५ ॥

पाहावया मन असा करुनी प्रकार ।
ग्रीकांस दंडिल अशी मज भीति फार ॥

तो जें सभेंत वदला कळलें न सारें ।
होईल घात तर दक्ष सदा असा रे ॥ ९६ ॥
तो कोण शान्तविल सांग नृपालकोप ।
याच्या करें करवि जोव्ह सदा प्रताप ॥
त्या मान्य हा, बहुत आवडतो तयास ।
ताडावयास सकलां न तया प्रयास " ॥ ९७ ॥
भेटे कुणी अरडतां जन अन्य साधा ।
दण्डें प्रहारुनि पुसे " अणितोस वांधा ? ॥
वत्सा उगीच अस ! लोक दुजे शहाणे ।
जें सांगतील तुज तें करुनी पहाणें ॥ ९८ ॥
तूं भ्याड दुर्बल, पुसे तुज कोण सांग? ।
नाहीं रणांत तव राजसभेंत अंग ॥
ग्रीकांत जो उठत तो नृप होउं पाही ।
* लोकीं प्रभुत्व बहुकर्तृक इष्ट नाहीं ! ॥ ९९ ॥
सर्वांस राज्यपद ईश्वर काय देतो ?
एकास देत मग ते करि कायदे तो ॥
तो एक नायक जनां अणि एक राजा ।
सांगेल तें, त्यजुन वैर, तुह्मीं करा जा " ॥ ६० ॥

---

* ना विष्णुः पृथिवीपतिः या वाक्याचा अनुवाद होमरनें येथें केला आहे. एकतंत्री राजसत्तेचे भक्त आपल्या ह्मणण्याचे मण्डनार्थ ही उक्ति आधार ह्मणून पुढें करतील.

ऐसे तयें वळविले बहुसंख्य वीर ।
जाती सभेंत मग गर्जुनि ते अधीर ॥
आक्रोश दीर्घ करतां भरुनी नभाला ।
तीरावरी अपटती जणुं ऊर्मिमाला ॥ ६१ ॥

खालीं दुजे बसुन राहति जागजागीं ।
थर्सायतीस परि भांडतसे अभागी ॥
शीघ्रोक्तिपंडित सदा तुटकें वदे तो ।
अश्लील जो वदुन दुःख दुजांस देतो ॥ ६२ ॥

जो कर्मशून्य कलहा करितो नृपाशीं ।
लोकांत हास्य पिकतां बहु सौख्य ज्याशीं ॥
भारी कुरूप, न तसा जन अन्य माटा ।
एक्या पदें अदु परंतु करें न थोंटा ॥ ६३ ॥

ते अंसदेश बहु वक्र, अरुंद छाती ।
शोभा अणी तनुस शीर्ष निमूळतें ती ॥
आंखूड केंश वरि शोभति दाट सारे ।
ईशें असा कथय निर्मियला कसा रे ? ॥ ६४ ॥

त्या आवडे न मुळिं तो युलिसीस दाणा ।
मानीत तो अहितसा अकिलीस राणा ॥
निन्दी परंतु अजि त्या अगमेम्ननाला ।
किंकाळुनी करित कर्कशशा वचाला ॥ ६५ ॥

ग्रीकांस चीड सकलांस अली परंतु ।
उच्चस्वरें बरळतो न गणून किन्तू ॥
" संतोष कां न तुज ? सांग पुसेन मीं तें ।
रे काय एत्रिअसजा ! तुजला कमी तें ? ॥ ६६ ॥
भांडार पूर्ण भरलें तव तें लुटीनें ।
अन्तःपुरीं चमकती ललना पटीनें ॥
पापांत कां मळवितोस पवित्र काय ? ।
हा द्रव्यलोभ तव जाइल सांग काय ? ॥ ६७ ॥
त्रायांतल्या शिशुजनांस अम्हीं धरावें ।
त्यां सोडण्या धन पित्यांजवळून घ्यावें ॥
होऊन दंग वद रंग करावयाला ।
* न्हाव्या कुरंगनयना तुज एकल्याला ! ॥ ६८ ॥
इच्छा कधीं न सजते असली नृपाला ।
ग्रीकांस सांग छळितोस उगा कशाला ॥
धिक्कार ! आज तुमच्या जन ! मार्दवाला ।
आहांत कोण ? बहु कारण संशयाला ॥ ६९ ॥
नाहीं तुह्मीं पुरुष ! नाजुक खास नारी ! ।
जाऊं चला परत कीं श्रमलांत भारी ॥
स्वारी इथें नृपतिची असुंदे अशीच ।
गेल्या अह्मीं नयन हा उघडील नीच ॥ ७० ॥

---

*क्रैसीसकन्यके प्रमाणें परत द्याव्या लागणार नाहींत अशा स्त्रिया, असा अभिप्राय.

तो श्रेष्ठ याहुन गुणें आकिलीस ठावा ।
यानें कसा तदुपमर्द वदा करावा ॥
* तो द्वेष दीर्घ धरता आकिलीस बांका
होती तुझी निकृति शेवटची, न शंका " ॥ ७१ ॥

थर्सायतीस जनपा अगमेम्ननाला ।
निंदी परंतु युलिसीस न तुष्ट झाला ॥
तत्काल साधु चढवी भिंवया, उठोनी ।
डोळे वटारुनि तया निरखी तिथोनी ॥ ७२ ॥

बोले " तुझ्या परिस निंदक निंद्य नाहीं ।
वाचाळता विदित आंवर आज कांहीं ॥
हे नीच ! नीचतम ! भांडसि कां नृपाशीं ? ।
सांभाळुनी फिरुन बोलत जा तयाशीं ॥ ७३ ॥

---

* श्रेष्ठ लोकांची विनाकारण कुचेष्टा करून हशा पिकवून आपली प्रतिष्ठा वाढवणाऱ्या मत्सरी व्यक्तींचें चित्र येथें होमरनें फार खुबीनें काढलें आहे. हें पात्र पुन्हां कोठेंही कविनें पुढें आणलें नाहीं. तो आहे कीं नाहीं या गोष्टी-कडे त्यानें लक्ष्यच दिलें नाहीं. ह्मणजे सर्वथा त्याला योग्य अशीच विस्मरणरूपी संभावना कविनें केली आहे. शिवाय घरीं परत जाण्याचा जो बूट निघाला त्याची प्रशंसा अशा क्षुद्रबुद्धीच्या मनुष्याच्या तोंडीं घातल्यानें उदार मनाचे सैनि-कांस त्याचे ह्मणण्यास रुकार देतां येइना. कारण याचे बरोबर आपणासही लोक हलक्यांत गणतील. ह्मणून येथें राहुन पुढें युद्ध चालू ठेवणें उचित आहे हें त्यांस सहजच वाटूं लागलें.

गेल्या घरा अहित वा हित होय ऐसें ।
मोठें भविष्य कळलें तुजलाच कैसें ?
तूं मौन सेव. अणि एत्रिअसात्मजाला ।
निंदूं नकोस नृवरा अगमेम्ननाला ॥ ७४ ॥

ते ग्रीक पूजिति नृपा बहु देणग्यांनीं ।
नाहीं तुझी किमपि हानि कधीं तयांनीं ॥
पाहीन मी बरळतां करतां अवज्ञा ।
ही पूर्ण मी करिन खास मम प्रतिज्ञा ॥ ७५ ॥

मिथ्या घडे तर जनें मज दोष द्यावा ।
कीं तेलिमाकसपिता न असा असावा ॥
फाडीन साफ तुज अंगरखे कशाला ।
फेडून वस्त्र तुज मारिन नागव्याला ॥ ७६ ॥

लत्ताप्रहार करूनी रडतां अणोनी ।
गावांस लाविन सभेंतुन हांकलोनी " ॥
दण्डें बहूत मग ताडितसे तयासीं ।
पाठीवरी अणिक उद्धत अंसदेशीं ॥ ७७ ॥

तो दीनसा वळवळे अणि अश्रु गाळी ।
ती पाठ ते उठुनियां वळ होत काळी ॥
खालीं बसून मग कांपतसे थरारां ।
तो मूढ दुःखित पुशी निज अश्रुधारा ॥ ७८ ॥

झाला जनांस जरि खेद परी म्हणाले ।
हांसोन सर्व जण ते " अजि ठीक झालें ॥
शाबास ! धन्य युलिसीस खरा कृतीनें ।
हा राजकारणिं रणिं श्रुत पद्धतीनें ॥ ७९ ॥

मारोनियां बसविला खल आज जागीं ।
वर्णी न कोण कृति उत्तम, तो अभागी ! ॥
देईल का फिरुन हा नृपतीस गाली ।
×खात्री असेल गमते बहुशः उडाली ! " ॥ ८० ॥

ऐसें सहर्ष जन लोक वदे सभेंत ।
बोलावया: उठुन तों युलिसीस येत ॥
दूतस्वरूप धरुनी पुढतीं मिनर्वा ।
" बैसा उगीच " विनवीत जनांस सर्वां ॥ ८१ ॥

तेणें समग्र जन थोर तसेच सान ।
ऐकून बोधवच घेतिल सावधान ॥
घेऊन दण्ड पुरलुंठक एक हातें ।
ज्ञानप्रयुक्त युलिसीस करी वचातें ॥ ८२ ॥

---

* थर्सायतीसाचा अशा रीतीनें युलिसीस यानें समाचार घेतला हें पाहून दिलदार, सरळ व निष्कपटी शिपाईगड्यांस आनंद झालेला कवीनें दाखविला हें योग्यच आहे. शिवाय असला भ्याडपणा तर केव्हांही त्यांस पसंत पडणार नाहीं.

"श्रीकांस एत्रिअसजा ! रुचलें असावें।
लोकांत नीच पदवीस तुला अणावें ॥
'तें त्राय घेउं तर येउं' असें दिलेलें।
यांनीं भलें वचन तें वद काय केलें ! ॥ ८३ ॥

पोरें जशीं भिउन कीं रडतात रांडा ।
जाया घरा निघतसे बहु दीर्घ तांडा ॥
मानापमान नकळे मुळिं यांस कांहीं ।
अश्लाघ्य कार्य करितां मनिं खेद नाहीं ॥ ८४ ॥

कान्तेस मासभर दूर करून राहे ।
होई न उत्सुक असा नर कोण आहे ? ॥
पर्जन्य वात हिम सोसुन सागरांत ।
आहोंत, एक अजि वर्ष उणें दहांत ॥ ८५ ॥

कंटाळुनी निघति लोक उतावळे हे ।
सांगावया कुणि नको मजला कळे हें ॥
काढून येथ बहुकाल असें रहावें ।
सांगा कसें विफलयत्न घरास जावें ? ॥ ८६ ॥

भाई ! जरा दम धरा अशि काय घाई ! ।
कल्कास वर्तवि भविष्य असत्य काई ? ॥
प्रत्यक्ष पाहुन तुह्मां सकलांस ठावें ।
जें वर्तलें तरुतलीं मनिं तें अणावें ॥ ८७ ॥

वाहे जिथें विमल वारि तिथें विशाला ।
वेदी रचून शतमेध दिले सुरांला ॥
हे ग्रीक सर्वजण आलिस येथ होते ।
ज्यां मृत्युनें बलि रणांत न घेतलें ते ॥ ८८ ॥

उत्पात दृष्टि पडला मग सावकाश ।
त्या प्रायमा सुचवि सप्रज जो विनाश ॥
वेदींतुनी बहु भयाण भुजंग आला ।
चित्रांग तो सरपटोन पुढें निघाला ॥ ८९ ॥

जोव्हें तयास तर पाठविलें; तसाच ।
घालून घोर वळसे तरु घेरि उंच ॥
शाखेवरि अगदिं शेवटल्या लहान ।
होतीं पिलें चिमणिचीं बसलीं दडून ॥ ९० ॥

तीं आठ त्यांत नववी जननी तयांची ।
काळापरी बघति मूर्ति भयाण याची ॥
केला बहू किलकिलाट तदा पिलांहीं ।
त्यातें दया न निपजे लवलेश पाहीं ॥ ९१ ॥

झाला पिलांस गिळता नच एक बाकी ।
माता विमूढ करुणा बहुवार भाकी ॥
अश्रान्त घालि घिरट्या कशि भोंवतालीं ।
तों तीस पंखिं धरि सर्प वळून खालीं ॥ ९२ ॥

* होती करीत बहु शोक पिलांस खातां ।
भक्षी तिलाच अहि, कोण रडेल आतां ! ॥
तों वृत्त जोव्ह घडवी न तया उशीर ।
पाषाणरूप बनवी अहिचें शरीर ॥ ९३ ॥
उत्पात हा विकट पाडित भीति लोकीं ।
कल्कास जोव्हमन जाणुन बोलला कीं ॥
' कां स्वस्थ आज बसलांत धरून मौन ?
हे ग्रीक हो शिरिं तुरे हलतात कां न ? ॥ ९४ ॥
जोव्हें असें सुचविलें सकळां कळेल ।
कीं कार्यसिद्धिस विलंब जरा घडेल ॥
भक्षी पिलें चिमणिचीं अहि आठ, आणी ।
माता तयांत नववी तशि ही कहाणी ॥ ९५ ॥
जेव्हा लढून दवडूं तितकींच वर्षें ।
तेव्हां जया मिळवुं हो दशमात हर्षें ' ॥
आहेत हे ठरत शब्द खरे तयाचे ।
या ग्रीक हो नगर घेउं अतां नृपाचें " ॥ ९६ ॥
वाखाणती सकल जें युलिसीस बोले ।
हर्षध्वनी उसळतां नभ काय हाले ॥

---

* मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तो मागुनी जात आहे ॥ रामदास.

नौका जलांत डुलती प्रतिशब्द होतां ।
× तो शूर नेस्तर वदे उठुनी विजेता ॥ ९७ ॥

" चेष्टा पुरे खचित युद्ध न पोरखेळ ।
*ठेवा कृतींत अणि उक्तिंत कांहिं मेळ ॥
आहेत कोठ शपथा ? पण काय झाले ? ।
अग्नींत काय उपदेश अतां जळाले ! ॥ ९८ ॥

बाहेर धूर हवनें मधिं भस्मराशी ।
धिक् ! धिक् ! वृथा वहतसों उजन्या करांशीं ! ।
वाचाळता विपुल नाव नसे कृतीचें ॥
वर्षें बहूत बसलों फळ मंद धींचें ॥ ९९ ॥

×नुकतेंच संपलेलें युलिसीस याचें भाषण, आतां होणारें नेस्तर याचें भाषण व अगमेम्ननाचें याच्या मागून होणारें भाषण हीं या आणीबाणीचे वेळीं क्रमानें घालून कवीनें काव्यकलेची एक सुन्दर चातुर्यसीमाच दाखवून दिली आहे. युलिसीस सैनिकांस प्रार्थना करून थांबवून घेत आहे; नेस्तर अशा रीतीनें थांबण्यास तयार झालेल्यांस तत्काल युद्धास सज्ज होण्यास आग्रह करीत आहे; व खुद्द अगमेम्नन सर्व सेनेसमक्ष संधि साधतांच आपली चुकी कबूल करीत आहे म्हणजे तीबद्दल सैन्याच्या मनांतील विषाद अगदीं नाहींसा व्हावा.

* क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे. ॥ रामदास

बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाउलें ॥ तुकाराम

" क्रियेशिवाय केलेली वाचाळता फक्त वृथाभिमानी व कर्मद्वेषी लोकांसच शोभते." "क्रिया विरहित वाचाळता आळसाचें लक्षण आहे" असें डेमास्थेनीस आपल्या देशबांधवांच्या कानीं कपाळीं सारखा ओरडत असे.

रे ऊठ एत्रिअसजा! लढ निश्चयानें ।
ग्रीकांस शत्रुवर ने यश ये अशानें ॥
लुच्चे मरोत जन जाति घरा निघून ।
आतां तयांस यश येइल खास तें न ॥ १०० ॥

जोव्होक्तिची बघितल्याविण हे प्रचीती ।
सोडून बान्धव इथें स्वगृहास जाती ॥
नौकांत वीर करिं घेउन शीर आले ।
जोव्हास संमत समग्र न काय झालें ॥ १०१ ॥

झाला न का गडगडाट तदा विजांचा ।
होता अभाव न अशा शुभ लक्षणांचा ॥
त्या त्रायवासि मृदु सुंदर अंगनांतें ।
आलिंगिल्याविण न जा फिरुनी घरातें ॥ १०२

त्या हेलनेस पडले बहु कष्ट त्याचा ।
घ्या सूड! मान अजि याहुन तो कशाचा? ॥
इच्छा अशांत निघण्यास घरास ज्यास ।
दावील मृत्यु निज धाम अधीं तयास ॥ १०३ ॥

जोव्हप्रसाद नृप! तूं करुनी विचार ।
ऐकें मदीय हितकारक शब्द चार ॥
ज्यां एक देश, आणि एक जयांस जात ।
त्यांचे विभिन्न कर भाग अजी दलांत ॥ १०४ ॥

जातीस जात अणि ओढिल गोत गोता ।
तेव्हां दिसेल तुज खाइल कोण गोता ॥
ज्याचें जसें बल तसा रणिं तो लढेल ।
तो भ्याड, शूर जन कोण, तुला कळेल ॥ १०५ ॥

तूं पाहशील तुज आणित कोण दैन्य ।
तो जोव्हकोप अथवा भयभीत सैन्य " ॥
दे भूप उत्तर " दिसे तुमच्या वचांत ।
नित्यक्रमास धरुनी मज सत्य तात ॥ १०६ ॥

या मेरुनें सजतसे मम मंत्रिमाला ।
हे जोव्ह! दे दश असे मजला नृपाला ॥
तें त्रायपूर पडणार अतां करांत ।
जोव्हें परी मज न ठेवियलें सुखांत ॥ १०७ ॥

तें माजलें उगिच भांडण आपसांत ।
हा शुष्कवाद रिपुभाव अणी मनांत ॥
मीं भांडुनी रुसविला अकिलीस भूप ।
या एक कारण मिळे प्रमदा सुरूप ॥ १०८ ॥

दोघे अह्मीं जर अहा अजि एक होऊं ।
त्या त्रोजनां सतत दुःसह दुःख देऊं ! ॥
व्हा तृप्त जा, करुन जेवण खाण आधीं ।
मागोनियां लगट ती करुं फार युद्धीं ॥ १०९ ॥

ठेवा चला प्रखर पाजळवून भाले ।
ढाली तयार करवा, करण्यास घाले ॥
चारा अतां जवन वारुंस खूप दाणे ।
पाहूं कसा रथ रणीं अणितां दणाणे ॥ ११० ॥

राहूं करीत दिन सर्व, रणांत चाळे ।
वीरां करील परि रात्रि जरा निराळे ॥
घर्में भिजेल गळिंचा मग ढालबंद ।
भाले रणांत फिरतां न उरेल छंद ॥ १११ ॥

जातील अश्व थकुनी रथ ओढुनीयां ।
स्वेदें भिजोन मग होतिल थंड काया ॥
पाहीन ज्यांस रणविन्मुख नौप्रदेशीं ।
श्वानां खगांस बलि देइन त्यांस देशीं " ॥ ११२ ॥

तो थांबतां क्षुभित गर्जति लोक तेवीं ।
वातें तटांवरतिं वीचि फुटून जेवीं ॥
स्थानास जाउन सधूम करुन जाळ ।
सुग्रास अन्न जन सेविति अल्प काळ ॥ ११३ ॥

एका सुरास जन एक दुजा दुजातें ।
संरक्षणार्थ बलि देत जपून हातें ॥
आणून थोर वृष मांसल जो सुरूप ।
सॅतर्नजास बलिदान करीत भूप ॥ ११४ ॥

पाचारिलें गुरुजनांस तदा नृपालें ।
ते ग्रीक नेस्तरविशिष्ट म्हणून आले ॥
आजक्षबन्धुंसह तैदिअसात्मजानें ।
सन्मानिलें नृपनिमंत्रण संभ्रमानें ॥ ११५ ॥

आला इदामिनिअसाख्य सभेस वीर ।
प्रख्यात तो नृपवयस्य रणीं अधीर ॥
जोव्हासमान बहुमान जया मिळावा ।
तो येत सुज्ञ युलिसीस तिथें सहावा ॥ ११६ ॥

आमंत्रणाविण अला नृप मेनिलास ।
जो बन्धुचें हृदय जाणतसे उदास ।
मध्यें महोक्ष अणितां मग भोंवताले ॥
श्रद्धा धरून मनिं वीर जमा जहाले ॥ ११७ ॥

घेती करांत यवपिण्ड बहू विशाल ।
जोव्हास उद्धृत करें विनवी नृपाल ।
"हे जोव्ह! सौख्यकर! नीलघनाम्बुवाह! ॥
आकाशिं तूं वससि! शत्रुतृणास दाह ॥ ११८ ॥

तें त्राय पूर मिळवीन धुळीस सारें ।
पाडीन उच्च तट जाळिन थोर दारें ॥
पाडोनियां कवच फोडिन हेक्तराचें ।
खोंवीन खोल उरिं खांजिर मीं तयाचे ॥ ११९ ॥

कापीन मी सहजनांस सभोंवतालीं ।
दंतें धरा धरुन ते पडतील खालीं ॥
जों वैरशुद्धि अशि साध्य न होय मातें ।
एकान्त शान्तिसुख होत न जों मनातें ॥ १२० ॥

तों जाउं देइं रविला नच मावळाया ।
देईं न दुर्धर तमा इकडे वळाया." ॥
थांबे नृपाल. वच जोंव्ह करी न मान्य ॥
दानप्रतिग्रह करी धारि हेतु अन्य ॥ १२१ ॥

यांचे परिश्रम फलद्रुप व्हावयास ।
सोत्कण्ठ वासर हवे किति जावयास ॥
अभ्यर्थना करुनि देति बली करानें ।
ते सिंचिती सकल पिष्टयवां जलानें ॥ १२२ ॥

तत्काल वध्य बलिची वळवून मान ।
निश्चर्म त्या नृपकरी वधुनी जपून ॥
मेदांत घोळवित तोडुन सक्थिखंड ।
आच्छादनार्थ वर ठेवित मांसपिण्ड ॥ १२३ ॥

निष्पर्णकाष्ठफलकीं मग मांडुनीयां ।
अग्नीवरी धरुनि काढिति भाजुनीयां ।
अंत्रांत रोंवुन अनेक निशात शूल ॥
भाजून अग्निवरि घेति तयां समूल १२४ ॥

घेऊन अंत्ररुचि शेष उरे तयाचे ।
काढून काप मग रोंविति शूलिं साचे ।
भाजून सर्व करिती अणिं सिद्धता ते ॥
पात्रें विशाल बहु मांडिति एक हातें ॥ १२५ ॥

ही पाकसिद्धि अटपून धरून जोर ।
मिष्टान्न सेविति यथेच्छ लहान थोर ॥
येऊन नेस्तर वदे "अगमेम्नना हे ।
हे थोर एत्रिअसजा जनपाल! पाहें ॥ १२६ ॥

द्यायास देव यश येत असें असोनी ।
कां बोलुनी दवडतां समया बसोनी ? ॥
पाचारुं या स्वजन धाडुन भालदार ।
तें जागवूं रण निरीक्षुन सैन्यभार " ॥ १२७ ॥

भूपें दिलें मत. पुकारति भालदार ।
तत्काल वीर जमले रणिं डौलदार ॥
त्यांतें व्यवस्थित उभे करण्यास आले ।
ते जोव्हभक्त नृप तुष्ट बहूत झाले ॥ १२८ ॥

ती तेथ नीलनयना चपला मिनर्वा ।
हातांत ढाल धरि ईजिस मूळ गर्वा ॥
भीतें जितें मरण, जीस जरा चपापे ।
यन्मध्य शोभत सुवर्ण दशाकलापें ॥ १२९ ॥

पाहून वीण गमतें नच मान मोला ।
प्रत्येक तन्तुस तसें न शतांस बैलां ॥
देवी अतां धरुन ईजिस ती करांत ।
क्रोधेद्ध दृष्टि फिरवी समरीं क्षणांत ॥ १३० ॥

उत्साह चित्तिं, बल बाहुंत तें भरोनी ।
ग्रीकांस धाडित रणीं लढण्या फिरोनी ॥
वाटे रण प्रिय तयां गृहही तसें न ।
हें वीर युद्ध धरतील न थांबवून ॥ १३१ ॥

* मोठें अरण्य गिरिच्या शिखरावरील ।
जाळी दवाग्नि पसरे दुरि झोत लाल ॥
सेनाप्रयाणसमयीं तशि आयुधांची ।
फांके प्रभा धरुन वाट वरीं नभाची ॥ १३२ ॥

---

* ही असंख्य सेना समरकार्याला निघाली असतां तिचें वर्णन होमरनें पांच प्रकारच्या पांच निरनिराळ्या उपमा योजून केलें आहे. १ त्यांच्या शस्त्रास्त्रांचें तेज अग्नि प्रमाणें दिसत होतें इ०; २ लढाईस व्यवस्थित रीतीनें आपआपल्या जागेवर जाण्याकरतां सैनिकांचा इकडून तिकडे जातानां झालेला संचार हंसाच्या गर्दीप्रमाणें दिसत होता इ०; ३ सैनिकांची संख्या मोठ्या अरण्यांतील वृक्षांच्या पल्लवांप्रमाणें अगर फुलांप्रमाणें अगणित वाटत होती इ०; ४ सैनिकांचा आवेश गोंगावणाऱ्या माशांच्या त्वेषाप्रमाणें होता. इ०; व ५ सेनापतीची आज्ञा पाळून व्यवस्थित रीतीनें रहाणारे सैनिक, मेंढपाळांच्या ह्मणण्याप्रमाणें चालणाऱ्या मेंढ्याप्रमाणें दिसत होते इ० या बहुविध कल्पनेबद्दल कविची करावी तेवढी तारिफ थोडीच आहे.

जैसे असंख्य गण धांवति त्या खगांचे ।
एशीअसोपवनिं वारिमयीं सदांचे ॥
कारण्डवांसह बलाहक, हंसराज ।
माना वरी उचलुनी उडतात रोज ॥ १३३ ॥

ते श्येन पुष्ट, पळती सह दुष्ट काक ।
मारीत जाति वनिं कर्कश दीर्घ हांक ॥
पक्षध्वनींत नभ मग्न करीत येती ।
वेगें जलाशयतटीं तळ सर्व देती ॥ १३४ ॥

तैसें असंख्य समरप्रिय जें निघालें ।
तें ग्रीकसैन्य करण्यास्तव घोर घाले ॥
स्कामंदरीं थडकलें रणिं थोर अंतीं ।
पर्णें फुलें पसरलीं वनिं वा वसंतीं ॥ १३५ ॥

चर्वीतुनी स्रवत गोव्रजिं दुग्ध जेव्हां ।
गोंगावुनी मशक धांवति फार तेव्हां ॥
तैसे तुटून रणिं शत्रुवरी पडाया ।
ते ग्रीक सर्व टपले झगडा कराया ॥ १३६ ॥

एकत्र कीं मिसळतां कुरणीं विशाल ।
मेंढ्यांस दूर करितो मग मेंढपाल ॥
सेनापती कुशल युद्धविशारदांच्या ।
रांगा तशाच रचिती निज सैनिकांच्या ॥ १३७ ॥

सेनापतींत सगळ्या अगमेम्ननाचें ।
तें रूप सोज्वळ खरें न तसें दुजाचें ॥
पाहून नेत्र बहुदीर्घ विशाल भाल ।
जोव्हास मत्सर भरे मनिं सर्व काल ॥ १३८ ॥
तो मार्स मध्य बघुनी मनिं खंगतो कीं ।
नेप्चून लज्जितमुखें तदुरा विलोकी ॥
वीरांत वीर नृप होय बली बलांत ।
+शोभे महोक्ष जणु उन्नत गोव्रजांत ॥ १३९ ॥
आलिंपसीं सतत देवि ! करून वास ।
तूं पाहसी सकल जें न कळे अह्मांस ॥
संक्षिप्त मागुन दुरून पडेल कर्णीं ।
तें पूर्ववृत्त कवि नित्य अजाण वर्णी ॥ ॥ १४० ॥
ते ग्रीक नायक तदा रणिं कोण आले ।
हें वृत्त सांग ह्मणुनी मज वेगळालें ॥
* होतीं मला दशमुखें रसना तशाच ।
लोहापरी हृदय कंटक कंठ साच ॥ १४१ ॥

+ या वर्णनाचें कालिदासानें केलेल्या प्रताप व ऐश्वर्य या गुणानीं युक्त अशा दिलीप राजाचे वर्णनाशीं साम्य आहे.

व्यूढोरस्को वृषस्कंधः शालप्रांशुर्महाभुजः ।
आत्मकर्मक्षमं देहं क्षात्रधर्म इवाश्रितः ॥ रघुवंश.

* या श्लोकांतील कविजनसांप्रदायिक अतिशयोक्तीचा मासला श्रीधर-कवीचे ग्रंथीं खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. फरक एवढाच कीं होमर हा अगाध

त्याची तरी न शकतों गणना कराया ।
साहाय्य दे ह्मणुनियां मज लेंकरा या ॥
नौका किती, अधिप कोण असे धरून ।
तें वर्णितों सकल विस्तर मी करून ॥ १४२ ॥

श्रीकचक्राचें वर्णन करण्यास स्वतःचें असामर्थ्य कबूल करून वाग्देवीच्या कृपा प्रसादाची याचना करीत आहे, व तीच याचना श्रीधर हा अज, अजित, अतर्क्य परमात्म्याचें अगाध गुणार्णव वर्णन करण्याकरतां करीत आहे.
धरित्रीचें करूनि पत्र । कुधर कज्जल, जलधी मषीपात्र । सुरद्रुम लेखणी विचित्र । करूनि लिहीत कंजकन्या ॥ २७ ॥ तेही तेथें राहिली तटस्थ । तरी आतां केविं करूं ग्रंथ । जरी तूं मनीं धरिसी यथार्थ । तरी काय एक न होय ॥ २८ ॥
शिवलीलामृत. अ० प० २७।२८ ओ.

नौकाची नामावलि.

आतां कथितों कोण कोण । सैन्याधिप रणीं धुरीण ॥ सेना घेवोनी प्रवीण । नौकांतून पातले ॥ १ ॥ पेन्यूलीस लिइतस । प्रोथोइनार क्लोनिअस ॥ पांचवा आर्कीसिलास । नेते बेओशिअनां पैं ॥ २ ॥ कृषीवल हैरीइचे । शिलापूर्ण आलिसचे ॥ स्कीनासींचे स्कोलासींचे । मोठे झुंझार ॥३॥ पर्वतमय ईतीओनसेच । समस्थल मिकालेससचे । थेस्पिएचे ग्रीआचे । रणीं आले सोत्साह ॥ ४ ॥ हार्मावासी इलेशिअसवासी । तैसे भट एरिथ्रीवासी । इलिअनवासी दुजे वीर ॥ ५ ॥ पेतीअनाचे ओकालिएचे । सुरचित मेदीअनचे ।युत्रेसिसचे कोपीचे । हैलीचे महायोद्धे ॥ ६ ॥थिस्बीपुर कपोतमय । हालिअर्तस तृणमय। ग्लीसा प्लेतिआ मृणमय । येथुन आले सुभट ॥ ७ ॥ जे राहती हिपोथिबींत । सुंदर पवित्र आन्कीस्तसांत । नेपचूनाच्या आश्रमांत । अथवा कारोनीएंत ॥ ८ ॥ द्राक्षीप्रचुर आर्नीनिवासी । मिदीआनिवासी निसानिवासी । दूरचे आन्थीदनवासी । रणलोभी प्रसिद्ध॥९॥ नौका अशानीं पन्नास । भरुनी आल्या त्रायास । प्रत्येकीं* शंभर

---

*बेओशिअन वीरांच्या प्रत्येक नौकेंत १२० सैनिक होते. व फिलोक्टेतीसानें आणलेल्या प्रत्येक नौकेंत ५० सैनिक होते. यांत नावाडी व मुख्य सरदार धरलेले नाहींत. तथापि १२० ही सर्वांत मोठी संख्या व ५० ही सर्वांत लहान अशी दिलेली आहे. असें धरलें ह्मणजे, ज्या अर्थी सर्व नौकांची संख्या १२००होती त्या अर्थी एकंदर ग्रीक लोकांचें सैन्य सरासरीनें ९६०००शहाण्णव हजार होतें असें निघतें. यांत अतिशयोक्तीचा भाग फार असावा असें विद्वानांचें मत आहे.

आणी वीस । घेउन बेओशिअन ॥ १० ॥ आस्प्लीदनचे भांडखोर । आर्कोमेनसचे थोर थोर । मीन्यीअन ते वीर घोर । नायक दोघे मार्सपुत्र ॥ ११ ॥ दोघांची माता आस्तिओकी । होती रंभा देवलोकीं । तिनें मार्सास भुलविलें कीं । आक्तरगृहीं ॥ १२ ॥ शीलवन्त ऐशी कुमरी । जात असतां माडीवरी । मार्सें आलिंगिली सुन्दरी । गर्भधरी तत्तेजें ॥ १३ ॥ झाले पुत्र दोन तीस । एक हा आस्केलाफस । दुजा आयेल्मेनस । सैन्याध्यक्ष जाहले ॥ १४ ॥ नौका यांच्या तीस । कापोनी महोदधीस । शब्द करीत घिस घिस । थडकल्या पैं ॥ १५ ॥

नाबोलससुत इफितस । त्याचा सुत एफित्रोफस । दुसरा तो स्केदिअस । फोकीअनां नेत असे ॥ १६ ॥ सैपेरिससीं हे वसति । शिलामय पैथनीं राहती । दिव्य क्रिसेंत अथ दिसती । वारंवार ॥ १७ ॥ ज्यांचें स्थल पॅनोपिया । दालिस आणि आनिमोरिया । सेफिससतीरीं लिलीया । जमले सारे येथील ॥ १८ ॥ चाळीस नौकांत निघाले । बेओशिअनां ह्यांपेलिसाहून आले । सन्निध पातले । वाम बाजूस ॥ १९ ॥ आजक्ष ओइलीअसज । जाणतांच रणिचें काज । निघाला घेउनी आज । लोक्रिअनां निःशंक ॥ २० ॥ आजक्ष तेलामनज । याहुनियां उंच सहज । त्या-समं करी हा झुंझ । अधिक ठेंगणा असून ॥२१॥ घाली साधें कवच तागी । भाला मारी शत्रुलागीं । तैसें चातुर्य नाहीं अंगीं । कोणाचे ही ॥ २२ ॥ सैनसवासी ओपसवासी । बेसावासी स्कार्फावासी ।

आजीइयावासी ताफीवासी । कालिआरसवासी शूर जे ॥ २३ ॥ बोआग्रिअस नदीतीर । तेथोनीयां येती वीर ॥ थ्रोनिअमचे भट अधीर । जाती संगें सहर्ष ॥ २४ ॥ हेलिनीस एकियन । यांहुन तनुनें हा ल्हान । त्यांतें जाई हार हा न । पराक्रमी आजक्ष ॥ २५ ॥ पवित्र युबेआमधल्या । चाळीस नौका आल्या ॥ लोक्रिअनांनीं भरल्या । गच्च सर्व ॥ २६ ॥

कारिस्तसचे स्तैराचे । विकटोदधि सेरिन्थसचे । उच्च अशा दियमपुरचे । शूर जेते ॥ २७ ॥ कालिसचे युबेआचे । द्राक्षीमय प्रदेशाचे । आले भट हिस्तिइयेचे । एरित्रियेचे बलाढच ॥ २८ ॥ मार्सवंशी एलिफिनार । काल्कोदनचा कुमर । आबान्तीसांचा नृपवर । नौका भरीत चाळीस ॥ २९ ॥

चपल सर्व आबांतीस । ×पाठीवरी रुळती केश । तीक्ष्ण घेती शस्त्रांस । उर अरीचे भेदाया ॥ ३० ॥ सुन्दर पुरी अथेन्स । संस्थान वसवी एरिक्थिअस । वाढवी मिनर्वा ज्यास । मंदिरीं ॥ ३१ ॥ तीर्चें अजुनी अथीनिअन । वर्षास करिती पूजन । अजांदींचें बलिदान । करोनियां ॥ ३२ ॥ पेटिअसपुत्र मेनिस्थिअस । रणांत अणितां यांस । अश्वयुद्धीं मिळे त्यास । प्रथम पद ॥ ३३ ॥ तो कांहींसा

×या वीर जातीची अशी चाल होती कीं डोक्यावर पुढल्याभागीं केंस राखावयाचें नाहींत. न जाणों शत्रू निकराचे वेळीं हात घाईस येऊन पुढले केंस हातीं पडतांच ते ओढून यांस पाहिजे तसे वांकवतील. डोक्याचे मागील भागीं ते लांब केंस ठेवीत असत. परंतु त नडण्याची यानां भीति नव्हती कारण यांच्या सारखे शूर पुरुष शत्रूला पाठ कधींहि दाखवीत नाहींत.

नेस्तर । वयानें पडला थोर । चातुर्यें ये बरोबर । ह्मणोनीयां ॥३४॥ यांच्या नौका पन्नास । शिवाय ह्मणा द्वादश । ज्यांत भरले सेलामिस तेलामनजें ॥ ३५ ॥

दूर देश अर्गोस । प्राकाररक्षित तिरिन्स । मृद्विकाप्रचुर एपि-दारस । भट आले येथले ॥ ३६ ॥ प्रसिद्ध पुरी हर्मिओनी । साग-राकुल आसैनी । एइयोनी व त्रिझेनी । भट आले येथले ॥ ३७ ॥ माझीस आणि एजिना । येथील येती वीर नाना । सज्ज होउनी रिपुदमना । एकियनाख्य तरुण ॥ ३८ ॥ कापेनिअसाचा पुत्रक । स्थेनिलस लोकनायक । दायोमीद शत्रुभंजक । दोघे सेनानी ॥३९॥ तिसरा युरिआलस । केवल देवमाणुस । पिता तयाचा मेसिस्त्यूस । पितामह तेलास तो ॥ ४० ॥ दायोमीद इतुक्यांस । आणिता झाला समरास । करुनियां जलप्रवास । ऐशीं नौकांत ॥ ४१ ॥

प्राकाररक्षित मिसिनी । आर्निआ आणि क्लिओनी । सधन स्थल कारिन्थ जनीं । वीर निघाले तेथले ॥ ४० ॥ आरीथेरियेचे धनी । सिसायनचे वीर मानी । यांचा होउनी सेनानी । अद्रास्तस नृप येई ॥ ४१ ॥ हैपरेशिएमधून । तैसे गोनोइसेहून । पेलिनीचे ते दुरून । एजिअमस्थ भट आले ॥ ४२ ॥ सागर तटनिवासी । ज्यांची भूमि ती हेलिसी । करिती नायक अगमेम्ननासीं । ते शत नौकांचा ॥ ४३ ॥ सर्वे सेना सर्वोत्कृष्ठ । वैभवानें गर्विष्ठ । कवचें अंगीं वरिष्ठ । तेणें तुष्ट मानसीं ॥ ४४ ॥ सर्वांत याची महती । विपुल सैन्या बघुनी भीती । शत्रुसंघ आज किती सांगवेना ॥ ४५ ॥

दरीयुत लेसिदीमनांत । स्पार्टांत अथ फारिसांत । कपोतप्रचुर मेसांत । राहती जे ॥ ४६ ॥ ब्रैसीयींत आमिक्लींत । समुद्रतटीं इलासांत । सुखद अशा आजीइयींत । राहती जे ॥ ४७ ॥ लाआसांत ईतैलसांत । वीर जे जे राहतात । साठ नौका प्रख्यात । निघाल्या त्वरेनें ॥ ४८ ॥ नेता तयांचा मेनिलास । ज्याचें प्रसिद्ध रणीं साहस । वीरां उत्तेजन द्यायास । येई स्वतां ॥ ४९ ॥ हेलनचे जाहले हाल । ते आठवुनी वीर जहाल । कोपानें होत लाल । ह्मणे घ्या सूड आतां ॥ ५० ॥

सुखकर आरेनींत । राहती जे पैलसांत । थ्रिआसांत आल्फिअसांत । जे वीर ॥ ५१ ॥ वसती ईपैच्या कोटांत । जे कां सिपारेसिइसांत । आम्फिजेनिएंत तेलियमांत । ते वीर सर्व निघती ॥ ५२ ॥ हेलासवासी दोरियमवासी । निघाले वीर साहसी । नायक करिती नेस्तरासीं । नव्वद नौकांचा ॥५३॥ येथेंच पुर्वीं काव्यदेवता । थेशिअन थामिरिस भेटतां । ईकेलिएहुनी परत येतां । भांडल्या कीं ॥५४॥ होता वदला गर्वानें । कीं सकल देवता निज गानें । हरण्या मद्यश मानें । नसती समर्थ ॥५५॥ काव्य देवता कोपती । आंधळा त्यास करती । गायनकला त्याची हरिती । कवित्व ही मागुनी ॥ ५६ ॥

पवनेरित पर्वत सिलेनी । ईपैतस जेथ ठेविला पुरुनी । येती भट तेथोनी । आर्केदिएचे ५७ आर्कोमीनस अजाप्रचुर । विख्यात रैपीनगर स्त्रेतिई पत्तन सुंदर । वीर येथले थडकले ॥५८॥ वातेरित एनिस्पीचे । फेनीअसचे तेजिएचे । सुखद मान्तिनिएचे । वीर विक्रान्त ॥ ५९ ॥

स्तिम्फालसस्थ पराक्रमी। पऱ्हेशिइस्थ नाहीं कमी। नायक त्यांचा फार नामी। आन्कीअसज ॥६०॥ आगापीनार त्याचें नाम। साठ नौका वेई उत्तम। आर्केदिअन शूर परम। सवें जाती ॥ ६१ ॥ मुखासन-नौका सुन्दर। एत्रिअसज नृपवर। देई होउन उदार। अनभ्यस्तां* यां वीरां ॥ ६२ ॥

बुप्राशिअमस्थ एलिसस्थ। हर्मिनीस्थ मिर्सिनसस्थ। भट आले आलिशियमस्थ। ओलिनिअनां शिवाय ॥ ६३ ॥ यांचे नायक चार। नौका घेती दहा तयार। ईपीअनां बरोबर। घेती कांहींना ॥ ६४ ॥ आक्तरमुत युरैतस त्याचा पुत्र थालिपअस। क्ती-आतसपुत्र आम्फिमाकस। चारां पैकीं दोन हे ॥ ६५ ॥ आमा-रिन्शिअसज दायोरीस। नेत दुजां वीरांस। पुण्य पुरुष पालिझेनस। चवथा पैं ॥ ६६ ॥ सुत हा आगास्थेनीसचा। नातू ह्मणा आजी-आसाचा। पालक प्रसिद्ध जनांचा। वात्सल्ययुक्त ॥ ६७ ॥

पारोदधि एलिसच्या समूर। पवित्र द्वीपीं वसती शूर। दुलिचि-यमांमाजी वीर। एकिनेदीसांत पैं ॥ ६८ ॥ जोव्हप्रिय फैली-अस। त्याचा पुत्र मेजीस। शौर्यें हरवी मार्सास। विलक्षण हा ॥ ६९ ॥ राग धरुनी पितयावरी। दुलिचियमास पळाला दुरी। नौका चाळीस त्राया परी। घेऊनी चालला ॥ ७० ॥

---

* आर्केदिअन लोक समुद्रकांठापासून फार लांब अंतरावर रहात असत्यामुळें त्यांस नौकानयनाचें चांगलें ज्ञान नव्हतें. ह्मणून अगमेम्ननानें चांगल्या नौका सामग्रीसह त्यांच्या करतां ठेविल्या होत्या.

सेफालिनिअन सरदार । नेतो युलिसीस उदार । इथाकाचे बरोबर । घेउनियां ॥ ७१ ॥ कम्पितपल्लववृक्षांनीं । नेरितस भरलें उपवनांनीं । भरली जैसी वीरांनीं । क्रोसैलीआ नगरी ॥७२॥ प्रस्तरमय एजिलिप्स । झासिन्थस व सामास । दूर द्वीपें आसपास । तेथुन्नियां वीर आले ॥ ७३ ॥ ज्ञानें समान जोव्हास । ऐसा थोर युलिसीस । द्वादश ताम्र नौकांस । घेउनियां पातला ॥ ७४ ॥

आन्द्रीमनज थोआस । नेई ईतोलिअनांस । प्ल्यूरनीं ज्यांचा वास । त्यांस संङ्गें आणीतसे ॥ ७५ ॥ फैलेनीचे ओलेनसचे । उदधितीरींचे कालिसचे । प्रस्तरमय कालीद्नचे । निघाले ते ॥ ७६ ॥ ईनियुसाचे थोर सुत । आतां झाले स्मृतिगत । दुर्दैवी त्यांचा तात । तो ही नसे ॥ ७७ ॥ सुन्दरकेशी मीलीएजर । काय झाला वीरवर । मातुलशापें भयंकर । नाश पावे ॥ ७८ ॥ ह्मणोनि सैन्याधिपति । थोआसातें करिती । चाळिस नौका निघती । ईतोलिअनांच्या ॥ ७९ ॥

अचुक भाला मारी अरिस । प्रसिद्ध इदामिनिअस । नेत रणीं क्रीतनांस । नोससवासी ॥ ८० ॥ तटरक्षित गार्तिनाचे । लिक्त-सचे मिलीतसचे । गोरे भुरके लिकास्तसचे । फिस्तसस्थ न्हिति-अमस्थ ॥ ८१ ॥ शत पुरीनीं शोभला । क्रीतचा प्रदेश चांगला । इदामिनिअसा लाधला । दैवयोगें ॥ ८१ ॥ ॥ ८२ ॥ मार्ससारिखा शूर । मेरिआनीस दुजा वीर । नौका ऐशीं सुन्दर । घेवोनियां पातला ॥ ८३ ॥

वसती जे लिन्दसांत । किंवा कामिरसांत । अथवा आयेलिस्ससांत । येतां करीती संघ तीन ॥ ८४ ॥

हर्क्यूलीसकुलज शूर। तिलिपोलीमस येत दूर । केल्याविना कुरकुर । ऱ्होदिअनां घेउन ॥८५॥ हर्क्यूलीस याच्या मातेस । सुस्वभाव आस्तिओकीएस । सीलीइसच्या पैलतीरास । एफिरींतुन हरीतसे ॥ ८६ ॥ राजपुत्र बहु कुलीन । वयानें अगदीं तरुण । त्यांचीं नगरें जाळुन टाकिलीं यानें ॥८७॥ प्रासादीं भोगुनी सुखांस । वाढला तिलिपोलीमस । वधीतसे वृद्ध चुलत्यास । आवडत्या पितयाच्या ॥८८॥ लिसिम्निअस त्याचें नांव । मार्सवंशीं त्याचा संभव । त्याचें थोर विभव । काय वर्णावें ॥ ८९ ॥ असो; हा बांधवी आरमार । मेळवी थोर सरदार । उदधीवरी संचार । करी सदा ॥ ९० ॥ हर्क्यूलीसाचे सुत । तैसे नातू याशीं भांडत । पडोनियां संकटांत । पळत हा ॥ ९१ ॥ ऐसा भटकत भटकत । आला ऱ्होद्स पुरांत । मार्गींचे कष्ट काढीत। नानापरी ॥ ९२ ॥ पहिले तीन स्थलीं वसती । जाहल्या त्यांच्या तीन जाती । जोव्हा प्रति आवडती । वित्त वर्षीत त्यांवरी ॥ ९३ ॥

आग्लाइआ ज्याची माता । कारोपस होय पिता । निरिअस तो आणी आतां । तीन नौका सैमीहून ॥ ९४ ॥ इलियमीं जमले नृप अपार । त्यांत हा फार सुन्दर । पेलिअसज भूपा जर। वगळीलें ॥९५॥ परी शरीरें नाजुक ह्मणुनी । सर्वे येती स्वार मोजुनी । शौर्यें उणा नाहीं कोणी । रतिभरी ॥ ९६ ॥

जेथिल नृप युरिपैलस । तें कास व काससं । क्रापेथस व निझैरस ।

वीर निघाले तेथिल ॥ ९७ ॥ कालिद्नीद्वीपांतले । वीर प्रबल निघाले । यांचे नायक झाले । थेसलिपतिचे आत्मज ॥ ९८ ॥ आन्तिफस नांव एकाचें । फिदिप्पस दुसऱ्याचें । अधिपत्व तीस नौकांचें । हर्क्यूलीस-पौत्रांचें ॥ ९९ ॥

शारदे ! पाहें जर कथिसी । कोण आले अर्गासवासी । त्रेचिनवासी एलासवासी । आलोपीवासी तैसे ॥ १०० ॥ कोण आले थियाहुन । किंवा त्या हेलासाहुन । अधिक रम्य जेथल्याहुन । रामा नसती कोठेंही ॥ १०१ ॥ ते लोक मिर्मिदन। दुसरे आणि एकियन । हेलिनीस अरिदमन । त्यांचा नायक अकिलीस ॥ १०२ ॥ यांतें न रणनाद ठावा । युद्धाचा नेणती कावा । अशांच्या पन्नास नांवा । निघतां उपयोग काई ॥ १०३ ॥ नायक अकिलीस राजा । रुसला त्यजून रणकाजा । कारण झाली ब्रैसीसजा । मेळविली जी पराक्रमें ॥ १०४ ॥ लुटीत असतां लिर्नेससा । लाधली ती अकिलीसा । अनवद्याङ्गी सहसा । ब्रैसीसजा कुरळकेशी ॥ १०५ ॥ यानें थीब्रतट पाडिले। लिर्नेससा विध्वंसिलें। एपिस्त्रोफसा मारिलें । मैनीतीसासह ॥१०६॥ यांचा पिता ईव्हीनस। पितामह सेलीपिअस । ठावे सर्वत्र लोकांस सारखे हे ॥१०७॥ असो; ब्रैसीसजा ऐशी । अगमेम्ननें हरिली कैशी । रडत होता नौकांशी । पुन्हा उचल कराया ॥ १०८ ॥

कुसुममय पीऱ्हासस । सीरीसचा पुण्यनिवास । येथुन वीर समरास । जाया मज्ज पातले ॥ १०९ ॥ अजाप्रचुर ऐतनांतले । फैलेसींतले आंत्रनातले । तृणमय तीलनांतले । धांवले सोत्साह

॥ ११० ॥ प्रोतीसिलास नृप सन्त । होता जोंवरी जीवन्त । राज्य करीत पसंत । यांवरी ॥१११॥ भूमें घेतां या पोटांत । जाउनियां फैलेसींत । पत्नी निर्वस्त्र फिरत । मंदिर असमाप्त राहिलें ॥ ११२ ॥ हिचा पति ग्रीकांत पहिला । नौकेंतुन उडी घे तीराला । त्रोजनानीं तो वधिला । दुष्टपणें ॥ ११३ ॥ ऐसा नायक जातां । म्हणती आह्मां कोण आतां । पोदार्सीस झाला नेता । महाशूर ॥ ११४ ॥ याचा पिता इफिक्लस । पितामह फैलेकिस । भ्राता प्रोतीसिलास । शौर्यें, वयें अधिक ॥ ११५ ॥ चाळीस नौकांत बसुनी । यांचे स्वार पातले रणीं । नायक लाधला तरी मनीं । झुरती त्याच्या साठीं॥११६॥

बीबीइस सरोवर । त्याच्या निकट फेरीपुर । तैसें विस्तृत बीबीनगर । ग्लाफैरीप्रमाणें ॥ ११७ ॥ आयेओल्कस सुरक्षित । तेथील वीरां रणीं नेत । आद्मीतसचा सुत । युमेलीस ॥ ११८ ॥ पेलिआसाच्या सुन्दर दुहिता । त्यांतली एक याची माता । अखिल जगीं पाहूं जातां । नाहीं ऐशी ॥ ११९ ॥ ऐसें स्त्रीरत्न आल्सेस्तिस । वरिता झाला आद्मीतस । यांचा सुत युमेलीस । नौका नेई एकादश ॥ १२० ॥

मेथोनीवासी थामेशिआवासी । मेलिबीआवासी ओलिझनवासी । नेता फिलोक्तेतीस यांसीं । धनुर्धारी प्रसिद्ध ॥१२१॥ सात घेतसे नौकांस । नावाडी वरी पन्नास । सोडिती जे बाणांस । नेम चुकेना कधींही ॥ १२२ ॥ विपरीत काळ आला । त्यातें सर्पदंश झाला+ ।

*मिनर्वेचें स्थंडिल झाडुन साफ करीत असतां यास सर्पदंश झाला. व्हल्कनचे

लेम्नास पुरीं त्या दिधला । टाकुनियां विव्हळत ॥ १२३ ॥ असो प्रसंग येतां कठिण । तुमुल मातेल जेव्हां रण। होईल त्याची आठवण। ग्रीकांस याच ॥ १२४ ॥ जरी हाच हवा होता । अभावीं मिळाला दुजा नेता । मीदन नामें तत्वतां बलाढय वीर ॥ १२५ ॥ ओइलीअसची राख । र्‍हिनानामें सुरेख । तियेशीं झालें सुख । मीदन नन्में ॥ १२६ ॥

विख्यात ऐथोमीवासी । इकालिआवासी त्रिकावासी । युरैतस ज्यांतें पोशी । यत्नें करून ॥ १२७ ॥ एस्क्युलेपिअसनंदन । पोदालिरिअस व मेकाअन । वैद्यराज फार प्रविण। दोघेजण प्रासिद्ध॥ १२८॥ आणून नौका तीस । उभ्या करोनी ओळीस । नेती शूर अक्षौहिणीस । कौशल्यानें ॥ १२९ ॥

आर्मेनियमपुरवासी । सरोवरिंचे हिप्पेरिआवासी । शुभ्रशिखरिंचे तितानसवासी । आस्तेरियमवासी अन्य ॥ १३० ॥ इव्हीमनचा सुत । युरिपैलस यांस नेत । चाळीस नौका सुरक्षित । घेवोनियां ॥ १३१

आर्गिसावासी । गिर्तोनिवासी । ओर्थीवासी एलोनीवासी । शुभ्रवर्ण ओलूसनवासी । युद्धार्थ सिद्ध पातले ॥ १३२ ॥ त्यांचा नेता पालिपीतीस । पिता तयाचा पिरिथैास । जोव्हें उत्पादिलें ज्यास ।

पुजारी विषवैद्य होते म्हणून याला येथेंच ठवून ग्रीक पुढें गेले. पण ईश्वरी संकेत असा होता कीं हर्क्यूलीसकृत बाण (ज्यांपैकीं याचे जवळ कांहीं होते) उपयोगांत आणल्या शिवाय त्राय हस्तगत होणार नाहीं. म्हणून यास येथें ठेवल्याचा पश्चाताप अकिलीसच्या मरणानंतर ग्रीकांस झाला. मग युलिसीसला याकडे पाठवून याला आणवून ह्या बाणांनो पारिसला मारल्यानंतर त्राय नष्ट झालें.

अमरानें ॥१३३॥ पेलियनाद्रिवरि करूनी साहस । कैंसाळ सेंतारांस । पिटाळीतसे पिरिथौस । एथिसीअनांपर्यंत ॥ १३४ ॥
हिप्पोदेमिआ सुन्दरी । प्रसंगानें गर्भधरी । पिरिथौसें भोगिल्यावरी । पालिपीतीस उपजे तो ॥ १३५ ॥ नोहे हा नेता एकला । लिआन्तिअस होता भला । कारोनसचा पुत्र चांगला । नातू सीनीअसाचा ॥ १३६
सर्वं सेना बहूत । चाळीस नौका सुरक्षित । संभाळुनी नेत । ल्ढायातें ॥ १३७ ॥
प्रसिद्ध नगरी सैफस । तेथोनी आला जिनीअस । नौका सर्वं बावीस । घेवोनीयां ॥१३८ ॥ अनुसरती एनिएनिस । पेरिबै करती मदतीस । शीतल दोदोनातीरीं वास । ज्या साहसिकांचा ॥ १३९ ॥ तितेरीशिअस नदी बरी । निर्मल स्फटिकाचे परी । पिनिअसा मिळे वरीवरी । चमत्कारें ॥ १४० ॥
पिनिअसाचे रूपेरी भोंवरे । त्यांवरी हिचा प्रवाह तरे । जैसें कीं तैल पसरे । जलावरी ॥ १४१ ॥ तितेरीशिअस निर्झरणी । ह्मणजे स्तिक्सनदीचें पाणी । दुरुनी जी वाहुनी आणी । शपथ घेती जन ज्याची ॥ १४२ ॥ तेथले हे शेतकरी । उल्हास वृत्ति त्यांची खरी । रणीं हा पातल्यावरी । अचल असे ॥ १४३ ॥
तेंथ्रीदनसुत प्रोथौस । नौका सर्वं चाळिस । घेउन वीर माग्नेतीस । धांवला पैं ॥ १४४ ॥ पिनिअसतीरीं यांचा वास । हेतु पेलिअनीं सुखास । जेथिल सपर्णवृक्षांस । कम्प येई पवनानें ॥ १४५ ॥

शारदे ! आता सांग । पाहुनी वारूंची रांग । कैसा तीचा ढंग । नीटपणें ॥ १४६ ॥ कोण नृपती रणशूर । कोणाचे वारू सुन्दर एत्रिअसजाचा सैन्यभार । काय शक्तीचा ॥ १४७ ॥ फेरीसच्या वंशजांचे । वारू पहिल्या प्रतीचे । युमेलसच्या संवयीचे । धांवणारे ॥ १४८ ॥ विहंगापरी घेती पळ । सारखी त्यांची आयाळ । सारखें वय उतावीळ । उंची सारखी सूत्रमित ॥ १४९ ॥ वाजिनी ऐशा दोन । मार्सास वाटे भय बघुन । पायेरिएंत वाढवी जपुन । अपाले ज्यां ॥ १५० ॥ वारू ज्याचे सरस । तो आजक्ष वीरावतंस । त्याहुनी थोर आकिलीस । परि मनीं रुष्ट ॥ १५१ ॥ अगमेम्ननाच्या वरी । राग ओती श्वासाबरोबरी । सर्वत्र सेनेंत सरदारीं । दिसे रिकामपण ॥ १५२ ॥ कोणी उगाच नेम धरी । कोणी खंजीर झेली करीं । बाण फेंकी कोणी दुरी । खेळे कोणी धनुशीं ॥ १५३ ॥ चपल एरव्हीं भारी । वारू जागच्या जागेवरी रथापाशीं भूवरी । पदें खळग्या पाडिती ॥ १५४ ॥ कोमल कमलें खाती । हरित तृणा कुडतुडती । रथापरी स्तब्धता दाविती । तंबूमाजी कांहीं ते ॥ १५५ ॥ इतस्ततः कटकभर । युद्ध सोडून फिरती स्वार । ह्मणती दावा धुरंधुर । आमुचा नायक ॥ १५६ ॥

असो ऐसा दलभार हाले । शस्त्रास्त्रें चकाकती भाले । होरपळे भूदवानलें । काय वाटे ॥१५७॥ तैफीअसाच्या थड्या भोंवता । जोव्ह आरिमींत रागें जातां । मेघनादें पदें ताडितां । जैशी धरा कांपते ॥ १५८ ॥ तैशी यांचे पाय पडतां । धरणीवरून सेना जातां । गडबडे धरणी कांपता । भयाभीत ॥ १५९ ॥

जोव्हें धाडिली इरिस । कथण्या दुर्वृत्त त्रोजनांस । जमलेल्या वृद्ध तरुणांस । प्रायमाघरीं ॥ १६० ॥ फार कुशल पलायनांत । पोलैतीस प्रायमसुत । उच्च थड्यावर उभा राहत । इसिएतसाच्या ॥ १६१ ॥ पाळथ ठेवी ग्रीकांवरी । नौकांतून कधिं बाहेरी । पडतील तेव्हां घरीं । धांवत सांगाया ॥ १६२ ॥ तेव्हां इरिस सुन्दरी । तयाचें रूप धारण करी । बोले जनां तयाच्या स्वरीं । हुबे हूब ॥ १६३॥

" वयोवृद्ध भूपाला ! । उपदेश अविचारें भरला । आवडतो तो तुजला । सर्व काळीं ॥ १६४ ॥ युद्धाचा प्रसंग आला घोर । रणीं पातले वीर थोर । ऐसे पाहिले नाहीं शूर । संख्यातीत ॥ १६५ ॥ जैशीं पर्णें उडती । सिकतेचे कण उठती । तैसे हे वीर चालती । युद्धार्थ ॥ १६६ ॥ सांगणें मम सकलांस । विशेषतः हेक्तरास । द्यावा अज मान त्यास । योग्य ह्मणुनी ॥ १६७ ॥ तुमचे मित्र संख्यातीत । भाषा त्यांच्या अगणित । दळ त्यांचें अपरिमित । प्रायमपुरी भोंवतीं ॥ १६८ ॥ ज्या त्या नायकें अपुले जन । न्यावे रणीं संभाळुन । परंतु तुवां काळजी घेउन । न्यावें नागरिकांस" ॥ १६९ ॥

देवीचा परी स्वर । हेक्तरें ओळखिला मधुर । झाला क्षणांत दूर । सभेंतून ॥ १७० ॥ सशस्त्र होती वीर । उघडती पुरद्वार । घुसती जावया बाहेर । करिती बहू गोंगाट ॥ १७१ ॥ घोडेस्वार आणि पदाति । पुरीच्या बाहेर जाती । क्षुद्र पर्वत एक गांठिती । सभोंवतीं मोकळा जो ॥१७२॥ बेतिइआ ह्मणती मर्त्य नर । मिरिन्नाचें

थडें अमर। त्रोजनसैन्याचा विस्तार । पडलासे सभोंवतीं ॥ १७३ ॥ प्रायमसुत हेक्तर। शीर्षकवच घाली सुन्दर । नेतसे त्रोजनवीर । युद्धार्थ पैं ॥ १७४ ॥ असंख्यात ते महावीर । सशस्त्र शूर स्वार । मनीं उतावीळ फार । भाले हाणावयातें ॥ १७५ ॥

व्हीनसोद्रीं अन्कैसीसास। जाहला सुत ईनिआस । नेई दार्दे-निअनांस । रणामाजी ॥ १७६ ॥ आर्चिलोकस आकामास । अन्तिनारज हे साहाय्यास । ज्यानीं मेळविलें सुयशास । युद्धकलेंत ॥ १७७ ॥ ज्यांतें इदाचे पायथ्यास । झेलिएंत मिळे आवास । ईसिपसचें प्यायास । नीर नीळ॥ १७८॥नेई ऐशा त्रोजनांस। लिकाअ-नसुत पन्दारस । देई धनू आपलें ज्यास । अपालो देव ॥ १७९ ॥

आद्रेस्तीवासी आपीससवासी । पितिइआवासी तिरिइआवासी । निघाले वीर समरासी । साहसिक ॥ १८० ॥ मीरप्स पर्कोशिअन । ज्यास पूर्ण भविष्यज्ञान । त्याचे दोन नंदन । यां नेती ॥ १८१ ॥ एक तो अद्रास्तस । दुजा तो आम्फिअस । रणीं जातां कर्तनास।पितया आवडेना॥१८२॥ पित्राज्ञेतें अवमानिती। रणीं जाया धांवताती। विधिची विचित्र गति × मृत्यूकडे नेईत्यां ॥ १८३ ॥ पर्कोटीचे प्राक्ति-असचे । आबीदासचे सेस्तसचे। तेवीं ते आरिस्बीचे । वीर समरीं पातले ॥१८४॥ र्हिर्ताकसज वीर शिरोमणी । आशिअस होई सेनानी । अश्वारूढ येई होवोनी । सीलीइसतीराहून ॥ १८५ ॥

लारिसेचे पेलास्जिअन । मारिती भाला नेम धरुन। हिप्पोथोअस रणीं

× दैवंहि दुरतिक्रमम् । रामायण.

गमन । त्यांसह करीतसे ॥१८६॥ मार्सवंशी पिलीअस। भ्राता याचा हिपोथोअस । जनक यांचा लीथस । पेलास्जिअन ॥ १८७ ॥ तियुतामस होय आजा । दोघे करिती रणकाजा । ह्मणतां लोक रणीं जा । निघाले हे ॥ १८८ ॥

आकामस आणि पिरोअस । नेतसे थ्रेशिअनांस । हेलिस्पान्टच्या तीरास । धरून जे वसताती ॥ १८९ ॥

नातू तो सीआसचा । सुत दिव्य त्रीझेनसचा । नायक झाला सिकोनीसांचा । युफेमस प्रसिद्ध ॥ १९० ॥

आक्सिअसजल निर्मळ । सर्वत्र वाहे झुळझुळ । पिओनिअन ते सकळ । सुखावले जेणें ॥ १९१ ॥

बाणलक्ष्यीं भट हे कुशळ । पैरिक्मीस पाहुन काळ । आमीदनाहून त्यांचें दळ । आणिता झाला ॥ १९२ ॥ छातीचा निधडा वीर । पेलीमेनीस अधीर । नेतसे रणीं समूर । पाफ्लगोनिअनां ॥ १९३ ॥ ईनेतींत यांचीं घरें । जेथलीं प्रसिद्ध खेंचरें । पळतां ह्मणती बरें । लोक सारे ॥१९४॥ एक वसती सैतोरसीं । एक वसती सेसामसीं । एक तों तीरनिवासी । पार्थेनिअसनदीचे ॥१९५॥ यांच्या संगें क्रोम्नांतले । एजिआलसस्थ अन्य भले । एरिथैंनीचे वीर आले । आणितां पेलीमेनीसें ॥ १९६ ॥

रजतमय आलिबींत । हेलिझोनिअन वसत । त्यांतें रणीं दोघे आणित । एपिस्त्रोफस होदिअस ॥ १९७ ॥

क्रोमिस इन्नोमस । दोघे नेती मिसिअनांस । अन्य चुकवी न मरणास ।

जाणत असतां भविष्य ॥ १९८ ॥ पराक्रमी अकिलीस। स्वकरें मारी तयास । नदीमध्यें टाकायास । मृतराशींत ॥ १९९ ॥

आस्केनिअस व फोर्किस । नेती रणीं फ्रिजिअनांस । आस्केनिएचा सोडुन वास । आनंदानें ॥ २०० ॥ तालीमेनिअसनंदन । मेस्थ्लीस आन्तिफस दोन । जिर्जीआसरीं ज्यांचें जनन । तिमोलसगिरीवर ॥ २०१ ॥ करावया रणकंदन । सवें घेती मीओनिअन । नायक त्यांचे ह्मणवुन। थडकले समरांत ॥ २०२ ॥

कर्कशांस केरिअनांस । ग्राम ज्यांचा मिलेतस । पेथिरिगिरीवर आ-वास । नेस्तीस त्यां नेई ॥ २०३ ॥ मीआन्दर नदीतीर । मैकेलींचें उच्चशिखर । तेथें यांचें आगर । रमणीय ॥२०४॥ आम्फिमाकस व नोस्तिस । पुत्र दोन नोमिअनास । आला होता प्रसिद्धीस । पूर्वीच जो ॥ २०५ ॥ सुवर्णालंकृता कुमरी । पडते जैशी बाहेरी । सुवर्णालंकृत तैसा समरीं । थडकला मूर्खपणें ॥ २०६ ॥ मरण न टळलें यानें । या वधितां ईआकसजानें । लागलेंच अकिलीसानें । सुवर्ण केलें दूर ॥ २०७ ॥

सोडून झान्थस पूर । लिसि:हून आले दूर । सर्पीदन ग्लाकस शूर । लिसिअनां घेऊन ॥ २०८ ॥ *

---

* कित्येकांच्या मतें या नामावळींत आलेल्या देशांचें व त्यांच्या राजांचें वर्णन इतिहासात्मक आहे. ग्रीस देशाचे विभाग व पोट विभाग पडून त्यांचीं लहान लहान संस्थानें कशीं बनलीं होतीं व त्याचा व्याप केवढा होता याचा

विचार होमरनें ऐतिहासिक दृष्टीनें केला होता. व त्याच्यावर बराच काळ जाई तों या संस्थानिकांचा इतका भरवंसा होता कीं त्यानीं आपसांतले सरहद्दीवरील तंटे होमरच्या या वर्णनाप्रमाणें एकमेकांच्या मुलखाची देव घेव करून आपसांतच मिटविले. या नामावळीचा पाठ शाळांतून सक्तीनें काहीं संस्थानांत होत असे.

या नामावळींत नाना तऱ्हेचीं नगरें, बंदरें, वनें, उपवनें, द्राक्षीलना, पर्वत नद व नद्या, संपन्नभूमि व शस्यसंपत्ति, नाना देशांतून आलेले सेनानायक व त्यांची भव्य सेना, त्यांचीं शस्त्रास्त्रें व युद्ध करण्याची पद्धति, इत्यादिकांचें कांहीं ठिकाणीं केलेलें वर्णन मनोरंजक आहे. कदाचित् आपल्या देशांतील पूर्वकालीन राजे व त्यांचीं राज्यें यांचें वर्णन, संधि येतांच, करून आपली इतिहास कथनाची हौस होमरनें फेडून घेतली असावी.

परंतु पुष्कळांशीं हा भाग प्रक्षिप्त दिसत आहे. ज्या वेळेस होमरचें हें महाकाव्य लेखबद्ध झालें नव्हतें, व तें भाटांच्या रोजच्या पाठानेंच नीट सांभाळलें जात होतें, त्या वेळेस एक किंवा अनेक भाटांनीं आपआपल्या यजमानांस खुष करण्याकरतां त्यांची किंवा त्यांच्या पूर्वजांचीं नावें ओढून ताणून कांहींतरी संबंध आणून यांत दडपून देण्यांत आलीं असावीं. निदान अशा काहीं तरी कृतीनें हा भाग फार नीरस झाला असून कांहीं कांहीं लेखक व वक्ते एकाद्याचा लेख अथवा एकाद्याचें भाषण अत्यंत नीरस आहे असें ह्मणावयाचें असतां या नामावळीची उपमा त्याला देतात.

सर्ग ३ रा

सारांशः—मेनिलास व पारिस यांचें द्वंद्वयुद्ध.

उभय दलें युद्धाभिमुख असतां हेक्तराच्या मध्यस्थीनें **मेनिलास व पारिस** यांनीं द्वंद्वयुद्ध करावें असें ठरतें. त्याचा हेतु लढाईचा शेवट करावा असा होता. द्वंद्वयुद्ध पहाण्याकरतां हेलनला इरिस घेऊन येते. **त्रायच्या** बाहेरील तटाशीं ती जाते. तेथें मंत्रिवरांसह **प्रायम** बसलेला असतो. त्यानें विचारिल्यावरून **ग्री**कांतील मुख्य सरदारांची माहिती **हेलन** देते. उभय पक्षांतील अधिप द्वंद्वासंबंधीं आणा शपथा वहातात. द्वंद्व सुरू होतांच **पारिस** हरतो. **व्हीनस** त्याला घनान्तरित करून त्याच्या महालांत पोंचवून वांचविते. तेथें पुन्हा हेलनची व त्याची भेट करविते. अगमेम्नन विजय प्राप्त झाल्यामुळें "हेलन द्या व द्वंद्वांतील शर्थी पुऱ्या करा" अशी मागणी करतो.

कालमानः—तेविसावा दिवस अजून सरत नाहीं.

स्थलः—**त्राया** पुढील समरभूमि व **त्राय.**

या सर्गाएवढा रमणीय सर्ग दुसरा नाहीं. **पारिसनें** द्वंद्व करण्यास दिलेलें आकस्मिक आह्वान, तत्संबंधीं शास्त्रोक्त विधिपूर्वक घेतलेल्या शपथा, मंत्रिजनांस जवळ घेऊन बसलेल्या वृद्ध राजासमक्ष पहिल्या सासरच्या मंडळीचें वर्णन करतांनां स्वाभाविकपणें करुणरसास भरती आणणारी **हेलन**च्या मुखांतून निघालेली हृदयंगम वाणी, पुत्रविनाश नेत्रांनीं पहावा लागेल ह्मणून **प्रायमाचें** तेथुन द्वंद्वा-पूर्वी निघून जाणें व त्यांत त्याची दिसून आलेली वत्सलता, द्वंद्वाचें प्रत्यक्षवत केलेलें वर्णन, **व्हीन**सच्या करवीं **पारिसाचें** संरक्षण, हेलनची व त्याची भेट घडवून आणणाऱ्या **व्हीनसची** हेलननें केलेली निर्भर्त्सना, **व्हीनसची** दरडाव-णी, **पारिसची** हेलननें केलेली फजिती, व **पारिसनें** केलेली सानुनय प्रार्थना इ. इ. सर्वच भाग सरस आहे.

त्रोजन युद्धाचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजें हेलन ही होय. स्वभावाचे चंचल. तेनें तिचे हातून प्रमाद झाला होता. परंतु ती अगदीं भ्रष्ट व सर्वथैव त्याज्य होती

असें कवीचे मनातून दाखवावयाचें नव्हतें. "पश्चात्तापेन शुद्ध्यति" या वचनांत कांहीं अर्थ असेल तर हेलनला फार पश्चात्ताप झाला होता असें या सर्गांत उत्तम रीतीन दाखविलेलें आहे. हा सर्ग सर्वांत लहान आहे पण सर्वांत सुन्दर आहे.

जाती बक पवनोत्थित शिशिरोद्वेगें उडोन जलधिकडे ।
× पिग्मिअनांवरतिं जसे पडती सारे करावया तुकडे ॥ १ ॥
सैन्यव्यूह रचोनी ग्रोजन साधिप तसे पुढें सरती ।
रणनाद उच्च करिती, जय घोषें दशदिशा तदा भरती ॥ २ ॥
रणकंदन मातविती रविचा झाला असे न जों उदय ।
दम धरुनी ग्रीक रणीं जाती चालून अरिवरी अदय ॥ ३ ॥
स्तेनां प्रिय रजनीहुन, अजपालांचें न जें करीत हित ।
गिरिवरि तें दाट धुकें येत यदा दक्षिणानिला सहित ॥ ४ ॥
बिघडुन दृष्टि तदा ती पोंचतसे जेथ फेंकिला दगड ।
हलतां दल, धूळींचें चक्र करी दृष्टिचा तसा बिघड ॥ ५
समरक्रमुनी आले दोघे भिडतील वाटतें खास ।
*सरसावे सुरसुन्दर पारिस जो हेतु दीर्घ दुःखास ॥ ६ ॥

× हे कल्पित मनुष्यप्राणी फार ठेंगणें होते. ते थ्रेसांत रहात असत. बगळे त्यांच्याशीं लढून त्यांचा पराभव करीत.

* पारिसच्या समरवेशाचें वर्णन त्याच्या स्वभावास साजेल असेंच आहे. तो एक रंगेल वृत्तीचा सभ्य गृहस्थ असून शौर्याचा नुसता आव आणीत आहे असें तेव्हांच समजून येतें. पुढें द्वंद्वयुद्धांत त्याचा पराभव करून मेनिलास जेव्हां त्याचें केसाळ शिरकवच ओढतो तेव्हां त्याच्या मानेला फांस लावणारा त्याच्या शिरकवचाचा बंद 'चित्रित' होता असे कवीनें फार मार्मिकतेनें नमूद करून ठेविलें आहे.

धनु वक्र पृष्ठिं शोभे, दों स्कंधीं व्याघ्रचर्म, असि करिं तो ।
त्रोजनपुंगव भाला फेंकुन आव्हान शत्रुसीं करितो ॥ ७ ॥
त्या धांवतां बघोनी मार्सप्रिय मेनिलास मुद पावे ।
मृग पुष्ट, वन्य अज वा वनिं हरिनें पाहतां जणुं टपावें ॥ ८ ॥
व्याधें ओरड करतां, अंगावर भुंकतां बहू कुतरीं ।
सोडील हरिहि सावज ! संभव नच मेनिलास अरिस परी ॥ ९ ॥
बोले मनीं " बरा हा अपराधी मन्दभाग्य करिं गवसे" ।
टाकी उडी रथांतुनि घ्यावा कीं सूड हेतु चित्तिं वसे ॥ १० ॥
समरशिरीं शूरातें बघतां दचके मनांत पारिस तो ।
काढुन पळ कटाकें लपे, मरणा चुकवी, न तो पुढें दिसतो ॥ ११ ॥
वदनीं विवर्णता ये, तनु कांपे, मुळिं न बोलवे त्याला ।
जैसें भितऱ्या होतें, रानीं सर्पास बघुन जात्याला ॥ १२ ॥
+ ऐसा पळतां पाहुन हेक्तर ताडी तयास शब्दशरें ।
" रुचिराकृति तव कोठें ! तदसम कृति निंद्य सांग कोठ बरें ! ॥ १३ ॥

+ हेक्तर या स्थलीं पहिल्यानेंच प्रवेश करीत आहे. तो या काव्यांतील मुख्य नायक नाहीं. तथापि त्याचें शील फार उत्तम आहे. त्याचा दोष एवढाच आहे कीं तो असत्पक्षीं लढत आहे. परंतु तसें करण्यास त्याची निःसीम पितृभक्ति हें कारण होय. ग्रीक सेनेंत एकाहून एक अधिक प्रबल असे अनेक वीर होते. व हा नाहीं, तो; तो नाहीं, तो; असें करून आळीपाळीनें सर्वांचा समरभूमिवर कवीनें प्रवेश केला आहे. परंतु त्रोजन पक्षाकडे पहावें तों त्याचा जीव काय तो हेक्तर एकटाच. तो प्रथमपासून शेवटपर्यंत शत्रूशीं सारखा सामना करीत आहे:-ऐश्वर्यांत अगमेम्नाशीं; शौर्यात द्यायोमीदाशीं; शक्तींत आजक्षाशीं; व आवेशांत अकिलीसाशीं.

स्त्रीवंचक! कुलकंटक! बडबडसी बायकांत, भीसि रणा!।
कां जन्मलास? मग कां कौमार्यीं सेविलेंस नच मरणा? ॥१४॥
होती पुरी सादिच्छा मग होता मुद मदीय चित्तास।
त्रोजनयश मळवाया वद कैसा मलिनकीर्ति उरतास? ॥ १५ ॥
निन्दिल निज कृति रिपु कीं रूपें उत्कृष्ट ह्मणुनियां फसलों।
निर्वीर्य दुर्बलाची भलत्याची भीति धरुनियां बसलों! ॥ १६ ॥
नौकेमाजि बसोनी, सहचर घेवून एक जीवाचे।
उदधि क्रमुनि विदेशीं जाशी जय शब्द बोलसी वाचे ॥ १७ ॥
हरिली एपिअनांची वीराची अंगना सुगात्री ती।
भय धरुनी तत्समयीं लाजविली अशिच का धरेत्री ती! ॥ १८ ॥
पुरयश मलिन करोनी लावियला तातकीर्तिला डाग।
झालें दुःख स्वजनां, मुद अरिला, लाज कां न तुज सांग॥ १९॥
त्या शूर मेनिलासासह अज जर दोन हात करतास।
कवण्या वीराची स्त्री हरिली त्वां तें तदा उमगतास॥ २०॥
व्हीनसदत्तसुभग तनु, मञ्जुल वीणा, कलाप केशांचा।
उपयोग तुज न यांचा, टळतो यानीं न काळ मरणाचा॥ २१ ॥
त्रोजन महाक्षमावान् करुनी बसते न युक्तिवाद गडी।
दुष्कृत्यास्तव आधीं तुजला वद गाडिते न वा दगडीं"? ॥ २२ ॥
*पारिस वदे "खरें बा, केलिस माझी न वाउगी फजिती।

* येथें पारिसचा खरा स्वभाव दिसून येतो. त्याची वागणूक सभ्य होती. हेक्टरनें त्याची फारच निर्दयपणें फजिती केली परंतु ती 'वाउगी नाहीं' असें तो सविनय व मोकळ्या मनानें कबूल करीत आहे.

स्वचित्तासीं तुलना च्छेतृ धरी वनिं कुऱ्हाड करिं जी ती ॥ २३ ॥
नौकार्थ काष्ठ भेदी प्रतिपातें वाढवून तत्बल जीः।
भेदक शक्तिप्रद तव हृदय उडे उरिं गमे तसेंच अजी ॥ २४ ॥
व्हीनसची थोर कृपा मजवर, तें तूं नकोस हिणवाया।
मज सुभग देणग्या ती देते जायास काय रे वांया ? ॥ १९ ॥
देवोत देव कांहीं, त्याचा स्वीकार पाहिजे केला।
धिक्कारितां फिरोनी कैसें लाभेल इष्ट वेळेला ? ॥ २६ ॥
इच्छिसि तरि करिन रणा, जागीं ये बसव उभय सैन्यांस।
झगडेन मेनिलासासह अज मानून तुच्छ जीवास ॥ २७ ॥
पण लावीं हेलन ती, विसरुं नको वरतिं वित्त राशी ती
द्वंद्वीं यश संपादी नेइल बलवन्त तो घराशीं तीं ॥ २८ ॥
शान्ति मिळो त्रायस्थां, ग्रीकां जाया मिळो स्वभवनातें।
प्रशस्य वारू जिथले ललनालावण्य जेथ निरुपम तें " ॥ २९ ॥
ऐकुन हें वच मोठें रणमध्यीं धांव घेत हेक्तर तो।
उचलुन दण्ड करींचा त्रोजनदलभार सर्व आंवरतो ॥ ३० ॥
तों ग्रीक नेम धरिती चापें शर ते असंख्य उडवाया।
तेव्हां वीरशिरोमणि अगमेम्नन नृप करी रणरवा या ॥ ३१ ॥
" ग्रीक अहो ! शर अंवरा, शिरपेंचें वळखुं येत हेक्तर तो।
गमतें किमपि मनींच्या उद्देशा कथित, आइका तर तो " ॥ ३२ ॥
होतां स्थिर सर्व, वदे हेक्तर " इतुका निरोप परिसावा।
त्रोजन हो ग्रीक अहो पारिस व्याया तुह्मां कथि विसावा ॥ ३३ ॥

शस्त्रविमोचन करुनी उभय दलींचें प्रशान्त भूवरि तें ।
द्वंद्वांत मेनिलासा, त्यातें वा कीर्ति पाहुं जर वरिते ॥ ३४ ॥
धन सारें मग त्याचें, त्याची होईल कामिनी ती ही ।
प्रेमें वागूं सारे येइल आह्मांस कामिं नीती ही" ॥ ३५ ॥
परिसुन हें, मुद्रितमुख जन होतां, वीर मेनिलास वदे ।
"माझें ही वच परिसा +चिंता चित्ता मथी, न सुखलव दे ॥ ३६ ॥
ग्रीक अहो त्रोजन हो ! शिणलां समरीं मदर्थ कलहानें ।
व्हा हो ! आधिं निराळे, सेवा सुख जें मिळे अजि तहानें ॥ ३७ ॥
कारण रणास दोघे पारिस अणि मी ह्मणून दोघांत ।
भरलें असेल ज्याचें त्याचा द्वंद्वांत होउं दे घात ॥ ३८ ॥
आणा जा अजशावक वर्णानें श्वेत एक कृष्ण दुजा ।
भूतें, रवितें बलि हे देउन जोव्हास अन्य, करुं पूजा ॥ ३९ ॥
प्रायम येथ हवा तो दूजा मध्यस्थ नाहिं हो जबरा ।
विश्वासहीन उद्धत तनयांवर नित्य ठेवि बोज बरा ॥ ४० ॥
* तरुणांचें चंचल मन वृद्धांच्या अचलतेस कीं वचके ।

\+ चिंता चितासमानास्ति बिन्दुमात्रविशेषतः ।
सजीवं दहते चिंता निर्जीवं दहते चिता ॥

अर्थ–चिंता व चिता या दोन शब्दांच्या रचनेंत फक्त अनुस्वाराचा भेद आहे. परंतु तात्पर्यार्थीं फारसा फरक नाहीं. चिंता जीवन्त पुरुषाला जाळते व चिता ही मृत झालेल्यास जाळते.

* पक्का बुद्धि करितसे सुयशाची वृद्धि मृत्तिका काची. । मोरोपंत.

हितकाम दूरदर्शी अकृपण समदृष्टि जीर्ण वय न चके " ॥ ४१ ॥
ग्रीक त्रोजन ह्मणती " फार बरें शान्त होउ संग्राम"।
बारुंस मागें घेती तत्क्षणिं शिबिरांत खेंचुन लगाम ॥ ४२ ॥
शस्त्रविमोचन करिती, भूवरतीं रचिति काय नगराशी।
प्रायम नृपा अणाया हेक्तर धाडीत दूत नगराशीं ॥ ४३ ॥
आणिक अजां अणाया गेले; अगमेम्ननें स्वसेवक ते।
धाडियले निज कटकीं बलिचें ऋण तें करा ह्मणे चुकतें ॥ ४४ ॥
प्रायमदुहिता सुन्दर लेओदिसि अन्तिनारसुतजाया।
हेलिकअन पति तीचा तिजसाठीं सिद्ध जो असु त्यजाया ॥ ४५ ॥
धरि रूप इरिस तीचें नणदेचें तोंच शीघ्र हेलनच्या।
दूती कृत्य कराया सन्निध येऊन गोष्टि करि घरच्या ॥ ४६ ॥
निर्मी बसुन महालीं, चातुर्यें दीर्घ रक्त कांचोळी।
+विणि चरितें वीरांचीं झाली ज्यांची तदर्थ रणिं होळी ॥ ४७ ॥
इरिस वदे " अधिं यावें, वळुनी इकडे वरानने! पाहीं।
हे ग्रीक कवचधारी त्रोजन हे स्वार पूर्ग रण ज्यांहीं ॥ ४८ ॥
झालें शान्त भयद रण, बसले हे स्वस्थ रोंवुनी भाले।
ढाली घेति उशाला वदती ' किति घोर हो रण निभालें!' ॥४९ ॥
द्वंद्वा पारिस योजी, संमति त्या पूर्ण मेनिलासाची "।

+ त्रोजनयुद्धांत तिच्या निमित्त ज्यांची रणांत होळी झाली त्यांच्या पराक्रमांचा चि पट हेलनच्या कडूनच कवीनें विणवावा हा प्रकार फार उचित आहे व सरस आहे.

वाच्छा त्वत्प्रेमाची, दोघां आशा तुझ्या विलासांची" ॥ ९० ॥
परिसुन वच कोमल हें झालें तिज गोडसें स्मरण पतिचें ।
नगराचें, पितरांचें; नयनांतुन गळत एक अश्रु तिचे ॥ ९१ ॥
सितवस्त्रा पांघरुनी ईथ्रा घेवोनिया सवें दासी ।
तैसी क्लीमीन दुजी, गेली पुरिंच्या पुढील दारासीं ॥ ९२ ॥
तेथ बसे प्रायम तो, लॅम्पस तो, अंतिनार हिसितअन ।
क्लैतिअस व थैमीतिस पॅन्थौस हि बैसला युकालिगन ॥ ९३ ॥
सारे वृद्ध वयानें, ज्ञानानें वृद्ध, पूज्य लोकांला ।
शस्त्र न करिं धरिती जे ज्यांनीं त्यजिला रणांतला काला ॥ ९४ ॥
सेविति वार्धक्यसुखा, बडबडुनी घालवीत जे काळ ।
*दूर वनीं तरुशिखरीं राहे करुनी रवा जशी राळ ॥ ९५ ॥
हेलन येतां बघुनी कुजबुजती सर्व एकमेकांत ।
+"हिजसाठीं नउ वर्षें जग लढतें काय नवल हो यांत ! ॥ ९६ ॥
मधुर किती रूप अहा ! खचितचि तनु सौष्ठवा नसे तुलना ।
वच कैसें ! गति कैसी ! वा ! वा ! दुसरी नसे अशी ललना ॥९७॥

---

* झातारे झातारे जमून सारखी बडबड कशी करतात याचें हें फार सुरेख चित्र आहे.

\+ स्त्रियांच्या स्वरूपाचें वर्णन करण्याची एक रीत वारंवार आढळण्यांत येते ती ही कीं, तिच्या पायांच्या नखापासून तों डोकीच्या केंसापर्यंत सर्व अवयवांचें सविस्तर वर्णन नानातऱ्हेच्या उपमानीं युक्त असें करावयाचें. अशा तऱ्हेचें वर्णन इलियडमध्यें नाहीं. दुसरी रीत अशी कीं जीच्या रूपाचें वर्णन

करावयाचें आहे त्या स्त्रीला पाहून जो काय तत्काल मनावर परिणाम होतो तो थोडक्यांत वर्णन करावयाचा. या दुसऱ्या रीतीनें हें एका चरणांत होमरनें हेलनचें वर्णन केलेलें आहे. याच्या तोडीचें सीतेच्या स्वरूपाचें वर्णन वाल्मीकीनें वृद्ध मारुतीच्या तोंडीं घातलें आहे. सीतेचा शोध करीत हिंडत असतां ती दृष्टीस पडतांच कपिराज ह्मणतात—

यदि रामः समुद्रान्तां मेदिनीं परिवर्तयेत् ।
अस्याः कृते जगच्चापि युक्तमित्येव मे मतिः ॥

मी तर हिच्या करितां कांहीं समुद्र व कांहीं भूभाग क्रमून आलों परंतु राम जरी समुद्रान्ता मेदिनी, नव्हे सर्व जगही हिला शोधण्याकरतां उलथें पालथें घालील तरी तिची योग्यताच तशी आहे.

अशा वर्णनांतील बहार कांहीं निराळीच आहे. तसेंच खालील मयूरकृत द्रौपदीचें वर्णन पहा.

धृष्टद्युम्नानें आपल्या भगिनीस (द्रौपदीस) राजसभेंत आणल्यावर तिचें रूप पाहून सर्व राजेलोक थक्क झाले. तेव्हां कवि ह्मणतात.

कर वळविला अजें जें विष्णुधृतस्त्रीस्वरूप कित्ता तें ।
चित्र तसेंचि उतरिलें चतुरें वाटे कवींद्रचित्तातें ॥

श्रीविष्णूनें पूर्वी सुरासुरांस अमृत वाढण्याचे प्रसंगीं जें उत्कृष्ट मोहिनीचें स्वरूप धारण केलें होतें तें कित्त्याप्रमाणें पुढें घेऊन उत्कृष्ट स्त्री निर्माण करण्याचें काम ब्रह्मदेवानें एकनिष्ठ उद्योगेंकरून चालू ठेविलें. व ज्याप्रमाणें कित्ता गिरवितां गिरवितां प्रयासान्तीं एकाद्यास मूळच्या कित्त्याचें वळण साधतें व त्याचा हात चांगला वळला असें अक्षरज्ञ लोक ह्मणतात व त्याची स्तुति करतात त्याप्रमाणें द्रौपदीला निर्माण करून मूळ ह्मणून पुढें ठेवलेल्या मोहिनीप्रमाणें हुबेहुब उत्कृष्ट स्त्री ब्रह्मदेवास निर्माण करतां आली तेव्हां कवींद्र त्याचा हात मोहिनीनिर्माणकौशलांत चांगला वळला असा धन्यवाद गाऊं लागला. येथें वाल्मीकीपेक्षां ही पंतांची भाषा जरा अलंकारिक आहे परंतु या रीतीनें केलेलें द्रौपदीच्या सौंदर्याचें वर्णन होमरकृत हेलनच्या वर्णनाप्रमाणें व वाल्मीकिकृत सीतेच्या वर्णनाप्रमाणेंच सरस आहे,

भूवरतीं अवतरली रंभा ही काय मोहिनी वाटे ।
ईशा ! शिशुंचा अमुचा नाश न हो! लाव कीं हिला वाटे !" ॥५८॥
प्रायम वदला " मुलि ! ये येथें तूं बैस आज मजसरशी ।
हे मित्र इष्ट बान्धव पति पहिला दृष्टिनें पुढें बघसी ॥ ५९ ॥
अन्याय तुझा नाहीं, ग्रीकांहीं युद्ध मांडिलें बाले! ।
हा कोप ईश्वरी कीं संकट जें घोर मजवरी आलें ॥ ६० ॥
सांग बरें पाहोनी तो गे तो ! वीर उंचसा कवण ।
रूप न हें साधारण आहे जरि हें दुजांत उंचपण ॥ ६१ ॥
पूर्वी न देखिला म्यां, राजा हें नाम योग्य यास अजी " ।
बोले हेलन " किति कथुं होते मज लाज आज मामंजी ! ॥ ६२ ॥
इष्टां, प्रिय दुहितेला, बन्धूंतें त्यजुनि निघुन जी गेलें ।
पति शयनीं सोडुनियां त्वत्सुतसंगें अलें, न कां मेलें ! ॥ ६३ ॥
मेलें तशी न ह्मणुनी आतां मी तोंड काढितें नामीं ।
खेदें पापी तनुला झुरवुनि सेवीन शीघ्र मरणा मी ॥ ६४ ॥
पुसतां ह्मणुनी कथितें होता हा एकवार दीर मम ।
× रणशूर नीतिवेत्ता अगमेम्नन एत्रिअसज नृप परम " ॥ ६५ ॥

× समग्र होमरचे काव्यांत ही ओळ शीकंदर बादशहाला फार आवडत असे. राजाचे अंगीं शौर्य व नीति हीं संयुक्त असलीं पाहिजेत असें त्याचें मत होतें. हीं दोन्हीं ज्या राजाचे अंगीं आहेत त्यास आणखी कशाची गरज नाहीं. 'या दोहोंवर नजर ठेऊन मी आपले सर्व व्यवहार चालवतों' असें तो ह्मणतसे. आतां पृथ्वीचा कोणचाच भाग जिंकावयाचा उरला नाहीं ह्मणून ज्या दिग्विजयी वीररत्नास रडूं आलें त्याच्या सर्व विजयाचें मूळ वरील चरणांत आहे. होमर

वृद्ध वदे " वा वा ! हे अगमेम्नन ! अससि खचित भाग्याचा ।
ग्रीकां केलें त्वां वश, उगम तुला हा अपार सौख्याचा ॥ ६६ ॥
पूर्वी ओत्रिअसाच्या वेळीं फ्रिजिएंत वीर बहु होते ।
मिग्दन त्यांचा नायक आमाझन्सा विरुद्ध लढले ते ॥ ६७॥
मीही विरुद्ध लढलों, गणना होती तदा न सेनेला ।
संगरिअसजालिं अरिच्या रुधिराचा रंग चढुनियां गेला ॥ ६८ ॥
विजयी दल परि तेंही, संख्येमाजी तसेंच शौर्यांत ।
मज या ग्रीकां पुढतीं गमतें अज तुच्छ नवल बहु यांत " ॥ ६९ ॥
युलिसीस दृष्टि पडतां वृद्ध पुसे " हा विशाल वक्षाचा ।
उंचीनें न्यून जरा, सांग मुली कवण रुंद अंसांचा ॥ ७० ॥
ठेवुन शस्त्रा भूवरि घिरट्या घाली दलीं बघे शूर ।
मेंढ्यांच्या कळपीं कीं मेष फिरे हा भिसाळ भेसूर " ॥ ७१ ॥
हेलन बोले " यातें ह्मणती युलिसीस सुज्ञ बहु शान्त ।
चतुरस्त्रनीतिवेत्ता जनन जरी तें मरुप्रदेशांत " ॥ ७२ ॥
मग अन्तिनार बोले " त्वद्वच हें सत्य अनुभवें बाई ! ।

झाला नसता तर शीकंदरही झाला नसता अशी कांहींची लाघवी भाषा आहे.
कालिदासानें हुबेहूब वरील होमरकृत चरणाच्या अर्थाचा श्लोक केला आहे.

कातर्यं केवला नीतिः शौर्यं श्वापदचेष्टितम् ।
अतः सिद्धिं समेताभ्यामुभाभ्यामन्वियेष सः ॥

अर्थ–नुसती नीति ह्मणजे भितरेपणाचें लक्षण आहे. तसेंच नुसतें शौर्य ह्मणजे व्याघ्रादि श्वापदांचें लक्षण आहे हें जाणून नीति व शौर्य यांची सांगड घालून तो राजा सर्वत्र सिद्धि मिळविता झाला. रघुवंश.

+तो मेनिलास अणि हा करुं आले तुजवरून शिष्टाई ॥ ७३ ॥
पाहुणचार तयाचा केला गृहिं, कळत बुद्धिचें मान।
निधि थोर हे कलांचे बाहुबला बघुन देति जन मान ॥ ७४ ॥
त्रोजनमण्डलिं शोभे उंच भला एक जों उभा राहे।
आणिक त्या दुसऱ्याच्या भुलले जन बघुन वक्षभारा हे ॥ ७५ ॥
वाणी वश दोघांला. भाषणिं किति मेनिलास करि घाई !।
बोलेल एवढेंसें अल्प परी चटक लावुनी जाई ॥ ७६ ॥
वाचाट खचित नोहे, वाहे हा तरुण कधिं न भलतिकडे।
युलिसीस बोलुं उठतां, आरंभिं न रीत ती पसंत पडे ॥ ७७ ॥
उठुनी निश्चल दृष्टी लावी भुवरी न हालवी यष्टी।
गेला चिडुनी वाटे मूढ जणूं मंदमति दिसे कष्टी ॥ ७८ ॥
परि जेव्हां स्पष्ट निघे कंठांतुनि खणखणीत आवाज।
वाटे गगनांतुनियां सणसण हिमवृष्टि होतसे आज ॥ ७९ ॥
वाद कराया त्यासह एक उठोनी धजे न मानवतो।
ह्मणती कीं पुरुषांतें विषमबलां कलह काय मानव तो ॥ ८० ॥
होते निंदित रूपा नयन अतां त्यांस हांसती कान।
आश्चर्य भरित होउन जन मोदें सकल डुलविती मान" ॥ ८१ ॥
आजक्ष दृष्टि पडतां वृद्ध वदे "कवण वीर गे तिसरा।

+ या प्रसंगीं मेनिलासाचीही गोष्ट निघायला पाहिजे होती. परंतु ती हेलनच्या मुखीं घालणें हें सर्वथैव अप्रशस्त झालें असतें ह्मणून कवीनें मोठ्या कुशलतेनें अन्तिनाराचे तोंडी थोडा त्याजविषयींचा स्तुतिवाद घातला आहे.

व्यूढोरस्क बली हा ग्रीकामधिं उंच हाच एक खरा " ८२ ॥
हेलन दिव्य वदे " हा जाणा आजक्ष थोर बलवान ।
स्तंभचि आधाराचा ग्रीकां रिपुची ह्मणून परवा न ॥ ८३ ॥
भूप इदामिनिअस तो तिकडे क्रीतन सजे जसा देव ।
ज्या मेनिलास विनवी मंदिरिं येतां ' यथेष्ट ये जेव ' ॥ ८४ ॥
ग्रीकांस दीर्घ नयनां बघतें, सांगेन ओळखुन नांवें ।
कां मग दृष्टि न पडती, जननायक दोन काय ते व्हावे ! ॥ ८५ ॥
तो अश्ववाह कास्तर पोलक्ष हि दक्ष मुष्टियुद्धांत ।
माझे बन्धु जुळे हे, वाढवि जननी न भेद कोणांत ॥ ८६ ॥
काय न आले येथें ? बसले कीं श्रान्त लेसिदीमनिं ते ।
येउन अथ कार्यि दुजा गुतले सोडून निंद्य भगिनीतें " ॥ ८७ ॥
+गे ऐक ! भूतधात्री धरणी दोघां धरीत पोटाशीं ।

+ पतिचें शव पाहून विलाप करणाऱ्या कर्णपत्नीचा शोक वर्णन करणाऱ्या खालील सर्वोत्कृष्ठ पंतांचे आर्येची आठवण या ठिकाणीं वाचकांस होईल.

धर्मा त्रयोदशाब्द न ज्याच्या चिंतेकरून निज लागे ।
तो हा पुन्हा नुठाया वसुधे ! तुज दृढ धरून निजला गे ॥ मोरोपंत.

वालीवध प्रकरणांतील ताराविलाप वर्णन करणारा वाल्मीकिकृत श्लोक पहा.

मत्तः प्रियतरा नूनं वानरेंद्र मही तव ।
शेषे हि तां परिष्वज्य मां च न प्रतिभाषसे ॥

" वानरेंद्र महाराज ! ही मही माझ्याहूनही तुह्माला प्रिय वाटत आहे. ह्मणून दों करानीं तिला आलिंगन देऊन शयन करिते झालेत व माझ्या प्रश्नास नुसतें उत्तरही देत नाहीं. " यांत थोड्या शृंगाराचें मिश्रण करून आद्यकवीनें शोकरसाला फार पुष्टि आणिलेली आहे. पतिविषयक हें पत्नीचें भाषण असल्यामुळें शोकरसांत शृंगाराचें मिश्रण करतां आलें.

निजले होति न जागे युद्ध कथा ऐकण्या नको त्याशीं ! ॥ ८८ ॥
आले तों नगरांतुन दोन अजापुत्र घेउनी दूत ।
मादक मद्य तसेंची आला चर्वीत ज्यास बहु ऊत ॥ ८९ ॥
शोभे इदीअसाच्या करिं सुन्दर पात्र तें सुवर्णाचें ।
वृद्धनृपा उत्तेजक वाक्य मुखें काढि जो सुवर्णाचें ॥ ९० ॥
" उठिं नृपते ! विनविति हे राजे समरांत तुजसिं उतराया ।
म्हणती ' वृद्धमुखानें वदवा झाला ठराव तो राया ' ॥ ९१ ॥
हे मेनिलास पारिस, दोन्ने करणार दोन हात रणीं ।
द्वंद्वीं यश मिळवी तो, नेइल ही स्त्री सवित्त घरिं तरणी ॥ ९२ ॥
शान्ति मिळो त्रायस्थां ग्रीकां जाया मिळो स्वभवनातें ।
सुन्दर वारू जिथले ललना लावण्य जेथ निरुपम तें " ॥ ९३ ॥
वृद्ध वदे कचरोनी ' जोडा हय ' तेविं करिति सेवक ते ।
रथिं अन्तिनार बसतां वृद्ध चढे रश्मि ओढुनी हातें ॥ ९४ ॥
दिण्डींतुन रथ आला, समरीं ते उतरले जसे खालीं ।
युलिसीस मान त्यां दे अगमेम्नन ही उठोन त्या कालीं ॥ ९५ ॥
दूतांनीं बलि अणिले, पात्रीं आकण्ठ ओतिली मदिरा ।
प्रोक्षाळिलें क्रमानें शीतजलें त्वरित सकलनृपतिकरां ॥ ९६ ॥
अगमेम्ननकरिं लटके असिसन्निध तीक्ष्ण एक खंजीर ।
तेणें भीस अजांची कापी, जी घेति वांटुनी वीर ॥ ९७ ॥
प्रार्थी अगमेम्नन नृप पसरुन कर वांकवोनियां माथा ।
" हे सर्वशक्ति ! बापा ! पाहीं हे जोव्ह ! हे इदानाथा ! ॥ ९८ ॥

हे सर्वसाक्षि ! दिनकर ! आयकसी सर्व शब्द जो कानीं ।
पुण्य नदानों ऐका, माते वसुधे ! सुतास या मानीं ॥ ९९ ॥
घेतात शपथ खोटी ऐशां दण्डीतसाल जे कोणी ।
त्यांतें पातालस्थां करितों साक्षी जुळोनियां पाणी ॥ १०० ॥
परिसा ठराव अमुचा पारिस जर वधिल मेनिलासाला ।
सवित्त हेलन त्याची; समजा तो पात्र तद्विलासांला ॥ १०१ ॥
उदधि क्रमुनी परतूं गांवा; जर जाहलें परी उलट ।
त्रायस्थांनीं हेलन परत करावी सवित्त; अणिक अट ॥ १०२ ॥
द्यावा दण्ड जयाची अठवण राहील पुत्रपौत्रांस ।
नाकारुनी ससुत नृप भोगिल समरांत सतत संत्रास " ॥ १०३ ॥
बोलुन ऐसें पुढतीं येउन तेणें बलींस दृढ धरिलें ।
कर्कश काष्णर्यायस करिं धरुनी तत्कण्ठ चरचरां चिरिले ॥ १०४ ॥
भूवर अज तडफडती, शस्त्रें झाले क्षणांत असुरहित ।
ओतुन जन मग मदिरा अमरां प्रार्थीत साधण्यास हित ॥ १०५
बोले एक कुणी मग " जोव्हा ! अससी समर्थ तूं थोर ।
मोडिति ठराव त्यांच्या शाप वठो शिरिं करून हा जोर ॥ १०६ ॥
त्यांच्या आणिक त्यांच्या पोरांच्या मस्तकांतला मगज ।
वाहो धरणीवर तो जैशी ही ओतितां सुरा सहज ॥ १०७ ॥
त्यांच्या स्त्रियांस होवो जारज संतति जगास दूषण जी" ।
ऐशा शापां देती, जोव्ह दिसे परि न अजुन त्यां राजी ॥ १०८ ॥
सकलां वीरां नंतर बोले प्रायम " पुरा अतां जातों ।

बघुं काय युद्धिं तनुजा ओढिल कीं मेनिलास ताजा तो ॥ १०९ ॥
ठाउक जोव्हा ठाउक अमरां हें ज्यांचियां करीं मरण "।
ऐसें बोलुन बालि रथिं ठेवोनी चालला त्यजून रण ॥ ११० ॥
रथिं अन्तिनार चढुनी जाय नृपाच्या बसून शेजारीं ।
स्वपुरास पोंचले ते पवनेरित जें प्रसिद्ध सर्वभरी ॥ १११ ॥
रणिं उतरे हेक्तर मग, मापी युलिसीस समरसीमेला ।
सोडत काढिति ठरण्या, वार अधीं पाहिजे कुणी केला ॥ ११२ ॥
शिरकवचा काढोनी हेक्तर ठेवीत भूवरी खालीं ।
आंत चिठ्या घालोनी घोळवितां जवळ मंडळी आली ॥ ११३ ॥
जन सारे कर पसरुनि विनविति अमरांस वांकवुन माथा ।
" हे सर्व शक्ति ! बापा ! पाहीं हे जोव्ह हे ! इदानाथा ! ॥११४॥
होवो घात तयाचा दोघां घोरांत घातलें ज्यानें ।
जावो नरकीं तो, मग नांदुं अह्मीं उभय मित्रभावानें ॥ ११५ ॥
हलवुन शिरकवचातें हेक्तर वळवीत वक्र दृष्टीला ।
टाकि चिठ्या भूवरतीं 'पारिस पारिस' जनीं ध्वनी उठला॥ ११६ ॥
निकट उभे हय करुनी, भूवर शस्त्रें रचून भट बसती ।
हेलनपति पारिस धरि कवचें स्कन्धीं जुळून सुन्दर तीं ॥ ११७ ॥
सेवी इजार, बांधी बंद रुपेरी, सुयोग्यपरिमाण ।
घाली लिकाअनाचें बन्धूचें गोजिरें उरस्राण ॥ ११८ ॥
मूठ रुपेरी जीतें स्कन्धीं तीं लटकवीत तलवार ।
ढाल स्थूल करीं घे जड जी सोशील शत्रुचे वार ॥ ११९ ॥

कवच करी शिरिं धारण, नाचे वरि पेंच अश्वकेशाचा ।
गच्च धरी, करिं भाला, सूचक जो घोर शत्रुनाशाचा ॥ १२० ॥
असलिंच शस्त्रें घेउन वीर अला सज्ज मेनिलास रणीं ।
ग्रीक त्रोजन जागीं बैसुनियां स्तब्ध पाहती सरणी ॥ १२१ ॥
भाले फेंकित आले मध्यें रणिं दांत ओंठ खावोनी ।
ढालीवरि, अरिच्या अधिं पारिस करि वार लक्ष्य लावोनी ॥ १२२ ॥
ढाल न भंगे अल्पहि, लवली ती टोंक उलट भाल्याची ।
पाळी वार कराया आलि अतां वीर मेनिलासाची ॥ १२३ ॥
+प्रार्थी तो अधिं जोव्हा " जोव्हा ! दे शक्ति सूड घेतों मीं ।
या दुष्ट पारिसानें पहिल्यानें ज्यास दुखविलें तो मीं ॥ १२४ ॥
आदर ज्यानें केला यजमाना त्याचि काय दुखवावें ।
ऐशी कृति करण्याचें मनिं आल्या फिरुन लोक चरकावे" ॥१२५॥
दीर्घच्छाय करींचा भाला फेंकी अरीवरी जोरें ।
भेदून ढाल रुतला उरकवचीं वस्त्र फाटलें कोरें ॥ १२६ ॥
बाजुस वळुनी तेणें चातुर्यें मृत्यु चुकविला घोर ।
एत्रिअसात्मज मग असि हाणी त्यावर शिरीं करुन जोर ॥ १२७ ॥
शीर्षत्राण फुटे तें असिचे परि चार जाहले तुकडे ।
एत्रिअसज रणनादा करुन बघे गगनिं, लोकिं धाक पडे ॥ १२८ ॥

+ द्वंद्वारंभीं मेनिलास यश येण्याकरितां ईश्वरप्रार्थना करीत आहे. पारिस करीत नाहीं. कशी करील ! तो आपण अपराधी आहों हें जाणून स्वस्थ बसतो असें दाखविण्याची व्यवस्था जी कवीनें केली आहे ती कौतुकास्पद आहे.

८

बोले "जोव्हा नाहीं तुजविण सुर अन्य हानिकारक रे ।
घेणार पारिसाचा होतों मी सूड आज पूर्ण करें ॥ १२९ ॥
आशेसह असि भंगुनि भाल्याचा विफल जाहला वार ।
पुरली न हौस मनिंची, नाहिं दिला अरिस चांगला मार ॥ १३० ॥
घुसुनी पाहे अरिच्या शिरकवचीं अश्वकेश रुळतात ।
धरतां ओढुन चित्रितबन्दें गळिं फांस लागुनी जात ॥ १३१ ॥
मिळतां विजय रणीं या, व्हीनस पारि आड येत जोव्हसुता ।
आली न दिसे कोणा, तोडोनी बंद त्यास दे असुता ॥ १३२ ॥
कवच रितें करिं येउन फिरत जसें फिरवि तत्कर प्रबल ।
सत्वर चक्राकारें फिरवुन फेंकी तया दुरी सरल ॥ १३३ ॥
आदळतां धरणीवर सहचर उचलून घेति तें सहज ।
अरिवरि धांवतसे मग चवताळुन वीर मेनिलास अज ॥ १३४ ॥
सावध व्हीनस रक्षी; बाष्पावृत त्यास लपवि आभाळीं ।
परिमलयुत तद्मंदिरिं नंतर नेउन सलील सांभाळी ॥ १३५ ॥
व्हीनस बुरुजावर मग हेलनला आणण्या स्वतां जाई ।
तीतें वृद्धपुरंध्रींमध्यें बघुनी ' वदे करूं काई ! ' ॥ १३६ ॥
ती एक लेसिदीमनिं मायेची धनगरीण कैवारी ।
पुरवी मृदु लोंकर हिसिं चातुर्यें विंचरोनियां भारी ॥ १३७ ॥
तीचें रूप धरोनी व्हीनस बोले "उठीं उभी राहें ।
पारिस बाहे तुजसीं वाट सखे मंदिरीं तुझी पाहे ॥ १३८ ॥
सौन्दर्यें चमके किति वस्त्रें सुन्दर अनेक तो ल्याला ।

रणविन्मुख कोण ह्मणे ? नर्तक कीं नृत्य संपतां बसला" ॥ १३९ ॥
परिसुन वच हें तीचें अंतरिं उद्दाम जाहलें हृदय ।
चकित मनीं होवोनी देवीचें रूप निराखि ती सभय ॥ १४० ॥
ग्रीवेची सुन्दरता, मोहक कुच, तेज तीव्र नयनांचें ।
पाहुन देविस लक्षुन कांहीं भयभीत बोलली वाचे ॥ १४१ ॥
" काय तुझें लक्षण हें ! करिशी मम वंचना अशी कां गे ! ।
नेशी कवण्या ठाया भोळी स्त्रीजात हें मनीं वागे ॥ १४२ ॥
काय अतां मी जाऊं सागर लंघोनिया दुजा देशा ।
कारण रणसंग्रामा होउन लोकांस भोगवूं क्लेशा ? ॥ १४३ ॥
व्रत पतिचें दुसऱ्यानें हेलन मोडील गे कुणा करतां ? ।
तेथें कथिं मज आधीं, पारिस तव अन्य कोण आवडता ? ॥ १४४ ॥
विजयी एत्रिअसात्मज होतां देतेस आज मज हातीं ।
जातें कोठें तरि मी, दुःखें सोसूं अशीं कशीं हा ! तीं ॥ १४५ ॥
झुरतो जर तो विरहें, जावें गे तूंच त्यास सुखवाया ।
आलिंपासिं सुरभवनीं होतें तें सर्व मान सुख वायां ॥ १४६ ॥
तत्सान्निध्य करावें, केव्हां येईल कोणती वेला ।
राज्ञीपद तुज देइल, अथवा दासी ह्मणेल सेवेला ॥ १४७ ॥
मीं तर येतचि नाहीं शोभविण्यातें तदीय शेजेला ।
त्रायस्थ सकल नारी ' छी थू ' करतील त्याच वेळेला ॥ १४८ ॥
सुरतसुखा सेवाया उचित न मीं ह्मणुन मन न वळतें गे ।
दुःखीं निमग्न झालें संक्षोभें चित्त हें खवळतें गे " ॥ १४९ ॥

कोपुन व्हीनस बोले " हतदैवे ! राग मज न आणावा।
जाइन तुज टाकुन मी व्याया वर्जीन गे तुझ्या नावा ॥ १९० ॥
प्रेमा मम तुजवरता होता तितुका अतां तिरस्कार।
मनिं शिरुनी नाश तुझा होइल गे मीं न बोलतें फार " ॥ १९१ ॥
भ्याली हेलन भारी पांघरि सित वस्त्र हळुच पातळ तें ।
देवी मार्गा दावी गेलि तिथोनी दुजां कसें कळतें ॥ १९२ ॥
पारिसमंदिरिं शिरतां दासी गेल्या उठोन कार्याला।
व्हीनस विनोदकर ती बसवी अणुनी पतीपुढें तिजला ॥ १९३ ॥
रूप तिचें तो निरखी; फिरवोनी नेत्र सरत ती मागें।
मर्मीं वाक्शर सोडी त्याची निर्भर्त्सना करी रागें ॥ १९४ ॥
* हेलन बोले त्यातें "रणभीरो ! पळुन काय आलास !।

---

* या ठिकाणीं कविवर्य मोरोपंतकृत रणपराङ्मुख पुत्रास पाहून केलेलें विदुलेचें भाषण समग्र दिल्याशिवाय रहावत नाहीं. दोहोंतील साम्य रसिक वाचक जाणतीलच. येथें हेलन आपल्या द्वितीय कामुक वल्लभास ताडून बोलत आहे व महाभारतांत विदुला आपल्या पुत्रास बोलत आहे.

विदुला ह्मणे अहारे ! क्लीबा ! मंदा ! कसा पळालास !।
कां वांचलासि अयशस्कर याहुन गर्भीं न कां गळालास ? ॥ १ ॥
अरि हरिल राज्य मग तूं वरिशिल वृत्त्यर्थ काय माधुकरी ।
सुखकर सुकर्म टाकुन असुखकर कुकर्म कोण करी ॥ २ ॥
मद्यौवन संजय ! हे ! निज नाम बुडविलें तुवां दगडें।
झगडें यशोर्थ अरिरथचक्रांहीं स्पष्ट लोष्ठसा रगडें ॥ ३ ॥
जेणें लज्जित व्हावें स्वर्गीं सह पूर्वजें तुझ्या तातें ।
परमानुचित पलायन कैसें केलें तुवां कुजाता तें ? ॥ ४ ॥

* * * * *

अथवा तुवां मरावें क्षणहि न बुडवून मान वांचावें।
काळा ! यासम अन्य हि जे असतिल त्यांहि मानवां चावें ॥ ५ ॥

याहुनियां मत्पतिचा लागुनियां वार कां न मेलास ! ॥ १९५ ॥
'मीं शूर कुशल मीं,मीं. मातें हो पाड मेनिलास नसे '।
होतास करित वच तें गर्वाचें सांग विसरलास कसें ?॥ १९६ ॥
जा शूर मेनिलासा पुनरपि युद्धास देइं आव्हान।
अथवा पुरे चतुरता ! मरशिल गा ! पुरुष उचित तूं या न" ॥१९७॥
पारिस बोले " सुन्दरि ! दुःखावर डाग काय देतेस ?।
साहाय्य मेनिलासा कोणाचें पूस तें मिनर्वेस ॥ १९८ ॥
काय अजुन झालें गे ! देवां घेउन सहाय अज सहज ।
हां हां ह्मणतां जिंकिन, त्याची नाहीं कथा मुळींच मज ॥ १९९ ॥
परि ये अशि आधिं जवळी घेऊं उरकून सुरतकार्याला ।
आलिंगन दे मजला सर्वांगीं हा अनंग संचरला ॥ १६०
त्या लेसिदीमनांतुन जलमार्गें जेधवां तुला नेली ।
क्रेनाईद्वीपांतरिं सुरस सुरतकेलि जेधवां केली ॥ १६१ ॥
अनुराग तुझ्या वरता इतुका गे खचित तेधवां नव्हता ।
गुदरे समय कठिण हा वांचिव मारूं नकोस मदनहता " ॥ १६२ ॥
अरुणशयनिं तरुण चढे सकरुण मागून जात वामांगी ।
खेळे अनंग अंगीं संगोत्सुक दंग जाहलीं रंगीं ॥ १६३ ॥
इकडे एत्रिअसात्मज धांवे, सर्वत्र शोधितो अरिला ।
गर्जुन भक्ष्या शोधी विपिनीं, त्या तुच्छ करित केसरिला ॥ १६४ ॥
गेला पारिस कोठें त्रायस्थांच्या करांत हा पडता ।
देते त्या अरिच्या करिं सकलां काळापरीस नावडता ॥ १६५ ॥

ह्मणतो अगमेम्नन तो येउन पुढतीं " अहो वचा पारिसा ।
त्रोजन हो ग्रीक अहो दिसतो कीं मेनिलास विजयीसा ॥ १६६ ॥
स्त्रीधन द्या, हेलन द्या, द्या हो संस्मरणीय दण्ड संतोषें " ।
ग्रीकांनीं मोदभरें भरिलें नभ सर्व उंच जय घोषें ॥ १६७ ॥

सर्ग ४ था.

तहाचा मोड व युद्धारंभ.

सारांशः—देवांचे सभेंत ट्रोजनयुद्धावर वादविवाद होतो व तें पुढें चालू ठेवावें असें ठरतें. तह मोडून टाकण्याकरतां मिनर्वेला जोव्ह पृथ्वीवर पाठवून देतो. ती जाऊन पन्दारसाचें मन वळवून मेनिलासावर आडून बाण सोडण्यास लावते. त्याचें क्षत वैद्यराज मेकाअन बरें करतो. अगमेम्नन सेनाध्यक्षांचें काम उत्तम रीतीनें करतो. तो सर्व सेनेचें निरीक्षण करून मुख्य वीरांची स्तुति किंवा निंदा करून सैनिकांत उत्साह भरवितो. नेस्तराची सेनेंतील शिस्त दिसून येते. युद्धास आरंभ होतो व उभयपक्षीं वीरांची नासाडी फार होते.

कालमानः—मागचाच दिवस पुढें चालू, तो सातव्या सर्गाचे शेवटापर्यंत असतो.

स्थलः—ट्रायाची समरभूमि.

जोव्हगृहीं देवसभा बसली ती आसनीं सुवर्णाचे ।
हीबी वाढि सुधारस, पेला झपझप करांतुनी नाचे ॥ १ ॥
होतें लक्ष्य सुरांचें ट्रायावर लागुनी तया कालीं ।
जूनोतें चिढवाया जोव्हाची व्यंङ्ग्य उक्ति सुरु झाली ॥ २ ॥
" दोन " वदे " सहकारी दिसती देवांत मेनिलासाचे ।
जूनो आणि मिनर्वा, परि तीं व्रत पाळिती तटस्थाचें ॥ ३ ॥
इकडे परंतु पाहीं व्हीनस ती ब्रीद आपुलें पाळी ।
राखीत पारिसाची पाठ सदा राहुनी उभी जवळी ॥ ४ ॥
मरणार तोंच आतां वांचविलें त्या अनर्थ टाळाया ।
सत्य पुसा तर कथितों विजयी तो मेनिलास या समया ॥ ५ ॥
अपुला विचार बघुं या व्हीनसनें साधितां असा कावा ।

रण घोर मातवावें ? अथवा अज संधि करून टाकावा ? ॥ ६॥
मानवतां हें सकला त्रायीं भरतील फिरुन पौर जन ।
द्या परत मेनिलासा हेलन ती, अन्य तोड ती अज न " ॥ ७ ॥
जूनो आणि मिनर्वा गुणगुणती कानमंत्र आणि करिती ।
त्राया विध्वंसाया, योजावी कठिण सुलभ काशि रीती ॥ ८ ॥
चित्तीं क्रुद्ध मिनर्वा, स्वस्थ बसे तातशब्द परिसून ।
जूनो क्रोधन भारी रागें बोले, न बैसली रुसुन ॥ ९ ॥
" जोव्हा ! वदसी कैसें ? होतो संतोष तुजसिं विघ्नांत ।
केले गाळुन घर्म श्रम ते नासून करिशि कां घात ? ॥ १० ॥
राजे जमवायातें फिरलें मी वारु बहुत शिणवीले ।
प्रायमनृप आणि तत्सुत लोटाया व्यसनिं कदन मातविलें ॥ ११ ॥
करिं जें तुला हवें तें अमरां अस्मादिकां न हें मत रे " ।
क्रोधानें जोव्ह वदे "लक्षण तव कां न दिसत नीट बरें ? ॥ १२ ॥
अपराध काय केला प्रायमभूपें व तत्कुमारांनीं ।
कीं तूं इच्छिसि बघण्या आजी तन्नगरनाश नेत्रांनीं ? ॥ १३ ॥
नगरद्वारांतुन तूं जाशिल लंघून उंच भिंतींतें ।
प्रायम ससुत सजन जर खाशिल तर चित्त वरिल शांतीतें ॥ १४ ॥
वाटेल तें करीं अज; होइल पुढतीं कलीस कारण गे ।
गोष्ट दुजी कथितों ती ध्यानीं तूं ठेव कार्य जर लागे ॥ १५ ॥
आवडती देश तुला त्यांवर मी काढला जरी राग ।
येई न आड माझ्या, मजला मनसोक्त वागण्या सांग ॥ १६ ॥

इच्छिसि ह्मणुनी त्रायीं घालूं देतों तुला धुमाकुल तो ।
त्रायस्थांस्तव माझा जीव परी नित्य फार कळवळतो ॥ १७ ॥
खोट्या दुराग्रहास्तव लाविसि तूं भोगण्या तयां भोग ।
त्रोजन भाविक, सन्नृप, तनय भले, काय वानुं हा योग ॥ १८ ॥
मानवलोकीं जन जे वसती नक्षत्रमंडलाखालीं ।
ज्यांची रविप्रकाशीं तिमिरापासून मुक्तता झाली ॥ १९ ॥
त्यांहुन सकलांहुन हे त्रोजन मच्चित्तिं अधिक मानानें ।
भजती पूजिति मातें करुनी शतमेध अर्घ्यदानानें " ॥ २० ॥
देवी जूनो बोले "स्पार्टा, अर्गास आणि मिसिनी हीं ।
प्रीतीचीं नगरें मम उच्छेदीं इष्ट तुजसिं तर पाहीं ॥ २१ ॥
यांची कड घेवोनी नाहीं घेणार राखण्या धांव ।
सामर्थ्य थोर तव, मग धरुं कैसा शत्रुचा मनीं भाव ॥ २२ ॥
शब्द न विरुद्ध काढिन, काढुन फल त्यांत काय सांगावें? ।
परि तव महिमा कीं मम व्हावे श्रम सफल, यश तुझें गावें ॥ २३ ॥
अमुची जाति सुरांची, एक कुलीं जनन एक होय पिता ।
भार्या ह्मणविसि मजसीं राया कां मग उगीच अप्रियता ॥ २४ ॥
ऐसें शिवाय पाहीं तुज करणें राज्य अखिल अमरांचें ।
करुं राज्यकारणा मग घेउन साहाय्य एकमेकांचें ॥ २५ ॥
अनुसरतिल सुर हा पथ, अमुचें साम्राज्यविभव वाढेल ।
होइल विनाश भेदें, ऐक्यानें कार्यभाग साधेल ॥ २६ ॥
येण्या निदर्शना हें पहिल्यानें कार्य घे असें हातीं ।

ग्रीक त्रोजन जेथें तेथें तूं धाड रे मिनर्वा ती ॥ २७ ॥
ऐसें करवीं जेणें त्रोजन ते मोडतिल अज तहातें ।
ग्रीकोत्तमास विक्षत करतिल आणि शस्त्र सोडुनी हातें " ॥ २८ ॥
जोव्हा हें मानवलें, आणवुनी बोलला मिनर्वेला ।
" ग्रीक त्रोजन जेथें तेथें तूं जा न लावितां वेला ॥ २९ ॥
ऐसें कर कीं जेणें त्रोजन ते मोडतिल अज तहातें ।
ग्रीकोत्तमास विक्षत करतिल आणि शस्त्र सोडुनी हातें " ॥ ३० ॥
उतरे ती भूवरतीं. तेज वमे तारका जणूं तुटली ।
मर्त्यां कीं जोव्हाच्या कोपाची नाविकांस खुण पटली ॥ ३१ ॥
सेनेमाजी थडके, न कळे हें कोण येतसे कां तें ।
ग्रीक त्रोजन होउन चकित मनीं वदति एकमेकांतें ॥ ३२ ॥
" रण घोर मातवाया, नाद जयाचा घुमेल जगतांत ।
वैरानल शमवाया इच्छी अथ जोव्ह आमुचा तात "॥ ३३ ॥
त्रोजनदलिं शिरली ती आकारें गमलि अन्तिनारसुत ।
सर्वत्र संचरे त्या सुरसम पंदारसास शोधीत ॥ ३४ ॥
दिसला लिकाअनज हा, पार्श्वीं दलभार करिं धरी ढाली ।
स्वारी पूर्वीं ज्यानें लंघुनियां ईसिपसजला केली ॥ ३५ ॥
+बोले वच वेधक त्या " वीरा वच आयकें लिकाअनजा ! ।

+ या घातकी कामाला याची योजना कां केली तें चॅप्मन कवीनें आपल्या काव्यांत वर्णिलें आहे.

ठावें लिकाअनाचें कुल तें विश्वासघातकी थोर ।
त्यांतिल पन्दारस हा उचित अकार्यास कीं खुळा पोर ॥ १ ॥
निष्पापा कोण वधिल ? शपथा मोडील कोण जर हा न ? ।
जोव्ह करी वृक्र या कीं यानें बलि अर्पिला शिशु लहान ॥ २ ॥

शर एक मेनिलासावर लपुनी सोडशील तर बघ जा ॥ ३६ ॥
त्रोजन तव प्रशंसा करतिल होऊन फार आभारी ।
बघतां अरि़स चितेवरि पारिस देईल देणग्या भारी ॥ ३७ ॥
ये सोड निशित सायक लक्षुन वीरास मेनिलासास ।
अधिं थोर फीबसाला नवसें बलि झेलिएंत द्यायास " ॥ ३८ ॥
मूढ वळे अविचारी. घाली करें निज धनुष्य उचलाया ।
चमकत होतें जवळी. त्याचा इतिहास गोड परिसा या ॥ ३९ ॥
अज वन्य एक दरिंतुन आला झुडुपांत नीट बागडत ।
वेधि शरें उरिं हा, तो खडकावरि जीव जावया पडत ॥ ४० ॥
तच्छृङ्गें बघतो तों षोडश तलहस्त मोजतां भरती ।
मग एक शार्ङ्गकारें सांधविलीं घांसुनी भराभर तीं ॥ ४१ ॥
अग्रें मढविलिं हेमें. शोभा याची अवर्णनीय खरी ।
वांकवि तें धनु आजि हा धरणीवर टेंकि नीट नेम धरी ॥ ४२ ॥
ढाली धरुन सुहृत्तम, लपविति या; काय नियम सांगावा ! ।
ग्रीकां तो न दिसावा ! बाणानें मेनिलास वेधावा ! ॥ ४३ ॥
शरधिमुखा उघडोनी काढी बाहेर एक निशित शर ।
चढवी तो धनुवरतीं व्हाया कीं भूवरी अहा कहर ! ॥ ४४ ॥
स्तवि तो कर जोडुनियां नम्रपणें फीबसास निज काजा ।
"यश दे मजसीं, अर्पिन नाजुक बलि झेलिएंत एक अजा" ॥ ४५ ॥
वांकवुनी धनुखण्डें वरि ज्या चढवी करूनियां बल तें ।
ज्यामध्य टेंकुनी उरिं ओढी धनु सर्व होत वर्तुळ तें ॥ ४६ ॥

स्पर्शी शराग्र चापा त्वेषें जणुं कडकडाट धनु करितें ।
निर्घोष घोष ज्या करि, घेत उडी शर वधावया अरितें ॥ ४७ ॥
पडला नाहीं बा रे! विसर तुझा मेनिलास ! हे! अमरां ।
राखी पाठ तुझी ही जोव्हसुता त्यांत उचलुनी स्वकरां ॥ ४८ ॥
लावी अन्य दिशेला त्वरितचि वळवून तीक्ष्ण शर हा कीं ।
निज लागे बाळा तों जननी जशि दक्ष मक्षिका हांकी ॥ ४९ ॥
दिधला तिनेंच लावुन कमरेवर जेथ ये उरस्त्राण ।
गेला भेदुन बंदा, उरकवचीं रुतुन राहिला बाण ॥ ५० ॥
कामा कवच न आलें, रक्षण वपुचें न जाहलें समयीं ।
झालें क्षत वर्मावर लागे मग धार कृष्णरुधिरमयी ॥ ५१ ॥
मीओनिएंत अथवा नारी ती केरिएंत रंगविते ।
हयतुण्डाभरणांस्तव कौशल्यें हस्तिदंतफलकांतें ॥ ५२ ॥
आगारीं ठेवी ती. ह्मणति रथी ‘ दे ’ परी नृपा देई ।
शोभति धवल फलक ते ज्यांवरतीं रक्तिमा बहू येई ॥ ५३ ॥
हिमधवल चरण तैसे ऊरु तुझे मेनिलास ! हे सजले ।
शरविद्ध वपुंतुनी तव जेव्हां हें रक्त रुधिर ओघळलें ॥ ५३ ॥
बघुनी क्षतशोणित तें अगमेम्नन नृपति जाय चरकोनी ।
अणि शूर मेनिलासा त्या सरसा कंप सुटत रणकोनीं ॥ ५४ ॥
बघतां शराग्र दिसलें मांसा बाहेर, धीर त्या आला ।
हुंकारिति जन, रडतां अगमेम्नन धरुन बन्धुराजाला ॥ ५५ ॥
“अरिशीं न्यां प्रिय बन्धो ! दुष्टें केला कसा असा तह रे ! ।

तूं एकलाच लढसी, स्वस्थ अह्मीं; तव अमोल जीव हरे ! ॥ ९६ ॥
आणा भाका करुनी धजले कैसे करावया घात !
ट्रोजन हो धिक् कृति ही रुधिराचा का पचेल हा पात ॥ ९७ ॥
बलिसंतर्पणपूर्वक केलेले याग काय होतील ?
गुतले हे शपथांनीं कर ते अमुचे दगा न देतील ॥ ९८ ॥
शिक्षा कठोर यांतें करिलचि तो जोव्ह जरि जरा उशिरां ।
कान्ता पोरें मरतां, यांच्या शोधील कोण समरिं शिरां ॥ ९९ ॥
निःसंशय कथितों कीं, प्रायम तो, ट्राय आणि तें नगर ।
मिळतिल धुळीस जेव्हां ईजिस फिरवील जोव्ह भीतिकर ॥ ६० ॥
गोष्टी घडतिल साऱ्या माझें साशंक चित्त परि होतें ।
अपाय तव जर जीवा घडला तर दुःख काय बन्धो तें ! ॥ ६१ ॥
लज्जायुक्त अधोमुख जावें लागेल मजसिं मग गांवा ।
हे ग्रीक परत जातिल हेलनचा मग उरेल न सुगावा ॥ ६२ ॥
ट्रोजननृपति प्रायम होइल कृतकृत्य, गति तुझी काय ! ।
फसलें तव कार्य, तिथें हा ! हा ! नासेल भूंत तव काय ! ॥ ६३ ॥
कबरीवर पद करुनी ट्रोजन बोलेल वाक्य उद्धत रे ।
घेणार सूड होता अगमेम्नन तो असाच काय बरें ! ॥ ६४ ॥
हें काय सैन्य अणिलें ? नेतो नौका रित्या घरा काय ? ।
*दे भ्रातृविरहिता मज भंगुन दे माय धरणि ! मग ठाय ! " ॥ ६५ ॥

---

* इंद्रजितानें ज्या वेळेस लक्ष्मणावर शक्तिप्रयोग करून त्यास विव्हळ केलें त्या वेळेस रामानें असाच शोक केला आहे.

त्या मेनिलास बोले धीरवचन "धैर्य काय सोडावें? ।
ग्रीकां भिववि न आतां, मर्मा वेधी न बाण जाणावें ॥ ६६ ॥
जें पदक कमरबंदीं कठिण बहू तें घडींव, शर वारी" ।
अगमेम्नन उत्तर दे "देव करो उक्ति सत्य तव सारी ॥ ६७ ॥
प्रियबन्धो ! वैद्य तुझें क्षत निरखोनी करील सदुपाय ।
मग तीव्र वेदना तव हरतां आराम होइल न काय ?" ॥ ६८ ॥
धैर्य धरोनी वदला सुरदूता चपल तालथीबिअसा ।
"त्या एस्क्युलेपिअसजा आणीं मेकाअनास आज कसा ॥ ६९ ॥
पाहिल तो ग्रीकवरा त्रोजन धन्वी जया गुणी आज ।
वेधी शर सोडुन ही कीर्ति तयाची अणी अम्हां लाज" ॥ ७० ॥
धांवे दूत तसाची धुंडी मेकाअना तसाच दलीं ।
मध्यें उभा सभोंवतिं शोभति करधृत निरुंदशा ढाली ॥ ७१ ॥

किं नु मे सीतया कार्यं लब्धया जीवितेन वा ।
शयानं योऽद्य पश्यामि भ्रातरं युधि निर्जितम् ॥ १ ॥
किं नु वक्ष्यामि कौसल्यां मातरं किं नु कैकयीम् ।
कथमंबां सुमित्रां च पुत्रदर्शनलालसाम् ॥ २ ॥
कथं वक्ष्यामि शत्रुघ्नं भरतं च यशस्विनम् ।
सह तेन वनं यातो विना तेनाहमागतः ॥ ३ ॥

अर्थः—आज लक्ष्मणासारखा बन्धु जखमी होऊन समरशय्येवर काळनिद्रा घेत आहे असें मला जर पहावें लागेल तर सीतेची प्राप्ति होऊन तरी काय फायदा ? फार काय मी याच्या पुढें जगून तरी काय फायदा ? कौसल्या माता, कैकयी व जिच्यामध्यें पुत्रदर्शनलालसा तीव्र उत्पन्न झाली आहे अशी सुमित्रा माता, भरत व शत्रुघ्न, हीं सर्वजणें मला ह्मणतील 'लक्ष्मण तुझ्याबरोबर वनवासांत जातानां होता; आतां तूं त्याच्याशिवाय एकटाच परत येत आहेस' ! तेव्हां मी त्यांना काय सांगूं !!

रामायण.

जाउन जवळ तयाच्या चातुर्यानें निरोप त्या वाही ।
"ये एस्क्युलेपिअसजा अगमेम्नन आज नृवर तुज बाही ॥ ७२ ॥
ग्रीकवरा पाहीं ये, त्रोजन धन्वी जया गुणी आज ।
वेधी शर सोडुन ही कीर्ति तयाची अह्मां अणी लाज "॥ ७३ ॥
ऐकुन वच कळवळला, उठला वेगें, तया सवें चाले ।
दोघे नृवरा जवळी उभय दलांतें वलांडुनी आले ॥ ७४ ॥
देखे तो नृवराच्या वीर सभोंवार काळजीमाजी ।
काढीत कमरबंदांतुन शर उपटोन ह्मणति जन 'वा जी' ॥ ७५ ॥
शर काढितां तदग्रें मोडुन अंगांत राहिलीं रुतुन ।
सोडीत कमरबंदा आंतिल वस्त्रास फार तो जपुन ॥ ७६ ॥
झालें कठिण शरें क्षत त्यास निरीक्षून शोषि रुधिर मुखें ।
चिरनें सांगितला जो ताता तो लेप लावि वरतिं सुखें ॥ ७७ ॥
गुतले जों हे कार्यीं त्रोजन सरसावले युयुत्सु रणीं ।
अगमेम्नन जागृत नृप डगमगल्यावीण धांव घेत क्षणीं ॥ ७८ ॥
त्यजिलें चित्ररथातें, त्यजिले हय, टाकितात जे धापा ।
युरिमीदन त्यां ठेवी जवळी, श्रमल्यास लागतील नृपा ॥ ७९ ॥
क्रमतां रणपथ पदिं नृप पाही घाईत भेटले भट त्यां ।
उत्तेजन देइ वचें द्विगुणित बल येत, यश तसें वदत्या ॥ ८० ॥
बोले " धीर धरावा; खोट्यांतें जोव्ह जय न देईल ।
ज्यांनीं तह मोडुनियां दुःख दिलें त्यांस गृध्र खातील ॥ ८१ ॥
मागुति घेऊं नगरा, हरुनी, समया न पाहतां जोरें ।

नौकामाजी घालुन नेऊं स्वपुरास बायका पोरें " ॥ ८२ ॥
रणभीरू दिसले त्यां बोले " धिक्कार ! यश न पाळवलें ! ।
करधृतधनु असतां कां दिसतां जणुं बाल हरिण घाबरलें! ॥ ८३ ॥
दमलें वनिं धांवुन जें उरलें कांहीं न बल जया हृदयीं ।
राहे स्वस्थ उभें तें तेविं तुह्मीं राहलां चकित समयीं ॥ ८४ ॥
वाट कशाची बघतां? ट्रोजन सरसावया हवे काय ? ।
तरतिल का जलधिंत मग नौका तुमच्या अशाच अनपाय? ॥ ८५ ॥
ऐसे जन भग्नोद्यम, त्यांतें साहाय्य जोव्ह करतो का ?
*तुमच्या आलस्यानें दिधल्या ही तो पडेल करतो का ! " ॥८६॥
वीरावलींत फिरुनी करितां सेनाधिपत्व रणिं साचें ।
क्रीतनभूपतिचें बल पडलें दृष्टिस इदामिनिअसाचें ॥ ८७ ॥
क्रीतन नृप सकलांच्या पुढतीं शोभे वराह उपमितिस ।

---

* अगमेम्नन याचे भाषणांत व खालीं दिलेल्या डेमास्थनीस याचे भाषणांत फार साम्य आहे.

पण मद्देशबांधव हो, किती वेळ तुमच्या कानाशीं ओरडावें ! तुह्मीं उपेक्षा करतां पाहून, पहा माझा जीव पराकाष्ठेचा चडफडतो. अरे तुह्मीं आलस्यनिद्रेंतून जागे होऊन युद्ध करण्याविषयीं कंबर कधीं बांधणार ? काय ? कांहीं मोठा एखादा अनर्थ घडल्यावांचून तुमचे डोळे उघडत नाहींत? आतां घरीं बसवत नाहीं, शत्रु येऊन वेशीशीं पोंचला, असें झालें पाहिजे काय ? अरे, आजपर्यंत ज्या तुमच्या मानखंडना झाल्या त्यांविषयीं तुह्मांस कांहींच वाटत नाहीं ? आजपर्यंत जें झालें तितक्यानें तुमचा आळस जात नाहीं? ह्याहीपेक्षां मोठा कांहीं अनर्थ कोसळला पाहिजे ? इ०

थोर फळ्या सैन्याच्या चालवि मागून मेरिआनीस ॥ ८८ ॥
अगमेम्नन थांबवुनी तोषें बोले इदामिनिअसातें ।
ग्रीकांत एक तूं मज आवडसी येसि सर्व कामातें ॥ ८९ ॥
समरीं धांवसि पुढतीं, मागें मिष्टान्न सेवनीं नससी ।
रसराज बघुन मदिरा आदर साभार तूं तिचा करसी ॥ ९० ॥
पात्रें परिमित भरुनी करती मित पान इतर सरदार ।
आकण्ठ पूर्ण पात्रें विलसे माझा तसा तुझा हि कर ॥ ९१ ॥
आतां त्वरा करावी, जाय रणीं डौल मारिलास तसा " ।
क्रीतननृप बोले " हे अगमेम्नन ! * आज मोडुं शब्द कसा ? ॥९२॥
समशील सखा मी तव, लढण्या ग्रीकां दुजां विनविं याया ।
देति दगा त्रोजन हे मोडिति तह दुःख अन्ति भोगाया " ॥ ९३ ॥
आजक्षां भेटाया मुदितमनें एत्रिअसज मग गेला ।
स्वार धृतायुध दिसती जमले घनसे पदाति रांगेला ॥ ९४ ॥
राहे उभा कड्यावरि पाहे अजपाल दूर जलधिकडे ।
वायव्यपवनवाहित एक तया कृष्ण मेघ दृष्टि पडे ॥ ९५ ॥
क्रमतां सागर वाटे मेघ+ न हा तमचि एकवटलें तें ।

---

* हें वाक्य फार लहान असून आंतील नीतितत्व मात्र फार मोठें आहे. अशीं वाक्यें आर्येंत गोंवून देण्याची हातोटी पंतांना फार साधली आहे. उदाहरणार्थ कांहीं वाक्यें दिलीं आहेत. " वचन काय फिरवावें ?" " न वदावें कटु पटुनें" "खळबोधश्रम निष्फळ" "क्रोध असावा समर्यीं" "आशा वेडी राया" इ०

+ चक्रवाताचे योगानें कधीं कधीं समुद्रांतील पाणी वर उचंबळून स्तंभाकार आकाशांत वर चढत जातें. या पश्चिम समुद्रांतील सृष्टिचमत्काराचें यांत वर्णन आहे.

मग चक्रवात सुटतां हांकी धनगर दरींत कळपातें ॥ ९६ ॥
आजक्षांचें भीषण दल त्या मेघासमान रणिं चाले ।
जोव्हप्रिय तरुणांच्या करिं ढाली नाचतात अणि भाले ॥ ९७ ॥
बोले अगमेम्नन त्या गोड वचें ग्रीकनायकांनां हीं ।
" आजक्षद्वय! हो मी तुह्मां खपवावया उचित नाहीं ॥ ९८ ॥
उत्तेजितां जनांतें, शौर्यें लढण्यास लावितां मोदें ।
हे जोव्ह ! हे अपालो ! सकलजनां शौर्य हें मिनर्वे ! दे ॥ ९९ ॥
प्रायमपुर मग घेऊं, येइल त्याचा विनाशकाल जसा " ।
नंतर तेथुन गेला अन्य दिशेला धराप तुष्ट तसा ॥ १०० ॥
भेटे नेस्तर त्यातें, वक्ता तो मधुर त्या पिलिअनांचा ।
जमवीत सहचरांनां " मान करा " बोलतो " विनंतीचा" ॥१०१॥
हीमन तो, पेलागन, सन्नृप तो क्रोमिअस, अलास्तर तो ।
विनतिस मानित समरीं जननायक ही बिआस नृपवर तो ॥१०२॥
रथतुरगां घेवोनी सज्ज रथीं ठाकले शिरोभागीं ।
अगणित पदातिसेना शूरांची सज्ज मागल्या जागीं ॥ १०३ ॥
भीतां ठेवी मध्यें निरुपायें लढतिल प्रसंगाला ।
मग सारथींस सांगे "संभ्रम कां ? आंवरा तुरंगांला ॥१०४॥
मी अश्वनिपुण, माझी शक्ति अतुल, गर्व हा कुणी धरुन ।
समरांत एकल्यानें पुढतिं न व्हावें स्वसैन्य सोडून ॥ १०५ ॥
पायहि काढावा नच, निर्बलता ये तयें स्वसेनेला ।
खालीं नच उतरावें भाला पुरल्यास नेम जर केला ॥ १०६ ॥

चरवी रीत खरी ही. पहिले जन या ठरींव पद्धतिनें ।
होते जिंकित नगरें काय करावें विशाल भिंतीनें "॥ १०७ ॥
युद्धविशारद वृद्धें केला उपदेश जो स्वसेनेला ।
अगमेम्नन तुष्ट तयें बोले हे शब्द योग्य वेळेला ॥ १०८ ॥
"इच्छा मीं तात करीं तुमच्या स्वाधीन पाय राहूत ।
धैर्य स्थिर हृदयिं वसे तैसें सामर्थ्य येउ बाहूंत ॥ १०९ ॥
वृद्धदशा आली ही तुह्मांतें कष्ट दे जशी इतरां ।
तुह्मां मिळुन तरुणपण, गेली तुमची दुजांस कां न जरा? "॥११०॥
प्रत्युत्तर नेस्तर दे "अगमेम्नन ! तेंचि इच्छि मम हि मन ।
बल यावें तेव्हाचें जेव्हां वधिला दुरेरुथेलिअन ॥ १११ ॥
बघ मनिं विचरुनियां कीं सर्वांतें सर्व ईश दे न कधीं ।
जरठ जरा अज घेरी जर म्यां तारुण्य भोगिलें आधीं ॥११२ ॥
राहिन तुरगां जवळी उपदेशिन मी तथापि सद्वचनें ।
कार्यचि तें वृद्धांचें. भाले फेंकोत तरुण मुदित मनें" ॥ ११३ ॥
गेला वच ऐकोनी मोदें नृप एत्रिअसज दुसरिकडे ।
मेनिस्थिअस तयाच्या सज्ज उभा पेटिअसज दृष्टि पडे ॥ ११४ ॥
रणनादकुशल भोंवतिं वीर उभे शूर ते अथीनिअन ।
सेफालिनिअन होते, होता युलिसीस जवळि सुज्ञ जन ॥ ११५ ॥
सेना स्वस्थ तयाची दूर दिला तळ समस्त लोकांनीं ।
तह मोडतां न कळला, नाहीं रणनाद ऐकिला कानीं ॥ ११६ ॥
ग्रीक दुजे येवोनी देतिल कीं त्रोजनांस तोंड रणीं ।

होते वाट बघत ही, भूपा कळतांच निंदि तत्करणी ॥ ११७ ॥
" जोव्हप्रसादनृपते !" भूप ह्मणे " ऐक पेटिअसतनया !।
हे युलिसीस ! असा कां: कांपसि जरि जाणतोस कुटिल नया ?॥ ११८॥
धजतां कां न रणीं हो, सोंपवितां कार्य अन्यशिरिं काय ? ।
करुनि पुढाकार अतां अर्पावा योग्य तो समरिं काय ॥ ११९ ॥
भोजन सरदारांतें ग्रीकांतें मम गृहीं यदा होतें ।
आमंत्रण पहिल्यानें तुमच्याविण हो वदा कुणा हो तें ॥ १२० ॥
मग मांस भाजलेलें, मद्य मधुर सेवितां मजा वाटे ।
समया प्रेक्षक झालां ! ह्मणतां आह्मांस काय जा वाटे ! ॥ १२१ ॥
ग्रीकांचीं दश सैन्यें भिडती अरिच्या कठोर शस्त्रांशीं ।
याची लाज धरा " हें ऐकुन युलिसीस चढत रागाशीं ॥ १२२ ॥
अगमेम्ननृपतीवर वाक्शर युलिसीस तीक्ष्णसे हाणी ।
" दंतावलिची सीमा लंघुन वद काय निर्गता वाणी ? ॥ १२३ ॥
कुचराई रणिं करतों वच हें भलतें रुचे तुझ्या मतितें ।
ग्रीक त्रोजन लढतां, इच्छिसि तरि पाहसील मत्कृतितें ॥ १२४ ॥
जनक असें वीराचा, जन्म दिलें तेलिमाकसा ज्यानें ।
समजे तर विचरें कीं आणावा काळिमा कसा त्यानें ॥ १२५ ॥
ती थोर अश्वविद्या त्रोजन हे तींत होत बहु कुशल ।
आधिं कां वदसी ? धांवुन त्यांवरतीं, दाखवीन बाहुबल " ॥ १२६ ॥
त्या ये राग बघोनी, हांसुन नृप शब्द घेतसे परत ।
" लाअर्टीससुता तूं ऐकें युलिसीस ! सुज्ञ ! " नृप वदत ॥ १२७ ॥

" अधिकोत्तर केलें म्यां चिढवाया तुज न, वा न चढवाया ।
बोधद्वेष्टा तूं नच. कार्यावर दृष्टि आपुली राया ॥ १२८ ॥
बोलुन चुकलों असलों बघुं मग. सर ये पुढें प्रसंगा या ।
+मम बोल फोल होउत जावो हें डोलणें तें वायां" ॥ १२९ ॥
बोलुन हें सोडुन या, भूप अनंतर दुजांकडे वळला ।
दायोमिद् तयातें तैदिअसात्मज उदार आढळला ॥ १३० ॥
अश्वांच्या जवळ उभा शोभे रथ थोर जवळ पितळेचा ।
कापेनिअसज राहे सन्निध तो स्थेनिलस हि ममतेचा ॥ १३१ ॥
निन्दागर्भ वचातें यातें पाहून करित भूपति हा ।
" बा रे तैदिअसज ! वद, सुटला तुज आज कंप तरि कितिहा १३२
पळवाट निरखिसी कां ? त्वत्पितया कंप ठाउका नव्हता ।
तो युद्ध अरिशिं जाणें, सहचर टाकून तो सरे पुढता ॥ १३३ ॥
त्यातें न देखिलें मीं, सांगति ते पाहिलें तया ज्यांनीं ।
श्रम करि अचाट ह्मणुनी, सर्वोत्तम सर्व लोक त्या मानी ॥ १३४ ॥
घेउन पालिनिकीसा गेला हा अतिथि ह्मणुन मिसिनीला ।
सैन्य जमा करण्याला, पाडाया थीबनगरभिंतीला ॥ १३५ ॥
" विख्यात वीर द्यावे " मागे फल सानुनय विनंतीचें ।
सैनिक सज्ज जहाले तत्संगें जावयास मिसिनीचे ॥ १३६ ॥
दुश्चिन्हें दावोनी त्यांचा परि जोव्ह बेत हा फिरवी ।
विन्मुख गांठी परतुनि आसोपसतीरभूमि हा हिरवी ॥ १३७ ॥

+ बोलणें फोल झालें । डोलणें तें वायां गेलें ॥ तुकाराम.

नंतर एकियनानीं तैदिअसा प्रतिनिधित्व देऊन।
थीबपुरा जायाला योजियलें *राजकारणावरुन ॥ १३८ ॥
स्थिरधैर्य, श्रुतविक्रम, चाले सोत्साह वीर जो राजी।
पोंचे थीबपुरीं तो मग * इतिआक्लीसमंदिरामाजी ॥ १३९ ॥
तों तेथ भोजनोत्सविं होते रममाण बहुत काद्‌मिअन।
हा एकला, बहू ते, नवखा तरि तैदिअस धरी भय न ॥ १४० ॥
समरप्रिय वीरांच्या खेळांचा आणिला तयें योग ।
हारविलें सकलांतें ह्मणती ते ' कोठुनी अला भोग ! '॥ १४१ ॥
येइल अपयश कां या ? यातें साहाय्य त्या मिनर्वेचें।
खवळे काद्‌मिअनांचें कितिकांचें पित्त अश्वनिपुणांचें ॥ १४२ ॥
जाया घरा निघे हा. पञ्चादश तरुण लपति वाटेंत।
नायक दोन तयांचे अमरांसम निपुण युद्धविद्येंत ॥ १४३ ॥
हीमनसुत मीअन तो घेउन परिवार अप्रमत्त बसे।
आतोफोनससुत तो लैकोफान्तीस अन्य जवळ वसे ॥ १४४ ॥
संहार घोर केला तैदिअसें एक उरविला मार्गें।
दैविक चिन्हें दिसतां राखाया मीअनास परि लागे ॥ १४५ ॥
ईतोलिअन असा तो होता विख्यात तैदिअस राणा।
त्याचा पुत्र शहाणा, रणभीरू जाहला कसा दाणा !" ॥ १४६ ॥
दायोमीद न बोले राखी तो बोज पूज्य नृपतीचा।

* हा आपला भाऊ जो पालिनिकीस त्याचें राज्य बळकावून बसला होता तें परत त्याचें त्याला देवविण्याचा तैदिअसचा विचार होता.

कापेनिअसज कोपे. देत असा जाबसाल अपकृतिचा ॥ १४७ ॥
" सत्य कसें बोलावें ठावें, मग कां असत्य वाचा ही ? ।
वीर पित्याचे आह्मीं लेंक सवाई कसे असों पाहीं ॥ १४८ ॥
स्वार सर्व थोडे परि जिंकियलें थीब सांग आह्मिच ना ?
सप्तद्वार नगर तें मार्सप्रिय, तरि अह्मां नसे गणना ! ॥ १४९ ॥
चिन्हें दैविक झालीं त्यांवरतीं फार भरंवसा होता ।
जोव्हाचें बल आह्मां, अपयश कैसें घडे तरुण पोतां ॥ १५० ॥
यश पूर्वजां न आलें मोहानें पावले विनाशा जे ।
त्यांच्या पंक्तिस आह्मां बसविशि हें काय रे तुला साजे !"॥१५१॥
दायोमीद तयाला लागुन बोले बऱ्याच रागानें ।
"हें काय वदसि बा तूं ! बैसें हे स्थेनिलस मुकाट्यानें ॥ १५२ ॥
रणिं जाया ग्रीकांतें उत्तेजी हा करून मनधरणी ।
ही एत्रिअससुताची वाटे निर्दोष सर्वथा करणी ॥ १५३ ॥
त्रोजन हरुनी ग्रीकां मिळतां जय मान होय नरपाला ।
ग्रीकांचें जर झालें कंदन तर लाज काय अन्याला ? ॥ १५४ ॥
दुर्घट दाऊं विक्रम चल ये " हे शब्द तो न जों ह्मणतो ।
तों घे उडी रथांतुन शस्त्रें करितात शब्द खणखण तो ॥१५५॥
संचरतां समरांगणिं, बघुन नृपा शूर नर हि भय धरतो ।
झुंजाया ग्रीकांचें दल खवळे काय ह्मणुं न सागर तो ॥ १५६ ॥
वायव्यमारुतोत्थित अर्णवजल नभसमागमोत्सुक तें ।
वृद्धि प्रचंड पावुनि दर्पें वरि धवल फेन उद्‌वमतें १५७ ॥

उच्चशिलाप्रतिरोधें, करुनी आक्रोश दीर्घ शब्दांनीं ।
तीरावर धांवतसे जेविं अविच्छिन्न ऊर्मिमालांनीं ॥ १५८ ॥
तेविं ग्रीकचमूच्या पंक्तिवरी पंक्ति चालती दाट ।
ठेविति दलीं व्यवस्था आज्ञापुनि अधिप चालतां वाट ॥ १५९ ॥
निःशब्द सैन्य चाले ठेवोनी मान नीट अधिपांचा ।
हें मौन बघुन ह्मणातिल जन सारे " काय यां नसे वाचा" ॥ १६० ॥
संग्रामसिद्ध सैनिक सजले सोज्ज्वल सहस्र शस्त्रांनीं ।
घातक घालुन घाले करतिल घटकेंत घोर रिपुहानी ॥ १६१ ॥
दोहनकालीं सततचि, ऐकुन शब्द स्वकीय वत्सांचे ।
अगणित शेळ्या करिती में में गोठ्यांत जेविं धनिकाचे ॥ १६२ ॥
तेविं त्रोजन करिती ओरड ती एक सकल सैन्यांत ।
भाषा भिन्न तयांची होते जन भिन्न देशचे यांत ॥ १६३ ॥
रणनाद भिन्न त्यांचे भिन्न स्वर नभपथें वरी जाती ।
मार्स त्रोजनवीरां, ग्रीकां दे धीर रणिं मिनर्वा ती ॥ १६४ ॥
ती एक संभ्रमाची अणिक भयाची तशीच कलहाची ।
या देवता अल्या रणिं शेवटली बहिण होय मार्साची ॥ १६५ ॥
प्रथम लहान असे जरि, उचली वरि वर्धमान निज शिर तें ।
ती संचरे धरेवरि, उंच परी तें पहा नभीं शिरतें ॥ १६६ ॥
पद फिरवी तिकडे ते कण्हती जे वीर जाहले जाया ।
संग्रामवैर माते. नाहीं हा ! कुणि शवांस मोजाया ! ॥ १६७ ॥
ढालीवरतीं ढाली, भाल्यांवर आदळोनियां भाले ।

कवचांचें भान सरुनि वीरांवर वीर पालथे झाले ॥ १६८ ॥
हत हंता आक्रोशा जयशब्दा करिति एक समयाला ।
रुधिराचे पाट झणीं भूवरतीं लागले वहायाला ॥ १६९ ॥
गिरिशिखरावरुनि झरे घसरुनि पडती यदा तडागांत ।
झांकृतिच्या प्रतिशब्दें दुरुनी अजपाल होत भयभीत ॥ १७० ॥
तेवीं रणनिर्घोषें भयविप्लुत वीरगण अतां झाला ।
त्या आन्तिलोकसाला त्रोजन पहिला अचूक बळि पडला ॥ १७१ ॥
हा एकिपोलसा त्या शिरकवचीं समरशिरिं करी वार ।
शिरास्थि भंगुन गेलें उठला नयनांसमूर अंधार ॥ १७२ ॥
समरीं खालीं आला बुरुज जसा कोसळे तटावरुन !
कवच हराया त्याचें ओढित या इलिफनार पद धरुन ॥ १७३ ॥
अपुरा प्रयत्न झाला; तत्कृत्या बघुन आजिनार भला ।
रोंवी कुशींत भाला ओणवतां ढालिंतुन जनां दिसला ॥ १७४ ॥
गात्रें शिथिल जहालीं; आत्म्यानें सोडिलें अहा ! तनुला ।
ग्रीक त्रोजन भोंवतिं जमती ते मातवावया तुमुला ॥ १७५ ॥
जेविं वृकावर वृक घे, वीरावर वीर तेविं घे धांव ।
लागत आजक्षाचा तरुण सिमोइसिअसा प्रथम घाव ॥ १७५ ॥
रम्य सिमोअसतीरीं माहेरीं प्रसवली तया जननी ।
ह्मणुनि सिमोइसिअस हें नाम तयाचें प्रसिद्ध होत जनीं ॥ १७६ ॥
पितृगृहिं कळपां चारी जननी रंभा वनीं इद्‌ावासी ।
सांभाळति काळजिनें वृद्ध घरीं लाड करून बाळासीं ॥ १७७ ॥

संगोपन केलें परि पितरां त्याचा मिळे न मोबदला ।
आजक्षाचा भाला लागुन अल्पायु असुरहित पडला ॥ १७८ ॥
रुतुनि उरीं उजविकडे अंसातुन नीट उपटला भाला ।
पडला धुळिंत धरेवर, पातित जणुं वृक्ष खालता आला ॥ १७९ ॥
रुजला वृक्ष रुचिर जो दीर्घवनीं वाढला जलाधारें ।
शाखा दूर पसरल्या घातियलें शस्त्र वरतिं रथकारें ॥ १८० ॥
हेतु मनीं कीं होइल रथचक्रा वलय यास वांकवितां ।
नदिच्या तटिं वाळतसे, गति तैशी सिमोइसिअसा आतां ॥ १८० ॥
आजक्षावर भाला रोंखी मग चित्रकवच आन्तिफस ।
चुकला वार तयाचा, झाला परि वार कठिण भलत्यास ॥ १८२ ॥
युलिसीससखा लियुकस नेतां करिं शव सिमोइसिअसाचें ।
होउन विद्ध मरे तो, करिंचें शव पडे तसें त्याचे ॥ १८३ ॥
युलिसीस कुपित झाला पुढतिं सरे शस्त्र घेउनी हातीं ।
निरखुनि सर्वां फेंकी भाला तंव भीत शत्रुसेना ती ॥ १८४ ॥
प्रायमदासीसुत जो राखी हय आबिदास नगरांत ।
भाला लागुन त्यातें अहह ! रुते दोन कानशीलांत ॥ १८५ ॥
धेरी येउन खालीं कोसळला वीर तो दिमोकून ।
शस्त्रें खणखणलीं तीं गेलें तें सर्व सैन्य दचकून ॥ १८६ ॥
परते हेक्तर भिउनी ग्रीक जयेंकरुन दीर्घ आरोळी ।
लुटती शवें अरींचीं पडलीं सर्वत्र तेथ वाटोळीं ॥ १८७ ॥
झाला क्रुद्ध अपालो पर्गामासिं बसुन पाहतां दुरुन ।

द्यायां त्रोजन सैन्यां उत्तेजन ओरडे तदा वरुन ॥ १८८ ॥
"त्रोजन अश्वनिपुण हो ! ग्रीकांची लावुनी न द्या हार ।
अंगें त्यांचीं दगडी लोहमयीं वा न, सोसण्या वार ॥ १८९ ॥
थेटिससुत रुसुनी तो बसला अकिलीस आरमारांत ।
युद्ध करीना अज तो द्वेषातें पोषवी शरीरांत "॥ १९० ॥
ऐसें वदत अपालो, जोव्हाची तों फिरून रणिं दुहिता ।
उत्तेजन दे शिथिलां ग्रीकां ती योजुनी तदीय हिता ॥ १९१ ॥
नंतर दायोरीसा गुंफ्यावर सव्य लागला दगड ॥
चुरलें अंग तयाचें, दैव कसें ! मोडलें पुरें हाड ॥ १९२ ॥
ईनासदेशवासी थ्रेशिअनाधीश पिरस जो नांवें ।
मारियला दगड तयें चित केलें त्यास एकल्या घावें ॥ १९३ ॥
भूवर पडत उताणा, मागे साहाय्य पसरुनी कर तो ।
रोंवी नाभित भाला धांवुनियां पिरस नृप भयंकर तो ॥ १९४ ॥
बाहेर पडुन अंत्रें झांकी अंधेर पूर्ण दृष्टीला ।
गेला प्राण निघुनियां टाकुनियां सकल जीवसृष्टीला ॥ १९५ ॥
पिरसावर धावुनियां शस्त्रा थोआस घेउनी आला ।
मध्यें उरांत खोंची रुतला मृदु फुफ्फुसांत तो भाला ॥ १९६ ॥
थोआस जवळ जाई उपटी भाला उरांतुनी सारा ।
हाणी असि शत्रूदरिं जीवाचा सोंपवि मुळें पसारा ॥ १९७ ॥
हरिलें कवच न यानें घेउनियां थ्रेशिअन करीं भाले ।
होते सभोंवताले, यासीं मग पाहिजे परत आलें ॥ १९८ ॥

बलवान शूर जेता परते परि लागला तया घाय ।
दोघे एका ठायीं धरणीवर पडति ह्मणत ते हाय ॥ १९९ ॥
एपिअनांचा पहिला थ्रेशिअनांचा नृपाल तो दुसरा ।
दायोरीस पिरस हे, पडले रणिं अन्य त्यां न गणति जरा ॥२००॥
असता अक्षत कोणी रणमध्यीं ज्यास असि नसे शिवला ।
हस्तें फिरवि मिनर्वा ह्मणुन रणीं जो शरां न घाबरला ॥ २०१ ॥
कळतें त्यास, कुणी ही चुकला नच, घेतली न माघार ।
ग्रीक त्रोजन दोघे पडले धुळिमाजि धरुन शेजार ॥ २०२ ॥

सर्ग ५ वा.

दायोमीदाचा पराक्रम.

सारांश– मिनर्वेच्या मदतीनें दायोमीद अद्भुत पराक्रम करतो. पन्दारस त्यास बाण मारून क्षत पाडतो. त्येषास चढून ट्रोजनांस साहाय्य करणारीं जीं व्हीनस व मार्स त्या दोघांस दायोमीद जखमी करतो.

मागील युद्ध पुढें चालू. काल व स्थल तींच आहेत.

नंतर देत मिनर्वा दायोमीदास धाष्टर्ययुक्त बल ।
ग्रीकांत आद्य पदवी पावुन वानोत लोक कीं सकल ॥ १ ॥
ढालीवर शिरकवचीं दीप्त करी तेज तें दुरी फांके ।
उदधिनिमज्जन सुंदर वासान्तिक तारका जणूं चमके ॥ २ ॥
रणमध्यीं दवडी त्या जेथ असंख्यात वीर झगडतसे ।
रणशूर इदीअस तो फेजिअसासह तयास भेटतसे ॥ ३ ॥
दारीस, व्हल्कनाचा मान्य पुजारी प्रसिद्ध सच्चरित ।
होता जनक तयांचा, युद्धाची लाविली तयें रीत ॥ ४ ॥
अरिवर दोघे बंधू घुसले ते एकले रथारूढ ।
दायोमीद तयांशीं पदचारी लढत हें जनां गूढ ॥ ५ ॥
दीर्घच्छाय करींचा भाला फेंकीत फेजिअस आधीं ।
अरिच्या अंसावरुनी जाइ निघोनी न लक्ष्य निज साधी ॥ ६ ॥
दायोमीद परी तो धांवे करिं धरुन कठिण खंजीर ।
सुटत न शस्त्र फुकट तें फेजिअसोरीं शिरे न करि उशिर ॥ ७ ॥
झाला भ्रष्ट रथांतुनि, भूप इदीअस रणीं पुढें सरला ।
बन्धु न मुक्त जहाला आला होता स्वतांवरी घाला ॥ ८ ॥

व्हल्कन पळवी त्याला ठेवी लपवून अंधकारांत ।
कींव अली वृद्धाची बसता कीं सारखा घरीं रडत ॥ ९ ॥
दायोमीद रथाचे सोडुन हय धाडि आरमारांत ।
दारीसात्मज दोघे, एक पळे एक समरिं मृत पडत ॥ १० ॥
तेणें भ्याले त्रोजन. वदली मार्सा तशी मिनर्वा ती ।
" हे मार्स ! नरनिषूदन ! ठाउक तूं उडवितोस पुरभींती ॥ ११ ॥
शोणितासिक्तकलेवर ! चल पळुनी ! चुकवुं जोव्हकोपातें ।
ग्रीक त्रोजन दोघे लढतां वद काय आपुलें जातें " ॥ १२ ॥
ऐसें बोलुन नेई मार्सा स्कामन्दरांत बसवी ती ।
ग्रीक अरीतें पळविति उभयदलीं चालु होत वीरहति ॥ १३ ॥
अगमेम्नन ओढितसे होदिअसा हेलिझोनिअन वीरा ।
पळतां मागुन मारी भाला भेदीत तीव्र, कठिण उरा ॥१४॥
कोसळतां भूवर नृप, उठला ध्वनि, शस्त्रभार खणखणला ।
दुसरा मग फीस्तस तो बलि पडला त्या इदामिनिअसाला ॥ १५ ॥
तार्नीहुनि आला हा सव्यांसीं वार घेत रथिं चढतां ।
पडला धरणीवर तो तमपटलें नयन झांकिले लढतां * ॥ १६ ॥
शस्त्रें त्याचीं लुटती परिचारक ते इदामिनिअसाचे ।

---

* याच्या मृत्यूवर पोपमहाराजांचे रूपक मनोवेधक आहे.
" जीवपतत्री अहा उडे लढतां " देहरूपी पिंजऱ्यांत इतके दिवस वास करीत असलेला जीवरूपी पक्षी त्यांतून उडून गेला तो पुन्हा कसचा परत येतो ! असा या चतुर्थ चरणांत अर्थ आला आहे.

स्कामन्द्रिअसा लागे तीव्र कठिण शस्त्र मेनिलासाचें ॥ १७ ॥
मृगयाकुशल धनुर्धर दायाना लक्ष्यवेध त्या शिकवी ।
वेळीं कामिं न ये ती विद्या गुरुची न गुरुहि तो तेवीं ॥ १८ ॥
पळतां मागुन मारी सव्यांसीं एत्रिअसज निज भाला ।
उपटे उरिं तो पडला, धरणीवर शस्त्रभार खणखणला ॥ १९ ॥
झर्मेन कारागिर तो लोभ करी ज्यावरी मिनर्वा ती ।
ज्याची हस्तकुशलता झाली तज्ज्ञां प्रशस्य सर्वा ती ॥ २० ॥
बांधीत आत्मघाती नौसाधन थोर पारिसाकरितां ।
दुःखा कारण झालें त्रायस्थां आणि त्या स्वतां लढतां ॥ २१ ॥
प्रश्न मनीं धरल्यावर कळले त्याला न कौल देवांचे ।
फेरीक्लस तत्सुत रणिं पळतां संत्रस्त कोठुनी वांचे ? ॥ २२ ॥
मागुन नितंबभागीं भाला मारीत मेरिआनीस ।
मूत्राशयास वेधुन शस्त्राचें अग्र भेदि अस्थींस ॥ २३ ॥
गुडघे टेंकुन रडतां मृत्यूची पसरली वरी च्छाया ।
पेदीअस मग पडला. लागे समरीं न मरण इच्छाया ॥ २४ ॥
अन्य क्षेत्रीं झाला सुत हा विख्यात अन्तिनाराला ।
वाढवि ज्यास थिआनो करुनी सुतानिर्विशेषलोभाला ॥ २५ ॥
भार्येच्या सत्कृतिनें बहुपरि मनिं आन्तिनार सुख पावे ।
मेजीस यास मारी मागुन शिरिं शस्त्र कीं असु खपावे ॥ २६ ॥
रसनेखालुन आला दंतावलिंतून उपटुनी भाला ।
शीतल शस्त्रा दन्तें चावुन पडला धुळींत न निभाला ॥ २७ ॥

दोलोपिअन पुजारी स्कामन्दरिं पूज्य देवनिभ राही ।
तत्तनया युरिपैलस समरिं वधी शूर हिप्सिनाराही ॥ २८ ॥
हाणून अंसदेशीं युरिपैलस उडवि हस्त जड असिनें ।
खालीं हस्त गळाला. मिटिले तन्नयन दुष्ट नियतीनें ॥ २९ ॥
ऐसे वीर झगडले. परि दायोमीद देखिला काय ? ।
त्रोजन यास ह्मणूं वा ग्रीक ह्मणूं ! दृश्य हा दलीं उभय ॥ ३० ॥
क्षणिं येथें क्षणिं तेथें ठायीं ठायीं रणांत संचरतो ।
घाला मागुन घाली पुढुनी अथ शीघ्र चाल ही करतो ॥ ३१ ॥
गिरिनिर्झरपुष्ट जणूं मार्गीचे सेतु उडवितो नद तो ।
फोडी दृढ धरणां जो क्षेत्रांच्या कुंपणींस का बधतो ! ॥ ३२ ॥
अवचित फुगुनी वाहे वारा पाऊस जोंव्ह जों धाडी ।
कितिकांचे तरुणांचे फुकट करी श्रम न हो जंव उघाडी ॥ ३३ ॥
दायोमीदा पुढतीं अगणित अरिसैन्य तेंवि नच टिकलें ।
त्राहि त्राहि करोनी तेणें तत्काल अरिस सोडियलें ॥ ३४ ॥
घाली रणीं धुमाकुळ मांडोनी घोर सैन्य संहार ।
पाहुन लिकाअनज हें पन्दारस ह्मणत " येतसे हार " ॥ ३५ ॥
धनु वक्र वांकवी निज लक्षुन त्या बाण धांवुनी सोडी ।
सव्यस्कंधीं हाणी रुतुनी अंगांत कवच जो तोडी ॥ ३६ ॥
शर आरपार वेधी तनुतें, मग होत रुधिरमय कवच ।
पन्दारस अरडोनी उत्साहें करित मोदजनक वच ॥ ३७ ॥
"त्रोजन हो ! व्हा पुढतीं विद्ध पडे ग्रीकवर न ये कामीं ।

तीव्र शरक्षत सोशिल तर मग दें मान फीबसा कां मी" ॥३८॥
पन्दारस गर्वोक्ति करी. दायोमीदास शर न नम्र करी ।
परतुन रथनिकट वदे स्थेनिलसा "ये रथांतुनी उतरीं ॥ ३९ ॥
उपटीं कटु कठिण शर स्कंधीं मम खोल रुतुन जो बसला" ।
उतरुन रथावरोनी स्थेनिलसें बाण सहज सोडिवला ॥ ४० ॥
कवचाच्या छिद्रांतुन पाघळलें रुधिर बहु दाटसर तें ।
दायोमीद प्रार्थी "देवाचें प्रेम कधिं वदा सरतें ! ॥ ४१ ॥
इजिसधरजोव्हसुते ! ताताची राखलीस पाठ रणीं ।
झाली थोर कृपा ही समया दाखीव देवि ! निज करणी ॥ ४२ ॥
मम हस्तें वध व्हावा याचा, या आण जवळ नेमांत ।
वेधुन मज म्हणतो-हा वांचेल न बहु रविप्रकाशांत–"॥ ४३ ॥
वाणी करुण मिनर्वा ऐके. दवडी तदंगजडता ही ।
जवळ उभी राहोनी बोले तुज "समरिं मुळिंच भय नाहीं ॥ ४४ ॥
दायोमीदा ! अरिशीं युद्ध करीं बल दिलें तुला अतुल ।
जेणें तव तातानें केलें लोकांत प्रथित तें स्वकुल ॥ ४५ ॥
देऊन दिव्य दृष्टि भ्रमपटला तव समग्र घालविलें ।
नर कोण, कोण सुर हें स्पष्टपणें पाहिजे तुला कळलें ॥ ४६ ॥
शक्ति बघावी तव किति, ये रणिं कुणि धरुन सुर कामना ही ।
व्हीनस वर्जुन अन्यां वेधायाचें तुला काम नाहीं ॥ ४७ ॥
व्हीनस कारण कलहा, प्रेमाची स्वामिनी तुला ठावी ।
क्षत कोमल करुनि शरें क्षणिं घरची सरळ वाट तिज दावीं" ॥४८॥

बोलुन हें नीलाक्षी जाय मिनर्वा न तों तैदिअसर्जे ।
केलें गमन समरमुखिं धरुनी औत्सुक्य जें तयास सजे ॥ ४९ ॥
द्विगुणाधिक शौर्य करी, सिंह जसा चिढवितां अजापाळें ।
कळपावरि तुटुन पडे तृषिता उपवासदुःख ज्या झालें ॥ ५० ॥
धनगर शर सोडी तो चुटपुटता लागतो तया दुरुन ।
जातो चवताळुन हरि अजपाला घर्म सुटत दरदरुन ॥ ५१ ॥
तेथें तत्पद न ठरे त्यजुन अजा जीव घेउनी पळत ।
दाणादाण उडोनी कळपाची होत दुर्दशा बहुत ॥ ५२ ॥
मृत मेंढ्यांच्या राशी घालुन तो क्रमत वाट रुधिरमयी ।
दायोमीद तसा हा तुडवुनियां त्रोजनां बसे विजयी ॥ ५३ ॥
भाला हृदिं रोंवुनियां क्षणिं एका आस्तिनोअसा मारी ।
हिपिनारा हाणितसे घेउनियां असि करांत जड भारी ॥ ५४ ॥
तुटलें गलास्थि मग हा! पडलें तें मुंडकें धडावरुन ।
युरिदामाससुतांवर गेला या सोडुनी त्वरा करुन ॥ ५५ ॥
स्वप्नार्थ वृद्ध सांगे ज्याचा प्रत्यय जनांस ये पुरता ।
एकाहि तो न रक्षी स्वप्नविचारें युयुत्सुला स्वसुता ॥ ५६ ॥
भरलें आबासाचें दुसऱ्याचें समरिं पोलिइदसाचें ।
दायोमीदें वधुनी लुटिलें सर्वस्व समरिं दोघांचें ॥ ५७ ॥
मग थून आणि झान्थस पडले फीनप्सपुत्र बळि याला ।
वृद्धदशेंत पित्याला होइल का तनय धन हरायाला ? ॥ ५८ ॥
अरिनें हरिले असु मग हरिलें वसु सकल भाउबंधांनीं ।

उरलें दुःख पित्याला सुतविरहें अहह! केवढी हानी ! ॥ ५९ ॥
होते प्रायमसुत रथिं एकिमन क्रोमिअस असे दोघे ।
दायोमीद तयांतें धरण्यास्तव धांवुनी सवेग निघे ॥ ६० ॥
तृण खातां गोकुल वनिं सिंह तयावरतिं तुटुनियां पडतो ।
ग्रीवा वत्सतरीची वृषभाची मोडुनी पुढें सरतो ॥ ६१ ॥
दायोमीद तसा हा धांवुन दोघां करी रथभ्रष्ट ।
शस्त्रा बळें हरोनी अवशांतें भोगवी बहू कष्ट ॥ ६२ ॥
हय देत सहचरांसह लावुनियां नीट आरमारांत ।
बघवे न ईनिआसा चालु असे प्रलय जो सैनिकांत ॥ ६३ ॥
रणनादातें न गणी, शस्त्रांचें भय मनांत लव न धरी ।
पन्दारसास शोधी, सांपडतां कठिण भाषणास करी ॥ ६४ ॥
" पन्दारस हे! वद रे केलें धनु काय? बाण तव कोठें? ।
लोक निगर्वित जेणें दुर्योधन नाम तें कुठें मोठें? ॥ ६५ ॥
जोव्हातें प्राथुनियां ये बा ये! सोड यावरी शर तो ।
कोण असे वरचढ हा! हाडें बघ मोकळीं कशीं करतो ॥ ६६ ॥
संहार देव करि हा प्रकुपित जो त्रोजनांवरी झाला ।
चुकलें होमहवन तें नातर हा कोप एवढा कुठला?" ॥ ६७ ॥
बोले पन्दारस "हा नकळे सुर अथ असेल मानव तें ।
दायोमीदाशीं अज याचें एकत्व अधिक मानवतें ॥ ६८ ॥
ढाल पहा तीच असे, तेंच शिरस्त्राण तेच हय बरवे ।
ह्मणतों तो जर असला अद्भुत हें कर्म त्या कसें करवे? ॥ ६९ ॥

ट्रोजनसखया ! ऐकें आहे त्या जवळ देव राखाया ।
त्यानेंच फिरविला कीं जो म्यां शर सोडिला तया खाया ॥ ७० ॥
आतांच सोडिला शर उरकवचा भेदुनी रुते स्कंधीं ।
प्लूतोपूर तयाला दावाया वाटली अली संधी ॥ ७१ ॥
झाला जित न परी तो, रक्षी त्या रुष्ट देव हेंच खरें ।
नाहीं रथ नाहिंत हय, होइन आरूढ मीं तरी बघ रे ॥ ७२ ॥
पितयाचे रथ अकरा आच्छादित घरिं सुरेख नव असती ।
ज्वारी गहुं खावोनी पुष्ट असे अश्व ज्यांस सजवीती ॥ ७३ ॥
सीमोल्लंघन करण्यापूर्वीं उपदेशिलें जरठ वीरें ।
कीं 'घे हय हे, रथ हा, ट्रोजनसैन्याधिपत्व मग करिं रे' ॥७४॥
दिधलें लक्ष्य न तिकडे; दिधलें असतें तरी बरें गमतें ।
पडलों कृपण जरासा, ह्मटलें बहु संवकले तुरंगम ते ॥ ७५ ॥
पुरवूं घांस पदरचा, वेढा नगरास शत्रुंनीं देतां ? ।
टाकुन आलों पायीं, आशा बहु सशरचाप करिं घेतां ॥ ७६ ॥
पण काय ? व्हावयाचा नव्हता उपयोग आज मज यांचा ।
दोघांवर सोडियला शर म्यां मनिं धरुनि हेतु विजयाचा ॥ ७७ ॥
दायोमीदासह त्या वेधियलें एत्रिअससुता कपटें ।
काढोनि रक्त यांचें अधिकाचि मीं चिढविलें कसें उलटें! ॥ ७८ ॥
हेक्तरकार्या चिंतुनि न्यायातें ट्रोजनांस इलियमातें ।
कर घालितां धनूतें वेला नच नीट लागली मातें ॥ ७९ ॥
जाउन नयनीं पाहिन फिरुनी देशांत मंदिरीं कांता ।

स्वकरें धनु मोडुनियां जाळिन तेणें दगा दिला आतां ! ॥ ८० ॥
मिथ्या हें घडलें तर उडवो माझेंच शिर कुणी अरि तो " ।
मग ईनिआस यावर उत्तर तो त्रोजनाग्रणी करितो ॥ ८१ ॥
"त्वां न असें बोलावें होइल का सांग सर्व विपरीत ।
आरूढ रथीं होउन अरिशीं करूं हात अल्प अवधींत ॥ ८२ ॥
बैस अतां रथिं माझ्या त्रासाचे अश्व बघ कसे असती ।
क्षणिं धांवाति थांबति वा अरिची अथ पाठ सांगतां धरती ॥ ८३ ॥
दुर्दम जोव्हें जर या दायोमीदास यश दिलें फिरुन ।
साभाळुन नगराला आह्मां नेतील हे त्वरा करुन ॥ ८४ ॥
घे तूं प्रतोद रश्मी, लढतों मीं, एक ऐक सुविचार ।
सारथि अथवा होतों तूं मग घे शत्रुचा समाचार " ॥ ८५ ॥
पन्दारस उत्तर दे "तूंच धरुन रश्मि अश्व सांभाळीं ।
पद काढिल्या रणांतुनि संवय तुझी ह्मणुन धांवतिल काळीं ॥ ८६ ॥
नाहीं तर भीतीनें बुझतिल तव शब्द जर न ये कानीं ।
होतील हलतनासे, वधुन अह्मां अश्व धरिल अरि मानी ॥ ८७ ॥
सांभाळीं हय अणि रथ अरिचें स्वागत करील मम भाला" ।
बोलुन हें दोघेजण चित्ररथीं बैसतां रथ निघाला ॥ ८८ ॥
ऐसे येतां देखे जवन हय स्थेनिलस तदा दुरुन ।
दायोमीदाजवळी बोले जाऊन शब्द बहु जपुन ॥ ८९ ॥
" हृदयानंदा ! बघ हे ! दायोमीदा ! अले समूर अरी ।
बलसागर दोघेजण; एक असे कुशल तो धनुर्धारी ॥ ९० ॥

पहिला लिकाअनात्मज दुसरा गर्विष्ठ तो ईनिआस ।
अन्कैसीसज ह्मणवी, व्हीनस माता असे परी खास ॥ ९१ ॥
अश्वारूढ अधीं हो जाउं पळोनी न लाविता उशिर ।
कर जोडितों न राहीं पुढतीं, तूं अज गमावशील शिर ” ॥ ९२ ॥
दायोमीद वदे या धिक्कारुन “ मी करूं पलायन का ?
जाणें भय न कसें तें, बलवन्ता मज उगीच भिववुं नका ॥ ९३ ॥
आजवरी नाहीं मी केलें रण लपुन आडवाटेला ।
देहस्वभाव कीं अरि दिसतांची समज आडवा केला ॥ ९४ ॥
रथ नलगे मजला मुळिं दूर करी भय सदा मिनर्वा ती ।
निसटेल एक यांतिल दुसऱ्याचा जीव अणिन परि हातीं ॥ ९५ ॥
ती सुज्ञ मिनर्वा जर पुरविल मम हौस मारवुनि यांस ।
ही गोष्ट एक कथितों ध्यानीं ती ठेव करुनि सायास ॥ ९६ ॥
रश्मीनें रथचक्रा हय माझे बांध तूं त्वरा करुन ।
अणि ईनिआसतुरगां ग्रीकांपशिं ने बळेंच पकडून ॥ ९७ ॥
मनिं भरला जोव्हाच्या त्रासात्मज गानिमीद तो ठावा ।
पात्रीं सुरा भराया भृत्य ह्मणोनी ह्मणे सवें न्यावा ॥ ९८ ॥
हानि भरोनी द्याया तज्जनका चपल अश्व जोव्हानें ।
दिधले ज्या जातीचे तींतिल हे दोन थोर मोलानें ॥ ९९ ॥
उगवुनियां पूर्वेला पृथ्वीला घालतो रवी वळसा ।
इतक्यांत दिसति हय जे त्यांमाजी श्रेष्ठ हे ह्मणा सहसा ॥ १०० ॥
अन्कैसीस नृपति मग अश्वा देई तयांत मिसळून ।

उत्पन्न शावकां हरि तें *लाओमीदना न ये कळुन ॥ १०१ ॥
शावक सहा जहाले, पोषी तो चार अश्वशाळेंत।
अवशिष्ट दोन देई तेव्हां त्यां ईनिआस घरिं नेत ॥ १०२ ॥
जोडी ही करिं येतां समजें उत्कृष्ठ कीर्ति जोडियली।
सांगड अरिद्वयाची इतक्यांतचि जवन वारुंवरुन अली ॥ १०३ ॥
वदला पन्दारस मग " दायोमीदा, खराच तूं वीर।
कटु पटु सायक माझा, शकला तुज वधुं न, धरिशि बहु धीर ॥१०४॥
आतां चालवुनी मी बघतों जर लागला तुला भाला "।
दीर्घच्छाय तसा तो भाला फिरवून फेंकि लाभाला ॥ १०५ ॥
उरकवचापावे तों गेलें तें शस्त्र फेकितां सरळ।
पन्दारस अरडे कीं "विद्ध अरी होत हेतु मम सफळ ॥ १०६ ॥
सोसेल हें कसें तुज, मज समजें तूं अतां दिलेंस यश"।
तैदिअसज उत्तर दे अल्प हि तो जाहला न भीतिवश ॥ १०७ ॥
" भ्रम झाला तव मतिला सोडीं तूं विफलयत्न न स्थान।
तोषवितों मार्सातें एकाचें करुन समरिं बलिदान" ॥ १०८ ॥
भाला फेंकी निज मग दक्ष मिनर्वा तया दिशा दावी।
नाकीं नयनांसन्निध लावी कीं दंतपंक्ति भेदावी ॥ १०९ ॥
नंतर भाला गेला छेदुन मूलांत नीट जिव्हेला।
बाहेर अग्र आलें फाडुन हनु, काय घोर ही वेला ॥ ११० ॥
पडला पन्दारस भुवि, वरतीं बहु शस्त्रभार खणखणला।

* या राजाचे वांटणीस वारस ह्मणून पहिलें अश्वयुग आलें होतें.

वारु पळाले बुझुनी शक्तीसह जीव हीं तसा द्रवला ॥ १११ ॥
भाला ढाल धरुन करिं घेत उडी भूवरी ईनिआस ।
ग्रीकांनीं न हरावें मित्राचें शव अशी मनीं आस ॥ ११२ ॥
घाली घिरट्या भोंवतिं सिंह जसा निर्विशंक थोर वनीं ।
नेम धरी भाल्यानें, फिरवितसे ढाल सर्वतः अवनीं ॥ ११३ ॥
जो जो धांवुन येई त्या त्या वर ओरडे जसा खाया ।
दायोमीदें अणिली दीर्घ शिला जड तयास माराया ॥ ११४ ॥
थट्टा नव्हे, अतांच्या दोघां पुरुषां हलेल ती न जरा ।
हाणीत ईनिआसावर पेलुन तीच वीर हा जबरा ॥ ११५ ॥
संधि घडे जंघांचा जघनाशीं तें अंग विश्रुत खवाट ।
लागून घाव तेथें, फाटुनियां चर्म लागली वाट ॥ ११६ ॥
ते स्नायुबंद तुटले वीर पडे खालिं ढोंपरें टेंकी ।
आंधेर नयनिं येई तनुचा तो भर करां न रेंटे कीं ॥ ११७ ॥
हा ईनिआस नरवर, हेंच खरें नाश पावता समया ।
तन्माता जोव्हसुता व्हीनस जर पाहती न लवकर या ॥ ११८ ॥
अन्कैसीस चराया गोधन नेतां तया सर्वे रमली ।
प्रसवे पुत्र अनंतर जो त्या रक्षावया अतां जपली ॥ ११९ ॥
प्रिय पुत्रा पोटाशीं धरुनी निज वस्त्र वरुन पांघरिते ।
ग्रीक उरीं शर मारुन हरतिल असु दुष्ट बहुत हो अरि ते ॥ १२० ॥
आवडत्या तनयातें गुप्तपणें दूर पळविण्या धजली ।
दायोमीदाची तों स्थेनिलसा गोष्ट सकल आठवली ॥ १२१ ॥

रश्मीनें रथचक्रा हय अपुले बांधुनी त्वरा करुन ।
त्या ईनिआसतुरगां ग्रीकांपशिं नेत झटिति हांकलुन ॥ १२२ ॥
नौसाधनिं त्यां नेण्या आवडिनें देइ देइपिलसाला ।
झालीं समान शीलें दोघांचीं हेतु अधिक सख्याला ॥ १२३ ॥
बसुनी रथीं फिरोनी घेई रश्मी करांत सुन्दर तो ।
दायोमीदामागुन हय हांकीं शत्रुचा नसे दर तो ॥ १२४ ॥
व्हीनस पळते पुढतीं अणि दायोमीद पाठलाग करी ।
धृतशस्त्र जाणतो कीं देवी निःशस्त्र नवशिकी समरीं ॥ १२५ ॥
नोहे उत्साहें जी नेइ रणीं वीर ती मिनर्वा ही ।
विध्वंसिनी पुरांची बेलोना साहसप्रिय न वा ही ॥ १२६ ॥
जनसंमर्दा भेदुनि शेवटिं तिज पाठ धरुनियां गांठी ।
बहुतीक्ष्ण शस्त्र उचली नाजुक देवीस मारण्यासाठीं ॥ १२७ ॥
स्वर्देवता मिळोनी गुंफुनि शालू दिला तिला मागें ।
या सित सुधांशुकांतुनि भाला तो मृदुल करतला लागे ॥ १२८ ॥
*स्राव निघे अविनाशी जैसा तो सुरतनूंतुनी वाहे ।
खाती न भाकरी ते पीती नच कृष्णशा आसवां हे ॥ १२९ ॥
नसतें रुधिर तयांच्या अंगीं ह्मणती ह्मणून ज्यां अमर ।
किंचाळे मग देवी हस्तांतुन तनय निसटला सभर ॥ १३० ॥
परिसुनि करुणस्वर हा येउन उचलीत शीघ्र फीबस त्या ।
लपवी नील पयोदीं, भीत मनीं ग्रीक वधिल कुणी बसत्या ॥ १३१ ॥

---

* ग्रीक अमरांच्या धमन्यांतून रक्ताचे बद्दल 'इकर' नामक रस वहातसे.

दायोमीद परंतु पळत्या देवीस गर्जुनी वदला ।
"निघ येथुनि जोव्हसुते ! जा ! जा ! सोडून आज समरिं दला ॥ १३२॥
मुग्धस्त्रीवंचन तव नित्यव्यवसाय उचित तो त्यजुनी ।
येशिल रणिं फिरुन ? दुरुन भीशिल तूं युद्धशब्द आयकुनी" ॥ १३३॥
निर्गत झाली देवी गलितांगा दुर्मनायमाना ती ।
तिज काढी गर्दीतुन दुरि करुनी इरिस रणभटांना ती ॥ १३४ ॥
आली ग्लानि बहू तिज वदनद्युति लागलीच मंद पडे ।
मार्स दिसे तिज बसला लपवुन जो शस्त्र तुरग दुसरिकडे ॥ १३५ ॥
पायीं लागुन देवी विनवी बहुपरि ह्मणे "अगा भाऊ ! ।
मत्कार्या करशिल का ? शोभित हय घेउनी तुझे जाऊं ? ॥ १३६ ॥
आलिंपसिं सुरभवनीं जातें; बघ मानवें तैदिअसजें ।
केलें क्षत मत्तनुला, हरविल जोव्हास तो असें समजें " ॥ १३७ ॥
मार्स तिजला दिधले कनकालंकृत रथास युक्त हय ।
रथिं चढली हृदयार्ता करिते सारथ्य इरिस जिस न भय ॥ १३८ ॥
वाजे प्रतोद फटकन घडघड रथ चालला नभपथानें ।
आलिम्पसोच्चशिखरीं सुरभुवनीं पोंचला क्षणार्धानें ॥ १३९ ॥
हय सोडी इरिस तिथें घालि सुधामय तयांस तृण खाया ।
दायोन मातृदैवत बघतां व्हीनस पडे तिच्या पायां ॥ १४० ॥
आलिंगुनि तनयेला माता कुरवाळुनी करें पुसते ।
" कवण्या गे देवानें दुःख दिलें लाडके! तुला वद तें ॥ १४१ ॥
अविनीत कवण ऐसा, वागवि जणुं उघड तूंच अपराधी !" ।

हास्यप्रिय व्हीनस मग बोले "हा, तैदिअसज उद्धतधी ॥ १४२ ॥
दायोमीद् बरें का! क्षत मातें करित दांडगा मेला ।
कारण कीं प्रियतम सुत समरांतुन ईनिआस मीं नेला ॥ १४३ ॥
नुसत्या त्रायस्थांशीं लढणें ग्रीकांस कां न मानवतें? ।
शैंफारुनि, अमरांसह लढती हे ग्रीक, असुनि मानव ते" ॥ १४४ ॥
दायोन ह्मणत, ×बाळे सोसावें दुःख सहनशीलपणें ।
सोशियलें नच सांगें आलिम्पस येथल्या सुरें कवणें ॥ १४५ ॥
पीडा बहु मानव दे, पीडा घे करुन तो तसा उलट ।
तो मार्सवीर कसला! त्रास दिला त्या करूनियां कपट ॥ १४६ ॥
एलोइअससुतद्वय मात्सर्यें लागले तयारीस ।
बांधून शृंखलेनें कारागृहिं लोटती तया रीस ॥ १४७ ॥
तेरा महिने छळती ओतस अणि अन्य एफिआल्तीस ।
मरता मार्स जरी नच माता सापत्न येति मदतीस ॥ १४८ ॥
सर्वांग सुन्दरी ती सांगे हें मर्क्युरिस इईरिबिया ।
जाई घाइ करुन तो बद्धश्रान्तास नेत पळवुनियां ॥ १४९ ॥
अर्धांगी जोव्हाची जूनो प्रत्यक्ष तिचि दशा काय ।
आंफित्रिअनज हाणी उरिं शर कळ उठत, फुकट सदुपाय ॥१५०॥
प्लूतो नरकाधिप परि अनुभव घे याच वीर पुरुषाचा ।
ईजिसधर जोव्ह जया वेधी सोडून शर अतिबलाचा ॥ १५१ ॥
राशित थोर शवाच्या पैलसिं या जांच कठिण बहु झाला ।

×झालिया भोगाशीं असावें सादर । तुकाराम.

आलिंपसोच्चशिखरीं जोव्हाच्या मंदिरीं ह्मणुन गेला ॥ १९२ ॥
स्कंधीं शर रुतला त्या हृदयार्ता क्षणभरी हि चैन नसे ।
पडला अमर ह्मणोनी पीअन त्यातें बरा करून बसे ॥ १९३ ॥
पीडाशामक लावी लेप वरी. काय कृत्य वर्णावें ।
हें धाष्टर्य मानवांचें उच्चारूं सांग कोणत्या नांवें ? ॥ १९४ ॥
करितां अधर्म याच्या कां हो कांहीं मनांत किन्तु नये ।
आलिंपसवासि सुरां माराया पापफल हि चिन्तुं नये ? १९५ ॥
हें कार्य मिनर्वेचें मानव तुझिया विरुद्ध कीं उठतो ।
दायोमीदा नकळे आज मदांधास काय शेवट तो ॥ १९६ ॥
दीर्घायुषी न होतो मानव जो युद्ध करित अमरांशीं ।
हांक न मारी बालक, 'बाबा ये' जाय जों निज घराशीं ॥ १९७ ॥
ह्मणुनी सावध व्हावें दायोमीदें जरी असे शूर ।
बलवत्तर भेटोनी समयीं होईल गा क्षणीं चूर ॥ १९८ ॥
अद्रास्तसजा अठविल दायोमीदास ईजिएलीया ।
सुप्त स्वजनां उठवुनि 'पति दावा' ओरडेल तज्जाया" ॥ १९९ ॥
बोलुन हें तलहस्तें स्राव पुशी तीव्र वेदना शमती ।
होत बरा कर, बघती दुरुनी जूनो अणी मिनर्वा ती ॥ १६० ॥
सॅतर्नात्मज जोव्हा, चिढविति बोलून मर्मभिद्वाणी ।
त्यांतुन वदत मिनर्वा " जोव्हा ! ताता ! न राग मनिं आणीं ॥१६१॥
कोणी ग्रीकप्रमदा त्रोजनसंगें निघोनियां जावी ।
ऐशा कार्यीं व्हीनस गुंतुन होती खचीत जाणावी ॥ १६२ ॥

प्रेमा भर अतिशय ये ग्रीकप्रमदा करी रतिक्रीडा ।
खेळवितां तिज, हिजला कंकण रुतुनी करीं करी पीडा" ॥ १६३ ॥
हांसे जगत्पिता मग संबोधुनि बोध करित व्हीनसतें ।
" धंदे रणकलहाचे तुजला सांगीतले कुणी नसते ! ॥ १६४ ॥
रतिकलहाचें नाजुक कार्य तुझ्या योग्य सर्वथैव मुली ।
सांभाळ तेवढें तूं मार्स मिनर्वा दुजा पुरुन उरलीं " ॥ १६५ ॥
बोलति असलें हीं जों तों दायोमीद चढुनियां त्वेषा ।
वधण्यास ईनिआसा धांवे, मग कोण वर्णि तद्वेषा ॥ १६६ ॥
प्रत्यक्ष अपालोचा हात वरी रक्षणार्थ जरि होता ।
तरि हा न गणि तयाला, अरिकवचा हरिन ध्यास हा चित्ता॥१६७॥
गेला धांवुन अरिला माराया तीन वेळ परि याची ।
फिरवी ढाल अपालो, फिरुन घुसे ऐट मिरवि अमरांची ॥ १६८ ॥
तेव्हां भयद अपालो घालाया धाक त्यास मग वदला ।
"हां हां तैदिअसज हे मागें सर तूं विचार बघ अपला ॥ १६९ ॥
अमरांचें कुल कोठें ? कोठें रे मनुज सांग भूचर ते ? ।
व्हाया बरोबरी तूं अमरांची इच्छिसी न हें सजतें" ॥१७०॥
मग कोप अपालोचा चुकवाया तैदिअसज तो परते ।
तों नेतसे अपालो गर्दीतुन दूर ईनिआसातें ॥ १७१ ॥
पुण्यस्थालिं पर्गामासिं ठेवित त्या जपुनियां राउळांत ।
लाटोना दायाना त्यास बरा करिति अल्प वेळांत ॥ १७२ ॥

मग देव तो अपालो निर्मितसे ईनिआस मायावी* ।
ग्रीक ट्रोजन लढती जमुनि सभोंवार अशि कृती दावी ॥ १७३ ॥
नंतर वदत अपालो मार्सातें धैर्यवान पुष्कळसा ।
"शोणितशोभित काया ! परिसें बा मनुजहन्तृका ! सहसा ॥१७४॥
हे भीत्तिभेद्का ! तूं यातें रणिं शिरुन हाकलुन द्यावें ।
हा तैदिअसज जोव्हा त्रासिल हें त्वन्मनीं न कां यावें ॥ १७५ ॥
पहिल्यानें वार करी व्हीनसच्या मनगटावरी मग तो ।
धांवे वेगें मजवर युद्धप्रिय देवसा कुणी गमतो " ॥ १७६ ॥
पर्गामसीं अपालो जाउनियां बैसला परी तिकडे ।
कटकीं मार्स फिरोनी ट्रोजनवीरांवरी तदा अरडे ॥ १७७ ॥
आकामस नायक जो थ्रेशिअनांचा बहूत आवडता ।
त्याचें रूप धरोनी प्रायमपुत्रांस बोलतो आतां ॥ १७८ ॥
सांगा जोव्हप्रिय हो ! प्रायमसुत हो ! बघाल वाट किती ?
हे ग्रीक उडवताती सकल जनांची पहा टाळकीं तीं ॥ १७९ ॥
काय हवा थडकाया लढतां लढतां अरी पुरद्वारीं ।
ग्रस्त रणीं प्रतिहेक्तर अन्कैसीसज पराक्रमी भारी ॥ १८० ॥
या हो ! उठा चला हो ! सोडवुं या हो सुहृत्तमा या हो " ।

---

* मायावी व्यक्ति उत्पन्न करावयाची ही ग्रीकदेवतांची कला इंद्रजित् राक्षसाला साध्य होती असें वाल्मीकिनें दाखविलें आहे. इंद्रजितानें रामाचा उत्साहभंग व्हावा ह्मणून मायामय सीता उत्पन्न करून तीचा वध केला असें सर्वांच्या नजरेस आणिलें.

ऐकुन वच हें सकलां स्फुरण चढे ह्मणति सर्वजण त्या 'हो' ॥१८१॥
मग थोर हेक्टरातें निर्भर्त्सुन सर्पिदन ह्मणे रागें ।
" गेलें तव पूर्वीचें हेक्तर ! बल तें अतां कुठें सांगें ? ॥ १८२ ॥
होतास ह्मणत मागें स्मरतें मज कीं पुरास राखाया ।
साहाय्य बन्धु बान्धव करतिल मज मित्रबल नको याया ॥ १८३ ॥
त्या आज बान्धवांचा थांग नसे ! बन्धु जाहले काय ? ।
लांब दडाले, कुतरे लपविति सिंहा पुढें जसा काय ! ॥ १८४ ॥
पाहें उलट अह्मीं तव मित्र कसे सोशितों रणीं घाव ।
मित्र तुझा मी ह्मणुनी आलों सोडून लांब मम गांव ॥ १८५ ॥
लिसिआपुरींत माझ्या, झान्थस हळु वाहते विवर्तवती ॥
धनधान्य, बाळ तान्हें, भार्या टाकून तेथ आवडती ॥ १८६ ॥
आलों मीं तुज साठीं, दुसरा लोभी कसा बरें येता ? ।
वळवून लिसिअनांतें गांठिन मी वीर आज तो जेता ॥ १८७ ॥
ग्रीकांस लब्ध आहे तेंही साहित्य मजपशीं नाहीं ।
गृहिं भार्या रक्षाया कथिशि न अन्यांहि, शान्ति तव कां ही १८८
सावध हो, अथवा तूं दैवें पडशील शत्रुजालांत ।
भक्ष्यस्थानीं पडतां लुटतिल तुज ठेवतील हालांत ॥ १८९ ॥
भरगच्च नगर तव हें नाशाप्रति कीं क्षणांत जाईल ।
या गोष्टीचें चिंतन रात्रंदिन कोण तुजाविणें करिल ॥ १९० ॥
हे दूरदूरचे तव मित्र अले त्यांस विनवुनी सांग ।
साहस नुसतें नलगे, उत्साहाचें हवें बरें आंग " ॥ १९१ ॥

वच हें सर्पिदनाचें हेक्तरहृदयास तीव्र दंश करी ।
उतरे रथावरोनी घालुनियां कवच, हातिं शस्त्र धरी ॥ १९२ ॥
कटकीं सर्व फिरोनी युद्ध करायास चिथवितो सकलां ।
दिधलें रण जुंपोनी वेढा ग्रीकांसभोवतीं पडला ॥ १९३ ॥
ग्रीक पळाले नाहीं धरती बहु धैर्य करुनियां लगट ।
वाटे समर खळें कीं मळणी काढीत वीर सरसकट ॥ १९४ ॥
सीरीस धान्य निवडी शेती मारून सूप वारवतो ।
पोल खळ्याभर पसरे उडव्यांतें शुभ्र रंगही चढतो ॥ १९५ ॥
परतवितां रथ हय ते टांपा अपटून उठवितां धुरळा ।
ग्रीकतनूंवर तैसा रंग चढे शुभ्र! युद्ध हें विरळा ॥ १९६ ॥
बल सारें बाहूंचें खरचिति पुढती करोनियां चाल ।
मार्स त्रोजनवीरां मदत करी उठवि वरतिं घनपटल ॥ १९७ ॥
आज्ञा करित अपालो कीं जेथुन जातसे मिनर्वा ती ।
त्रोजन वीरां तेथें भेटुन उत्साह देत जा वरतीं ॥ १९८ ॥
कारण कीं ग्रीकांचा पक्ष तिनें उचलिला असे सारा ।
मानीत मार्स आज्ञा. तों ये होऊन ईनिआस बरा ॥ १९९ ॥
त्या थोर अपालोनें दिधलें सामर्थ्य मनगटांमाजी ।
जीवन्त सबल अक्षत बघुनीयां ह्मणाति मित्र त्या "या जी" ॥२००॥
अधिक प्रश्न न पुसती, मागें उद्योग लाविले भलते ।
समरांत अपालोनें, मार्सानें कलह देवतेनें ते ॥ २०१ ॥
ग्रीकां आजक्षद्वय, तो दायोमीद आणि युलिसीस ।

ईर्षा अणिती अरिंचे हल्ले येतां न धरिति भीतीस ॥ २०२ ॥
वाताधिपतिस यावी समयीं कधिं झोंप बोरिआसास ।
अभ्रच्छिद् व्रात्य दुजे उद्धत गण सेवितात मौनास ॥ २०३ ॥
पर्वतशिखरीं तेव्हां सॅतर्नज बसवि मेघ निश्चल ते ।
तैशी वीरावलि ही स्थिर बैसे एक पदहि न च हलते ॥ २०४ ॥
एत्रिअसज कटकिं फिरुन द्याया उत्साह बोलतो समयीं ।
"पुरुषत्व दाखवा हो मित्रांनों धैर्य धरुनियां हृदयीं ॥ २०५ ॥
×भीरु मरे अधिं पळतां, जगतां चाले जगीं अधोवदन ।
शूर जगे रणिं लढतां मरतां गांठी सुकीर्तिचें सदन ॥ २०६ ॥
ह्मणुन चढाओढ करा, अधिकाधिक शौर्य गाजवा आतां" ।
बोलुन हें: धावोनी फेंकी भाला पुढें पुढें जातां ॥ २०७ ॥
पर्गासिसजा मारी दीईकूनास मुख्य वीरास ।
प्रायमसुतसम मानें ज्याचा प्रियतम सुहृत् ईनिआस ॥ २०८ ॥
ऐशा धुरंधराच्या ढालीवर लागला भला भाला ।
नाहीं निसटुन गेला, गेला भेदून कमरबंदाला ॥ २०९ ॥
उदराखालीं वेधी धरणीवर थोर वीर कोसळला ।
मागुन तत्तनुवरतीं पडतांना शस्त्रभार खणखणला ॥ २१० ॥

×ही आर्या सुभाषितरूप आहे.
हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् । गीता.
अवाप्नुयामः कीर्तिं वा निहत्वा शत्रुमावहे । निहता वीरलोकस्य भोक्ष्यामो वसु वानराः ॥ अंगदाचें भाषण. रामायण

ग्रीकांचे वीर कितिक पडले बलि शूर ईनिआसाला ।
त्या क्रेथनास आधीं लागे, मग आर्सिलोकसा भाला ॥ २११ ॥
सुंदर फेरी नगरी आंत वसे जनक शूर तो याचा ।
तटिनी आल्फिअस न कधिं तोटा पाडीत मधुर तोयाचा ॥ २१२ ॥
वृद्ध पितामह यांचा आल्फिअसोत्पन्न ठाउका सकलां ।
डायोक्लीस तयाला झाला सुत, दोन पुत्र हे ज्याला ॥ २१३ ॥
युद्धविशारद दोघे नौकेमधिं बसुनियां गडी ज्वान ।
इलियमदेशा आले देउनियां एत्रिअससुतां मान ॥ २१४ ॥
गिरिशिखरीं निबिड वनीं गुल्मावृत घोर थोरल्या जागीं ।
स्तन्या पाजुनि सिंही वाढविते दोन शावकांलागीं ॥ २१५ ॥
मांसल मेष, बली वृष धरुनी हे रोज बाललीलेंत ।
कालें करुनी हळुहळु गोशाला ध्वस्त करुनियां बसत ॥ २१६ ॥
त्यातें अवचित कोणी वधिती जन कठिण तीक्ष्ण शस्त्रानें ।
वाट तशी दोघांची लागे अजि ईनिआसहस्तानें ॥ २१७ ॥
पडले दोघे भूवरि तरु जैसे उच्च देवदारूचे ।
यां मेनिलास बघतां कळवळला त्यास अयश हें न रुचे ॥ २१८ ॥
भाला चमकत फिरवुन गेला रणिं धांवुनी पुरोभागीं ।
मार्से अवसर अणिला जिंको कीं ईनिआस यालागीं ॥ २१९ ॥
नेस्तरतनयें यातें देखियलें आन्तिलोकसें जातां ।
समरशिरीं तो चाले नकळे होइल नृपा अपाय अतां ॥ २२० ॥
श्रम निष्फळ होतिल कीं राहे हा ह्मणुन नृपतिच्या पाशीं ।

भाले फेंकायातें कर उचलिति वीर सज्ज युद्धाशीं ॥ २२१ ॥
तो ईनिआस योद्धा चपल परी बघुन यांस दोघांस ।
तेथें न राहिला तो ग्रीकांनीं उचलिलें मग शवांस ॥ २२२ ॥
सहचर हस्तीं देउनि दोघांचीं तीं शवें विधिहतांचीं ।
चाल रणीं करिती ते समराशिरीं, शत्रु परत जातांची ॥ २२३ ॥
पाफ्लागोनिअनांचा नायक मग पडत पेलिमेनीस ।
रणिं एत्रिअससुतानें भाल्यानें तोडिलें उरास्थीस ॥ २२४ ॥
परि आन्तिलोकसानें मिदना वधिलें तिथेंच रथवाहा ।
आतिम्निआससुत हा होता वळवीत हय, नशीब पहा ॥ २२५ ॥
अरि मारी दगड तया लागे येऊन कोंपरावरतीं ।
गजदन्तांकित रश्मी धुळिमाजी गळति कोणि नावरती ॥ २२६ ॥
नीट कपाळीं दिधला असिचा मग आन्तिलोकसें घाय ।
पुळणींत खोल पडला धापा टाकीत विरथ निरुपाय ॥ २२७ ॥
स्कन्धांवर सांवरला शिर खालीं रुतुन पाय वर हलती ।
राहे असाच परि मग पदिं बुझरे तुरग यास चुंधडती ॥ २२८ ॥
आणि आन्तिलोकसें ते हय नेले हांकलून निज कटकीं ।
हें हेक्तरास दिसतां धांवे गर्जून सहचरांसह कीं ॥ २२९ ॥
त्रोजनसैन्य निघालें, बेलोना, मार्स खुद्द त्या नेती ।
हलकल्होळें पावे बेलोना सुख रणध्वनीनें ती ॥ २३० ॥
कधिं मागें कधिं पुढतीं मार्स चले हेक्तरास राखाया ।
भाला करिंचा बघुनी दायोमीदास कंप ये सभया ॥ २३१ ॥

चुकतां मार्ग बिचारा कोणी भूभाग आक्रमी सरळ।
देखे समुद्रगामी फेनयुता पथिं जशी नदी चपळ ॥ २३२ ॥
बावरुनी परत जसा जाई घांईत तो तसा आतां।
दायोमीद् रणांतुन हटला मागें न दम निघे लढतां ॥ २३३ ॥
बोले तैदिअसज मग "मित्रांनो थोर वीर हेक्तर हा।
चातुर्यें शूलधरां वीर्यें वीरां करीत तुच्छ पहा ॥ २३४ ॥
देवांतिल एक तरी सन्निध राहून मृत्युला वारी।
सेवक मर्त्य जसा कीं मार्स उभा जवळ सदय कैवारी ॥ २३५ ॥
मागें वळा नको हें, त्रोजनसुहृदांशिं युद्ध अमरांशीं।
बघतां समूर हळुहळु काढावे पाय युक्ति ही खाशी" ॥ २३६ ॥
परि होते त्रोजन ते पुढतीं ग्रीकांसमीप गेलेले।
त्या हेक्तरास पडले दोघेजण बलि रथांत बसलेले ॥ २३७ ॥
मेनिस्थीसासहिताचि पडला रणिं वीर आन्किआलस तो।
तेव्हां तेलामनसुत चित्तीं आजक्ष फार कळवळतो ॥ २३८ ॥
धांवुन जाई जवळी, मारी फिरवून चमकतां भाला।
पीससवासी गवसे सेलागसतनय आंफिअस त्याला ॥ २३९ ॥
शेतीभाती अपुली सोडुन संपत्ति विपुल सकल घरीं।
प्रायमतनयांर्थ अला दैवें परि शस्त्र बोचलें उदरीं ॥ २४० ॥
कोसळतां ध्वनि झाला, धांवे आजक्ष कवच काढाया।
त्रोजन सशस्त्र धांवुनि जमति सभोंवार यासह लढाया ॥ २४१ ॥
शस्त्राघात तरी तो ढालीवर झेलुनी करी जोर।

पतितारिस पदिं दाबुनि शस्त्र तयाचें हरीतसे थोर ॥ २४२ ॥
स्कंधींचें एखादें सुंदर परि कवच लागलें न करीं ।
अरिशस्त्रभरें गेला दडपुनि तो. बहु मनांत भीति धरी ॥ २४३ ॥
त्रोजन उद्धत रक्षण करिति असें रणिं अनेक बलवान ।
भोंवतिं जमून भाले रोंखिति, अरिची तयांस परवा न ॥ २४४ ॥
सामर्थ्यवान जरि हा लोकीं विख्यात शूर तरि यास ।
दूर पिटाळुनि लाविति, एकाक्षणिं होत बलविपर्यास ॥ २४५ ॥
रणकंदन मातवुनी इकडे हे भागले बहू वीर ।
हर्क्यूलीसज उठला तिलिपोलीमस करूनियां धीर ॥ २४६ ॥
नातू जोव्हाचा हा सर्पिदना जोव्हजा वधायास ।
धांवुन जातां वदला "करितोसी कां उगाच सायास ॥ २४७ ॥
लिसिअन नृपते ! तुजला सर्पिदना युद्ध ठाउकें नाहीं ।
येथें कांपत बसण्या येशि कशा, ठकविलें तुज जनांहीं ॥ २४८ ॥
ईजिसधरजोव्हाचा पुत्र असें काय हें तुला ह्मणती ।
जोव्होत्पन्न जुने ते वीर भले त्यांत तुज कसे गणती ! ॥ २४९॥
हर्क्यूलीस पिता मम कैसा होता विचार जा त्यांला ।
रणसिंह तात आला लाओमीदनहयां हरायाला ॥ २५० ॥
नौका सहा तयाच्या सांथीला जनहि मोजके कांहीं ।
इलियमपुर विध्वंसुनि भरिले पुरवीथि पौरविधवांहीं ॥ २५१ ॥
परि तूं अधम मनानें सैनिक मरु देशि तव पटापट रे ।
तूं त्रोजनांस कैसें करशिल साहाय्य मजसिं सांग बरें ! ॥ २५२ ॥

आलासी लिसिएंतुन मोठा तूं शूर ठाउका जेता ।
हेदीसद्वारानें जाशिल तूं, मरण मत्करें येतां" ॥ २९३ ॥
लिसिअननायक बोले " इलियम विध्वंसिलें खरें त्यानें ।
* लाओमीदनभूपें केला हा नाश सर्व मूर्खानें ॥ २९४ ॥
पूजार्ह पुरुष असतां केला अपमान दुर्वचें त्याचा ।
उपकार फेडण्याचा मार्ग न अपकार, उगम दुःखाचा ॥ २९५ ॥
आला यदर्थ दुरुनी ते हय हातीं न पडुं दिले कांहीं ।
राहूंदे तें आतां मृत्यु तुझा आज चुकत रे नाहीं ॥ २९६ ॥
हा कर वार करिल तुज. भाला हा तुज करील आज वश ।
प्लूतोस एक देशिल भूत घरीं, मज रणीं तसें सुयश" ॥ २९७ ॥
नंतर दोघेजण करिं भाले घेऊन फेंकिते झाले ।
सुटले एका समयीं, सर्पिदना अधिक यश परी आलें ॥ २९८ ॥
अरिचा गलमध्य तया गवसोनी शस्त्र पार पडलें तें ।
नयनावरतिं निशेचें दुस्तर घन तम भयाण उठलें तें ॥ २९९ ॥
तिलिपोलीमस शस्त्रा सर्पिदनाची मिळे परी मांडी ।
वेगें गेलें आंतुन, जातां निसटून हाडही झाडी ॥ २६० ॥

---

* सोडविली नृपतनया मत्स्यमुखांतोनियां तुझ्या तातें ।
तेलामनभूपतितें प्रेमें अर्पीयली सुजातातें ॥ १ ॥
लाओमीदनभूपें हर्क्यूलीसास द्यावया केले ।
हय दोन, ते न देतां इलियम विध्वंसुनी तयें नेले ॥ २ ॥
याप्रमाणें लाओमीदनचा काय मूर्खपणा झाला तो भाषांतरकार चॅपमन यानें कथन केला आहे.

परि चुकवी तात मरण. त्यातें तेथून सोबती नेत ।
भाला रुतलेला परि फरफटतां दुःख त्या बहू देत ॥ २६१ ॥
रथिं चढतां काढावा कोणातेंही न हा सुचे तर्क ।
इतुकें कोणि बघावें, जो तो चिंतेंत जाहला गर्क ॥ २६२ ॥
तिलिपोलीमस नेला ग्रीकांनीं उचलुनी रणांतोनी ।
युलिसीस त्यां बघे तो गेलें तच्चित्त फार खवळोनी ॥ २६३ ॥
"जोव्हसुताच्या मागें लागूं अथ घेउं बळि लिसिअनांचे," ।
पडला विचार चित्तीं भाला करिं निशित सारखा नाचे ॥ २६४ ॥
विधियोजना निराळी. युलिसीसें जोव्हजा न मारावें ।
वळवी लक्ष्य मिनर्वा हेतु तयें लिसिअनांकडे जावें ॥ २६५ ॥
सीरानस, ग्रितानस, नोईमन, हेलिअस, अलास्तर तो ।
अणखी क्रोमिअसासह अल्कांदर वीर पडत दुस्तर तो ॥ २६६ ॥
बळि अन्य लिसिअनांचे घेता युलिसीस अल्प कालांत ।
परि हेक्तर त्या बघुनी धांवे घेऊन शस्त्र हस्तांत ॥ २६७ ॥
देखुन ऐसा येतां दीनवचें सर्पिदन तया विनवी ।
" प्रायमतनया तूतें बघतां मज सहज येत आस नवी ॥ २६८ ॥
त्रायपुरीं ठेविन मीं देह सुखें, अरिकरीं न टाकिं मज ।
कान्ता सुत मी पाहिन गांवीं जाउन घरा न हा समज " ॥ २६९ ॥
हेक्तर तसाच गेला अंगावरुनी न बोलतां कांहीं ।
ग्रीकां सारिन मागें, मारिन बहु, आस ही मनीं वाही ॥ २७० ॥
ईजिसधरजोव्हाचा प्रियतरु त्याच्या सुरम्य छायेंत ।

सहचर तितक्यातचि ते सर्पिदना उचलुनी करें नेत ॥ २७१ ॥
बलवान मित्र त्याचा पेलागन काढि उपटुनी भाला ।
थांबे चलन वलन मग नेत्रीं काळोख घोर तो आला ॥ २७२ ॥
लागे श्वास तशांतचि, परि धाडी बोरिआस मृदुपवन ।
आला जीव तयाला झाले श्रम छिन्न बघुन रम्य वन ॥ २७३ ॥
हेक्तर अणि मार्स असे ग्रीकांनीं पाहिले रणीं लढतां ।
करिति न पलायना ते सरती पुढतीं न वा कशा करतां ? ॥ २७४ ॥
त्या त्रोजनांस राखी मार्स असें त्यांनि ऐकिलें कानीं ।
लढतां मागें सरती स्तविलें हें कृत्य एकमेकांनीं ॥ २७५ ॥
अधिं कोण, कोण मागुन मार्सें वा हेक्तरें पुसा वधिले ।
ओरिष्टीस, त्रेकस, थोर तियुथ्रास, हेलिनस पहिले ॥ २७६ ॥
ईनोमास पडे रणिं ओरिस्बिअसासवें तया काळीं ।
राहे हिलेंत दुसरा रम्य अशा सेफिससरा जवळी ॥ २७७ ॥
बेओशिअन तयाचे सन्निध वसती बरेच हेमरत ।
जूनो सितबाहु बघे संग्रामीं ग्रीक बहुत हे मरत ॥ २७८ ॥
जवळून मिनर्वेला बोले "गे जोव्हजे बघें चपले !
जें वचन मेनिलासा ' इलियम तूं जिंकशील ' हें दिधलें ॥ २७९ ॥
तें व्यर्थ होय जर ह्या मार्सा घालूं दिला धुमाकुळ हा ।
आह्मां साहाय्य हवें कोणाचें तरि, विचार नीट पहा " ॥ २८० ॥
वदली " होय " मिनर्वा. जूनो सॅतर्नजा त्वरा करुनी ।
शृंगारी हय अपुले काचनमय बंद चमकती मधुनी ॥ २८१ ॥

रथिंच्या लौहाक्षाग्रीं हेमाचीं युक्त अष्ट आरांनीं !
हीबी जुळवी चक्रें परिणाहीं बद्ध हेमतारानीं ॥ २८२ ॥
पितळेच्या वर धांवा बघण्यातें या खऱ्या विलक्षण हो।
तुंबे ते रजताचे; रथभागीं सजत रजत कांचन हो ॥ २८३ ॥
जो रजतरज्जुबद्धप्रांतांतुन दण्ड निघतसे पुढतीं।
त्यावरि सुंदर बांधी एक धुरा फार करुन लटपट ती ॥ २८४ ॥
अश्वोरुस्त्राण तिनें केलें मग सज्ज, धीर परि नाहीं।
जूनो ह्मणुन हयांतें जोडितसे निज करें रथीं पाहीं ॥ २८५ ॥
ईजिसधरजोव्हसुता उठुन मिनर्वा स्वहस्तरचित झगा।
पितृभवनीं टाकुनियां पांघरुनी चोल झांकि निज अंगा ॥ २८६ ॥
रडवी रण लोकां जें त्या साठीं सज्ज ही क्षणीं झाली।
जलवाहक जोव्हाचें कवच वरोनी पिनद्ध मग घाली ॥ २८७ ॥
स्कंधीं ईजिस लटकवि घोर सभोंवार भीति नांदत से।
विद्रवण तेथ होतें धैर्य वसे तेथ कलह नीट बसे ॥ २८८ ॥
त्या क्रूर गार्गनाचा शोभे विक्राळ मुखवटा वरतीं।
ईजिसधरजोव्हाच्या कोपाचें चिन्ह दृश्य, जन ह्मणती ॥ २८९ ॥
शोभा शिरकवचाची वाढे हलतां तुरे वरी चारी।
पसरे कांठ तयाचा शतनगरें राहतिल सशस्त्र वरी ॥ २९० ॥
ठेवी रथीं पदातें घेई करिं दीर्घ कठिण जड भाला।
उग्र पित्याची मुलगी तेणें जिंकी सरोष वीरांला ॥ २९१ ॥
जूनो तुरगां हांकी ओढुनियां कोरडे भराभर ते।

स्वर्गद्वार उघडलें तिरपोनी काडकन न आवरतें ॥ २९२ ॥
घटका रक्षक होत्या स्वर्गीं आलिंपसावरी दक्ष ।
घनपटला उघडाया आणि मिटायास लावुनी लक्ष ॥ २९३ ॥
बहु वार मार खातां द्वारांतुनि आंत तुरग ते जाती ।
आलिंपसोच्चशिखरीं देखे सॅतर्नजा जोव्हजा ती ॥ २९४ ॥
नव्हते सुर कुणि तेथें जूनो हय थोपवीत धवलकरा ।
प्रश्न करी जोव्हातें "ताता तुज कोप कां न येत जरा? ॥ २९५ ॥
उद्धत करणी ऐसी मार्सातें सांग शोभतेना ही ।
ग्रीकांच्या वीरांचें मण्डल उत्कृष्ठ उरविलें नाहीं ॥ २९६ ॥
व्हीनस आणि अपालो मानिति आनंद दुःख मज वाटे ।
निःसीम बोकले हा, दुर्वृत्ता लावुं काय या वाटे?" ॥ २९७ ॥
घनवाहक जोव्ह वदे "सांग मिनर्वेस त्यास अंवराया ।
तिज पारिपत्य याचें येतें करतां हव्या तशा समया" ॥ २९८ ॥
परिसुन वच धवलकरा जूनो आज्ञेस वंद्य मानून ।
मारी प्रतोद अश्वां जे कधिं नव्हते पलायनीं न्यून ॥ २९९ ॥
आकाशमंडळांतुनि धरणीवर करिति सरळ उड्डाण ।
एका उडीस अंतर घेति किती तें पुसाल परिमाण ॥ ३०० ॥
भूधरशिखरावरुनी बघतांनां तल विशाल अंबुधिचें ।
दृग्पाताचें पुरुषा अन्तर जें विषय, तें हयां उडिचें ॥ ३०१ ॥
स्कामन्दरतटिनीला मिळते मग जेथ कीं सिमोइस ती ।
तेथ त्राया जवळी जूनो हय थांबवीत चपल अती ॥ ३०२ ॥

हय मोकळे करोनी पसरि धुक्याचें वरून आवरण ।
स्वादिष्ट सिमोइसजल पिउनी हय चाखतात रुचिर तृण ॥३०३॥
गेलीं मग तेथुन तीं उडुनी जैसे कपोत ते चपळ ।
ग्रीकां सहाय व्हाया रणसंग्रामांत दवडतां न पळ ॥ ३०४ ॥
दायोमीदा घेउन जमले नरवीर ज्यां नसे गणना ।
अपक्क मांसा सेवुनि सिंह जसे लाल करुनियां वदनां ॥ ३०५ ॥
किंवा वराह गमले नाहिंत जे न्यूनबल भयाण वनीं ।
तेथें जाउन जूनो, धवलकरा देखिते तयां नयनीं ॥ ३०६ ॥
स्तेन्तर निधडा योद्धा चण्डस्वर अतुल शक्ति जो आज ।
पंचादश लोकांच्या इतुका ज्याचा प्रचण्ड आवाज ॥ ३०७ ॥
धरुनी रूप तयाचें जूनो अरडे करून बहुत बळ ।
"धिक्कार हो तुह्मांला ! लज्जास्पद जाहलां कसे सकळ ?॥ ३०८ ॥
ग्रीक अहो ! तुमचें कीं व्यावें सौन्दर्य पाहुनी नुसतें ।
अकिलीस येत होता समरीं तों त्रोजनां भरे भय तें ॥ ३०९ ॥
तच्छस्त्रांच्या धाकें जाति वलांडुन न दार्दनद्वारा ।
बाहेर येउनी ते घेति अतां जलधितीरचा वारा " ! ॥ ३१० ॥
बोलुन ऐसें भरलें प्रत्येकातें तिनें बहु स्फुरण ।
दायोमीदाचें मग सहज मिनर्वेस जाहलें स्मरण ॥ ३११ ॥
जाउन पाहे त्यातें, बसला तो भूप निज रथाजवळी ।
पन्दारसशरकृत तें निज हस्तें क्षत वरून कुरवाळी ॥ ३१२ ॥
ढाल विशाल तयाची तीचा बहु रुंद बंद त्या खालीं ।

सुटला घर्म श्रान्ता, जडता त्यांतें करांत बहु आली ॥ ३१३ ॥
उचलून बंद वर तो टाकितसे पुसुनियां कृष्ण रुधिर ।
धरुनी धुरा रथाची, देवी वदली तया मग अधीर ॥ ३१४ ॥
" दिधलें तैदिअसें न च जन्म अहा ! आत्मसमसुता कांहीं ।
त्याची लहान मूर्ति, कीर्ति परी थोर ती कशी पाहीं ॥ ३१५ ॥
ग्रीकां कडुनी गेला थीबपुरीं तो करावया वकिली ।
काद्मिअनांसह भोजन सेवि सुखें युक्ति ही तया कथिली ॥ ३१६ ॥
क्रोध नको युद्ध नको समरीं धावूं नको उतावीळ ।
होती मम आज्ञा ही. धरिला परि वेगळा तयें पीळ ॥ ३१७ ॥
अवसान राखुनी निज काद्मिअनां तो करून आह्वान ।
जिंकी तरुणां सकलां, केली प्रत्यक्ष मदत जरि त्या न ॥ ३१८ ॥
जवळी राहून उभी राखिन तव पाठ जा करीं समर ।
त्रोजन जिंकावे ही तुजसिं विनंती करीतसें सभर ॥ ३१९ ॥
केलेस कष्ट कांहीं भागथटा ये बहूत गात्रांस ।
उत्साह हृदयिं नुरला, जावोनी धैर्य जाहला त्रास ॥ ३२० ॥
अज पासुन मारूं मीं हांक तुला सांग कोणत्या नांवें ? ।
ईनियुसाचा नातू तैदिअसज तूं खरें न मानावें " ॥ ३२१ ॥
दायोमीद वदे तिज "ओळखतों देवि जोव्हजे तुजशीं ।
सत्य ह्मणून कथिन तुज इच्छा मम मानसांत होत जशी ॥ ३२२ ॥
मजला भीति कुणाची ? आळस दवडील काय उत्साहा ? ।
आज्ञा मज केलिस ती आहे ध्यानांत नीट तूंच पहा ॥ ३२३ ॥

व्हीनस जोव्हसुता जर रणिं आली क्षत तिला करीं आधीं ।
परि ती अन्य सुरांची जाऊंदे सोड मंडळी साधी ॥ ३२४ ॥
ह्मणुनी परतुन आलों ग्रीकां कथण्यास येथ जमण्याला ।
मार्सानें रणसूत्रें निज करिं अज घेतलीं दिसे मजला" ॥ ३२५ ॥
बोले उलट मिनर्वा दायोमीदास "तैदिअसजा रे ।
माझ्या हृदयानंदा मार्सावर चालवीं रथा जा रे ॥ ३२६ ॥
त्यातें भिऊं नको तूं भीति नको तुज मुळींच अमरांची ।
साहाय्य तुजसिं माझें, ताडुन त्या लगट दाव समराची ॥ ३२७ ॥
उद्धत त्या मार्साचें घेउनियां काय आज बसलास ।
तो भ्रान्तचित्त सकलां व्याधि गमे सोडुनी निसर्गास ! ॥ ३२८ ॥
रोज करी पक्षांतर करुनी प्रस्ताव मज दिलें वचन ।
जूनोच्या देखत कीं ग्रीकांचें मी करीन गे अवन ॥ ३२९ ॥
इतक्यांत सर्व विसरुन गेला तो त्रोजनांत मिसळून" ।
बोलुन हें स्थेनिलसा काढी अश्वांवरून ओढून ॥ ३३० ॥
भूवरि घेत उडी तो क्रोधावेशांत रथिं चढे मग ती ।
दायोमीदा सन्निध बसुनी देई रथास शीघ्र गती ॥ ३३१ ॥
रथ चलतां अक्षाग्रें करकर करती प्रचंड भारानें ।
आंत महा शक्ति बसे देवी आणि वीर उग्र तेजानें ॥ ३३२ ॥
रश्मी करीं मिनर्वा घेवोनी फडकवीत चाबुक ती ।
कठिण खुरांचे हय त्या मार्सावरि नेत पथ न ते चुकती ॥ ३३३ ॥
त्या थोर पेरिफासा ईतोलिअनोत्तमास मार्सानें ।

मारियलें रुधिरमयें ओकेसिअसात्मजास भाल्यानें ॥ ३३४ ॥
पूतोच्या शिरकवचा घालि मिनर्वा तदा शिरावर ती ।
उद्धत मार्स तिजला वळखुं नये वेळ ही कठीण अती ॥ ३३५ ॥
आधींच घेतला त्या मार्सानें जीव पेरिफासाचा ।
दायोमीदा बघतां टाकुनियां तो पुढें सरे साचा ॥ ३३६ ॥
दोघे जवळी आले चढला मग मार्स रथधुरेवरतीं ।
घ्याया जीव अरीचा भाला सरसाविला तयें पुढतीं ॥ ३३७ ॥
तत्काल मिनर्वा ती भाला धरुनी दुजेकडे वळवी ।
लागुन रथास निसटे दवडी श्रम फुकट, नेम अज चुकवी ॥ ३३८ ॥
दायोमीद अनंतर घेउन भाला भला पुढें घुसला ।
अरिकटिबंदिं मिनर्वा रोंवी तो तेथ रुतुनियां बसला ॥ ३३९ ॥
झाला वार भयंकर पडलें क्षत साल सुटत अंगाचें ।
घेतां भाला काढुनि किंचाळे मार्स हाल बहु याचें ॥ ३४० ॥
नवदश सहस्र सैनिक एका समयास गर्जले समरीं ।
तर जो ध्वनि होइल तो मार्सध्वनितुल्य होय लेशभरी ॥ ३४१ ॥
भ्याले ग्रीक त्रोजन मग दायोमीद वरतिं जों पाहे ।
स्वर्गा घनां वलांडुन मार्स रणांतून चालला आहे ॥ ३४२ ॥
पडतां प्रखर उन्हाळा सहसा जड वाहतो जसा वारा ।
दिसतें घनांतरालीं भयद पटल दृष्टिला न दे थारा ॥ ३४३ ॥
दिसला मार्स तसा हा जाउन सॅतर्नजापशीं बसला ।
आलिंपसोच्चशिखरीं सुरभवनीं आर्तहृदय गहिंवरला ॥ ३४४ ॥

वाहे क्षतांतुनी जो अविनाशी स्राव तो तया दावी ।
बोले "हे तात तुला ही कृति बघतां न चीड कां यावी ॥ ३४५ ॥
मानव हित साधाया कारस्थानें खरेंच सुर करिती ।
दुःखें सदैव सोशिति राग तुझा येतसे अशारीती ॥ ३४६ ॥
जन्म दिलेंसी एका वेडीला फार दुष्ट दुहितेला ।
नित्य उपद्रव देणें वाटे कर्तव्य ज्या प्रमत्तेला ॥ ३४७ ॥
आलिम्पसस्थ सुर ते आज्ञा तव मानतात वश सारे ।
शब्दानें कृतिनें वा निग्रह हीचाच होत न कसारे ॥ ३४८ ॥
करतोस लाड ऐसे देवोनी जन्म दुष्ट तनयेला ।
उद्धत तैदिअसज तो अमरांवर सांग समरिं कुणि नेला ॥३४९ ॥
वार करी मणिबंदी व्हीनसला घोर चालतां समर ।
येई धांवुन मजवर चपळ ह्मणुन वांचलों जरी अमर ॥ ३५० ॥
राशींत मज मृतांच्या नाहीं तर लागतेंच लोळावें ।
दुःखांत तेथ पडुनी शस्त्रांचे तीक्ष्ण घाव आणि खावे " ॥ ३५१ ॥
अवमानुनियां त्यातें जोव्ह वदे सांग मज न गाऱ्हाणें ।
नावड तव मी करतों कर तूं तर येथुनी अतां जाणें ॥ ३५२ ॥
हौस तुला युद्धाची, कलहप्रिय तूं सुखी सदा समरें ।
आलिंपसस्थदेवांमाजी दाखीव अन्य तुजसम रे ॥ ३५३ ॥
मातेच्या वळणावर गेलासी तो स्वभाव तुज लागे ।
कोण दुराग्रह धरि ती, मज न वळे, बोललों जरी रागें ॥ ३५४ ॥
आंतुन फूस तिची तुज करतोसी ढंग हे दिसे उघड ।

तरि तव तळमळ डोळां पाहाया जात मज अतीव जड ॥ ३९५ ॥
झालासी मातेला मज पासुन तूं खराच मम तनय ।
इतरत्र जन्मतासी, सोडुन अणि वागतासि जर विनय ॥ ३९६ ॥
केली असति अवस्था, जीहुन बरवी युरानससुतांची ।
वळवुन मुख जोव्ह वदे "पीअन हें क्षत बरें कर अतांची"॥३९७॥
पीडा शमनार्थ तदा पीअन लावी अमोघ लेप वर ।
त्याची जाति सुरांची झाला निर्व्रण पळांत तो सभर ॥ ३९८ ॥
तो चीक उंबराचा, दुग्धीं ओतून ढवळतां हस्तें ।
दोन्हीं पातळ द्रव्यें सत्वर सांकून जाति हें दिसतें ॥ ३९९ ॥
तैसें सत्वर भरलें मार्सक्षत. त्यास घालुनी स्नान ।
हीबी वस्त्रें सजवी जोव्हापाशीं बैसतां न हो म्लान ॥ ३६० ॥
आला घालित ऐसा मार्स जो नित्य जीवहानिरत ।
जूनो आणि मिनर्वा आल्या मग जोव्हमंदिरीं परत ॥ ३६१ ॥



सर्ग ६ वा.

दायोमीद व ग्लाकस यांचें आख्यान.

हेक्तर व ॲन्द्रोमाकी यांची भेट.

देवांनीं समरभूमीचा त्याग केल्यावर **ग्री**कांची सरशी होते. प्रसिद्ध शकुनज्ञ जो **हे**लिनस तो **हेक्त**राला नगरांत परत येण्यास सांगतो. व **त्रा**यांतील पुरंध्री जमा करून **मि**नर्वामंदिरांत जाऊन '**दा**योमीदास युद्धपराङ्मुख कर' अशी देवीची प्रार्थना करण्यास सांगतो. **हे**कराभावें युद्धास शैथिल्य प्राप्त होतें. तितक्यांत **ग्ला**कस व **दा**योमदि यांची रणांत भेट होऊन ते पगडीभाई करतात. कारण असें कीं उभयतांचे पूर्वज स्नेही होते. **हे**क्तर **हे**लिनसच्या ह्मणण्याप्रमाणें व्यवस्था करून **पा**रिसास युद्ध करण्यास प्रवृत्त करतो. नंतर **हे**क्तर आपल्या कोमल स्त्रीची परवानगी घेतो. व समरावर धांवत जाऊन थडकतो.

कालमानः—दिवस तोच.

स्थलः—समरभूमि व **त्रा**य.

ग्रीक**त्रो**जनयुद्धा सोडुन सुर सर्व चालते झाले ।
अन्योन्यांवर फेंकिति वीर मधोनी कुठें कुठें भाले ॥ १ ॥
झान्थस आणि सिमोइस यांमधली भूमि वीर शोभवती ।
आजक्स **ग्री**कांचा आधारस्तंभ सरत मग पुढतीं ॥ २ ॥
त्रोजनदलरचनेतें भंगुन आशाप्रदीप दीप्त करी ।
थ्रेशिअनोत्तमवीरा आकामासा बळें करून धरी ॥ ३ ॥
हयकेशांचें शोभे कवच शिरीं त्यावरी करी घाव ।
मस्तकिं भाला रोंवी त्यातें अस्थींत लाधला ठाव ॥ ४ ॥

मिटले नयन नृपानें पटल तमाचें करीत आवरण ।
दायोमीदें वधिला अक्षैलस फार गाजवून रण ॥ ५ ॥
आरिस्बानगरीं हा थोर तियुथ्राससुत करी वास ।
शोभवि राजपथातें तद्गृह पूजून अतिथिभारास ॥ ६ ॥
*लोकप्रिय धनवन्ता त्यांतुन आला न एक राखाया ।
कालेसिअस तयाचा सारथि त्याही वधीत अरि समया ॥ ७ ॥
ओफिल्तिअस द्रेसस पडले युरिआलसास सहज बळी ।
ईसिपसासह होता पेदासस शूर वीर तो जवळी ॥ ८ ॥
आबारबारिया वनिं शेळ्या चारीत अप्सरा असतां ।
लाओमीद्नतनय श्रेष्ठ बुकोलिअन हर्षला बघतां ॥ ९ ॥
प्रेमें बद्ध जहालीं विसरोनी भान तेथ जों फिरती ।
आलिंगनप्रसंगें गर्भ धरी सुन्दरी विलासवती ॥ १० ॥
प्रसवे पुत्र जुळे हे सुन्दर जे शूर वाढले तरुण ।
तद्बल युरिआलस हरि नंतर कवचास पळवि निष्करुण ॥ ११ ॥
युलिसीस हाणि भाला पडला तत्काळ तो पिदैतीस ।
एलातसास मारी अगमेम्नन नृवर अणुन जेरीस ॥ १२ ॥
हा भूप सात्निओइसतीरीं पेदाससांत राहतसे ।
फैलाकसास पळतां लिइतस मारी. अपूर्व दैव कसें? ॥ १३ ॥
मेलान्थिअसा मारुन युरिपैलस कवच नेतसे हरुन ।
मग मेनिलास नरपति ठेवी अद्रास्तसा अहत धरुन ॥ १४ ॥

*कठिण समय येतां कोण कामास येतो. रघुनाथ पंडित.

त्याचे अश्व बुजोनी पळती रणभूमिवर न आवरती।
दीर्घ सुरूची शाखा येउनियां आड आदळति वरतीं ॥ १५ ॥
रथदण्ड भग्न होतां इतरांसह धांवती पुरदिशेला।
चक्रा जवळी भूपति उलटुनि धुरळ मुखांत बहु गेला ॥ १६ ॥
जवळीच मेनिलासा भाला करिं घेउनी उभा बघतां।
तज्जानूंतें कवळुनि विनवी " हे एत्रिअसज ! रक्ष अतां॥ १७ ॥
दे जीवदान मजला घे तूं मग योग्य खण्डणी वरतीं।
धनवान जनक माझा द्रव्य घरीं विपुल ज्या नसे गणती ॥ १८ ॥
शस्त्रें छान तिख्याचीं पित्तलमय वस्तु हेमसंभार।
मद्रक्षणोद्यता तो देइल त्यांतिल यथेच्छ साभार" ॥ १९ ॥
द्रवलें मानस त्याचें होता ह्मणणार सेवकां " न्या या "।
*अगमेम्नन धांवुन तों येउन " अरडे न जाणसी न्याया ! ॥ २० ॥

---

*सरसकट राक्षसांचा संहार लक्ष्मणानें मांडिलेला पाहून राम त्यास ह्मणतात.

अयुध्यमानं प्रच्छन्नं प्राञ्जलिं शरणागतम्।
पलायमानं मत्तं वा न हन्तुं त्वमर्हसि ॥

जो युद्ध टाकून बाजूला सरला आहे, जो प्राणभयानें लपून राहिला आहे, हात जोडून प्राण वांचवा ह्मणून प्रार्थना करीत आहे, जो पळत आहे किंवा धास्तीनें वेडा झाला आहे, त्याचा जीव घेणें केव्हांही न्यायाचें होणार नाहीं. या नियमांप्रमाणें चालविलेल्या युद्धास धर्मयुद्ध ह्मणतात. ' रक्ष्यो हि शरणागतः ' (शरण आलेल्यास मरण देऊं नये) असेंही अन्यत्र वाल्मीकीनें ह्मटलें आहे. हें रामकालिन सुधारलेल्या युद्धनीतीचें तत्व ट्रोजन युद्धाचे वेळेस प्रचारांत नव्हतें असें कित्येकांस ह्मणतां येईल. परंतु तें सर्व खरें

हे मेनिलास ! तव हें कसलें निर्जीव हृदय मृदु मृदु रे ! ।
यांची सुटली माया कैशी तुज आठवण मुळीं न उरे ॥ २१ ॥
पाहुणचार तयांचा निजगृहिं केलास आदरें फार ।
ट्रोजन लोकांनीं तव फेडियले नीट सकल उपकार ॥ २२ ॥
अपुल्या हस्तें यांचा उतरूं ये आज नीट तोरा हो ।
नाश पुरा सकलांचा लावूं अजि एकही न तो राहो ॥ २३ ॥
*सांभाळी जननी ज्या, गर्भींच्या बालका वधीं त्याही

नव्हे. मेनिलासाला अद्रास्तसाची दया येऊन त्यास जीवदान देण्यास तो तयारही झाला असें कवीनें दाखविलें आहे. मात्र सूड घेण्याची इच्छा अगमेम्ननाचे मनांत फार प्रबल झाल्यामुळें कोणत्याही ट्रोजनाचा जीव राखण्याचें त्याच्या मनांत येईनासें झालें होतें एवढेंच.

भूमीनें रथाचें चाक गिळून टाकिलें तें सोडवून घेतों. तोंपर्यंत माझेवर बाण टाकूं नकोस अशी कर्णानें पार्थास विनंति केली.

रथचक्र उद्धरूं दे ! श्रुतिशास्त्रज्ञा ! महारथा ! कुलजा ! ।
साधु न हाणिति अरिला पाहाति अधृतायुध व्यथाकुल जा ! ॥

परंतु पांडवांचे प्रथम पासून कौरवांनीं केलेले हाल, विशेषतः त्यांनीं केलेल्या द्रौपदीच्या विटंबनेची त्यास आठवण देऊन अर्जुनाचे आधींच श्रीकृष्णांनीं कर्णास याप्रमाणेंच उत्तर दिलें आहे.

पूर्वी न धर्म रुचला त्यजिला निपटूनि जो जसा कुचला ।
आतांचि बरा सुचला काळगृहा सर्व व्हा परासु चला ॥ मोरोपंत.

* गरुड रामास ह्मणतो.

बालवृद्धावशेषां तु लंकां कृत्वा शरोर्मिभिः ।
रावणं तु रिपुं हत्वा सीतां त्वमुपलप्स्यसे ॥ १ ॥

संस्काररहित पसरूं पौरशवें चालवून हत्या ही " ॥ २४ ॥
बंधूचें मन वळवी सांगोनी गोष्ट युक्तिची बरवी ।
अद्रास्तसास खेंची स्वकरें उदरांत शस्त्रही शिरवी ॥२५ ॥
पडला वीर उताणा देइ उरीं एत्रिअसज निज पाय ।
शस्त्रा काढुन घेई, नेस्तर मग बोलला बघा काय ॥ २६ ॥
" हे ग्रीकवीर ! परिसा जमलां तुह्मि दास थोर मार्साचे ।
मित्रांनों पुढतिं सरा, टाकोनी काम हें लुटायाचें ! ॥ २७ ॥
कापुन काढूं अरिचे लोक अधीं कार्य हें करा पहिलें !
नंतर मृतांस लुटणें स्वस्थपणीं कार्य ह्मणुन जें गणिलें !" ॥ २८ ॥
धैर्य अलें ग्रीकांतें अरिच्या जीवास काळजी पडली ।
हृदयींच्या भीतीनें झाले जित अधिक, मंडळी फिरली ॥ २९ ॥
परतून इलियमाला जाते, पण हेलिनस पुढें आला ।
प्रायमसुत हा ठाउक भाविष्यवादी करीत वचनाला ॥ ३० ॥
"हेक्तर ! आधीं परिसें वाणी हे इनिआस ! जी वदतों ।
त्रोजन हे लिदिअन हे तुह्मांवर भिस्त ठेविती बघतों ॥ ३१ ॥
मसलत कळते, कळतें समर, तुह्मी शूर सर्व कामातें ।

आबालवृद्धांस वर्जून रावणासहवर्तमान लंकेंतील सर्व राक्षसांचा नाश तुझ्या हातून घडेल व सीतेची प्राप्ति तुला होईल. या श्लोकांत शत्रुपक्षांतील बाल व वृद्ध यांचें रक्षण करावें अशी नीति आहे. ती " गर्भिंच्या बालकांस-ही सोडूं नये " या वरील आर्येंतील होमरीय नीतीह्न निराळी आहे. हें उघडच आहे.

थांबा ! सर्व दिशांनीं सैनिक पळतात थांबवा त्यांतें ॥ ३२ ॥
*दडतिल नाहीं तर हे कोमलकान्ताकरांत जाऊन! ।
मग कोणता असे जगीं शत्रूचा विजय अधिक याहून ? ॥ ३३ ॥
वळतां दल सारें हें ग्रीकांसह चांगलें करूं समर ।
नडलों चौंबाजूंनीं पाते हा समय फार भीतिकर ॥ ३४ ॥
हेक्तर ! नगरा जाउन आईला सांग भेटुनी वेगें ।
आयाबाया मिळवुन आज मिनर्वालयास जावें गे ॥ ३५ ॥
लावुन किल्ली उघडा देवद्वारा अणी मिनर्वेच्या ।
चरणीं उत्कृष्ठ वसन अर्पावें थोर लोकमातेच्या ॥ ३६ ॥
सांग करावा देविस नवस असा कीं ' कृपा तुझी व्हावी ।
त्रोजन, त्यांचीं बालें, कान्ता, नगरी समस्त राखावीं ॥ ३७ ॥
वर्षाच्या वर्षाच्या द्वादश गोज्या तुला बळी देऊं ।
गे ! हांक ! इलियमांतुन दायोमीदा नको इथें ठेऊं ' ॥ ३८ ॥

---

*या वीररसात्मक भाषणामध्यें थोड्या शृंगाराचें मिश्रण करून कवीनें हास्य रस उत्पन्न केला आहे. ज्या अबला स्त्रियांचें संरक्षण वीरांनीं वेळेस प्राण खर्ची घालूनही केलें पाहिजे त्या वीरांनीं भीतीनें पलायन करून त्याच स्त्रियांचा आश्रय स्वतांच्या रक्षणाकरतां करावा याहून अधिक दैन्य तें कोणतें ! हा अर्थ वरील मिश्रणानें सुरेख साधला आहे. व असें मिश्रण योग्य रंगाचे मिश्रणांप्रमाणें कवितेंत शोभतें.

अर्जुन उत्तरास ह्मणतोः—
न्यावा चमूवरि तुवां रथ, तरुणीप्रति जसा स्मरें तरुण ॥ मोरोपंत.
ही आर्या वरील मिश्रणाचेंच उदाहरण आहे.

योद्धा क्रूर असोनी पळवी अरिला अनेक हिकमतिनें ।
ग्रीकांत हाच पहिला जाणा अकिलीसही न्यून मतिनें ॥ ३९ ॥
अकिलीस ह्मणति झाला देवीला तो असेल पारि असला ।
नाहीं दुसरा कोणी कोपन बलवान तो जगीं झाला ! " ॥ ४० ॥
आज्ञा हेक्तर मानी बन्धूची मग रथांतुनी उतरे ।
भाला फिरवित गेला कटकीं सर्वत्र अभय हा विचरे ॥ ४१ ॥
उत्तेजन देत तयें वीर चिढोनी करीत रणिं झगडा ।
केली लगट तयांनीं ग्रीकांवर कीं बसेल आजि पगडा ॥ ४२ ॥
सोडून कदन देती घेती हे ग्रीक मुळिंच माघार ।
वाटे त्यांस नभांतुन पृथ्वीवर अमर उतरले फार ॥ ४३ ॥
ते त्रोजनांस करिती मदत तयें घोर होत संग्राम ।
बोले हेक्तर "कथितों त्रोजन हो ! मित्र हो ! तुह्मां काम ॥ ४४ ॥
धैर्य धरा आजि समरीं विक्रम निज अतुल दाखवायास ।
जाऊन इलियमा तों कथितों गृहिणींस मंत्रिवृद्धांस ॥ ४५ ॥
'प्रार्था प्रभुला भावें त्यातें शतमेध द्यावयास करा ' "।
ऐसें बोलुन हेक्तर लागे वाटेस जाय जी नगरा ॥ ४६ ॥
ढालीच्या चर्माची कृष्ण कडा चालतां त्वरा करुनी ।
त्याच्या मानेवर आणि गुंफ्यावर घांसते अतां मधुनी ॥ ४७ ॥
दायोमीदा भेटे ग्लाकस समरीं युयुत्सु भयद दलीं ।
भिडले दोघे जवळी, मग दायोमीद त्यास वदत बली ॥४८ ॥
" तूं कोण मानवांतिल? दिसतोसी शूरतम मला नयनीं ।

नाहिं कधीं पाहियलें तुजसीं समरीं सुकीर्तिच्या सदनीं ॥ ४९
झालासी धीट बहू भाल्याच्या पोंचलास अग्रासीं ॥
हतदैव पितर त्याचे ज्यांतें मम शस्त्र कठिण हें ग्रासी ॥ ५० ॥
स्वर्गींच्या अमरांतिल असलासी सांग तर मला अजुनी ।
त्यांसीं युद्ध न करिं मीं ! कां तें लैकर्गसास ये पुसुनी ॥ ५१ ॥
गांठी रणिं हा ते सुर बाकस अणि ते प्रसिद्ध अनुयायी ।
पुण्य निसा क्षेत्रांतुनि लावि पिटाळून त्यां त्वरित पायीं ॥ ५२ ॥
हाणी गवांकुशानें, शस्त्रें टाकून अमर ते पळती ।
भ्याला बाकस भारी घेइ बुडी सागरांत खोल अती ॥ ५३ ॥
हा धाक मानवांचा भरला अमरां दुजां न मानवला ।
कोपायमान जोव्हें केलें त्या अंध; काय कथुं नवला ! ॥ ५४ ॥
शान्तिप्रिय अमरां तो अवडेना, वांचला न मग फार ।
धन्य सुरांशीं ह्मणुनी युद्ध न करतों; न हा चमत्कार ॥ ५५ ॥
असशील धरित्रीचीं सुफलें खाणार एक मानव रे ! ।
तर इकडे ये ह्मणजे लवकर दावीन मृत्युमान बरें ! ” ॥ ५६ ॥
हिप्पोलोकससुत मग उत्तर दे त्यास परत विख्यात ।
“ हे थोर तैदिअसजा ! पुससी मम काय कारणें जात ॥ ५७ ॥
जात जशी पर्णांची, होय तशी जात मानवांची ती ।
पवनें पर्णें पडतां, पालवती तरु वसन्तिं ही प्रचिती ॥ ५८ ॥
एक पिढी जाइ लया होई उत्पन्न दुजि तिच्या जागीं ।
मग लालसा असे का व्हाया मद्वंश विदित तुजलागीं ? ॥ ५९ ॥

परिसें प्रसिद्ध ती जनिं अर्गोसीं थोर एफिरा नगरी।
सिसिफस ईओलससुत चातुर्यें अन्य ज्या न साम्य करी ॥ ६० ॥
ग्लाकस तत्सुत झाला बेलेरोफन तदीय सुत झाला।
होतें ईशकृपेनें नैसर्गिक रूप फार तरुणाला ॥ ६१ ॥
ग्रीकोत्तम जोव्हप्रिय प्रीतस नृप कोण त्यास पुसणार।
किल्मिष मनिं येतां क्षणिं राज्याच्या लाविलें तया पार ॥ ६२ ॥
प्रीतसजाया ठाउक थोर परी आन्तिआ करी ढंग।
समया साधुन याशीं गुप्तपणें इच्छि कीं घडो संग ॥ ६३ ॥
सुज्ञ युवा सुविचारी सत्यव्रत तो तिला नसे वळला।
म्हणुनी कुभांड रचुनी प्रीतस भूपति तिनेंच चेतविला ॥ ६४ ॥
बोले " तूं मर अथवा त्या बेलेरोफनास जा मार।
*जो निंद्य नीच मेला करुं पाहे मजवरी बलात्कार " ॥ ६५ ॥
परिसुन वच नृप खवळे, मन धांवे परि तया न माराया।
देऊन छद्मपत्रें लिसिआनगरीस धाडि त्या राया ॥ ६६ ॥
मुद्रित लेख विघातक, त्या कथिले द्यावया श्वशूरास।
अंतरिं गुप्त मरण तें कळलें नच सरळचित्त शूरास ॥ ६७ ॥
राखीत पाठ ईश्वर झान्थसतीरावरून लिसिआंत।
होतां प्रविष्ट त्याचा आदर करि भूप हृष्ट चित्तांत ॥ ६८ ॥

*अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता। अशौचं निर्दयत्वं च स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥ ही एका स्त्रीद्वेष्ट्या कवीची उक्ति या बाईच्या कृतीनें सार्थ होऊं पहात आहे.

पाहुणचार करी नृप नउ दिन नउ वत्स धेनुचे वधुन ।
उजडे दिवस दहावा " काय पुसे भेट आणिली जपुन" ? ॥ ६९ ॥
जामात्याची निरखुन भेट ह्मणे " वध्य तुज किमीरा ती ।
जन्म अमानुष तीचा सिंहमुखी पक्षयुतशरीरा ती ॥ ७० ॥
अजमध्या मधुन मधुन वमन करी भयद अग्निच्या ज्वाला ।
दैविक चिन्हांवरतीं विश्वासुन मारिलें तयें तिजला ॥ ७१ ॥
सालिमिसह युद्ध करी आमाझन्सांस जाउनी मारी ।
मानवयोनीमाजी केला झगडा न कुणि असा भारी ॥ ७२ ॥
कपटप्रयोग योजी नंतर, नृप धाडसी जमा करुन ।
बसवी दबा धरुन. त्यां वीर वधी. ते अले न घरिं फिरुन ॥७३॥
सुरसंभव वीर असें आयोबेटीस नृपतिला कळलें ।
× राज्यार्धासह कन्या देवोनी त्यास तेथ राहविलें ॥ ७४ ॥

×मालिनी नामक एकुलती एक राजकन्या आपल्या मुलास, मदनास, राज्या सह मिळावी अशी दुष्टबुद्धिनामक प्रधानाची इच्छा होती. परंतु सुन्दर, पण मातृपितृरहित, व राजचिन्हांकित राजपुत्र चंद्रहास, जो त्याच्या स्त्रीनें दूरचा नातेवाईक ह्मणून जवळ बाळगला होता, तो त्यास नडत होता. ह्मणून त्यास मारण्याचे दुष्टबुद्धीनें अनेक प्रयत्न केले. ते विफल झाल्यावर शेवटला ह्मणून एक प्रयत्न केला तो असा. चंद्रहास दुष्टबुद्धीच्या हातून एकवार सुटल्यावर एका मांडलिक राजाचे पदरीं राहिला होता. तो त्याचा करभार घेऊन दुष्टबुद्धि ज्या सार्वभौम राजाचे पदरीं होता त्याकडे येत होता. वहिवाटीप्रमाणें थैलींत पत्र होतें. तींत दुष्टबुद्धिनें चंद्रहासाजवळ मुद्रित लेख कपटानें देण्याची व्यवस्था केली होती त्यांत 'विष या दीजे' असे शब्द

लिसिआवासि जनांनीं दिधला उत्कृष्ट रम्य भूभाग ।
जेथें विशाल कुरणें द्राक्षीचे थोर थोरले बाग ॥ ७५ ॥
या स्त्रीपासुन झाली मग बेलेरोफनास तीन मुलें ।
हिप्पोलोकस लोकीं प्रथित इसान्द्रस तसाच्च बाहुबलें ॥ ७६ ॥
कन्या अपूर्व तिसरी, ती लाओमेदिआ जिला भुलुनी ।
चौर्थरतें जोव्हानें पुत्र दिला ख्यात सर्पिदन सुजनीं ॥ ७७ ॥
बेलेरोफन झाला अवडेनासा सुरांस; मग रागें ।
जनसंपर्का टाकुन खिन्न मनें एलिइअनिं फिरुं लागे ॥ ७८ ॥
सालिमिसह युद्ध करी पुत्र इसान्द्रस तयास मार्स वधी ।

होते. चंद्रहासानें दुष्टबुद्धीचें घरीं पाहुणा ह्मणून उतरावें अशी व्यवस्था होती व तो मुद्रित लेख मदनास द्यावयाचा होता. वाटेंत तो लेख दुष्टबुद्धीचीच कन्या विषया हिचे हातांत पडून तिनें 'विष' व 'या' या शब्दांमध्यें ओळ घालून मधलें अंतर नाहीसें करून 'विषया दीजे' असे शब्द केले. तेवढ्यावरून याचा अपघातानें येणारा मृत्यु चुकून उत्तम स्त्रीरत्न त्याच्या पदरांत पडलें. पुढें प्रधानजीनें राजकन्येला वर शोधावयाचा टाकून आपलेच मुलीला वर प्राप्त केला हें जाणून राजा आपली कन्या चंद्रहासासच राज्यासह अर्पण करता झाला. त्याप्रमाणें बेलेरोफनचा वध करावा ह्मणून त्याबरोबर प्रीतसनृपानें मुद्रित लेख दिला होता. परंतु जी जी युक्ति याला मारण्यास तें पत्र पाहून आयोबेटीस नृपानें केली ती निष्फल होऊन हा पराक्रमी व सुन्दर राजपुत्र देवसंभव आहे असें समजतांच आपली कन्या राज्यार्धासह यास तो अर्पण करिता झाला. या दोन कथानकांत साम्य किती आहे व भेद किती आहे हें रसिक वाचकांस सांगणें नकोच.

तत्तनयेला मारी दायाना ती न लावतां अवधी ॥ ७९ ॥
हिप्पोलोकस जनकें जन्म दिलें मजसिं सांगतों परिस ।
त्राया तो मज धाडी दावाया शौर्य जिंकुनी अरिस ॥ ८० ॥
' मिळवीं विजय ' वदे तो ' पितरांचें धवल यश न तें मळवीं ' ।
त्याशीं न एफिरेंतहि लिसिएंतहि तुल्यता कुणा यावी ॥ ८१ ॥
त्यांच्या सत्कुलिं झालों, वाटे अभिमान; अंगिं तें रुधिर " !
दायोमीदा वाटे मोद मनीं वृत्त परिसुनी रुचिर ॥ ८२ ॥
रोंवून भूंत भाला, जननायक बोलला बरी वाचा ।
" प्राघूर्णक निःसंशय आज जुना भेटलास पितयाचा ॥ ८३ ॥
बेलेरोफन मागें ईनियुसें निज गृहांत आदरिला ।
दिन वीस, देणग्यांनीं दोघांनींही स्वजीव तोषविला ॥ ८४ ॥
ईनियुसें त्या दिधला प्रेमानें कमरबंद लखलखित ।
बेलेरोफन देई हेमाचें पात्र परत कीं त्वरित ॥ ८५ ॥
तें मंदिरांत ठेउनि आलों मी येथ परि न आठवतो ।
मज थोर तैदिअस जो गेला टाकून बाल असतां तो ॥ ८६ ॥
थीब्रांत बहुत मेले ग्रीक तदा तें असो परंतु अतां ।
तूं मित्र पाहुणा मम अर्गोसीं टाकिलेंस पद कळतां ॥ ८७ ॥
लिसिएंत टाकितां पद मी ही तव पाहुणा तसा सहज ।
मारा परस्परांच्या शस्त्रांचा चुकवुं समरिं ह्मणुन अज ॥ ८८ ॥
ज्या त्रोजनांस करतिल देव पुढें, त्यां रणांत ससहाय ।
भाल्यानें मारिन मी तुडवोनी पोंचल्यास मम पाय ॥ ८९ ॥

ग्रीक दुजे वध्य तुला जितके शकशील तूं वधायातें" ।
शस्त्रें बदलुन अपुलीं वडिलार्जित सख्य दाखवूं यांतें ॥ ९० ॥
अश्वावरुन उतरले, दोघे हातांत हात घालोनी ।
वचनें बांधुन घेती दोघे कवचांस घेति बदलोनी ॥ ९१ ॥
जोव्हें अक्कल हरिली ग्लाकस तव मन भुले अतां कच्चें ।
दायोमीदा देसी सुन्दर निज कवच तें सुवर्णाचें ॥ ९२ ॥
पितळेचें स्वीकारिशी मोलाचें मान तर बघें काई ? ।
* शत धेनू एकाचें दुसऱ्याचें फार तर नऊ गाई ॥ ९३ ॥
इतक्यांत थोर हेक्तर जननायक पातला पुरद्वारीं ।
जीर्ण तरूच्यां खालीं त्रायांतिल भेटल्या तया नारी ॥ ९४ ॥
कान्ता पुसति पतींचें, दुहिता पुसती स्वकीय जनकांचें ।
माता निज पुत्रांचें भगिनी पुसती सुवृत्त भावांचें ॥ ९५ ॥
मित्रांचें मित्र पुसति. हेक्तर पारि बोलला तयांस " चला ।
भावें ईश नमावा संकट जांचेल आजचें सकलां " ॥ ९६ ॥
प्रायम मंदिर सुंदर ज्यास कमानी सुरेख गुळगुळित ।
पंचाशत त्यांत पहा संगमरवरी महाल रंगीत ॥ ९७ ॥
निद्रासुख घेति तिथें प्रायमसुत सहित धर्मपत्नींच्या ।
द्वादश शिवाय होत्या विस्तृत शाला अभिन्न जातीच्या ॥ ९८ ॥
सत्यव्रत भार्यांसह निद्रा ये जेथ नृपति जामातां ।

---

*याकाळीं नाणें चालू नसल्यामुळें गाईंच्या प्रमाणावरूनच वस्तूंची किंमत ठरत असे.

इकडुन हेक्तर जातां पूज्य तिथें भेटली तया माता ॥ ९९ ॥
लेओदिसि दुहिता प्रिय अनवद्याङ्गी, तिला बघायाला ।
होती ही जात अतां धरुनी कर बोलली स्वतनयाला ॥ १०० ॥
“ बाळा ! अतां अलासी कां रे बा ! सोडुनी भलें समर ।
निंद्य तुला हे छळती ग्रीकांचे पुत्र वेढुनी नगर ॥ १०१ ॥
वाटे तुला नमावें जोव्हातें हस्त उचलुनी भावें ।
दुर्गांत पातलासी अणितें तुज मद्य अल्प थांबावें ॥ १०२ ॥
देवांतें इतरांतें, जोव्हातें अर्पुनी स्वतां प्यावें ।
व्हावें विगतश्रम तूं, श्रान्ता बल मद्य देत तुज ठावें ॥ १०३ ॥
थकलास बान्धवांतें करितां साहाय्य कथितसें ह्मणुनी ” ।
प्रत्युत्तर हेक्तर दे “ प्रियमाते ! मद्य मज न दे अणुनी ॥ १०४ ॥
होतील शिथिल गात्रें, जाइल बल विक्रमास विसरून ।
अप्रक्षालित हस्तें जोव्हातें मद्य काय अर्पून ! ॥ १०५ ॥
शोणितरुधिरें दूषित, जोव्हा नवसूं कसा जलदवाहा ! ।
जमविं मिनर्वामंदिरिं थोर पुरंध्री, दिसे बरा पथ हा ॥ १०६ ॥
घ्यावें बलिदानातें, सर्वोत्तम वसन रुंद गे घरचें ।
तुजला जें आवडतें, देवीपदिं होय तें वहायाचें ॥ १०७ ॥
तिजला नवस करावा ‘ नगरावरतीं तुझी कृपा व्हावी ।
त्रोजननारी, त्यांचीं बाळें तूं सर्व आज राखावीं ॥ १०८ ॥
गे ! लाव इलियमांतुन दूर पिटाळून तैदिअसतनया ।
योद्धा क्रूर भयंकर नाहीं ज्या अल्पही दया माया ॥ १०९ ॥

वर्षांच्या वर्षांच्या द्वादश गोज्या अणीन बलिदाना ' ।
जाइं मिनर्वालयिं तूं भेटें मी पारिसास तंव विमना ॥ ११० ॥
ऐकुन घेइल तर मी गोष्ट तया कथुन पाहिन हिताची ।
धरणी मध्यें भंगुन देवो त्या ठाव उदरिं आतांची ! ॥ १११ ॥
सप्रज तनयांसह हा प्रायम भूपति उदार अनपायी ।
जोव्हानें घातियला आज पहा संकटांत या पायीं ॥ ११२ ॥
हेदीसांत उतरतां नयनीं पाहीन जेधवां यातें ।
बोलेन तेधवां ' मम तीव्रव्यथ दुःख सर्व वायां तें' " ॥ ११४ ॥
परिसुन वच हें धाडी मंदिरिं जाउन पुरास दासीतें ।
करुनी त्वरा पुरांतिल त्यांनीं मग जमविलें पुरंध्रींतें ॥ ११४ ॥
रम्य सुगंधित मंदिरिं होतीं तीं ठेविलीं बहू वसनें ।
सिदनांतिल नारींनीं विणिलीं जीं चित्रित प्रयासानें ॥ ११९ ॥
हेलन सत्कुलजा ती आणियली पारिसें जया कालीं ।
लंघुन विस्तृत सागर आणुन जीं जपुन येथ सांभाळी ॥ ११६ ॥
मग हेक्युबा शिरोनी मंदिरिं या वसन तें पसंत करी ।
रंगें विचित्र सुन्दर, रुंद, मिनर्वेस होय जें सभरी ॥ ११७ ॥
भूवर घडी तयाची चमके जणुं तारका नभामाजी ।
घेउन वसन निघाली पूज्य पुरंध्री सर्वे निघति राजी ॥ ११८ ॥
सर्व मिनर्वामंदिरिं दुर्गांतरिं घोळका निघुन गेला ।
उघडी द्वार थिआनो मान्य पुजारीण दक्ष हांकेला ॥ ११९ ॥
ही अंतिनारजाया सिसिअसजा गौरशा कपोलांची ।

होत मिनर्वेला मग ऊर्ध्वकरांनीं विनंति सकलांची ॥ १२० ॥
गौरकपोलथिआनो अर्पि मिनर्वापदीं सुवसन करें ।
जोव्हसुतेला नवसुन तीस विनंती करीत भक्तिभरें ॥ १२१ ॥
" देवि मिनर्वे ! इतुकें अमुचें वच नगररक्षके ! परिसें ।
हे देवसंभवे ! करिं दायोमीदा अपेश येइ असें ॥ १२२ ॥
मोड तयाचा भाला पाडीं साष्टाङ्ग त्या पुरद्वारीं ।
राखीं दया करोनी त्रोजन पोरें पुरी अणी नारी ॥ १२३ ॥
आणून एकहायन बारा गोज्या करूं बली तुजला " ।
जोव्हसुतेला केला त्यांनीं हा नवस तिज न तो रुचला ॥ १२४ ॥
त्रायस्थ कुशल शिल्पी जमवुनि जें बांधिलें तयें भवन ।
भेटेल त्यांत पारिस ह्मणुनी हेक्तर निघे त्वरा करुन ॥ १२५ ॥
विस्तृत सभांगणासह शय्यालय उंच वासगृह छान ।
या पारिसास लाधे वसत जिथें तात बन्धु बलवान ॥ १२६ ॥
तेथें हेक्तर शिरला करिं अकरा हात लांब घे भाला ।
पित्तलमय अग्र तसें हेमाचें वलय शोभतें ज्याला ॥ १२७ ॥
भ्राता दिसला खोलित जो घे करिं ढाल चढवुनी कवच ।
शीर्षस्त्राणा चढवी सजवी तें वक्र धनु लहान न च ॥ १२८ ॥
दासी जनांत बसुनी हेलन कार्यें तयांस समजविते ।
हेक्तर बन्धुस बघतां त्यातें ताडीत करुन दुर्वच तें ॥ १२९ ॥
"उन्मत्ता बसलासी राग धरोनी मनांत उचित न हें ।
नगरतटाच्या सन्निध लढतां मरतात कीं पहा जन हे ॥ १३० ॥

हें रण पेटुन राहे नगराभंवतीं अरे तुझ्या पायीं ।
कार्य रणींचें खोटें पळतां तुज आवडेल अनुयायी ? ॥ १३१ ॥
तूं निंदशील तत्क्षणिं चुकतानां पाहशील जर इतरा ॥
ऊठ अतां हो जागा वैरानिल भस्म करि न जों नगरा" ॥ १३२ ॥
पारिस बोले "हेक्तर मजला तूं योग्य बोललास अज ।
अणखी तें हि सकारण, सांगतसें किमपि मी तुला सहज ॥ १३३ ॥
तें सावधान चित्तें परिसें, जो बैसलों महालांत ।
तो त्रोजनांवरी मी रुसुनी बसलों मुळीं न रागांत ॥ १३४ ॥
मन मोकळें करोनी दुःखें मज वाटलें रडावें कीं ।
मृदुवचनें कांतेनें परि मज उपदेशिलें लढावें कीं ॥१३५ ॥
बरवें दिसे मला तें. विजयश्री विचल आश्रया बदली ।
ये आतां थांब जरा, सायुध कवचें न जों तनू सजली ॥ १३६ ॥
अथवा पुढतीं तूं जा, मागोनी लागलाच येईन ।
वाटे मला असें कीं तुज मार्गी त्वरित सहज गांठीन " ॥ १३७ ॥
हेक्तर उत्तर नच दे. हेलन त्या वदत धरुन बहु विनय ।
"भावोजी तुमची मी निर्लज्जा मन्दभाग्य भाउजय ॥ १३८ ॥
कां दुष्प्रभंजनानें साधोनी अचुक मम जननसमय ।
नेलें नच उडवोनी गिरिवरि अथ सागरांत शब्दमय ! ॥ १३९ ॥
नेलें असतें मज कीं वीचीनीं दूर आंत वाहून ।
कृत्यें असलीं कैशीं येतीं मागून काय हो घडुन ! ॥ १४० ॥
व्हावे अनर्थ ऐसे होता संकेत ईश्वरी जर हा ।

होता हवा मला पति शौर्यानें श्रेष्ठ अधिक खचित अहा! ॥ १४१ ॥
मानापमान कळुनी समजे अपवाद जो सदा जनिंचे ।
नव्हतें! नसेल!! नाहीं!!! परि यातें स्थैर्य खास बुद्धीचें ॥१४२॥
याचीं मिळतिल यातें सुफलें समयीं असें मला दिसतें ।
राहो तें भावोजी ध्यावें येऊन आंत आसन तें ॥ १४३ ॥
चिंता व्याकुल शिणलां, निर्लज्जा त्यास एक कारण मी ।
तें पाप पारिसाचें अन्य जरी तें निमित्त नाहिं कमी ॥ १४४ ॥
नशिबीं याच्या जोव्हें घातियलें दुःख जें अहा जबरें ।
पुढल्या काळीं लोकां गाया होईल विषय, नाहिं बरें ?" ॥ १४५ ॥
हेक्तर उत्तर दे तिज " हेलन हे मज अतां नको बसवूं ।
तूं चारुशील, परि अज शकशिल मन्मानसा कसें वळवूं?॥ १४६ ॥
मद्‌भावीं खिन्न अशा त्रायस्थां पूर्ण मदत द्यायास ।
झालें प्रेरित मन्मन, देईं भर पारिसास यायास ॥ १४७ ॥
त्यानें त्वरा करावी जों मी नगरांत तोंचि गांठाया ।
पाहिन परिचारक तों भार्या, तान्हें लहान निज ठाया ॥ १४८ ॥
पुनरपि घरास येउनि यांलागीं काय नियम भेटेन ।
ग्रीकां करवीं मातें जित करविल ईश तरि कळे तें न " ॥ १४९ ॥
गेला बोलुन ऐसें हेक्तर अपुल्या सुरम्य भवनाला ।
सितकर ॲन्द्रोमाकी शोभवि तेथें न तों महालाला ॥ १५०
शोकाकुल रुदन करी, जाउनियां बैसली मनोऱ्यांत
दासी जवळी राहे घेउनियां बालका निज करांत ॥ १५१ ॥

किल्मिषरहिता भार्या तेथ दिसेना ह्मणून दासींस ।
उंबरठ्यावरतिं उभा " बोले मानाल का विनंतीस? ॥ १९२ ॥
सांगा अँद्रोमाकी गेलि कुठें राजभवन सोडून? ।
नणदांच्या जावांच्या वासगृहां काय जात इकडून ? ॥ १९३ ॥
त्रायांतिल वा जेथें सर्व पुरंध्री अतां मिनर्वेची ।
शान्ति स्तवुनी करिती जाय तिथें वृत्त हें अथ खरेंची ? " ॥ १९४ ॥
दासीमुख्या वदली " हेक्तर तूं वृत्त जर खरें पुसशी ।
नणदांच्या जावांच्या वासगृहीं ही मिळेल तुजासि कशी ? ॥ १९५ ॥
त्रायांतिल वा जेथें सर्व पुरंध्री अतां मिनर्वेची ।
शान्ति स्तवुनी करिती तेथें ही तुज दिसेल वद कैंची ? ॥ १९६ ॥
त्रोजन शिणले भारी ग्रीकांची शक्ति होय थोर अजी ।
हें वृत्त परिसतांची उंच मनोऱ्यांत बसुन होती जी ॥ १९७ ॥
उठुनी ती वेगानें घेत असे धांव नगरभिंतिकडे ।
भ्रम झाला जणुं मतिला ! दासी फिरवी मुलास ही तिकडे ॥ १९८ ॥
परिसुनि वच हें हेक्तर पडला बाहेर राजभवनाच्या ।
धांवत राजपथांतुन गेला द्वारांत नीट नगराच्या ॥ १९९ ॥
होता याच पथानें समरीं जाणार जों तसा पुढतीं ।
तों तेथ एइशनजा अॅन्द्रोमाकी प्रिया दिसे सुदती ॥ १६० ॥
सिलिशिअनांचा होता तात तिचा भूप वन्य देशांत ।
तद्दुहिता मेळविली हेक्तरभूपें सुशील जी शान्त ॥ १६१ ॥
ती ही आज दिसे या जवळी होती तदा तिची दासी ।

नाजुक बालक केवळ तान्हें त्यातें धरून पोटासीं ॥ १६२ ॥
चमके नक्षत्रासम हेक्तरसुत हा सुरूप एकुलता ।
स्कामांद्रिअस तयाचें होतें अभिधान आवडे ताता ॥ १६३ ॥
परि अन्य लोक सारे ह्मणति तयालागिं आस्तिआनक्ष ।
हेक्तर इलियमरक्षक लावी बालाकडे हंसुन लक्ष ॥ १६४ ॥
ॲन्द्रोमाकी त्याच्या सन्निध होऊन करितसे रुदन ।
आणि तत्करावलंबन करुनी बोले तयास हें वचन ॥ १६५ ॥
"दिससी बहू विलक्षण ! *शौर्य तुझें हें करील तव नाश ! ।
माझ्या आणि बाळाच्या प्रेमाचा तोडिशी कसा पाश ॥ १६६ ॥
तूझा वध करतिल कीं धांवुन हे ग्रीक पडुन तुजवरतीं ।
अन्तरशील अह्मांला यास नसे क्षणभरीहि फुरसत ती ॥ १६७ ॥
तव विरहाहून बरें धरणी 'आ' करुन जर मला गिळिल ।
अपला आपण घेशी करुनी तूं नाश बघ दशा पुढिल ॥ १६८ ॥
होणार सौख्य कुठुनी उरतां जगतांत दुःख केवळ तें ।

---

*शूराय न प्रदातव्या कन्या खलु विपाश्चिता
शूरभार्यां हतां पश्य सद्यो मां विधवां कृताम्

अर्थः– शहाण्या बापानें आपली कन्या कधींही शूर पुरुषास अर्पण करू नये. केल्यास काय होतें तें माझेकडे पहा ह्मणजे समजेल. मी शूराची भार्या ! ह्मणूनच मला वैधव्य यावयास एक क्षणही लागला नाहीं. हेक्तराचे मरणापूर्वीं जें त्याची भार्या ह्मणाली त्यांतील तत्व वालीचे मरणानंतर त्याची भार्या जी तारा तिनें वरील श्लोकांत जास्त स्पष्ट करून सांगितलें आहे.

मजसिं न तात न जननी, कोणाचें ही मला नसे बळ तें ॥१७९॥
वधिला अकिलीसानें सिलिशिअनांचा नृपाल मम तात ।
द्वारवती तन्नगरी केली उध्वस्त फिरवुनी हात ॥ १७० ॥
वधिलें नृपास, परि नच*तच्छस्त्रां भिउनि हात लावियला ।
शस्त्रांसहित नृपाला अग्नि दिला; योग्य मान ठेवियला ॥ १७१ ॥
बांधविली वर कबरी , गिरिवरच्या अप्सरांस तें कळलें ।
भोंवतिं बाग बनविला जोव्हसुतांचें खरेंच कृत्य भलें ॥ १७२ ॥
मम सात बन्धु होते ! गेले प्लूतोपुरास एक दिनीं ।
सकलां अकिलीसानें वधिलें मग काय संपदा असुनी ॥ १७३ ॥
बहु वक्र खूर ज्यांचे वृषभ असे शुभ्र हिमसमान अजा ।
चारित असतां रानीं पडले जीवांत वीर सर्व वजा ॥ १७४ ॥
हैपोप्लाकसदेशीं राज्ञीपद तें मदीय मातेला ।
बंदींत तिज हि घालुन विजयी नृप परत निघुनियां गेला ॥ १७५ ॥
बंधविमोचन केलें घेउनियां खण्डणी न जिस गणना ।

---

* मरणान्तानि वैराणि निवृत्तं नः प्रयोजनम्

क्रियतामस्य संस्कारो ममाप्येष यथा तव

अर्थः—शत्रूच्या जीविताची समाप्ति केली कीं त्याजविषयींच्या वैराची समाप्ति झाली ह्मणून समजा. आमचें मुख्य तें कार्य झालें. आतां याची संस्कारयुक्त प्रेतक्रिया करा. याचें आतां तुझ्याशीं व माझ्याशीं नातें एकच. श्रीरामानें रावणवधानंतर बिभीषणास उद्देशून केलेल्या या भाषणांतील तत्व व वरील आर्येंतील तत्त्व एकच आहे, व तें फार उदात्त आहे.

मञ्जनकमंदिरीं तिज मारी परि चापकुशल दायाना ॥ १७६ ॥
*वाटे पतिराया ! तुज कुशली नेत्रें असा पुढें बघतां ।
प्रिय माता, पूज्य पिता, बन्धू ते लाडके सजीव अतां ॥ १७७ ॥
मजवर करुणा करुनी येथ मनोऱ्यांत शांतचित्त रहा ।
तव मूल पोरकें अणि भार्या विधवा उगा न उरविं अहा ! ॥१७८॥
पुण्य तरू तो जेथें मारा नगरावरी बरा होतो ।
सुलभ चढाया पुरतट तेथें सैनिक समूर राहो तो ॥ १७९ ॥
ग्रीकांनीं येथूनचि केले घाले त्रिवार शूरांनीं ।
एत्रिअसाच्या अणि त्या तैदिअसाच्या कठोर पोरांनीं ॥ १८० ॥
आजक्षद्वय होते, लढतां जवळी इदामिनिअसाचे ।
दावी भविष्यवादी स्थल हें न कळे मनांत ये यांचे " ॥ १८१ ॥
प्रत्युत्तर हेक्तर दे " सर्वांची काळजी प्रिये मातें ।
राहूं दूर कसा मीं भ्याडापरि आज त्यजुन समरातें ? ॥ १८२ ॥
ह्मणतिल काय त्रोजन ? काय पुरंध्री ? अशी मनीं शरम ।
पळणें शिरे मनीं हि न आहें मी त्रोजनाग्रणी परम ॥ १८३ ॥

---

* श्रीराम वनवासास निघाले असतां बरोबर जाण्याचा हट्ट धरून याच अर्थाचें भाषण सीता देवीनें केलें आहे.

मितं ददाति हि पिता मितं भ्राता मितं सुतः
अमितस्य तु दातारं भर्तारं चानुपूजयेत्   रामायण.

अर्थः—पित्यापासून होणारें, भ्रात्यापासून होणारें, फार काय प्रत्यक्ष पुत्रापासून होणारें जें सुख तें मोजून मिळणारें मर्यादित होय. भर्त्यापासून होणारें सुख मात्र अमर्याद होय. ह्मणून तो सर्वथैव पूज्य आहे.   रामायण.

संपादुन शौर्यातें वँडिलांचें नांव राखिलें समरीं ।
कीर्ति बहू मेळविली, उमजुन आहें मनांत नीट परी ॥ १८४ ॥
कीं दिन येइल, जेव्हां प्रायम सप्रज तसेंच इलियम तें ।
होईल नष्ट; मजला होतिल बहु कष्ट उघड हें गमतें ॥ १८५ ॥
ते त्रोजनार्थ नच गे, नच गे ते खचित हेक्युबे करितां ।
ते प्रायमार्थ नच गे, बन्धूंकरितां हि ते न परिस अतां ॥ १८६ ॥
असुनी अनेक उत्तम, पडतिल ते धुळिंत शत्रुच्या खालीं ।
गत कैशी होइल तव ! हरतिल हे ग्रीक, तुज न कुणि वाली ॥१८७॥
स्वातंत्र्यातें मुकशिल, अशरण रडशील ढळढळां कांते ! ।
अर्गासपुरा लागीं नेतिल तुज काय वदुं ! अतां कां तें ! ॥१८८॥
मेसिइसस्त्रोतोजल अथवा समजें हिपेरिएमधलें ।
तुज करवीं आणवतिल; कोणी प्रमदा न मन जिचें द्रवलें ॥१८९॥
लाविल वस्त्र विणाया. विषम दशा ही छळील तुजला गे ।
कुणि तरि वदेल ऐसें त्वन्नयनीं बघुनि आविल जला गे ॥ १९० ॥
' त्रोजन अश्वनिपुण ते इलियम राखावयास जे लढले ।
त्यांतिल वीरोत्तम जो हेक्तर त्याचें कलत्र येथ अलें ! ' ॥ १९१ ॥
त्या समयीं होतिल मग अधिकाधिक वेदना नव्या तुज गे ।
बन्धविमोचन करण्या, पति नाहीं जवळ ! तो उगीच जगे ! ॥१९२॥
हरिलें जों न स्त्रीतें, कानीं जों ऐकिले न विपलाप ।
+तों मज विपुल धरित्री गडप करो भंगुनी अपोआप " ! ॥१९३॥

+दुःखाच्या वेदना असह्य झाल्या असतां धरिणीजवळ तिच्या पोटांत ठाव मागण्याची कल्पना मराठी भाषेंतही रूढ आहे.

अंध ह्मणेल "मला घे पोटीं देऊनि विवर महिमाते ! " शल्यपर्व.

ऐसें बोलुन हेक्तर पसरी निज बालकाकडे कर ते ।
परि बालक किंचाळुन चिकटुन दाईस दडत लवकर तें ॥ १९४ ॥
पित्तलमय शिरकवचीं हलतांनां अश्वकेश पाहून ।
बाळ न ताता ओळखि, अधिक भयंकर न पुरुष याहून ॥ १९५ ॥
हंसुं आलें पितयाला, हंसुं आलें लागलेंच जननीला ।
हेक्तर शिरकवचातें काढी जें शोभवीत धरणीला ॥ १९६ ॥
चुंबुनि बाळालागीं घेउनियां निजकरांत मग डुलवी ।
जोव्हपुरःसर देवां प्रार्थितसे " हौस पूर्ण ही व्हावी ॥ १९७ ॥
त्रोजन विख्यात जसा मी बहु बलवान इलियमत्राता ।
होवो मत्तनय तसा कोणि वदो प्राप्तजय घरा जातां ॥ १९८ ॥
कीं 'बापसे सवाई बेटा हरि शत्रुचे असू वसु ही '।
मातेला याहुनियां हर्षावह वृत्त अधिक तें नाहीं " ॥ १९९ ॥
प्रिय पत्नीच्या हस्तीं ठेवियलें बालका तयें जपुन ।
पोटाशीं ती त्या घे झाले जरि नयन साश्रु तरि हंसुन ॥ २०० ॥
कळवळलें मन पतिचें पत्नीच्या पाहुनी अशा स्थितिला ।
तत्तनुला प्रेमानें कुरुवाळोनी वदे फिरून तिला ! ॥ २०१ ॥
" मत्कारणें न करणें चिंता अगदींच लाडके कसली ।
मृत्युच्छाया पाडिल मजवर कुणिही न वेळ जर न अली ॥ २०२ ॥
परि वाटे कीं नाहीं एक हि जो दैव चुकवुनी राहे ।
*भ्याडा वा शूरा वा जन्मुनियां दैव काय चुकताहे ? ॥ २०३ ॥

* जातस्य हि ध्रुवो मृत्युः भगवद्गीता.

परि तूं घरास आतां जावोनी काम काज आज पहा ।
ती सूय वाट बघते. कार्यीं दासींस लाव आणि रहा ॥ २०४ ॥
इलियमवासि नरांतें, मजसि विशेषें पुरेल हें समर "।
गेला नंतर हेक्तर शिरकवचा घेउनी करीं जबर ॥ २०५ ॥
प्रिय पत्नी जाय गृहा, वरचेवर वळुन मागुती पाही ।
नयनांस अश्रुधारा लागुनियां राहिल्या, न खळ कांहीं ॥ २०६ ॥
हेक्तरमंदिर सुन्दर तेथ अली आंत, भेटल्या दासी ।
पाहुनिया स्थिति तीची सर्वजणी त्या करीत खेदासीं ॥ २०७ ॥
रडतात मंदिरीं त्या यद्यपि जीवन्त भूप हेक्तर तो ।
प्रबलग्रीककरागत कैसा हा समरसंकटा तरतो ! ॥ २०८ ॥
इकडे पारिस अपुल्या उंच महालीं न काढितो वेळा ।
पित्तलशस्त्रविभूषित घेउनियां धांव पुरिंतुनी गेला ॥ २०९ ॥
बहु काल बद्ध जणुं हा हय हयशालेंत पुष्ट खावोनी ।
तोडून बंद निघतां नगराबाहेर जात नाचोनी ॥ २१० ॥
सानंद संवकलेला गर्वित गंगाजलांत न्हायाला ।
शोभा शिर उन्नत दे स्कन्धीं आयाळ विखरतां ज्याला ॥ २११ ॥
रूपाचा गर्व तया, नेती पळवोनि सहज जानु तिथें ।
चरतात अश्वयुवती सुंदर कुरणांत तृप्त नित्य जिथें ॥ २१२ ॥
प्रायमसुत पारिस हा शस्त्रांहीं चमकतो जसा सविता ।
पर्गामसदुर्गांतुनि खालीं उतरे विलंब नच करतां ॥ २१३ ॥
पत्नीसह संभाषण हेक्तर होता करीत ज्या ठायीं ।

तेथुन तो निघतो तों पारिस त्या गांठि येउनी पायीं ॥ २१४ ॥
सुरसुन्दर पारिस त्या बोले " बन्धो ! उगाच थांबविला ।
केली त्वरा परी मज वाटे मीं नियत काल घालविला " ॥ २१५ ॥
हेक्तर बोले हलवुन शिरपेंचा " तूं खरा विलक्षण रे ।
न्यायी तव शौर्यातें निंदिल ऐसा जगांत एक न रे ॥ २१६ ॥
होसी शूर खरा तूं बुद्ध्या जातोस वाउग्या वाटे ।
समरिं न बसतें त्वन्मन याचा मज खेद हृदयिं बहु वाटे ॥ २१७ ॥
त्रोजन हे काय तुला ह्मणतिल जे सर्व तुजमुळें शिणले ।
राहो तें अधिं जाऊं पाहूं मागून सर्व जर जुळलें ॥ २१८ ॥
ग्रीकां त्रायांतुन या जोव्ह जरी घालविल कृपा करुन ।
अर्पू सुरा सुरांला पात्रें निज मांदिरांत भरभरुन " ॥ २१९ ॥

सर्ग ७ वा.

हेक्तर व आजक्ष यांचें द्वंद्व.

सारांश—जो सर्व **ग्रीक**सैन्यांत शौर्यगुणांत श्रेष्ठ असेल त्यानें माझ्याशीं द्वंद्वयुद्ध करण्यास यावें असें हेक्तर आव्हान करतो. नऊजण तयार होतात. त्यांत सोडत काढून **आ**जक्षानें द्वंद्व खेळण्यास जावें असें ठरतें. रात्र पडेतों दोघे लढतात व एकमेकांस सुन्दर पारितोषिकें अर्पण करून द्वंद्व शेवटास नेतात. समर भूमीवर मृत झालेल्यांस मूठमाती देण्याकरतां उभय पक्षीं कांहीं वेळ युद्ध थांबवून द्यावें असें ठरतें. **ग्रीक** आपल्या छावणींत पुष्कळ दागडुजी करतात.

कालमानः—या सर्गाबरोबर तेवीसावा दिवस संपतो. दुसऱ्या दिवशीं अल्प कालिक तह होतो. तिसऱ्या दिवशीं मृतांस मूठमाती देतात. चवथ्या दिवशीं **ग्रीक** नौदेशीं कांहीं वेळ दागडुजी करण्यांत घालवतात.

स्थलः—समरभूमि.

हेक्तर निघे सवेग द्वारांतुन बन्धु त्या सवें धांवे ।
दोघे उत्सुक लढण्या वाटे दोघांस शत्रुस वधावें ॥ १ ॥
घेउन गुळगुळित वल्हीं नाविक उदधीस वलवितां दमती ।
अंगें विगलित होतां आशा त्या एक वायुची धरती ॥ २ ॥
ईशाज्ञेनें सुटुनी वारा अनुकूल हर्ष दे सकलां ।
दर्शन या दोघांचें अवचित दे हर्ष तेविं समरिं दला ॥ ३ ॥
एरिइथोअसजनकें मातेनें ज्या फिलोमेदुसेनें ।
आर्नीपुरींत दिधला मेनिस्थिअसास जन्म आशेनें ॥ ४ ॥
त्यास वधी पारिस तो. इइओनिअसास वधित हेक्तर तो ।

शिरकवचा खालिं बसे मानेवर परशु मग कसा तरतो ! ॥ ५ ॥
लिसिअन वीर ग्लाकस हिप्पोलोकसज शूर घनसमरीं ।
त्या आयूफिनोअसातें भाल्यानें देक्सिआसजा मारी ॥ ६ ॥
अश्वारोहण करतां स्कंधावर वार लागला घोर ।
पडला अश्वावरुनी गात्रें मग शिथिल जाहलीं थोर ॥ ७ ॥
ग्रीकांचा नाश असा कदनीं बहु दिसुन ये मिनर्वेला ।
आलिम्पसावरोनी उतरे इलियमिं न लावितां वेला ॥ ८ ॥
पर्गामसांतुनी तिज बघुन अपालो अला तिच्या जवळी ।
त्रायस्थपक्षपाती सुर हा तीसह बसून वृक्षतळीं ॥ ९ ॥
बोले श्रेष्ठ अपालो जोव्हज तीतें " अगे पुन्हां कां गे ।
आलिंपस सोडियलें ? मारितसे कोण तुजसिं हांका गे ? ॥ १० ॥
हर्ष तुला बहु होतो ग्रीकांनीं त्रोजनांस रणिं वधतां ।
मद्वच ऐक हिताचें थांबिव तूं कलह आजच्या पुरता ॥ ११ ॥
होवो मागुन कांहीं; लढतिल हे त्रायनाश होइल तों ।
देवींनीं सकलांनीं त्याचा मनिं नाश अवधिला दिसतो " ॥ १२ ॥
उत्तर देत मिनर्वा " होउ तसें जर खरेंच मज पुसशी ।
मीही त्या उद्देशें येथ अलें; घडवशील गोष्ट कशी ? " ॥ १३ ॥
जोव्हज भूप अपालो बोले " अजि हेक्तरास चिथवावें ।
आव्हान करिल शत्रुस ' शौर्य तरी द्वंद्वयुद्ध खेळावें ' ॥ १४ ॥
चिढतां, ग्रीकांतुनियां एक तरी मग सरेल कीं पुढतीं " ।
मानवलें देवीला. दोघेही दूर तेथुनी निघती ॥ १५ ॥

सुरद्वयानें केला ऐसा चित्तांत जो विचार भला ।
अंतर्ज्ञानें तो अजि हेलिनसा प्रायमात्मजा कळला ॥ १६ ॥
भेटोनी लवलाहीं जवळुन वच बोलला हेक्तरा त्या ।
" जोव्हसमानप्रज्ञा ! प्रायमजा ! हेक्तरा ! मम भ्रात्या ! ॥ १७ ॥
त्वां एवढें करावें; ग्रीकांस त्रोजनांस बसवावें ।
ग्रीकोत्तमास देउन आह्वान द्वंद्वयुद्ध खेळावें ॥ १८ ॥
आहे मरणसमय तव दूरी, अद्यापि दैवनिर्दिष्ट ।
दैवीं ठेव भरंवसा. अमरांचा हेतु मज कळे इष्ट " ॥ १९ ॥
परिसुनि बोधवचन हें पावे हृदयांत हर्ष हेक्तर तो ।
रणमध्यास्थित होउनि भाल्यानें त्रोजनांस आंवरतो ॥ २० ॥
बसले ते खालीं तों अगमेम्नन बसवितो झणीं ग्रीकां ।
तेथ मिनर्वेसह मग बसत अपालो विशाल वृक्षीं कां ? ॥ २१ ॥
जोव्हास प्रिय तरु हा जगतीं ईजिसधरास तातास ।
त्यावरतीं बसलीं हीं धरुनीयां रुचिर गृध्ररूपांस ॥ २२ ॥
दलभार उभयतांचा बसला खेंचून अंग अंगाला ।
ढालींनीं शूलांनीं शिरकवचांनीं सुकंटकित दिसला ॥ २३ ॥
तो पवन पश्चिमेचा वाहे जों मंद मंद जलधिवरी ।
रूप भयानक येतें गाढ जला तों उठोनियां लहरी ॥ २४ ॥
रूपें तशीं दलांचीं झालीं. मग वदत शब्द हेक्तर तो ।
" ग्रीक अहो त्रोजन हो ! सांगे मन तें तुह्मांस मी वदतों ॥२५॥
सॅतर्नात्मज जोव्हा दूरस्था संधि नावडे गमतें ।

तीव्रोपायें कलहा लांबवितो किति कुणा न तें कळतें ॥ २६ ॥
घ्या त्राय एक अथवा गांठा नौका पळावया दूर ।
योद्धे तुह्मात असतिल एकाहुन एक अधिक ते शूर ॥ २७ ॥
सांगेल मन जयाचें त्यानें द्वंद्वास सिद्ध अजि व्हावें ।
येवोनी समरांगणिं हेक्तरशौर्यास पाहुनी घ्यावें ॥ २८ ॥
तर मी हा पण करतों ठेवोनी साक्ष आज जोव्हातें ।
जर करतां भाल्यानें मजला तो वधिल आज निज हातें ॥ २९ ॥
न्यावें चिलखत काढुन नौकांमाजी जपून ठेवाया ।
परि पाठवा घराला काळजिनें मम तशीच मृत काया ॥ ३० ॥
नरनारी त्रायांतिल, मिळतिल सारीं रचावयास चिता ।
मत्तनु विगतासु वरी ठेवुन होतील धन्य पेटवितां ॥ ३१ ॥
परि करण्या वध त्याचा मजसीं जर देव यश अपालो दे ।
धाडीन इलियमाला हरुनी तत्कवच साहजिक मोदें ॥ ३२ ॥
आणि अपालोमंदिरिं देइन धाडून उंच टांगाया ।
परि याचें शव देइन नौकांतुनि इष्ट तेथ तें न्याया ॥ ३३ ॥
उत्तरकार्य तयाचें करितिल ते ग्रीक बांधतिल कबर ।
नौका प्रवास करतां पुढले जन टाकतील वर नजर ॥ ३४ ॥
ह्मणतिल कीं ‘ वीराची कबर पहा! होउनी असे गेला ।
त्या थोर हेक्तराचा धीरोद्धत वार खावुनी मेला’ ॥ ३५ ॥
पृथुयश उरेल माझें.” सेविति जन मौन परिसुनी वचन ।
लाज तयांला झाली स्वीकारावें कसें न आह्वान ॥ ३६ ॥

स्वीकाराया वाटे भय त्यां. मग मेनिलास उठुन वदे ।
अतिनिर्भर्त्सनपूर्वक हेक्तरवच ताप तन्मना बहु दे ॥ ३७ ॥
करितां विकत्थना कां? सर्व तुह्मीं बायका, न पुरुष मुळीं ।
झगडेल हेक्तराशीं ऐसा नच वीर कोणत्याहि कुळीं! ॥ ३८ ॥
तुह्मां धिक्कार असो! गोष्ट खरी शोच्य शोचनीयांत! ।
पृथ्वी जल मिळुनी जे झालां, मिसळा फिरोन जा त्यांत ॥ ३९ ॥
बसलांत जागजागीं काय नसे धैर्य मूढ हृदयांत? ।
अयशस्कर कृति तुमची जातों मी शस्त्र घेवुनि करांत ॥ ४० ॥
जय अपजय येणें तें अमरांच्या सर्व होय हातांत । "
बोलुन हें, चढवी मग शस्त्रास्त्रें थोर थोर अंगांत ॥ ४१ ॥
हें काय मेनिलासा! हेक्तर बलवान तो तुझ्याहुन रे ।
झाला असता तूझा तद्हस्तें अन्त संशयाविण रे ॥ ४२ ॥
ग्रीकनृपालांनीं तुज उठुनीयां आवरोनियां धरिलें ।
आणि एत्रिअसजभूपें फार बरें कीं विशेष बोधियलें ॥ ४३ ॥
धरुन करा अगमेम्नन बोले " हे मेनिलास तूं वेडा ।
हें व्यर्थ तव खुळेपण! शान्ति वरावी. करिं न अज बखेडा ॥४४॥
अपराध तुझा यांनीं केला तरि बघ मनीं विचारून ।
प्रायमसुत हेक्तर हा अधिक तुझ्याहून रे बलेंकरुन ॥ ४५ ॥
कांहीं कलह करावा इतक्या करतां लढें न यासह रे ।
याचें भय जन धरिती. अकिलीसा यास बघुन धाक भरे ॥ ४६ ॥
अकिलीस तुजहुनी तो श्रेष्ठ खरा, हीं कथा परी त्याची ।

सहचर सैन्यांमाजी जावोनी सोय कर बसायाची ॥ ४७ ॥
कोणी दुजा तयावर देऊं लावून वीर लवकर तो ।
जो युद्धलुब्ध समरीं कंटाळा अल्पही न कधिं करितो ॥ ४८ ॥
निःशंक फार असला तरि रणिंचा त्वेष चुकवुनी परम ।
जातां घरीं सुरक्षित मोडुन गुडघे बसेल खात दम " ॥ ४९ ॥
उपदेश योग्य करुनी बन्धूचें वळवि वीर मन जेव्हां ।
तत्परिचारक मोदें त्याच्या शस्त्रांस उतरती तेव्हा ॥ ५० ॥
नंतर उठुनी बोले " ग्रीकांवर समय घोर गुदरतसे ! ।
सुरवर हो ! हें वीरा पेलिअसा आज पाहवेल कसें ? ॥ ५१ ॥
मिर्मिदनांचा शास्ता ढाळिल तो अश्रु मंत्रिवर आजी ।
जेणें अहा ! पुसावें ग्रीकांचें वृत्त होउनी राजी ॥ ५२ ॥
'अभिधान काय याचें ?' ' केलें रणिं शौर्य काय ?' 'कोण पिता ?' ।
परि हेक्टरापुढें त्यां पाहिल जर मान आज वांकवितां ॥ ५३ ॥
उचलोनी कर वरतीं प्रार्थिल अमरां खरेंच फिरफिरुनी ।
'आत्मा देहांतुनि मम लावा प्लूतोपुरास हांकलुनी ! ' ॥ ५४ ॥
हे जोव्ह ! हे मिनर्वे ! देव अपालो ! करा मला तरुण ।
तरुण तसा जेव्हां म्यां नेलें समरांत पिलिअनां निपुण ॥ ५५ ॥
जार्दनजलवलयांकित फीयापुरतट उभे सदा जेथ ।
सेलादन नद वाहे आर्केदिअनांस गांठिलें तेथ ॥ ५६ ॥
एरिइथोअसभूपें मेळविलें पूर्वि नाव ' यष्टिधर ' ।
कारण तो करि घेउनि लोहमयी यष्टि शत्रुसंहार ॥ ५७ ॥

नेणें धनु वा भाला. त्याचें घालून कवच समरशिरीं ।
एरियुथेलिअन निघे घेउन आह्मांविरुद्ध कामगिरी ॥ ९८ ॥
एरियुथेलिअनातें एरिइथोअसनृपालधृतकवच ।
*लाधे कैसें तें अज लोभानें वृत्त सर्व परिसाच ॥ ९९ ॥
एरिइथोअसभूपा लैकर्गस वधित करुनियां कपट ।
करित न बलें तया जित अडवित त्या स्थलिं अरुंद आणि बिकट॥६०॥
लोहाची तेथ गदा चुकवुं शकेना विनाश जीवाचा ।
शूलें कटींत वेधी लैकर्गस त्या न काढितां वाचा ॥ ६१ ॥
भूवरि एरिइथोअस पडुन उताणा समग्र आदळला ।
लैकर्गस मग वेगें हरि त्याच्या मार्सदत्त कवचाला ॥ ६२ ॥
लैकर्गसास आला मार्सासह समय युद्ध करण्याचा ।
तेव्हां निज तनु शोभवि चढवोनी याच रुचिर शुचि कवचा ॥ ६३ ॥
पहिलें वय रणिं दवडी पश्चिम वय दवडि हर्म्यवासांत ।
एरियुथेलिअना दे कवच ह्मणे ' गूण थोर दासांत ' ॥ ६४ ॥

---

* याप्रमाणें अस्त्रपरंपरा देण्याची वहिवाट रामायणांतही आढळून येते.

यं तस्मै प्रथमं प्रादादगस्त्योभगवान् ऋषिः ।
ब्रह्मदत्तं महद्बाणममोघं युधि वीर्यवान् ॥
ब्रह्मणा निर्मितं पूर्वमिंद्रार्थमामितौजसा ।
दत्तं सुरपतेः पूर्वं त्रिलोकजयकांक्षिणः ॥

इंद्राकरतां ब्रह्मदेवानें निर्माण केलेला बाण अगस्त्य ऋषीनें प्राप्त करून श्रीरामास कसा दिला तें यांत सांगितलेलें आहे.

त्या कवचा घालोनी एरियुथेलिअन कारित आव्हान ।
सर्वां शूरतमां; परि भीतीच्या त्याजिति वीर कंपा न ॥ ६५ ॥
धजला कोणि न पुढतीं. प्रोत्साहन देत धीट मन्मन तें ।
सर्वांत तरुण होतों मेळविलें परि रणांत अयश न तें ॥ ६६ ॥
हा लोभ मिनर्वेचा मारियलें म्यां प्रचण्ड वीरातें ।
दोन्हीं कुशींविरी तो लोळुन पसरीत वीर पायांतें ॥ ६७ ॥
तरुण तसा मी व्हावा, शक्ति असावी तशीच आज मज ।
आणि वाटे झगडावें धांवोनी हेक्तरापशीं सहज ॥ ६८ ॥
अखिल ग्रीकांमाजी कांहीं तरि शूर वीर असतांनां ।
तत्काल हेक्तरासह झगडाया कां उगाच ह्मणता ना ? " ॥ ६९ ॥
वृद्धाच्या उपदेशें, उठले नउ वीर त्यांतले सगळे ।
अगमेम्नन नृवर उठे मग दायोमीद थोर धैर्य बळें ॥ ७० ॥
धीरोद्धत सरसावति दोघे आजक्ष वीर भावळ ते ।
अन्य इदामिनिअस तो ज्याच्या परिचारकांहि बहु बळ तें॥ ७१ ॥
येत बरोबर तोही मार्सासीं तुल्य मेरिआनीस ।
एव्हीमनतनय निघे युरिपैलस योग्य पुरुष मदतीस ॥ ७२ ॥
आन्द्रीमनतनय दुजा, सज्ज तसा दिव्य नृवर युलिसीस ।
समरास हेक्तराशीं करण्या जे धरिति मनिं न भीतीस ॥ ७३ ॥
नेस्तर बोले " ठरवा सोडत काढुन रणीं कुणी जावें ।
ग्रीकांस तोच वाली जर तो युद्धांत अक्षत निभावे ॥ ७४ ॥
होइल मुदित तदात्मा." परिसुन वच हें क्षणांत सर्वजण ।

करिती खुणा चिठ्यांवर निजनामांची धरून आठवण ॥ ७५ ॥
अगमेम्ननाशिरकवचीं सर्व चिठ्या सावकाश घोळून ।
जन ऊर्ध्वहस्त विनविति अमरां; तेव्हां वदे कुणी उठुन ॥ ७६ ॥
" हे तात जोव्ह ! ऐकें, आजक्षाची चिठी निघो आता ।
अथ तैदिअससुताची, मिसिनीच्या नृपतिची बघूं जाता " ॥ ७७ ॥
नंतर नेस्तर हलवुन टाकि चिठ्या, तों निघे चिठी इष्ट ।
होती आजक्षाच्या नांवाची खूण जीवरी स्पष्ट ॥ ७८ ॥
मग भालदार हातीं घेवोनी दावितो चिठी सकलां ।
उजवे कडून जाई. जो तो माझी नव्हे असें वदला ॥ ७९॥
कटकीं फिरून त्या अज आजक्षाच्या अला समूर तदा ।
होती दिली जयानें नामाची आपुल्या चिठी भयदा ॥ ८० ॥
आजक्ष हात पसरी देइ चिठी भालदार करिं विनत ।
ओळखुनी निजनामा भूवर टाकुन चिठी वदे त्वरित ॥ ८१ ॥
" सुहृदानों आलें कीं माझें अज नाम सौख्य मज झालें ।
या हेक्तरास जिंकिन निश्चित, ऐसें मनांत मम आलें ॥ ८२ ॥
वीरोचित शस्त्रास्त्रें अंगीं घालीन तों तुह्मीं या हो ।
निमुटपणें अपल्याशीं जोव्हा सॅतर्नजा स्तवाया हो ॥ ८ ॥ ३
त्रोजन कर्णीं ह्मणजे स्तव नच जाईल हाच हेतु मनीं ।
ह्मटलें का अपुल्याशीं ? नाहीं ! अरडा ! मला न भीति जनीं ॥ ८४ ॥
माझी इच्छा नसतां मजला जिंकील कोण समरिं बलें ।
कोण ह्मणे मजलागीं शस्त्रास्त्र ज्ञान नच कधीं शिवलें ? ॥ ८५ ॥

कैसें होइल ऐसें ? बोला सेलामिसांत उपजून ।
झालें शिक्षण जेथें विद्या झाली वयासवें जून ? " ॥ ८६ ॥
सॅतर्नसंभवाचें जोव्हाचें करिति मग जन स्तवन ।
त्यांतून एक बोले लावुनियां दीर्घ नभपथीं नयन ॥ ८७ ॥
" हे तात ! इदानाथा ! जोव्हा बलवत्तमा सुकीर्तिकरा ।
उज्ज्वल यश पसराया आजक्षा जय मिळो रणीं नृवरा ॥ ८८ ॥
हेक्तरही जर अवडे, त्याची जर काळजी तुला वाटे ।
दोघां बल दे, यश दे, अक्षत दोघांस लाव कीं वाटे " ॥ ८९ ॥
ऐसा स्तव चाले तों होता आजक्ष सज्ज तनु करित ।
सन्नद्धकाय होतां मार्साची धांवला धरुन रीत ॥ ९० ॥
हृत्पीडाकर कलहा मांडाया जोव्ह पाठवी जेव्हां ।
बलवन्त् जगतिं धांवे मार्स असा रण करावया तेव्हां ॥ ९१ ॥
धांवे आजक्ष पुढें ग्रीकांचा स्तंभ जेविं धैर्याचा ।
पद लांब लांब टाकी हसतां किति उग्र चेहरा याचा ॥ ९२ ॥
दीर्घच्छाय करींचा भाला चमके बघून वीर असा ।
ग्रीकांस हर्ष वाटे, कंप भरे त्रोजनां तयांसरसा ॥ ९३ ॥
तत्काल हेक्तराचा जीव उरामाजि काय गलबलला ।
आव्हान यास करुनी लपणें अज फुकट ! काळ कठिण अला ॥९४॥
भिउनी कैसें होतें आला आजक्ष ढाल घेवोनी ।
केली जी गोंचर्मे एकावर एक सात लावोनी ॥ ९५ ॥
त्या श्रेष्ठ चर्मकारें याच्या करतां हिलास्थ तैकिअसें ।

तींतील लोक सारे निर्मितिनैपुण्य वानितिल न कसें? ॥ ९६ ॥
थर आठवा जियेवर पितळेचा सजत दीर्घ सर्वभरी ।
उचलुन ती ढाल करें गांठी आजक्ष हेक्तरा समरीं ॥ ९७ ॥
घाली धाक वचानें "आतां तूं गावलास हेक्तर हे! ।
आजि गांठ एकल्याची माझ्याशीं, समज रे मनीं तर हें! ॥ ९८ ॥
तुजला कळेल आले ग्रीकांचे वीर कवण जातीनें ।
अकिलीस त्यांत न गणीं, अरिभेदक, सिंहहृदय जो कृतिनें ॥ ९९ ॥
नौकेमाजी बसला अगमेम्ननन‍ृपतिवरतिं जो रुसुन ।
आह्मीं कसे पहा तूं, पुष्कळसे तुजाविरुद्ध लढुं उठुन ॥ १०० ॥
तें सर्व आज राहो करितों आरंभ आधिं रणकलहा" ।
परिसोनी वच, हेक्तर उत्तर दे यास मग महाबल हा ॥ १०१ ॥
"तेलामनतनया हे! सैन्याधीशा! विचार मनिं आण ।
वाटे का तुजला मीं गेलों लागून पोर निष्प्राण! ॥ १०२ ॥
मी का अबला कोणी कांहीं जी समरकृत्य जाणेना ।
रण घोर ठाउकें मज जाणें मी कापणें कशी सेना ॥ १०३ ॥
डावी उजवी बाजू रक्षितसें ढाल चिवट फिरवून ।
श्रमल्याविणें लढावें एकानें मींच या जगीं ह्मणुन ॥ १०४ ॥
अश्वारूढ अरीशीं चालवतों युद्ध घालुनी कवच ।
हा होय मार्समहिमा, कुशल फिरें रणिं वचास करुन वच ॥ १०५ ॥
चुकवुन नजर करावा वार तुला इच्छिलें असें कधिं न ।
शस्त्रप्रहार तुजला केला तर उघड सांगुनी करिन" ॥ १०६ ॥

ऐसें बोलुन फेंकी आजक्षावरतिं नीट निज भाला ।
पित्तलमय आच्छादन अष्टम अश्रान्त त्यावरी बसला ॥ १०७ ॥
रुतला गच्च तिथें तो. नंतर आजक्ष उचलुनी भाला ।
अरिच्या ढालीवरतीं मारी तो पार भेदुन निघाला ॥ १०८ ॥
कौशल्यरचित तुटलें कवच तसा आंत फाटला चोल ।
परि तो मरणा चुकवी तनुचा सांभाळुनी त्वरित तोल ॥ १०९ ॥
नंतर दोघे जण हे भाले काढून रणिं पुन्हां भिडले ।
मांसासक्त ह्मणावे सिंह जसे कीं वराह मस्त भले ॥ ११० ॥
रिपुच्या ढालीमाजी हेक्तर रोंवीत दीर्घ निज भाला ।
पित्तलमय फलकावर लागुन भग्नाग्र तो नच निभाला ॥ १११ ॥
घेउन आजक्ष उडी भाला ढालींत शत्रुच्या शिरवी ।
जातां पार निघुन तो, येतां धांवून शत्रुला अडवी ॥ ११२ ॥
झाली मान अरिची विद्ध तसें कृष्ण रुधिर ओघळलें ।
तेणें न हेक्तराचें अल्प हि समरांत धैर्य परि गळलें ॥ ११३ ॥
मागें सरुनी उचली वर्णें जो कृष्ण विषम फत्तर तो ।
आजक्षाच्या ढालीवरतीं मारीत उग्र हेक्तर तो ॥ ११४ ॥
लागे मध्यावरतीं फलक घुमे लागलाच पितळेचा ।
उचली आजक्ष करें, भार असे अधिक ज्या घन शिळेचा ॥ ११५ ॥
गरगर फिरवुन मारी खर्चुनियां आपुलें अमित बल तें ।
फुटली ढाल अरीची घरटाची पेढ लागली गमतें ॥ ११६ ॥
गुडघ्यातें क्षत पडलें वीर उताणा रणांगणीं पडला ।

ढालीवर आपटला धरित अपालो ह्मणोनियां उठला ॥ ११७ ॥
आले असते दोघे जवळी येऊन हातघाईला ।
सहजीं परस्परांला करते ते वार घेउनी असिला ॥ ११८ ॥
परि भालदार आले सुरनर ज्यां मान देति दूतांस ।
ग्रीकांतला इदीअस दुसरा त्रायस्थ तालथीबिअस ॥ ११९ ॥
मध्यें उभे रहाती दण्ड उभारून उभय सैन्यांत ।
नंतर इदीअसें वच केलें उपदेश पूर्ण तो ज्यांत ॥ १२०
"अजि लाडक्या मुलानों ! युद्ध पुरे तो पुरे अतां कलह ।
प्रीति करी दोघांवर तुह्मांवर जोव्ह जो जलदवाह ॥ १२१ ॥
विक्रान्त वीर तुह्मीं ऐसें जाणून सर्व आहोंत ।
यामा ही येत तिचा सर्वा अधिकार मान्य जगीं होत" ॥ १२२ ॥
आजक्ष देत उत्तर " वदवीं हे शब्द हेक्तराकडुन ।
जेणें आव्हान दिलें तेणें घ्यावी समाप्ति मागून ॥ १२३ ॥
मग मी मान्य करिन तें " प्रत्युत्तर हेक्तरें तया दिधलें ।
" कवण्या तरि देवानें दिधलें आजक्ष! तुजासिं जन्म भलें ॥ १२४ ॥
रूप दिलें, शक्ति दिली, तेविं दिलें गा बरें शहाणपण ॥
ग्रीकोत्तम तूं होसी चालविशी शूलहस्त घोर रण ॥ १२५ ॥
हा युद्धकलह घेऊं थांबवुनी आजच्या दिसा पुरता ।
युद्ध करूं मग तों जों सोडवि आम्हांस देव समररतां ॥ १२६ ॥
कोणा तरि येइल जय दोघे जाणून नीट आहोंत ।
यामा ही येत तिचा सर्वा अधिकार मान्य जगीं होत॥ १२७ ॥

ग्रीकां त्वां भेटावें जाउनियां आज नौसमूहांत ।
सुखवावे त्यातुनियां सहयोद्धे बालमित्र अभिजात ॥ १२८ ॥
मी त्रोजनांस सुखविन. सुखविन मी भेटुनी पुरंध्रींना ।
आयाबाया मिळवुन करिती स्तव ज्या मदर्थ बहु दीना ॥ १२९ ॥
कुलदेवतायत्नीं ह्या प्रायमनगरींतल्या पहा शिरती ।
राहो तें ! परि देऊं अन्योन्यां वस्तु सुचविण्या प्रीती ॥ १३० ॥
ग्रीक त्रोजन कोणी मागुन बोलेल, 'जीव तोडोनी
लढले वीर परंतु गेले स्नेहास अन्ति जोडोनी' " ॥ १३१ ॥
बोलुन हें त्या देई बहु सुन्दर रजतमुष्टि तलवार ।
म्यान बरोबर तीचें नकशीचा कमरबंद बहुभार ॥ १३२ ॥
आजक्षें कमरेचा पट्टा दिधला तयास लखलखित ।
नंतर दोघे स्वजनां भेटाया जात तेथुनी त्वरित ॥ १३३ ॥
ग्रीकां पहिला भेटे, भेटे त्या त्रोजनां तसा दुसरा ।
मोद त्रोजन पावति आला जीवन्त कुशल केविं घरा ॥ १३४ ॥
बलवान अजितविक्रम असुनी आजक्ष, हा कसा वांचे ।
नेती त्या नगरातें, नव्हती आशा, न काढिली वाचे ॥ १३५ ॥
ग्रीकांनीं आजक्षा नेलें अगमेम्ननाकडे मोदें ।
सॅतर्नजास तेव्हां तरुण बलीवर्द एक बलि तो दे ॥ १३६ ॥
मग चर्म काढल्यावरि आंत मसाला भरीत कापून ।
लघुमात्र खण्ड त्याचे शूलांवर सकल नीट रोंवून ॥ १३७ ॥
चतुरपणें भाजोनी घेती ते मांसखण्ड काढून ।

हें कार्य संपल्यावर करिती ते अन्न सिद्ध मग ऊन ॥ १३८ ॥
संतुष्ट जाहले जन अल्प उणें नाहिं मेजवानींत ।
पृष्ठास्थिदानपूर्वक आजक्षा एत्रिअसज वानीत ॥ १३९ ॥
इच्छा उरली नाहीं त्यांची मग भोजनीं तशी पानीं ।
त्यांतें करण्या नेस्तर रचितो उपदेश मधुर शब्दांनीं ॥ १४० ॥
पूर्वीपासुन उत्तम याचा उपदेश अनुभवा आला ।
विस्तारें करुनी तो चतुरपणें श्रेष्ठ बोलता झाला ॥ १४१ ॥
" हे एत्रिअसात्मज नृपते! ग्रीकांचे मुख्य मुख्य सरदार!
समरहत ग्रीकांचा मनिं आणा केवढा पडे भार ॥ १४२ ॥
स्कामन्दरोपकण्ठीं करुनि अहा पात घोर रुधिराचा ।
मार्सानें बहुवीरां दावियला पथ तमःप्रदेशाचा ॥ १४३ ॥
तेव्हां प्रभात होतां ग्रीकाचें समर थांबवून धरा ।
जमवा रथांत घाला सर्वशवें तेथ जवळ दहन करा ॥ १४४ ॥
ह्मणजे न्याया येतिल अस्थि मृतांच्या मुलांस द्यायाला ।
जाऊं जेव्हां अटपुन रण परतोनी अहो स्वदेशाला ॥ १४५ ॥
तैशी चितेसभोंवतिं सर्वांतें एक कबर बांधावी ।
बांधून उंच बुरुजां अमुच्या नौकांस बळकटी यावी ॥ १४६ ॥
ठेवावा दरवाजा एक तयांतून रथ सदा जावे ।
भोंताले खोल खणा खंदक ज्यांनीं अह्मांस राखावें ॥ १४७ ॥
नाहीं तर उद्धत हे त्रोजन धरतिल अह्मांस पेंचांत"।
उपदेश असा याचा ठसला परिपूर्ण नृपतिचित्तांत ॥ १४८ ॥

इकडे प्रायमभवनीं इलियमिं दरबार थोर किल्लयांत ।
त्रोजन भरविति तेथें झाला गोंगाट भीत लोकांत ॥ १४९ ॥
विस्तार करुनि त्यातें बोलतसे सुज्ञ अन्तिनार असा ।
" दार्देनिअन तुह्मी हो! त्रोजन हो! मित्र हो! वचा परिसा ॥१५०॥
अंतर्यामीं सांगे मन्मन तें सांगतों स्वकीयांस ।
+ धनसहिता हेलन द्या एत्रिअसाच्या विशुद्ध तनयांस ॥ १५१ ॥
विश्वासें तह केले, मोडोनी तेंहि युद्ध चालवलें ।
हित कैसें साधावें दिधलेलें वचन जर न पाळवलें " ? ॥ १५२ ॥
ऐसें बोलुन खालीं बसला तों उठत दिव्य पारिस तो ।
पति हेलनचा करितो परुषाक्षर वचन तप्त बहु दिसतो ॥ १५३ ॥
*" हे अन्तिनार मजला सुखद असें वच तुला न अज साधे ।

+ असाच उपदेश बिभीषणानें रावणास केला होता.

यावन्न सगजां साश्वां बहुरत्नसमाकुलाम् ।
पुरीं दारयते बाणैर्दीयतामस्य मैथिलीम् ॥ रामायण.

अर्थ:—जों गजांनीं, अश्वांनीं व बहुत रत्नांनीं संकुलित अशी लंका बाणांच्या योगानें **रामा**नें विध्वस्त केली नाहीं तोंच त्यास **मै**थिली देऊन टाका.

* रावणानें बिभीषणाला असेंच उत्तर दिलें आहे.

द्विधा भज्येयमप्येवं न नमेयंनुकस्यचित् ।
एष मे सहजो दोषः स्वभावो दुरतिक्रमः ॥ रामायण.

अर्थ:—एकवेळ माझे दोन तुकडे होतील परंतु मला कोणी बळानें वाकवितां मीं वांकणार नाहीं हा माझा जन्मसिद्ध दोष आहे. स्वभावाला बाबा औषध नाहीं, त्याला तूं काय करशील व मीं काय करूं !

मेनिलासानें रावणासारखा पराक्रम दाखविला नाहीं पण हट्टीपणा दाखविला हें खास.

जाणसि कैसें करणें, बरवें याहून बोधवच साधें ॥ १९४ ॥
परि जर आज खरोखर थट्टेचा हेतु यांत तव नाहीं ।
देवांनीं हरिली तव बुद्धि नसे यांत अनृत मुळिं कांहीं ॥ १९५ ॥
चल देतों मत माझें होवोनी त्रोजनां पुढें आतां ।
उघडपणें मीं कथितों नाहीं देणार आपुली कान्ता ॥ १९६ ॥
अर्गोसाहुनि हरिलें, संतोषें द्रव्य परत तें करिन ।
जरि पाहिजे तरी मी पदरांतिल भर बरीच घालीन" ॥ १९७ ॥
ऐसें भाषण करुनी पारिस खालीं बसे तया समया ।
दार्देनसतनय उठे प्रायम सुरसुज्ञ भूप बोलाया ॥ १९८ ॥
" दार्देनिअन तुह्मी हो! त्रोजन हो! मित्र हो! वचा परिसा ।
अंतर्यामीं सांगे मन्मन तो बोध आइका सहसा ॥ १९९ ॥
भोजन उरकुन आधीं स्वस्थानीं सर्व लोक दक्ष रहा ।
कटकीं रात्रिं पहारा ठेवाया काळजी बरीच वहा ॥ १६० ॥
झाली प्रभात ह्मणजे लावा नौकांकडे इदीअस तो ।
सांगेल एत्रिअसजां तो जें पारिस सभेंत आजि वदतो ॥ १६१ ॥
माजे तदर्थ रण हें. राहो तें. त्या वदा असे बोल ।
जाळूं मृतांस तोंवर थांबवितां काय समरकल्होल ॥ १६२ ॥
नंतर झगडूं फिरुनी जोंवर आम्हांस सोडविल दैव ।
दोघांतुन एकातें मिळतां जय कीर्ति राहिल सदैव" ॥ १६३ ॥
अवहित चित्तें सारे घेउन ऐकून जन तसें करिती ।
सेविति पुरिं जन भोजन करुन समूहां जशी तिथें रीती ॥ १६४ ॥

झाली प्रभात तेव्हां गेला नौकाकडे इदीअस तो ।
ग्रीकांस मार्सपुत्रां नृप नौकापृष्ठभागिं मग बघतो ॥ १६५ ॥
तेथें रणवीरांची भरली होती प्रचंड एक सभा ।
मग मधुरकण्ठ बोले मध्यें राहून भालदार उभा ॥ १६६ ॥
"हे एत्रिअसात्मज नृप हो ग्रीकांचे मुख्य मुख्य सरदार ।
प्रायममुख्य त्रोजन मजला आज्ञापिती अज उदार ॥ १६७ ॥
कीं सांग पारिसाचा ग्रीकां जर हा निरोप मानवला ।
लढलों यदर्थ आह्मीं, पारिस तो निश्चयांत नच ढळला ॥ १६८ ॥
तेणें धन जें अणिलें त्रायपुरीं तें करील तो परत ।
(आधींच कां न मेला पहिल्यानें परधनापहरणरत !) ॥ १६९ ॥
जरि पाहिजे तरी तो पदरांतिल भर बरीच घालील ।
परि मेनिलास भार्या देइल परतून तो न दुःशील ॥ १७० ॥
या त्रोजनांत एकहि नाहिं कुणी जो तदीय कृति वानी ।
अपुल्याकडून होइल तितकी केली शिकस्त सर्वांनीं ॥ १७१ ॥
मजला त्यांची आज्ञा आणिक संदेश नीट हा बोल ।
जाळूं मृतांस तोंवर थांबवितां काय समरकल्होल ? ॥ १७२ ॥
नंतर झगडूं फिरुनी जोंवर आह्मांस सोडविल दैव ।
दोघांतुन एकातें मिळतां जय कीर्ति राहिल सदैव " ॥ १७३ ॥
ऐसें भाषण परिसुनि आलें मूकत्व जणुं जनां सकलां ।
दायोमीद उठोनी त्यांतें रणशूर शेवटीं वदला ॥ १७४ ॥
" कोणीही घेउं नका पारिसधन वा तदीय हेलन ती ।

त्रोजनाविनाश जवळी हें जाणें बाल ही लहान अती" ॥ १७५ ॥
परिसुनि वचना ऐशा, आरोळी ग्रीक मारिती सारे ।
दायोमीद न होइल लोकां या कौतुकास्पद कसा रे !॥ १७६ ॥
अगमेम्नन नृपति वदे " ऐकियलें हें तुवां इदीअस रे ।
ग्रीकांचें मत कळलें ? कुठलें उत्तर अधीक युक्त बरें ? ॥ १७७ ॥
मानवतें हेंचि मला. आतां पुसतोस तूं मृतांविषयीं ।
वैषम्य मज न वाटे, जाळा त्यां जा खुशाल या समयीं ॥ १७८ ॥
* कैचें वैर शवांशीं भुवरि कुडच्या त्या निरर्थ असुरहित ! " ।
जोव्हा ! जूनोनाथा ! साक्ष तुझी या तहा करीं विहित" ॥१७९॥
ऐसें बोलुन उचलुन आकाशीं राजदण्ड वर करित ।
गेला परत इदीअस, पुण्यपथा इलियमा तदा त्वरित ॥ १८० ॥
दार्देनिअन त्रोजन बघताती वाट दूत कधिं येत ।
येउन संदेश कथी मध्यें मग तो उभा नृपसभेंत ॥ १८१ ॥
मग ते सज्ज जहाले दोन्हीं कार्यें करावयालागीं ।
कोणी शवांस नेती कोणी अणितात लांकडें जागीं ॥ १८२ ॥
ग्रीकहि नौकांतुनियां धांवति बाहेर ते दुजा भागीं ।
कोणी शवांस नेती कोणी अणितात लांकडें जागीं ॥ १८३ ॥
शान्त प्रशान्त सागर यज्जल हलतें गभीर त्यांतुन तो ।
आकाशीं रवि चढुनी स्वकरें अवनीतलास शोभवतो ॥ १८४ ॥

---

* मरणान्तानिच वैराणि । रामायण.

ग्रीक ट्रोजन पडले; राशिंत वळखे न शव कुणांचें तें ।
धूतां क्षतरुधिर जलें तप्ताश्रू गाळितां हृदय चेते ॥ १८५ ॥
रथिं घालतां शवांतें पावे संक्षोभ हृदय सर्वांचें ।
प्रायम आंवरि त्यांतें दुःखोद्गारा न काढिती वाचे ॥ १८६ ॥
रचिती शवें चितांवरि झालें जड हृदय बिकट समयाला ।
दहन करोनी त्यांचें गेले परतोन जन इलियमाला ॥ १८७ ॥
इकडे ग्रीक चितांवरि रचिति शवें क्षुब्धहृदय होऊन ।
दहन करोनी त्यांचें नौदेशा जाति सर्वही निघुन ॥ १८८ ॥
झाली प्रभात नाहीं, होता संधिप्रकाश तोंच भली ।
दहनस्थानापाशीं ग्रीकांची मंडळी फिरुन जमली ॥ १८९ ॥
रचिती विशाल तेथें साधारण एक कबर सर्वांस ।
भिंती अणि उंच बुरुज रचिती राखावयास नौकांस ॥ १९० ॥
मार्ग रथांतें होइल ऐशीं द्वारें तयांस हे करती ।
बाहेर थेर विस्तृत रुंद आणि खोल खंदकां खणती ॥ १९१ ॥
ठायीं ठायीं रचिती मेढींचा कोट चपल हस्तांनीं ।
ग्रीकांनीं श्रम केले निजबलरक्षार्थ दीर्घलोमांनीं ॥ १९२ ॥
हें मेघनाद जोव्हाजवळी सुर बसुन बघति कुतुकानें ।
अवनीकंपक तेव्हां बोले नेप्चून हळुच गर्वानें ॥ १९३ ॥
"हे जोव्ह आजपासुन विपुल धरेवरतिं मर्त्य एक तरी ।
मनिचें दुःख कथुनियां देवां प्रार्थील का अवश्य जरी? ॥ १९४ ॥
ही पाहिलीस कैशी ग्रीकांनीं आज दीर्घलोमांनीं ।

नौभागा राखाया, बांधियली भिंत केवढी यांनीं ? ॥ १९५ ॥
खणिला खंदक भोंवतिं शतमेधें पूजिल्याविणें अमरां ।
पसरेल यश तयांचें जेथें लाधे प्रवेश भानुकरां ॥ १९६ ॥
फीबस अणि मी श्रमुनी त्या लाओमीदनार्थ दोघांनीं ।
नगरा भोंवतिं रचिली विसरावी भिंत ती कशि जनांनीं ?" ॥१९७॥
घनवाह जोव्ह बोले "भूनें तुज पुढतिं नित्य कांपावें ।
ऐसा पराक्रमी तूं; तव मनिं पद भीति सांग कां पावे ॥ १९८ ॥
दुसरा अमरांपैकीं बाहुबलें जो तुझ्याहुनी कमती ।
येतां विचार हा मनिं जाता बहु गांगरून मंदमती ॥ १९९ ॥
पसरेल यश तुझें तें जेथें करिती प्रवेश भानुकर ।
राहो असेल जें तें जातिल हे ग्रीक साधण्यास घर ॥ २०० ॥
पाडुन भिंत तदा ही नेवोनी सागरांत बुडवावी ।
तीरीं वाळु भरावी; ग्रीकांची कीर्ति काय मग व्हावी"! ॥ २०१ ॥
ऐसें भाषण चाले, इकडे तों सूर्य जाय अस्तास ।
आरब्ध कार्य सरलें ग्रीकांचें; ते अले स्वस्थलास ॥ २०२ ॥
पटगृहिं वृषभ वधोनी घेती उरकून जन भोजनास ।
मदिरा घेउन आल्या नौका सोडून पूर लेम्नास ॥ २०३ ॥
तनय युनीअस झाला जेसननृपतीस हिप्सिपैल्युदरीं ।
धाडीत भेट मदिरा एत्रिअसात्मजनृपांस सौख्यकरी ॥ २०४ ॥
बन्धुद्वयार्थ होती मदिरा मापें सहस्त्र शेष परी ।
उरली ती ग्रीकांनीं देवोनी मोल घेतली सारी ॥ २०५ ॥

+ देती पित्तल कोणी कोणी लोखण्ड देति लखलखित ।
चर्म कुणी दास कुणी बैल कुणी व्हावया सुरासुखित ॥ २०६ ॥
अशि सज्जता करोनी आनंदें भोजनोत्सवा करितां ।
हे ग्रीक दीर्घकेशी सेविति सुख रात्रभर पितां खातां ॥ २०७ ॥
त्रोजन भोजन करिती इकडे घेऊन सर्व सहकारी ।
सुचवी अरिष्ट उभयां, जोव्ह करी मेघगर्जना भारी ॥ २०८ ॥
सकलां विवर्णता ये, पेल्यांतुन सोडिती सुरा खालीं ।
जोव्हास अर्पिल्याविण मदिरा प्याया न मंडळी धजली ॥ २०९ ॥
सकलश्रमपरिहारक निद्रा वर दिव्य लाधला जीवा ।
तत्सुख पडुनी सेविति, आलि निशा तींत गुंग हे किंवा ॥ २१० ॥

+ जेव्हां नाणें अस्तित्वांत नव्हतें तेव्हां एका पदार्थाबद्दल दुसरा देऊनच देवघेव करावी लागे.

